पहिली आवृत्ती : १९९५

© का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था, धुळे

मुखपृष्ठ : मनोज गांधलीकर

मूल्य : एकशे पन्नास रुपये

प्रकाशक : डॉ. प्रभाकर मांडे
मानद संचालक, का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था,
उन्नतिनगर, देवपूर, धुळे – ४२४ ००२

अक्षरजुळणी : का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था, धुळे

मुद्रणस्थळ : का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था, धुळे

का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था, धुळे
येथील आठवणींना

Scanned with OKEN Scanner

# ।। अनुक्रम ।।


× प्रकाशकीय / एक

× या पुस्तकासंबंधी थोडेसे / चार

१] संशोधन : स्वरूप व प्रयोजन / १

२] साहित्य संशोधनाचे प्रकार / १८

३] संशोधन प्रक्रिया / ५०

४] संशोधन पध्दती / ८९

५] पाठचिकित्सा व संहितासंपादन / १०४

६] मराठीतील काही संशोधक / १२४

७] प्रबंधाची, प्रबंधिकेची अंगोपांगे / १४९


**परिशिष्टे**


१] संदर्भ साहित्याची सूची / १५८

२] विषयसूची / १६१

३] डॉ. शरद राघव राणे : जीवनपट / १६५

४] डॉ. श. रा. राणे : लेखनसूची / १६७


Scanned with OKEN Scanner

# ।। अनुक्रम ।।

× प्रकाशकीय / एक
× या पुस्तकासंबंधी थोडेसे / चार
१] संशोधन : स्वरूप व प्रयोजन / १
२] साहित्य संशोधनाचे प्रकार / १८
३] संशोधन प्रक्रिया / ५०
४] संशोधन पध्दती / ८९
५] पाठचिकित्सा व संहितासंपादन / १०४
६] मराठीतील काही संशोधक / १२४
७] प्रबंधाची, प्रबंधिकेची अंगोपांगे / १४९
**परिशिष्टे**
१] संदर्भ साहित्याची सूची / १५८
२] विषयसूची / १६१
३] डॉ. शरद राघव राणे : जीवनपट / १६५
४] डॉ. श. रा. राणे : लेखनसूची / १६७

Scanned with OKEN Scanner

# प्रकाशकीय

का.स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था ही मराठी भाषा, वाङ्मय आणि संस्कृती या क्षेत्रात अध्ययन, अध्यापन आणि संशोधनाचे कार्य करणारी महाराष्ट्रातील या स्वरूपाची एकमेव संस्था आहे. अल्पावधीतच या संस्थेने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि शैक्षणिक क्षेत्रात स्थान प्राप्त करून लौकिक मिळविला आहे. कॅनडा येथे वास्तव्य करणारे प्रा. डॉ. जगन्नाथ वाणी यांनी त्यांच्या जन्मगावी धुळे येथे भरीव देणगी देऊन ही संशोधन संस्था सुरू केली. या कार्यात त्यांच्या कुटुंबीयांनीही त्यांना साथ दिली. अशा स्वरूपाची संस्था सुरू करण्यामागे कविवर्य वि.वा. उपाख्य तात्यासाहेब शिरवाडकर यांची प्रेरणा होती. धुळे शहरातील देवपूर भागात या संस्थेची भव्य वास्तू उभी आहे. संस्था स्वयंपूर्ण व स्वावलंबी व्हावी या उद्येशाने संस्थेत अद्यावत सुसज्ज अशी मुद्रणशाळाही आहे. या मुद्रणशाळेत मुद्रणतंत्र कला या पदविकेचे अभ्यासक्रम चालतात. मूलतः प्रगत अध्ययन केंद्राचे आणि संशोधन केंद्राचे स्वरूप असलेल्या या संस्थेत मराठी एम.ए. व एम. फिल् चे विशेष अभ्यासक्रम सुरू आहेत. विद्यार्थ्यांना संशोधनाची आवड निर्माण व्हावी आणि पदव्युत्तर तसेच संशोधन-पदवीचे अध्ययन प्रगत स्तरावर व्हावे या दृष्टीने अभ्यासक्रमांची आखणी करण्यात आली आहे. पुणे विद्यापीठ व उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ मान्यताप्राप्त या अभ्यासक्रमांसाठी महाराष्ट्राच्या निरनिराळ्या विभागांतून विद्यार्थी येतात.

महाविद्यालयीन स्तरावर अध्यापन करणाऱ्या अध्यापकास संशोधनाची आवड असावी अशी साधारणपणे अपेक्षा असते. महाविद्यालयातील अध्यापक संशोधक-अभ्यासक असावा अशीच विद्यापीठ अनुदान मंडळाचीही धारणा आहे. उच्च शिक्षणाशी संबंधित अध्यापकांना निरनिराळ्या शोध-प्रकल्पांसाठी अनुदान देण्याची व त्याद्वारे प्रोत्साहन देण्याची अनुदान मंडळाची योजना असण्यामागे हीच धारणा प्रबळ असल्याचे दिसते. महाविद्यालयीन अध्यापकांची निवड करताना संशोधन-पदवीप्राप्त उमेदवारांना प्राधान्य देण्यामागेही हीच दृष्टी असते.

अलीकडच्या काळात महाविद्यालयातील अध्यापकांसाठी विद्यापीठ अनुदान मंडळाने किमान अर्हता निश्चित केली आहे. त्यानुसार नेट, सेट परीक्षा उत्तीर्ण असणे अनिवार्य करण्यात आले आहे. संशोधन-पदवीकडे त्यामुळे नकळत दुर्लक्ष झाले आहे-होत आहे. परिणामस्वरूप संशोधन-पदवीकडील अभ्यासक-विद्यार्थ्यांचा ओढा कमी झाल्याचे दिसते. असे असले तरी का.स.वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्थेत संशोधन छात्रांसाठी एम. फिल् चे वर्ग नेटाने चालवण्यात येत आहेत.

संस्थेचे मुखपत्र असलेले 'आमची श्रीवाणी' हे नियतकालिक अल्पावधीत मान्यताप्राप्त झाले आहे. प्रत्येक अंकास एका स्वतंत्र ग्रंथाचा दर्जा असतो. त्याशिवाय संस्थेचा स्वतंत्र प्रकाशन-विभाग आहे. संस्थेच्या वतीने संदर्भमूल्य असलेले ग्रंथ प्रकाशित केले जातात. हैद्राबाद येथील ख्यातनाम संशोधक डॉ. श्री. रं. कुलकर्णी यांनी लिहिलेले मौलिक ग्रंथ संस्थेने प्रसिद्ध केले आहेत. डॉ. रमेश सूर्यवंशी यांनी सिद्ध केलेला अहिराणी बोलीचा शब्दकोश प्रकाशनाच्या मार्गावर आहे.

महाराष्ट्रातील मान्यवर, अनुभवी तज्ज्ञ, अभ्यासक-संशोधकांच्या अध्ययनाचा व व्यासंगाचा लाभ संस्था प्रारंभापासूनच घेत आहे. संस्थेतील विद्यार्थ्यांना, संशोधन-छात्रांना त्यांच्या अध्यापनाचा तसेच संशोधन-मार्गदर्शनाचा लाभ होत आहे. प्रा. डॉ. श.रा. राणे हे एक समीक्षक-लेखक म्हणून महाराष्ट्राला परिचित आहेत. एक सौजन्यशील, सहृदय, व्यासंगी प्राध्यापक अशी त्यांची प्रतिमा आहे. का.स.वाणी प्रगत अध्ययन संस्थेच्या स्थापनेपासूनच ते संस्थेशी संलग्न आहेत. त्यांच्या अध्यापनाचा व मार्गदर्शनाचा लाभ येथील विद्यार्थ्यांना होत आहे.

डॉ. श.रा. राणे यांचे समीक्षाग्रंथ प्रसिद्ध आहेत. ते केवळ एक मान्यताप्राप्त समीक्षक नाहीत तर ललित लेखकही आहेत. त्यांनी अनेक ललित लेख लिहिले आहेत, त्यांच्या काही बाल कादंबऱ्याही प्रकाशित झाल्या आहेत. नवसाक्षर प्रौढांसाठीही त्यांनी लेखन केले आहे. ग्रंथाच्या शेवटी दिलेल्या लेखनसूचीवरून त्यांच्या एकूण प्रकाशित लेखनाचे स्वरूप लक्षात येऊ शकेल. डॉ. राणे यांनी संस्थेत गेली काही वर्षे एम्. फिल्. या संशोधन-पदवीसाठी अध्ययन करणाऱ्या



विद्यार्थ्यांना 'संशोधन-पद्धती' या विषयाचे अध्यापन केले. त्यांच्या मार्गदर्शनानुसार संशोधन-लेखन करून अनेक विद्यार्थ्यांनी लघुशोध प्रबंध यशस्वीपणे पूर्ण करून पदव्या मिळविल्या. पीएच्.डी. पदवीसाठी संशोधन करणाऱ्या संशोधक-छात्रांनाही त्यांनी मार्गदर्शन केले आहे. त्यांच्या अनुभवाचा-व्यासंगाचा व संशोधन दृष्टीचा लाभ महाराष्ट्रातील संशोधन करणाऱ्या सर्व अभ्यासकांना व्हावा या हेतूने संस्थेने त्यांना 'मराठी संशोधनः स्वरूप व दिशा' हा ग्रंथ लिहिण्याची विनंती केली. संस्थेच्या विनंतीला मान देऊन डॉ. राणे यांनी अत्यंत अभ्यासपूर्ण असा संशोधकांना मार्गदर्शक ठरणारा ग्रंथ सिद्ध केला, त्याबद्दल संस्था त्यांची ऋणी आहे.

डॉ. श. रा. राणे यांनी लिहिलेल्या या ग्रंथाचा लाभ संशोधन-लेखन करणाऱ्यांना विशेषतः संशोधन-पदवीसाठी अध्ययन करणाऱ्या संशोधक-छात्रांना निश्चितपणे होईल असा विश्वास वाटतो.

**प्रा. डॉ. प्रभाकर मांडे**
मानद संचालक,
का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था,
देवपूर, धुळे.

# या पुस्तकासंबंधी थोडेसे

एम्. फिल्. व पीएच्. डी. च्या विद्यार्थ्यांनी संशोधनाच्या संदर्भात लिहिलेला मजकूर वाचल्यानंतर असे निदर्शनास आले की, साहित्यसंशोधनासाठी जे लेखन केले जाते, ते विशिष्ट पध्दतीचे, म्हणजे शास्त्रीय स्वरूपाचे असते, याची जाणीव अनेक विद्यार्थ्यांना नसते. एम्. फिल्. च्या अभ्यासक्रमात 'संशोधन पध्दती' ची एक प्रश्नपत्रिका असते. या प्रश्नपत्रिकेत ज्या विद्यार्थ्याला खूप गुण मिळाले आहेत असा विद्यार्थीदेखील प्रबंधिकेचे लेखन करताना संशोधनासंबंधीच्या एकूण सर्वच संकल्पना बाजूला ठेवून त्याच्या पध्दतीने संशोधनबाह्य लेखन करीत असतो. संशोधन हे एक शास्त्र असते; त्याचे काही प्रकार असतात; त्याची विशिष्ट प्रक्रिया असते; त्यात अभ्युपगमनिश्चितीला महत्त्व असते आणि संशोधनाच्या विषयाला अनुलक्षून विशिष्ट संशोधनपध्दती असते, या सर्व गोष्टींची संशोधकाला जाणीव नसल्यामुळे मराठीचे संशोधन दर्जेदार होत नसल्याबद्दल वृत्तपत्रांतून अनेकदा लिहिले जाते. मराठी साहित्याचे संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांनी संशोधन करण्यापूर्वी संशोधनाचे स्वरूप जर काळजीपूर्वक समजून घेतले तर त्यांच्या संशोधनाला निश्चित दर्जा प्राप्त होऊ शकेल, असा आत्मविश्वास हे पुस्तक अभ्यासकांच्या हाती देताना मला वाटत आहे.

संशोधनासंबंधीची प्रश्नपत्रिका शिकविताना अशा प्रकारचे पुस्तक मी प्रसिध्द करावे असा आग्रह अनेक विद्यार्थ्यांचा होता. तसे पाहिले तर



डॉ. वसंत स. जोशी यांनी पुण्याच्या महाराष्ट्र साहित्य परिषदेसाठी 'भाषा व साहित्य : संशोधन' या नावाने संपादित केलेले तीन खंड, डॉ. दु. का. संत यांचे 'शोधविज्ञानकोश' आणि 'संशोधन : पध्दती, प्रक्रिया व अंतरंग' हे दोन ग्रंथ, डॉ. सु. रा. चुनेकर यांनी संपादित केलेले 'संशोधन : स्वरूप व पध्दती' हे पुस्तक , डॉ. पु. ल. भांडारकर यांचे 'सामाजिक संशोधन पध्दती' व डॉ. श्री. रं. कुलकर्णी यांचे 'प्राचीन मराठी हस्तलिखिते: संशोधन आणि संपादन' हे पुस्तक वगैरे अनेक पुस्तके मराठी साहित्यसंशोधन करणाऱ्यांना उपयुक्त अशीच आहेत. हे पुस्तक लिहिताना हे ग्रंथ याशिवाय सूचित निर्दिष्ट केलेल्या ग्रंथांचे व लेखांचे मला साह्य झाले आहे. त्या सर्वांचे ऋण मला प्रथमतः मान्य केलेच पाहिजे.

या पुस्तकाची हस्तलिखित प्रत वाचल्यावर आमचे एक मित्र म्हणाले की, हे पुस्तक वाचल्यावर संशोधन करण्याची प्रेरणा कुणालाही मिळू शकेल. त्यांच्या या उद्गारात फार मोठा अर्थ असला तरी 'कुणालाही' प्रेरणा मिळण्यापेक्षा मराठी साहित्यात 'संशोधन करणाऱ्यांना' जर प्रेरणा मिळाली व दिशा गवसली तर मला धन्यता वाटेल.

का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था, धुळे येथे अध्यापन करीत असताना अनेकांचा सहवास मला प्रेरक व प्रोत्साहक ठरला. त्यात प्रामुख्याने संस्थापक डॉ. जगन्नाथ वाणी, प्रा. गो. म. कुलकर्णी, प्रा. वसंत दावतर, डॉ. रमेश वरखेडे, डॉ. चंद्रकांत वर्तक, डॉ. मु. ब. शहा, डॉ. म. रा. जोशी, डॉ. र. रा. गोसावी, डॉ. प्रभाकर मांडे, प्रा. म. सु. खैरनार, प्रा. पुं. म. चित्ते व सौ. मंगला वरखेडे यांचा अवश्य उल्लेख केला पाहिजे.

अलीकडे डोळ्यांचा त्रास सुरू झाल्यामुळे मला स्वतः या पुस्तकाचे लेखन करणे शक्य नव्हते. लेखनिकेचे काम माझी पत्नी सौ. वत्सला हिने जसे जमेल तसे आणि जेव्हा वेळ मिळेल तेव्हा करून जीवनप्रवासाप्रमाणे माझ्या लेखनप्रवासातही मला मोठ्या आनंदाने साथ दिली. मुद्रणपत डॉ. नसीम देशमुख, प्रा. मनोहर जाधव व प्रा. शालिनी नारखेडे या माझ्या विद्यार्थ्यांनी, त्याचप्रमाणे धनाजी नाना महाविद्यालयातील भूगोलाचे प्रा. नंदकुमार भंगाळे यांनी करून दिली त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.



Scanned with OKEN Scanner

परिशिष्टातील सूचीचा मजकूर धनाजी नाना महाविद्यालयातील ग्रंथपाल श्री. गंगाधर पाटील व सौ. वत्सला यांनी तयार केला त्याबद्दल त्यांचे आभार मानणे मी माझे कर्तव्य समजतो.

दि. ११–११–१९९४ रोजी माझ्या वयाला साठ वर्षे पूर्ण होत असून त्यादिवशी मी माझ्या सेवेतून निवृत्त होणार आहे, असे माझ्या अनेक विद्यार्थ्यांच्या व चाहत्यांच्या निदर्शनास आल्यावर त्या संदर्भात एक 'सत्कार समिती' निर्माण करून त्या निमित्ताने एक 'स्मृतिग्रंथ' प्रसिध्द करावा अशी कल्पना काहींनी मांडली. परंतु 'स्मृतिग्रंथ', 'सत्कार समिती' वगैरे कल्पनाच मला पसंत नसल्याचे मी त्यांना सांगितल्यावर, निदान माझा जीवनपट व माझ्या समग्र लेखनाची सूची देऊन, 'मराठी साहित्यसंशोधन : स्वरूप आणि दिशा' या पुस्तकाचे तरी षष्ट्यब्दीपूर्तीनिमित्त प्रकाशन करावे, अशी कल्पना काहींनी मांडली. या पुस्तकाची हस्तलिखित प्रत वाचून, 'मराठी विषयात संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना हे पुस्तक उपयुक्त असल्यामुळे ते अवश्य प्रसिध्द करावे' अशी शिफारस डॉ. सदानंद मोरे यांनी केली. हे पुस्तक प्रसिध्द होणे आवश्यक आहे असे मलाही वाटत होते, म्हणून मी त्यांच्या कल्पनेला दुजोरा दिला. तिला मूर्तस्वरूप का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्थेच्या संस्थाचालकांनी हे पुस्तक प्रसिध्द करून प्राप्त करून दिले, त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे.

डॉ. प्रभाकर मांडे यांचे या पुस्तकाला 'प्रकाशकीय' लाभले, हे मी माझे फार मोठे भाग्य समजतो.

आकर्षक मुखपृष्ठ, सुबक छपाई व एकूणच पुस्तकाचे देखणेपण यात चित्रकार मनोज गांधलीकर यांचा व का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्थेच्या मुद्रण विभागातील सहकारी मित्रांचा फार मोठा वाटा असल्यामुळे त्यांचेही आभार.

**डॉ. श. रा. राणे**
'अक्षर', उपासना सहनिवास
फैजपूर – ४२५ ५०३



# १ : संशोधन : स्वरूप व प्रयोजन

'रिसर्च' या इंग्रजी शब्दासाठी 'संशोधन' हा शब्द वापरला जातो. 'सर्च' म्हणजे शोधन. 'रिसर्च' म्हणजे पुनः केलेले शोधन. शोधन हे एक प्रकारचे 'मूल्यांकन' असते. म्हणून 'पुनः केलेले शोधन' या शब्दसमुदायासाठी 'पुनर्मूल्यांकन' हा शब्द वापरता येईल. विविध क्षेत्रांत संशोधन सुरू असते. भौतिक शास्त्रे, सामाजिक शास्त्रे आणि साहित्य या तीनही क्षेत्रांत संशोधन केले जाते. ही तीनही क्षेत्रे भिन्नभिन्न स्वरूपाची आहेत. त्यांच्यांत प्रकृतिभेद आहे. यामुळे या क्षेत्रांतील संशोधनाच्या स्वरूपात आणि पध्दतीतही फरक आहे. असे जरी असले तरी संशोधनाची एक मूलभूत अशी शास्त्रीय पध्दती आहे. क्षेत्र कोणतेही असो संशोधकाला या शास्त्रीय पध्दतीचाच अवलंब करावा लागतो. म्हणून संशोधन या शब्दाच्या अर्थासंबंधी असे म्हणता येईल की, संशोधन हा एक शास्त्रीय पध्दतीचा अवलंब करून बुध्दिनिष्ठ आणि व्यावहारिक अशा प्रश्नांची उत्तरे शोधून काढण्याचा एक प्रयत्न असतो. तथ्ये शोधण्यासाठी केलेले ते एक परीक्षण असते.

## [क] संशोधनशास्त्र : विविध व्याख्या व स्वरूप

पुढे संशोधनासंबंधीच्या काही व्याख्या दिल्या आहेत. त्यांवरून संशोधनाच्या स्वरूपाविषयी कल्पना येऊ शकेल.

१] संशोधन म्हणजे कोणत्याही ज्ञानशाखेत नवीन तत्त्वे अथवा तथ्ये शोधण्यासाठी आणि जुनी तथ्ये व तत्त्वे परीक्षण्यासाठी केलेला चिकित्सक व पध्दतशीर अभ्यास.



Scanned with OKEN Scanner

२] संशोधन म्हणजे अभ्यासपूर्ण रीतीने केलेली एक चौकशी असते. चिकित्सकपणे सर्वकषपध्दतीने केलेली ती एक पाहणी असते. त्यात प्रयोगशीलता असते. नव्याने प्रकाशात आलेल्या घटनांच्या प्रकाशात लोकमान्य घटनांचा पुनर्विचार करण्याचे उद्दिष्ट या पाहणीच्या मुळाशी असते.

३] एखाद्या विशिष्ट विषयासंबंधी विशिष्ट उद्देश मनात धरून आवश्यक ती माहिती मिळविण्याचा साक्षेपी व पध्दतशीर प्रयत्न म्हणजे संशोधन.

वरील व्याख्यांवरून सहज लक्षात येते की, संशोधनात नवीन तथ्ये शोधण्याचा प्रयत्न असतो. हा प्रयत्न म्हणजे विशिष्ट उद्देश मनात धरून चिकित्सकपणे केलेली पाहणी असते.

संशोधन हे मूलतः एक शास्त्र आहे. त्याची मूलभूत अशी शास्त्रीय पध्दती आहे. या पध्दतीचा अवलंब संशोधकाला– मग ते कोणतेही क्षेत्र असो–पायाभूत म्हणून करावाच लागतो. या शास्त्रीय पध्दतीला विमर्शक विचारपध्दती असेही म्हणतात. या पध्दतीच्या पाच पायऱ्या मानण्यात येतात. जॉन ड्युई यांनी विचारक्रियेच्या ह्या पायऱ्या सांगितल्या आहेत. या पाच पायऱ्यांत टी.एल्. केली यांनी सहाव्या पायरीची भर घातली. या विचारक्रियेला यामुळे 'डयूई–केली स्टेप्स' असे म्हणतात. ह्या पायऱ्या पुढिलप्रमाणे आहेत :

**१] शंका उपस्थित होणे**

कोणत्याही व्यवहारात शंका उपस्थित होणे ही पहिली पायरी असते. संशोधनाचा प्रारंभच मुळी प्रश्न निर्माण होण्यापासून होतो. त्याचा शेवट जिथे त्या प्रश्नाचे उत्तर मिळते त्या ठिकाणी होतो. संशोधन ही एक अखंड प्रक्रिया असते. प्रश्न कसा निर्माण झाला, उत्तरे कशी मिळत गेली, उत्तरे कशी चुकत गेली, ती कशी सुधारत गेली, शेवटी निष्कर्षापर्यंत कसे येता आले; हा संशोधनातील महत्त्वाचा भाग असतो. संशोधकाच्या मनात जी शंका निर्माण होते तिच्याने तो झपाटला जातो. त्याच्या आंतरिक शक्तीने निर्माण झालेल्या समस्येचा तो शोध घेण्याचा प्रयत्न करीत असतो. समस्या



सुटल्यानंतर संशोधकाला जो आनंद होतो तो अलौकिक स्वरूपाचा असतो.

**२] शंकेचे स्वरूप व समस्या**

मनात प्रश्न निर्माण झाल्यानंतर किंवा शंका उपस्थित झाल्यानंतर त्या प्रश्नाचे किंवा शंकेचे स्वरूप ओळखणे ही दुसरी पायरी असते. शंकेचे स्वरूप निश्चित झाल्यानंतर मनात समस्या निर्माण होते. त्या समस्येचे निश्चित स्वरूप जाणून घ्यावे लागते.

**३] समस्येच्या सोडवणुकीसाठी गृहितकृत्य**

ही समस्या कशी सोडवता येईल, याचा विचार तिसऱ्या पायरीवर करावा लागतो. यासाठी अंदाज बांधावा लागतो. म्हणजे समस्येच्या सोडवणुकीसाठी कोणती उपाययोजना करावी लागेल याचा विचार करावा लागतो. म्हणजे कोणतीतरी गृहितकल्पना [हायपॉथेसिस] निश्चित करावी लागते. 'गृहितकल्पना' या शब्दाऐवजी 'अनुमान', 'परिकल्पना', 'गृहितकृत्य', 'उपकल्पना', 'अभ्युपगम' इत्यादी अन्य पारिभाषिक शब्दही वापरले जातात. कोणत्याही संशोधनात गृहितकल्पना ठरविणे अतिशय महत्त्वाचे असते. पुष्कळसे संशोधन, विशेषतः साहित्यक्षेत्रातील संशोधन गृहितकल्पना निश्चित न करताच केलेले असते. गृहितकल्पना माहीत नसणारे मार्गदर्शक व अभ्यासकही पुष्कळ असतात. अशांनी केलेले संशोधन हे संशोधन नसते, तर केवळ माहितीचे संकलन असते किंवा जुजबी परीक्षण असते.

प्रारंभिक ज्ञानाच्या आधारे अभ्यासक आपल्या विषयासंबंधी कोणतेतरी अनुमान मनाशी योजतो. हे अनुमान अभ्यासाची दिशा ठरविण्यास मदत करते. हे अनुमान काल्पनिक असू शकते. अभ्यास, अनुभव आणि चिंतन यांमुळे अनुमान करता येते. उदा. आपणास डॉक्टर भालचंद्र नेमाडे यांच्या कादंबऱ्यांचा अभ्यास करावयाचा आहे. खूप विचार करून आपण पुढील गृहितकृत्य निश्चित केले की, 'कोसला ही कादंबरी मराठी कादंबरीतील मैलाचा दगड आहे.' अशावेळी आपणास 'कोसला' पूर्वीच्या मराठी कादंबरीसंबंधी माहिती मिळवावी लागेल. पुरावे गोळा करावे लागतील. 'कोसला'त नवीन वळण देणारे असे काय आहे, याचा शोध घ्यावा लागेल.



Scanned with OKEN Scanner

अभ्यासाच्या शेवटी हे गृहितकृत्य बरोबर आहे किंवा नाही यासंबंधी शोध घ्यावा लागेल.

गृहितकृत्य हे स्पष्ट व निश्चित असावे लागते. आपल्यासमोर ज्या समस्या निर्माण होतात त्याचे ते पर्यायी उत्तर असते. गृहितकृत्याची मांडणी सैल असू नये. गृहितकृत्याला सैध्दांतिक चौकट असली पाहिजे. काही एक घटक असलेली गृहितकृत्ये सरळ असतात, तर अनेक घटक असलेली गृहितकृत्ये मिश्रित असतात. गृहितकृत्यामुळे संशोधन केंद्रितस्वरूपाचे होते. त्यामुळे निष्कर्ष शोधणे सुलभ होते. गृहितकृत्य शोधून काढणे हे संशोधनात नैपुण्याचे लक्षण असते. शास्त्रीय पध्दतीचा तो एक अपरिहार्य भाग असतो.

**४] गृहितकृत्याचे परिणाम शोधणे**

सुचलेल्या गृहितकल्पनेचे काय परिणाम होतील ह्याविषयीचा विचार या पायरीत येतो. निष्कर्ष देण्याचा व स्पष्टीकरण करण्याचा भाग या ठिकाणी प्रामुख्याने असतो.

**५] गृहितकल्पनेचा स्वीकार किंवा नकार**

जे गृहितकृत्य ठरविले असेल त्याप्रमाणे निष्कर्ष येतात किंवा नाहीत याचा विचार या पायरीत अभिप्रेत असतो. गृहितकृत्य स्वीकारायचे की नाकारायचे याचा निर्णय यावेळी घ्यावा लागतो. पुष्कळदा नवीन गृहितकृत्य शोधावे लागते. तसे पाहिले तर हा एक प्रयोगाचाच भाग असतो.

**६] निष्कर्ष मांडणे**

शेवटच्या पायरीत समस्येच्या सोडवणुकीसाठी कोणता परिणामकारक उपाय हाती लागतो तो निष्कर्षरूपाने मांडावा लागतो.

## [ख] संशोधनाची प्रयोजने

संशोधनाचा उपयोग काय, असा प्रश्न पुष्कळदा उपस्थित केला जातो. ज्यांच्या अंगी संशोधनाची कुवत नसते असे लोक असला प्रश्न उपस्थित करतात. संशोधनाची तात्कालिक उपयुक्तता विशद करता येणार नाही. संशोधनाची उपयुक्तता ही दूरगामी असते. विज्ञान क्षेत्र, सामाजिक क्षेत्र



आणि साहित्य क्षेत्र या तीनही क्षेत्रांत संशोधन सुरू असते. त्या त्या क्षेत्राचे वैशिष्ट्य वेगवेगळे आहे, त्यामुळे त्याचे स्वरूपही वेगवेगळे आहे आणि त्याचे प्रयोजनही वेगवेगळे आहे. प्रत्येक क्षेत्रातील संशोधनाची उपयुक्तता त्या त्या क्षेत्राला असतेच. क्षेत्रपरत्वे प्रयोजनभिन्नता असते असे म्हणावयास हरकत नसली, तरी ज्ञानात नवीन भर घालणे हे कोणत्याही संशोधनाचे महत्त्वाचे प्रयोजन असते. आत्मिक समाधानाचा भाग कोणत्याही संशोधनात असतो. संशोधनप्रकल्प पूर्ण केल्यानंतर होणारा आनंद हा केवळ आनंद नसतो तर परमानंद असतो. हा आनंद प्राप्त झाल्यानंतर संशोधकाला जे आत्मिक समाधान होते त्याचे स्वरूप संशोधकाशिवाय इतरांना कळू शकणार नाही. समस्याव्यूहातून निष्कर्षाप्रत पोचल्याचा तो आनंद असतो.

मानवी जीवन संशोधनामुळे संपन्न करणे, असेही एक प्रयोजन संशोधनाचे सांगितले जात असले तरी संशोधनात व्यावहारिक हेतू असतो, हेही आपणास नाकारता येणार नाही. विद्यापीठ अनुदान मंडळाच्या सेवानियमांची पूर्तता करण्यासाठी पुष्कळदा विद्यापीठीय संशोधन हाती घेतले जाते, ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. या पूर्ततेमुळे अर्थलाभ होतो, वेतनवाढ होते, व्यावहारिक स्थिरता येते, शिक्षणक्षेत्रात यश मिळते व कीर्ती मिळते हे सर्व खरे असले तरी ही सर्व प्रयोजने विकृतिजन्य आहेत. ज्ञानप्राप्तीचा हेतू अशा संशोधनात नसतो. प्रबंधलेखनाच्या निमित्ताने केलेले असे संशोधन हे प्रारंभीचे आणि शेवटचे ठरत असते. त्यात कोणत्याही प्रकारचे सातत्य नसते.

विद्यापीठात चालणारे संशोधन आणि विद्यापीठाबाहेर चालणारे संशोधन असे दोन प्रकारचे संशोधन आपणास दिसून येते. विद्यापीठात चालणारे बरेचसे संशोधन हे जिज्ञासेतून किंवा स्वयंप्रेरणेतून निर्माण झालेले नसते. व्यावसायिक प्रेरणा त्यामागे असते. हे संशोधन पुष्कळदा पोटार्थी संशोधन असते. अपप्रवृत्तीतून जन्माला आलेले असे व्याजसंशोधन हे खरे संशोधन नसते. त्या संशोधनात गुणात्मक कस कमी असतो. केवळ ज्ञानप्राप्तीच्या हेतूतून विद्यापीठाबाहेर चालणारे संशोधन पुष्कळदा खरेखुरे संशोधन असते.

विद्यापीठातील साहित्यक्षेत्रातील संशोधन म्हणजे पुष्कळदा केवळ संकलन असते किंवा वैचारिक निबंधलेखन असते. अनुपलब्ध आहे ते उपलब्ध करून देणे, त्यावर संपादनाचे संस्कार घडवून संकलन करून व पाठचिकित्साशास्त्राच्या साहाय्याने प्राचीन साहित्याची अभ्यासपूर्ण आवृत्ती तयार करणे, हे प्राचीन साहित्याच्या संशोधनाचे प्रयोजन असते. अर्थसौंदर्य, भावनात्मक सृष्टी, शब्दरूप आविष्कार, अनुभवाची श्रेष्ठता आणि लेखकाची नवनिर्माणक्षमता यांचा शोध घेणे हे आधुनिक साहित्याच्या संशोधनाचे प्रयोजन असते.

संशोधनाची प्रयोजने अनेक स्वरूपाची असू शकतात. ती संशोधक सापेक्ष आहेत, तशीच संशोधनविषयसापेक्ष आहेत. 'प्राचीन मराठी हस्तलिखिते : संशोधन आणि संपादन' या पुस्तकात डॉ. श्री. रं. कुळकर्णी संशोधनाच्या प्रयोजनासंबंधी म्हणतात, ''इतिहासजमा झालेल्या संकेतादिकांचे स्पष्टीकरण करून भूतकालीन जीवन वर्तमानाच्या आकलनक्षेत्रात आणून सोडणे हे संशोधनाचे प्रयोजन असते.'' [पृष्ठ ३४] ग्रंथ कोणत्याही काळातील असो, समकालीन सामाजिक व सांस्कृतिक जीवन आणि साहित्यविषयक धारणा या ना त्या रूपात त्या ग्रंथात प्रतिबिंबित झालेल्या असतात. त्यांचा शोध घेणे महत्त्वाचे असते, असे प्रतिपादन डॉक्टर कुळकर्णी करतात.

शेवटी असेच म्हणता येईल की, संशोधनाची प्रयोजने ही संशोधकसापेक्ष व संशोधनविषयसापेक्ष आहेत.

## [ग] तात्त्विक व उपयोजित संशोधन

काही विशिष्ट प्रकारच्या संशोधनात काही मूलभूत प्रश्न विचारात घेतले जातात. हे प्रश्न तात्त्विक स्वरूपाचे असतात. अशा प्रकारच्या संशोधनाला उपयुक्ततेचे निकष लावता येत नाहीत. उपयुक्ततावादी संशोधनाला 'अप्लाईड रिसर्च' किंवा 'प्रॅक्टिकल रिसर्च' असे इंग्रजीत म्हणतात. उपयुक्ततेचे किंवा अवलंबनाचे निकष ज्या संशोधनाला लावता येत नाहीत अशा संशोधनाला 'विशुध्द संशोधन', 'मौलिक संशोधन' आणि 'तात्त्विक संशोधन' ह्या तीन पारिभाषिक संज्ञा वापरतात. इंग्रजीत



या शब्दांसाठी 'प्यूअर रिसर्च' किंवा 'फंडामेंटल रिसर्च' हे शब्द वापरले जातात. तात्त्विक स्वरूपाच्या संशोधनात तात्त्विक स्वरूपाच्या प्रश्नाचे संशोधन असते, त्यामुळे त्याला फक्त सांस्कृतिक महत्त्व आहे; कारण त्यात प्रात्यक्षिक नाही; परंतु असे प्रतिपादन मान्य होण्यासारखे नाही, कारण वैज्ञानिक संशोधनाचे उपरोक्त जे तात्त्विक संशोधन आणि उपयोजित संशोधन असे वर्गीकरण केले जाते तेच मुळात पटणारे नाही; कारण सारे शास्त्रीय संशोधन हे कोणत्यातरी प्रकारच्या प्रात्यक्षिक प्रश्नाच्या सोडवणुकीतूनच निर्माण झालेले आहे. शास्त्रात बरेचसे शोध प्रारंभीच्या प्रश्नातून निर्माण झालेले आहेत. तात्त्विक संशोधनाला 'सैध्दांतिक संशोधन' किंवा 'मूलभूत संशोधन' असेही म्हणतात. आजचे तात्त्विक संशोधन कालांतराने उपयोजित संशोधन होते. उपयोजित संशोधनाला 'प्रत्यक्षावलंबी संशोधन' असेही म्हटले जाते. एक प्रश्न मनात असा निर्माण होतो की, मूलभूत संशोधन आणि प्रत्यक्षावलंबी संशोधन यांत फरक कोणता? सी. एफ्. केटरीग यांनी हा फरक सामान्यतः वीस वर्षांचा दिला आहे. याचा अर्थ असा की, सैध्दांतिक संशोधन हे वीस वर्षांनंतर उपयोजित संशोधन होते. यातील काल हाच खरा फरक आहे. सैध्दांतिक संशोधनाची व्याप्ती विस्तृत असते. त्याच्या योगाने एखादी शास्त्रशाखा वृध्दिंगत होते. उपयोजित संशोधन हे विद्यमान ज्ञान व त्याचे तंत्रशास्त्रीय अवलंबन यांपुरते मर्यादित असते.

संशोधनामुळे मनुष्याच्या गरजा भागविल्या जातात. संशोधनासाठी जो खर्च येतो त्यादृष्टीने त्याचा विचार करावा लागतो. उपयोजित संशोधनावरचा खर्च ते संशोधन व्यापारी स्वरूपाचे असल्यामुळे लवकर भरून येतो; परंतु प्रत्येक गोष्टीत पैसेलक्षी होऊन चालत नाही. ज्ञानात भर घालण्याला तितकेच महत्त्व असते. त्यासाठी मूलभूत किंवा सैध्दांतिक किंवा तात्त्विक स्वरूपाच्या संशोधनाची तेवढीच गरज असते. म्हणून अशा प्रकारच्या संशोधनासाठीचा पैसा उगाच खर्च झाला असे म्हणता येत नाही; कारण उपयोजित संशोधनाला सैध्दांतिक संशोधनामुळेच गती मिळालेली असते.

सैध्दांतिक किंवा विशुध्द किंवा मूलभूत संशोधन हे आधारभूत संशोधन असते. अशा संशोधनाला श्रेष्ठ दर्जाचे संशोधन मानले जाते. प्रत्येक क्षेत्राप्रमाणे विशुध्द संशोधनाचे स्वरूप बदलत जाते. विद्याभ्यासावर व ग्रंथांच्या आधारावर अधिष्ठित असे जे संशोधन असते त्याला वाङ्मयासंबंधीचे संशोधन असे म्हणतात. प्रयोगशाळेच्या आधारे शास्त्रीय संशोधन केले जाते. पत्रव्यवहार, मुलाखती, पाहणी इत्यादींवर आधारलेले जे संशोधन असते त्याला सामाजिक संशोधन म्हणतात. तात्त्विक संशोधन हे ज्ञानलक्षी असते. परंतु पुष्कळदा नवे मिळालेले ज्ञान हे ज्ञानदृष्ट्या महत्त्वाचे नसते. तरीपण त्याचे विशिष्ट दृष्टीने उपयोजन करणे शक्य असते; इतकेच नव्हे तर ते महत्त्वाचे असते. अशावेळी हे संशोधन उपाययोजनात्मक किंवा प्रत्यक्षावलंबी स्वरूपाचे ठरते. म्हणून कालचे तात्त्विक संशोधन हे आजचे उपयोजित संशोधन आहे, असे जे म्हटले जाते ते अगदी बरोबर आहे.

शुध्द संशोधनात मौलिक सिध्दांत शोधले जातात. त्यामुळे ज्ञानात भर पडते. पूर्वज्ञानाचे शुध्दीकरण करणे हा या संशोधनाचा उद्देश असतो. वर्तमानाच्या पार्श्वभूमीवर नवीन समस्या निर्माण होतात. त्यामुळे नवीन सिध्दांत शोधून काढणे आवश्यक असते. या पध्दतीत एखाद्या समस्येचे कारण शोधले जाते; परंतु तिचे निराकरण करण्यासाठी उपाययोजना सुचविली जात नाही. उपयोजित संशोधनात मिळालेल्या ज्ञानाचा मानवी जीवनाच्या कल्याणाच्या हेतूने त्या ज्ञानाचा व्यावहारिक उपयोग करावा हे या पध्दतीचे उद्दिष्ट आहे. ह्या पध्दतीत ज्ञान हे व्यवहारोपयोगी असावे अशी विचारसरणी अनुस्यूत आहे. समाजविकासाच्या योजना आणणे यामुळे शक्य होते. उपरोक्त दोन्ही प्रकारची संशोधने परस्परपूरक आहेत.

### [घ] वैज्ञानिक, सामाजिक व साहित्यक्षेत्रीय संशोधन

संशोधन ही एक अतिशय व्यापक आणि सर्वगामी अशी विविध ज्ञानक्षेत्रीय संकल्पना आहे. संशोधनाचा संबंध बुध्दीशी असतो. संशोधन ही देखील एक सर्जनशील निर्मिती असते. वैज्ञानिक संशोधन, सामाजिक संशोधन आणि साहित्यसंशोधन ही संशोधनाची क्षेत्रे भिन्न भिन्न दिसत



असली तरी त्यांचा संबंध माणसाच्या बुध्दीशी आहे. माणसाने विविध क्षेत्रांत जे संशोधन केले आहे त्याचा उपयोग मानवी जीवनाच्या प्रगतीसाठी, सामाजिक व्यवहारासाठी आणि पूनर्मूल्यांकनासाठी झाला आहे. या सर्व ज्ञानक्षेत्रीय संशोधनांतून माणसाला ज्ञानजन्य आनंद प्राप्त झाला आहे. माणसाच्या गरजेतून शास्त्राची निर्मिती झाली. शास्त्रातून विविध शोधपध्दती निघाल्या आणि त्यातून विशुध्दशास्त्रे आणि उपयोजितशास्त्रे निर्माण झाली. वर सांगितलेल्या तीनही क्षेत्रांतील ज्या संशोधनपध्दती निर्माण झाल्या त्या संशोधनाला उपयुक्त ठरलेल्या आहेत. मागे सांगितलेल्या 'डयुई–केली' ह्या संशोधनाच्या पायऱ्या सर्वच क्षेत्रांतील संशोधनासाठी उपयुक्त ठरतात. मानवी जीवनाचा एक महत्त्वाचा घटक म्हणून संशोधनाला आज मान्यता मिळालेली आहे. वरील तीनही क्षेत्रे संशोधनाने हल्लीच्या काळात व्यापून टाकली आहेत. ज्ञानक्षेत्रात संशोधनामुळे सतत नवी भर पडत आहे. तात्त्विक किंवा विशुध्द संशोधन आणि उपयुक्त किंवा उपयोजित संशोधन असे वर्गीकरणही संशोधनाच्या क्षेत्रात करता येते. संशोधनामुळे वैज्ञानिक क्षेत्रात वैज्ञानिक आणि तांत्रिक प्रगती झाली. सामाजिक संशोधनामुळे कृषिव्यापारात प्रगती झाली; त्याचप्रमाणे समाजव्यवहारातही प्रगती झाली. विविध प्रकारच्या ज्या कला आहेत त्यांतही संशोधनामुळे प्रगती झालेली आहे. साहित्य ही एक प्रकारची कला आहे. या कलेच्या क्षेत्रातही संशोधनामुळे बरीच प्रगती झाली आहे. याचा अर्थ असा की, संशोधन हे ज्ञानसंपादनासाठी असले तरी त्या त्या क्षेत्राला संशोधनामुळे गती मिळाली आहे.

#### १] वैज्ञानिक संशोधन

भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, प्राणिशास्त्र, वनस्पतिशास्त्र, तंत्रज्ञान इत्यादी विज्ञानक्षेत्रांशी संबंधित जी शास्त्रे आहेत त्यांचे संशोधन विविध शोधपध्दतीच्या साह्याने होत असते. विज्ञानात जडवादी शास्त्रे येतात, त्याचप्रमाणे जीववादी शास्त्रेही येतात. भौतिकशास्त्रे ही प्रायोगिक शास्त्रे आहेत. त्यांची व्याप्ती वस्तुनिष्ठ अशी आहे. वैज्ञानिक संशोधनात भावनेला स्थान नसते. आत्मनिष्ठा त्याठिकाणी महत्त्वाची नसते. विज्ञानक्षेत्रातील

विषय नियमबध्द असतात. संशोधकाच्या आवडीनिवडी विज्ञानक्षेत्रात महत्त्वाच्या नसतात. या क्षेत्रातील संशोधनात प्रयोग, पाहणी व सिध्दांत प्रतिपादन यांना महत्त्व असते. अशा प्रकारच्या संशोधनात सिध्दान्त प्रतिपादन केल्यानंतर निष्कर्ष काढले जातात. वैज्ञानिक संशोधन हे प्रयोगशाळाप्रधान असते. या क्षेत्रातील नोंदी महत्त्वाच्या असतात. यातील निष्कर्ष विश्वासजन्य असतो. वैज्ञानिक संशोधनात तीन गोष्टीना महत्त्व असते : [१] घटनांचे काळजीपूर्वक व अचूक वर्गीकरण करणे. त्याचप्रमाणे त्यांचे सहसंबंध व क्रम यांचा अभ्यास करणे. [२] वैज्ञानिक नियमांचा शोध करणे. [३] स्वतःच्या संशोधनाची आलोचना करणे.

वैज्ञानिक संशोधनाचे मूलभूत व उपयुक्त संशोधन असे वर्गीकरण करता येते.

### २] सामाजिक संशोधन

मानव्यप्रधान जी शास्त्रे असतात त्यांतील संशोधनाला 'सामाजिक संशोधन' असे म्हणतात. सामाजिक शास्त्राचा अभ्यासविषय वस्तू हा नसून माणूस हा असतो. येथे माणसाचा माणसाशी संबंध, माणसाचा समाजाशी संबंध, एका समाजाचा दुसऱ्या समाजाशी संबंध, राष्ट्राराष्ट्रांतील संबंध हे अभ्यासाचे विषय असतात. इतिहास, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, कायदा, समाजशास्त्र यांच्याबरोबरच मानसशास्त्र, तत्त्वज्ञान, नीतिशास्त्र, शिक्षणशास्त्र इत्यादी विषयांचा समावेश सामाजिक संशोधनात होतो.

सामाजिक शास्त्रांतील संशोधनविषय 'चल' म्हणजे बदलणारा घटक आहे. बहुतेक शास्त्रांतील वस्तुप्रमाणे तो 'अ–चल' म्हणजे न बदलणारा असा असत नाही. भावना असलेला विचार व कल्पनाशक्ती असलेला असा माणूस, त्याने निर्माण होणाऱ्या संस्था व समाज हे येथे संशोधनविषय असल्याने मुळातच येथील अभ्यासक्षेत्र बदलणारे किंवा सरकणारे असे असते. येथे अवलोकन करणे, अचूकपणे नोंदी घेणे व नेमकेपणाने नोंदी करणे अवघड असते. फार मोठ्या प्रमाणात सर्व्हेक्षण या ठिकाणी करावे लागते. अशा प्रकारच्या संशोधनात समुहाचे, जमातीचे किंवा काही घटकांचे सर्व्हेक्षण विशिष्ट उद्दिष्टे डोळ्यांपुढे ठेवून करावे लागते. कमी



काळात अधिक क्षेत्रांचे सर्वेक्षण करणे आवश्यक असते. एकाच सर्वेक्षणाला दीर्घकाळ देऊन उपयोगाचे नसते; कारण दीर्घकाळ एकच सर्वेक्षण चालू ठेवले तर निष्कर्ष काढणार तोपर्यंत समाज बदलून गेलेला असणेही शक्य असते. समाजशास्त्रीय संशोधनात सर्वेक्षण एकदा करून चालत नाही. सर्वेक्षणे पुनः पुनः वेगवेगळ्या काळी, म्हणजे थोडा थोडा कालावधी सोडून सातत्याने चालू ठेवावी लागतात. ही सर्व सर्वेक्षणे दीर्घकालखंडभर पसरलेली असतात. वेळोवेळी केलेली सर्व सर्वेक्षणे एकत्रित करून त्यांतून काही अनुमान काढणे मग शक्य होते. त्याचा पडताळाही घेता येतो आणि अखेर अंतिम निष्कर्ष काढता येतात.

समाज व सामाजिक संस्था ही सामाजिक शास्त्रांच्या संशोधनाची प्रयोगशाळा असते. समाज व समाजातील संस्था बदलत जातात. त्यामुळे अशा प्रकारचे संशोधन व संशोधनविषय दोन्हीही चल विषय असतात, म्हणजे बदलणारे विषय असतात. सामाजिक क्षेत्रातील संशोधन यामुळे नित्य बदलणारे असते. समाजपुरुष सतत बदलत असतो. प्रगतीच्या नव्या वाटा तो शोधत असतो. कालांतराने जुन्या वाटा बुजल्या जातात. समाज, राष्ट्र, राष्ट्रव्यवहार वगैरे सर्व परिवर्तनशील क्षेत्रे आहेत. यामुळे अशा प्रकारच्या संशोधनात निर्णयात्मक एकलक्षी उत्तर हाती लागत नाही. अशा प्रकारची संशोधने पुष्कळशी वर्णनात्मक, समालोचनात्मक आणि वस्तुस्थितीनिदर्शक अशी असतात. येथे निष्कर्षावर फार मोठ्या मर्यादा येतात. कालाशी व स्थलाशी हे संशोधन बध्द असल्यामुळे त्यात लवचिकपणा असतो. अशा प्रकारच्या संशोधनाचा पडताळा पुन्हा घेता येत नाही. तरीपण या संशोधनात व्यवहार्यता आणि उपयुक्तता यांना महत्त्व आहे.

### ३] साहित्यक्षेत्रीय संशोधन

साहित्यसंशोधन हे जसे ग्रंथालयनिष्ठ असते तसेच सर्वेक्षणात्मकही असते. भाषाबोलीचा अभ्यास आणि लोकसाहित्याचा अभ्यास करताना सर्वेक्षण करावे लागते. साहित्यसंशोधन हे विशुध्द संशोधन असते. उपलब्ध नसलेले जेव्हा उपलब्ध करून दिले जाते तेव्हा त्या मराठीतील संशोधनाला



Scanned with OKEN Scanner

विशुध्द संशोधन म्हणता येईल. महानुभाव साहित्य, संतांचे साहित्य, बोली भाषेतील साहित्य व इतर लिपीतील साहित्य हे उपलब्ध करून दिले जाते किंवा लोकसाहित्याचे संकलन करून त्याचे संपादन केले जाते तेव्हा त्याला मूलगामी संशोधन म्हणता येईल. या मूलगामी साहित्यसंशोधनावर जेव्हा पुनः जे संशोधन होत जाईल त्याला उपयोजित संशोधन म्हणता येईल.

वाङ्.मंय हे वर्तनवादी [मानसशास्त्र व मानवशास्त्र] व सामाजिक शास्त्रांच्या जवळ जाणारे असले तरी ते शास्त्र नव्हे. संगीत, चित्र व शिल्प या कलांना ते जवळ असले तरी ते यांच्याहून अगदी भिन्न आहे. वाङ्.मय हे मुख्यतः दोन प्रकारचे असते. [१] ललित [२] ललितेतर [इतिहास, तत्त्वज्ञान आणि शास्त्रीय इ. प्रकारचे] साहित्य संशोधनात जे अनुपलब्ध आहे ते उपलब्ध करून देणे, त्यावर टीकाटीप्पणी करून ते प्रकाशित करणे, हा एक भाग आहे. तो महत्त्वाचा आहे; परंतु त्याहीपेक्षा साहित्यकृतीचे नवे अर्थसौंदर्य पाहणे, साहित्यकलादृष्ट्या पुनर्मूल्यांकन करणे हा अधिक महत्त्वाचा भाग आहे. साहित्यसृष्टी ही अलौकिक रूपाची सृष्टी असते. तिला स्वतःचे वेगळे रूप असते. साहित्यसंशोधनात शोध घ्यावयाचा असतो तो साहित्यकृतीच्या सौंदर्यरूपाचा. साहित्याच्या संशोधनात शब्दाच्या अंतरंगांचा शोध घेत घेत शब्दाशब्दातून उमटत जाणारा सुंदर आकृतिबंध अनुभवणे महत्त्वाचे असते.

वाङ्.मयाचा अभ्यास विविध दृष्टिकोनातून, विविध पातळ्यांवरून आणि विविध उद्दिष्टांनुसार केला जातो. विशिष्ट वाङ्.मयप्रकार, विशिष्ट ग्रंथकार, विशिष्ट कालखंड, विशिष्ट धर्मसंप्रदाय, भाषांतरित साहित्य, तौलनिक साहित्याचा अभ्यास, लोकसाहित्याचा अभ्यास, भाषिक अभ्यास अशा कितीतरी विविध दृष्टीकोनांतून साहित्याचे संशोधन केले जाते. विविध भाषांतील वाङ्.मयाचा अभ्यासही पुष्कळदा तौलनिक दृष्टीकोनांतून केला जातो. साहित्य हे जरी भौतिकशास्त्रे आणि सामाजिक शास्त्रे यांच्याहून वेगळे असले आणि त्याच्या संशोधनाची उद्दिष्टे आणि दृष्टीकोन भिन्न असले, तरी त्यांच्या संशोधन पध्दतीची मूळ बैठक शास्त्रीय



संशोधनाचीच असते. वाङ्.मयीन संशोधन हे विमर्शक विचार पध्दतीचे असले तरी येथे येणारे निर्णय हे भौतिकशास्त्रीय संशोधनासारखे निश्चित, काटेकोर, अचूक निरपवाद व एकमेव असे नसतात. सामाजिक शास्त्रातील निर्णय हे भौतिक शास्त्रातील निर्णयाहून कमी निश्चित, नेमके व अचूक असतात, पण त्यांच्याइतकेही निश्चित आणि नेमके निर्णय वाङ्.मयीन संशोधनात मिळू शकत नाहीत.

भावनात्मक सृष्टीचे मूळ शोधणे आणि त्याच्या शब्दरूप आविष्काराच्या सौंदर्याचे स्वरूप पकडणे हे साहित्यसंशोधनाचे अंतिम उद्दिष्ट आहे. साहित्यसंशोधनात अंती निश्चयन करायचे असते साहित्यसौंदर्याचे आणि साहित्यश्रेष्ठतेचे. समाजक्षेत्रे आणि वाङ्.मय यांची क्षेत्रे एकमेकांना लागून, प्रसंगी एकमेकात मिसळणारीही दिसून येतात.

वैज्ञानिक शास्त्रे वस्तुनिष्ठ असतात. सामाजिक शास्त्रे समाजाधिष्ठित आहेत. वाङ्.मय हे मनोनिष्ठ, प्रतिभानिष्ठ आणि सर्जनप्रधान असते, त्यामुळे वाङ्.मयाचे संशोधन करताना पुढील प्रश्न उपस्थित होतात : यात झालेल्या संशोधनात काही बदल करता येतील का? संशोधनामुळे इतर क्षेत्रे प्रगल्भ झाली तसे हे क्षेत्र प्रगल्भ होऊ शकेल का? साहित्याचे स्वरूप बदलते असल्यामुळे वस्तुनिष्ठ भूमिका या ठिकाणी घेणेही शक्य नाही. असे असल्यामुळे साहित्यसंशोधनाचे निश्चित स्वरूप ठरविणे अवघड आहे.

वरील तीनही क्षेत्रांतील संशोधनात काही प्रमाणात साम्य असले तरी भेदही आहेत. या विद्याशाखांच्या संशोधनासाठी शास्त्रीय पध्दतीच उपयोगात आणली जात असली तरी शाखांच्या भिन्नत्वामुळे त्यांच्यातील संशोधनाचे स्वरूप भिन्नभिन्न स्वरूपाचे असते. साहित्यशाखेला तर खूपच मर्यादा असल्याने या शाखेतील संशोधनालाही मर्यादा प्राप्त झाल्या आहेत. या शाखेतील संशोधनात मूळ उर्मी फार कमी असते. शास्त्रीय संशोधनपध्दतीचा अवलंब करणे याही क्षेत्रात आवश्यक असले तरी बहुधा तसे होताना दिसत नाही.

## [च] संशोधन आणि समीक्षा

साहित्याची समीक्षा म्हणजे संशोधन नसते. त्याचप्रमाणे साहित्यविचार



Scanned with OKEN Scanner

म्हणजेही संशोधन नसते. समीक्षा आणि साहित्यविचार ह्या दोन्ही गोष्टी संशोधनाला आवश्यक असतात हे मात्र खरे. एवढेच नव्हे तर समीक्षाशास्त्र आणि साहित्यशास्त्र जर अवगत नसेल तर संशोधन करणेही अवघड असते. साहित्य, समीक्षा, साहित्यशास्त्र आणि संशोधन हे चार घटक परस्परावलंबी व परस्परपूरक असतात.

## साहित्य आणि साहित्यविचार

साहित्य ही वस्तू नसते तर एक कलाकृती असते. मानवी जीवनातील अनुभवांच्या आधारे कलाकृती निर्माण होत असली तरी हे अनुभव कलात्मक असतात. केवळ वास्तव अनुभव हे रूपवान नसतात. कल्पनाशक्तीच्या बळावर ते रूपवान होतात. साहित्यकृती ही सेंद्रिय असून स्वयंपूर्ण असते. साहित्यविचार, साहित्यसमीक्षा आणि साहित्यसंशोधन ह्या साहित्याच्या तीन अभ्यासपध्दती आहेत.

साहित्यविचार म्हणजे साहित्यशास्त्र. ह्या शास्त्रानुसार साहित्यनिर्मिती होत नसते. साहित्यनिर्मिती ही सजीव असते. ती एक कला असते. ह्या कलानिर्मितीची विशिष्ट पध्दती, तिचे विश्लेषण, तिचे संकलन आणि तिच्या विशिष्ट पध्दतीला अनुसरून एक प्रकारचे व्यवस्थीकरण साहित्यविचारात असते. श्रेष्ठ साहित्याचा समकालीन साहित्यावर परिणाम होत असतो. अशा साहित्याची एक विशिष्ट पध्दती असते. या पध्दतीचा हा परिणाम असतो. कालांतराने ती पध्दत रुढ होते. साहित्यविचारात ती पध्दत आवश्यक घटक म्हणून येते. साहित्यविचारात यामुळे मोलाची भर पडते. साहित्याचे स्वरूप, साहित्याचे प्रयोजन, साहित्याची निर्मितीप्रक्रिया, साहित्याची भाषा, साहित्याचा आस्वाद, साहित्याचे प्रकार अशा अनेक घटकांचा विचार साहित्यविचारात असतो. शिवाय 'भारतीय साहित्यविचार', 'पाश्चात्य साहित्यविचार' आणि 'सौंदर्यशास्त्र' यांचाही समावेश यात असतो. साहित्यातील परंपरा आणि नवता साहित्यविचारात घ्यावीच लागते. साहित्यविचारात साहित्यविषयक सिध्दांतप्रतिपादन असते. साहित्याच्या संशोधकाला ह्या सर्व गोष्टींचे ज्ञान आवश्यक असते.



## साहित्यसमीक्षा आणि साहित्यसंशोधन

आकलन, आस्वाद आणि मूल्यमापन या घटकांना समीक्षेत महत्त्वाचे स्थान असते. समाजशास्त्रीय समीक्षा, मानसशास्त्रीय समीक्षा, स्त्रीवादी समीक्षा इत्यादी समीक्षापध्दतीनुसार समीक्षा केली जाते. साहित्यविचार माहीत असल्याशिवाय साहित्यसमीक्षा करणे अशक्य आहे. साहित्यसमीक्षा ज्याला माहीत नसेल त्याला साहित्यसंशोधन करता येणार नाही, हे जरी खरे असले, तरी साहित्यसमीक्षा म्हणजे संशोधन नसते. संशोधन आणि समीक्षा ही भिन्नभिन्न शास्त्रे असली तरी ती परस्परपूरक आहेत. समीक्षक हा संशोधक असावा लागतो. साहित्य, साहित्यविचार, समीक्षाशास्त्र, संशोधनशास्त्र हे चार घटक समीक्षकाला आणि संशोधकाला माहीत नसतील, त्याच्या स्वरूपाची जाण नसेल तर समीक्षा आणि संशोधन करता येणे शक्यच नाही. याच कारणामुळे साहित्याचे संशोधन करणे वाटते तितके सोपे नाही.

(1) संशोधन आणि समीक्षा यांतील भेद पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल. कलाकृतीच्या संदर्भात आपल्या भावप्रतिक्रिया आणि कलात्मक प्रतिक्रिया शोधून आपण जर मांडणी करत गेलो तर ती समीक्षा होते. अर्थात ही समीक्षा आत्मनिष्ठ असते. इतरांच्या समीक्षणात्मक प्रतिक्रियांचा शोध घेऊन त्यांचा परामर्श घेऊन आपल्या प्रतिक्रियांना आपण जर रूप देत गेलो तर त्यावेळी संशोधन होते. हे संशोधन 'संशोधन–समीक्षा' या स्वरूपाचे असते.

(2) समीक्षेत आवडनिवड व्यक्तिसापेक्ष असते. संशोधनात आवडनिवड महत्त्वाची नसते. त्या ठिकाणी वस्तुनिष्ठता महत्त्वाची असते. साधार, सप्रमाण विवेचनाला त्या ठिकाणी महत्त्व असते. (3) संशोधनात निष्कर्ष कसे काढले, ते बरोबर की चूक या गोष्टींना महत्त्व असते. समीक्षेत आस्वादाला महत्त्व असते, तर संशोधनात गृहितकृत्याला महत्त्व असते. समीक्षेत तादात्म्य असते, तर संशोधनात ताटस्थ्य असते. समीक्षा म्हणजे साहित्यसंशोधन नसले, तरी समीक्षाक्षम प्रतिभा असलेल्या संशोधकाने केलेले संशोधनकार्य अधिक मर्मग्राही असू शकते. कलाकृतीतील नवेपणा व



Scanned with OKEN Scanner

सौंदर्य यांसंबंधी समीक्षक चर्चा करतो. संशोधकाला नवेपणा आणि सौंदर्य का प्राप्त झाले, यांसंबंधी चर्चा करून भागत नाही, तर ह्या दोन्ही गोष्टी सिध्द कराव्या लागतात. असे जरी असले तरी शेवटी असेच म्हणावे लागेल की, संशोधन आणि समीक्षा परस्परपूरक आणि परस्परावलंबी आहेत हेच खरे.

### छ] संशोधकाचे गुण

संशोधन ही एक वृत्ती आहे. या वृत्तीला जिज्ञासा आणि सत्यनिष्ठा या दोन गुणांची गरज असते. संशोधनवृत्ती ही नेहमीच्या जगण्यात आणि विचारातही दिसून येते. आपला शोधविषय व त्याचे उद्दिष्ट यांसंबंधी तादात्म्य असणे आवश्यक असते. व्यासंग आणि विचार करण्याची शक्ती यामुळेच प्राप्त होते. कल्पना करणे, तथ्ये मिळवणे, पारखणे यांत अंचूकता असावी लागते. मनात विषय मुरल्याशिवाय ही अचूकता येत नाही. सतत जागरूक असणे हा गुण संशोधकाजवळ असावा लागतो. या गुणामुळे सामान्य गोष्टीतील असामान्यत्त्व निदर्शनास येते. शोधदृष्टीमुळे असामान्य असे तत्त्व प्रतीत होते. चिकाटी हा महत्त्वाचा गुण तर संशोधकाजवळ असावाच लागतो. अपयशाने त्याने खचून न जाता सतत प्रयत्नरत राहिले पाहिजे. अनेक अडचणी येतात, त्यावर मात करता आली पाहिजे. निष्कर्ष मांडताना सावधगिरी हा गुण संशोधकाजवळ असावा लागतो. पूर्वग्रहापासून अलिप्त असणे हा गुण संशोधकाजवळ नसेल तर त्याचे संशोधन, संशोधन होणार नाही. सतत प्रयत्न करीत धीर न सोडता सत्यान्वेषण करणे हा गुण संशोधकाजवळ नसेल तर संशोधनाच्या अडचणीतून मार्ग काढताच येणार नाही.

डॉ. सु. रा. चुनेकर 'संशोधन : स्वरूप आणि पध्दती' या पुस्तकाच्या प्रस्तावनेत संशोधकाजवळ असणाऱ्या गुणांसंबंधी विवेचन करताना म्हणतात, ''सत्यजिज्ञासा व सत्यप्रतिपादन ही संशोधकाची पहिली प्रतिज्ञा हवी. त्यासाठी निर्भयता हवी. ही निर्भयता निःस्वार्थतेतून येते. म्हणून ही निःस्वार्थता हवी. प्रामाणिकपणा, निष्ठा हा संशोधकाचा महत्त्वाचा गुणधर्म.



गुणधर्म स्वतःशी प्रामाणिकपणा हवा. दुसऱ्यांना फसवणे शक्य आहे, तसे ते सोपेही आहे. पण स्वतःला फसवणे अवघड आहे आणि ते अधिक बाधक आहे.''

संशोधकाने विश्वसनियतेला जपले पाहिजे. आधार–प्रमाणांना पारखून घेतले पाहिजे. संशोधकाला संशोधनशास्त्र माहीत पाहिजे. साहित्याच्या संशोधकाला साहित्याच्या स्वरूपाविषयी, त्याचप्रमाणे साहित्यशास्त्राविषयी आणि समीक्षाशास्त्राविषयी माहिती असली पाहिजे. याबाबत जर तो अज्ञानी असेल तर त्याच्याकडून संशोधनाची अपेक्षा करणेच बरोबर होणार नाही.

✧ ✧



Scanned with OKEN Scanner

# २ : साहित्यसंशोधनाचे प्रकार

मराठी साहित्याचे संशोधन इतर शाखांतील संशोधनापेक्षा वेगळे असते; कारण मराठी साहित्याचे स्वरूप वैज्ञानिक शास्त्रे आणि सामाजिक शास्त्रे यांपेक्षा मूलतः भिन्न आहे. संशोधनाची सुरुवात कोणत्यातरी प्रश्नाने होते. या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी संशोधकाला संशोधन करावे लागते. संशोधनासाठी विषयाची निवड महत्त्वाची असते. अतिशय व्यापक असा विषय संशोधकाने निवडू नये किंवा अतिशय सीमित असा विषयदेखील निवडू नये. संशोधन करणाऱ्याने स्वतः विषय निवडणे महत्त्वाचे असते. दुसऱ्याने सांगितलेला विषय अभ्यासकाला आकलन झालेला असतोच असे नाही. मराठी साहित्याचे संशोधन जर बघितले तर असे निदर्शनास येते की, अभ्यासकांना वाङ्मयीन संशोधन म्हणजे काय तेच कळलेले नसते. साहित्याचे यथार्थ अवलोकन संशोधनात आवश्यक असते. प्रबंधलेखनात संशोधन व समीक्षा या दोहोंची गरज असते. संशोधनात संशोधकाने काहीतरी नवीन दाखविणे आवश्यक असते. वाङ्मयीन समज जर नसेल तर मराठी साहित्याचे संशोधन करणे शक्य नाही. साहित्याच्या संशोधनात संकलन, पृथक्करण आणि अन्वयार्थ याला महत्त्व असते. पुष्कळदा संशोधक मोठ्या अट्टाहासाने काहीतरी नवे सांगण्याचा प्रयत्न करतो; परंतु साहित्याच्या संशोधनात अभिनिवेश महत्त्वाचा नसतो.

पुष्कळदा असा गैरसमज असतो की, प्रबंध जेवढा मोठा तेवढे संशोधन



मोठे; परंतु प्रबंधाच्या पृष्ठसंख्येवर संशोधनाचा कस अवलंबून नसतो. प्रबंधाची पृष्ठे अनावश्यक मजकुराने भरली जातात. संशोधकाने अनावश्यक माहिती न देता सूक्ष्म चिकित्सेला महत्त्व देणे आवश्यक आहे. प्रबंधलेखनात संदर्भसूची, संदर्भटीपा, निष्कर्ष, समारोप वगैरे गोष्टी असतात; परंतु पुष्कळदा ह्या गोष्टी केवळ तंत्र म्हणून आणल्या जातात. प्रबंधलेखन ही एक कला असते; हे जितके खरे आहे तितकेच प्रबंधलेखन हे एक शास्त्र आहे हेही विसरता कामा नये. साहित्यकृती जशी सेंद्रिय असते त्याचप्रमाणे प्रबंधदेखील एक सेंद्रिय कलाकृती असली पाहिजे.

पुष्कळदा प्रबंधात अवतरणांचा पाऊस असतो. केवळ अवतरणे देणे म्हणजे संशोधन नसते. संशोधक एखाद्या अवतरणाच्या संदर्भात कोणते विचार मांडतो याला महत्त्व असते. संशोधकाच्या एखाद्या मुद्याला बळकटी येण्यासाठी संशोधक पुरावा म्हणून अवतरणचिन्हांचा उपयोग करीत असतो. एखाद्या मताचे खंडनदेखील संशोधक करत असतो; त्यासाठी त्याला अवतरणचिन्ह द्यावे लागते. केवळ इतरांच्या अवतरणांनी सजवलेला प्रबंध म्हणजे माहितीचे केवळ संकलन असते. प्रबंधात संदर्भांच्या नोंदी विद्वत्तेच्या प्रदर्शनासाठी नसतात; तर संशोधकाच्या चिकित्सेला अशा नोंदी उपयुक्त ठरणाऱ्या असतात. संशोधनात ललित भाषा चालत नाही, त्याचप्रमाणे अतिशय बोजड अशी भाषाही चालत नाही. प्रबंध खूप किचकट केला म्हणून तो संशोधनास पात्र ठरला असे होत नाही. प्रबंधाची मांडणी प्रमाणबध्द असावी लागते. ही प्रमाणबध्दता निवडलेल्या विषयाला अनुरूप गृहितकृत्य असेल तरच येऊ शकते.

प्रबंधातील सर्व प्रकरणे गृहितकृत्याच्या दिशेने जाणारी असली पाहिजेत. मराठी साहित्यसंशोधनाचे अनेक प्रकार आहेत. वाङ्मयीन संशोधन आणि आंतरविद्याक्षेत्रीय संशोधन असे दोन मराठी साहित्य संशोधनाचे मुख्य प्रकार आहेत. वाङ्मयीन संशोधनात वाङ्मयाच्या इतिहासासंबंधी संशोधन, भाषिकसंशोधन, साहित्यशास्त्रीय प्रश्नांचे संशोधन, लेखकाचा अभ्यास, साहित्यकृतिनिष्ठ संशोधन, वाङ्मयप्रकारनिष्ठ संशोधन आणि तौलनिक साहित्याचा अभ्यास या



Scanned with OKEN Scanner

संशोधन प्रकारांचा समावेश होतो. आंतरविद्याक्षेत्रीय संशोधनात वाड्.मय आणि समाजशास्त्र, वाड्.मय आणि मानसशास्त्र, लोकसाहित्याचे संशोधन, साहित्य आणि तत्त्वज्ञान, साहित्य आणि इतिहास इ. विषयांचा समावेश होतो. त्या त्या प्रकाराची संशोधनपध्दती वेगवेगळी असते. विषयाला अनुसरून अशी पध्दती निश्चित करावी लागते.

## क] वाड्.मयीन संशोधन

साहित्याचे संशोधन हे जरा अवघड असते; कारण साहित्य ही एक मानवनिर्मित कला असते. या निर्मितीत पुष्कळदा अनाकलनीय असा भाग असतो. साहित्यात आशय आणि अभिव्यक्ती यांना महत्त्व असते. लेखकाचा आत्माविष्कार साहित्यात प्रकट झालेला असतो. मानवाचे भावविश्व साहित्यातून व्यक्त झालेले असते. साहित्य हे कालसापेक्ष असते, कारण समाजजीवनातील माणूस बदलत असतो; त्याचप्रमाणे साहित्यातील माणूसही बदलताना दिसतो. माणसाची मूळ प्रवृत्ती जरी एक असली तरी सामाजिक पर्यावरणाचा मानवी जीवनावर परिणाम होत असतो. अशा रीतीने साहित्यातील माणूस हा चल असतो. साहित्याची समीक्षाही बदलत जाते. साहित्यकृतीच्या नव्या अर्थसौंदर्याचा आणि साहित्यातील अनुभवाचा शोध संशोधनात घेतला जातो. साहित्याच्या संशोधनात संशोधकाला जुन्याचा नव्याने शोध घ्यावा लागतो. पुनर्मूल्यमापन करावे लागते. या सर्व गोष्टींमुळे साहित्यसंशोधन ही एक बुध्दिनिष्ठ अशी संशोधनप्रक्रिया ठरत असते.

मूलभूत संशोधन आणि उपयोजित संशोधन असे संशोधनाचे दोन प्रवर्ग आपण मागे पाहिले आहेत. विद्यापीठात मराठी साहित्याचे संशोधन होत असते; त्याप्रमाणे व्यक्तिगत पातळीवरही संशोधन होत असते. मराठी साहित्यसंशोधनाची व्याप्ती खूप आहे. शास्त्रीय पध्दती माहीत असल्याशिवाय मात्र कोणत्याही संशोधकाला संशोधन करणे शक्य नाही. मराठी साहित्यसंशोधनासाठी विविध काळात विविध प्रेरणा मिळालेल्या दिसतात. मध्ययुगीन मराठी साहित्याचे संशोधन प्रारंभीच्या काळात मोठ्या प्रमाणावर झाले. नंतरच्या काळात मात्र या संशोधनाची गती कमी झाली.



आधुनिक वाड्.मयाच्या संशोधनाकडे संशोधकांनी आपले लक्ष वेधले. या संशोधनातही खूप महत्त्वपूर्ण भर पडलेली आहे. साहित्य हे सर्जनशील असल्यामुळे त्याच्या संशोधनासाठी विज्ञानप्रणित मूल्यांचा मात्र काटेकोरपणे अवलंब करता येत नाही.

वाड्.मयीन संशोधनाच्या क्षेत्रात अलीकडच्या काळात खूप नावीन्य निर्माण झाले आहे. संशोधन ही एक वृत्ती असते. ही वृत्ती प्राचीन अप्रकाशित ग्रंथांचा कधी शोध घेते, तर कधी कोरीव लेखांचा शोध घेते. साहित्याच्या क्षेत्रात अनेकांनी संशोधन करण्याच्या दृष्टीकोनातून संशोधन केले नसले तरी त्यांचे संशोधन महत्त्वपूर्ण, नावीन्यपूर्ण व संशोधनाच्या तोडीचे आहे. जया दडकर यांनी 'चिं. त्र्यं. खानोलकरांच्या शोधात' हे पुस्तक लिहून व्यक्ती, व्यक्तिमत्त्व आणि निर्मिती यांचा बारकाईने शोध घेतला आहे. द. ग. गोडसे यांचे संशोधन लोकजीवनाच्या आणि लोकसाहित्याच्या संदर्भातील आहे. लोकसाहित्याच्या संदर्भात गोडसे नवीन विचार प्रतिपादन करतात. याचा अर्थ असा की, वाड्.मयीन संशोधनाचे पुढे जे काही विशिष्ट प्रकार दिले आहेत तेच असू शकतात असे नाही, तर त्या शिवायही इतर प्रकार असू शकतात. एखादा प्रतिभावान संशोधक नव्या दिशेने संशोधन करतो आणि एखाद्या नवीन प्रकाराला जन्म देतो. मराठी साहित्याच्या क्षेत्रात आतापर्यंत जे काही संशोधक झाले आहे ते डोळ्यांसमोर ठेऊन पुढे काही प्रकारांची चर्चा केली आहे.

### १] वाड्.मयेतिहासासंबंधी संशोधन

वाड्.मयीन संशोधनात वाड्.मयाच्या इतिहासाचे संशोधनदेखील करता येते. मराठी वाड्.मयाचा इतिहास वेगवेगळ्या अभ्यासकांनी वेगवेगळ्या पध्दतींनी लिहिला आहे. कुणी कालखंडाला महत्त्व दिले आहे, तर कुणी वाड्.मयीन प्रकाराला महत्त्व दिले आहे. कुणी विशिष्ट लेखकाला महत्त्व दिले आहे, तर कुणी एखाद्या लेखकाच्या श्रेष्ठ कलाकृतीला महत्त्व दिले आहे. मराठी साहित्याच्या संशोधनात वाड्.मयाच्या इतिहासाच्या संशोधनाला फार महत्त्व आहे; कारण इतिहासलेखनाची जी प्रवृत्ती असते त्या प्रवृत्तीचे संशोधन या ठिकाणी अभिप्रेत असते. प्राचीन वाड्.मयाचा



Scanned with OKEN Scanner

इतिहास जर आपण पाहिला तर आपल्याला आख्यायिका, दंतकथा आणि चमत्कार यांना महत्त्व दिसते. प्राचीन वाङ्.मयाची निर्मिती विशिष्ट संप्रदायानुसार जशी झाली; तशीच त्या संप्रदायाच्या तत्त्वज्ञानानुसारही झाली आहे. इतिहासात त्या त्या कालखंडावर प्रभाव गाजविणाऱ्या अनेक महत्त्वाच्या सांस्कृतिक घडामोडी असतात. त्या सांस्कृतिक घडामोडींचे पडसाद वाङ्.मयाच्या इतिहासात कितपत उमटलेले आहेत याचा शोध घेणे महत्त्वाचे असते. शिवकाल आणि मुस्लिम संस्कृती यांचे परस्पर संबंध वाङ्.मयाच्या इतिहासकारांनी फारसे लक्षात घेतलेले नाहीत. त्यांचाही शोध घेणे आवश्यक असते. पंडित कवींनी पुराणकथांचा जो आधार घेतला त्या संबंधीही विचार होणे आवश्यक आहे. वाङ्.मयाच्या इतिहासकारांनी राजकीय परिस्थितीवर भर दिला, त्याचप्रमाणे साहित्यातील अध्यात्माच्या संकलनावरही भर दिला. ज्ञानेश्वरासंबंधी कितीतरी प्रश्न अनिर्णित राहिले आहेत. ज्ञानेश्वर आणि नामदेव यांचे नाते नेमके कोणत्या स्वरूपाचे होते यांचाही शोध फारसा झालेला नाही.

वाङ्.मयाच्या इतिहासात कालतत्त्व महत्त्वाचे असते. त्या त्या काळात विशिष्ट प्रवृत्ती असते. त्या त्या काळाची विशिष्ट अभिव्यक्ती असते. त्या त्या काळाचा विशिष्ट मूल्यभाव असतो. या सर्व गोष्टींचा परामर्ष वाङ्.मयाच्या इतिहासात कितपत घेतला आहे, याचा विचार अशा प्रकारच्या संशोधनात आवश्यक असतो. ज्ञानेश्वरकालीन साहित्य आणि एकनाथकालीन साहित्य यांत फरक का पडला याचाही विचार अशा प्रकारच्या संशोधनात येऊ शकतो. जीवनमूल्ये आणि साहित्यमूल्ये बदलतात. त्यांच्या परस्पर संबंधांचे दर्शन वाङ्.मयाच्या इतिहासाचा लेखक कितपत घडवितो याला महत्त्व असते. केवळ इतिहासातील घटनांची नोंद म्हणजे वाङ्.मयाचा इतिहास होत नाही.

वाङ्.मयाचा इतिहास सूत्रबध्द असला पाहिजे. हे सूत्र वाङ्.मयाशी निगडित पाहिजे. आजपर्यंतचे वाङ्.मयाचे इतिहास जर पाहिले तर वाङ्.मयबाह्य गोष्टींना अधिक महत्त्व दिलेले दिसते. वाङ्.मय आणि त्याला प्रेरणा देणाऱ्या घटना यांचा अभ्यास व्हायला पाहिजे. काळ बदलतो,



कालखंडातील घटनांचा अन्वयार्थ शोधणे महत्त्वाचे असते. कालमानानुसार शैली बदलते. तिचाही विचार वाङ्.मयाच्या इतिहासात अपेक्षित आहे. प्राचीन आणि अर्वाचीन असे मराठी साहित्याचे दोन कालखंड आहेत. त्या त्या कालखंडात ज्या विविध प्रणाली होत्या त्यांचे परस्पर संबंध शोधणे आवश्यक असते. संतसाहित्य अध्यात्मनिष्ठ आहे. अशा साहित्याला साहित्यिक स्पर्श कसा आहे याचा विचार वाङ्.मयाच्या इतिहासात अभिप्रेत आहे. अध्यात्म आणि साहित्य, आशय आणि अभिव्यक्ती यांचा विचार वाङ्.मयाच्या इतिहासात आवश्यक असतो. संतसाहित्यावर संस्कृत साहित्याचा जो प्रभाव आहे त्याचा शोध अशा प्रकारच्या संशोधनात व्हायला पाहिजे.

प्राचीन वाङ्.मयप्रकारांचा अभ्यास वाङ्.मयाच्या इतिहासात करणे आवश्यक असते. हे वाङ्.मयप्रकार त्या त्या काळात लोकप्रिय का झाले याची कारणमीमांसा केली पाहिजे. प्राचीन आणि अर्वाचीन, त्याचप्रमाणे नवसाहित्य यांचा इतिहास लिहिणाऱ्या इतिहासकारांच्या इतिहासाचा शोध घेणे आवश्यक आहे. कारण संशोधन हे सतत बदलणारे असते. इतिहासलेखकाला एक नवी दृष्टी अशा प्रकारचे संशोधन देऊ शकते. वाङ्.मयाच्या इतिहासाचे लेखन एका व्यक्तीने करावे की अनेक व्यक्तींनी करावे असाही प्रश्न निर्माण केला जातो. परंतु या प्रश्नाचे उत्तर देणे अवघड आहे. दोन्हीही प्रकारांनी वाङ्.मयाचा इतिहास लिहिला जातो. दोन्ही प्रकारांचे फायदे आहेत तसेच तोटेही आहेत. कोणताही इतिहास वस्तुनिष्ठ पाहिजे असेच शेवटी म्हणावे लागते.

साहित्यिक इतिहास लिहिताना काही अडचणी समोर असतात. साहित्याचा सामाजिक इतिहास लिहावा की लेखकांची जीवनचरित्रे लिहावी, असा प्रश्न निर्माण होतो. साहित्यकृतीचे रसग्रहण हा भाग पुष्कळदा बाजूला राहतो व अवांतर गोष्टींना महत्त्व मिळते. वाङ्.मयाच्या इतिहासात साहित्यिक इतिहासातील मौलिकतेला महत्त्व असते. ही मौलिकता जर नसेल तर साहित्याचा इतिहास खऱ्या अर्थाने इतिहास होणार नाही. साहित्याचा इतिहास एक कला म्हणून लिहिला गेला पाहिजे.

त्या त्या कालखंडातील युगतत्त्व लक्षात घेऊन तो इतिहास तपासला पाहिजे. सांस्कृतिक परिस्थिती वगळून असा इतिहास निर्माण होऊ शकत नाही. ज्या कालखंडात कलाकृती जन्माला येतात त्या कलाकृतींवर त्या काळाचा ठसा उमटलेला असतो. वाङ्.मयाच्या इतिहासाचे संशोधन ज्यांना करावयाचे आहे त्यांनी वाङ्.मयाच्या इतिहासलेखनासंबंधीच्या विविध संकल्पना लक्षात घेणे आवश्यक असते. खऱ्या अर्थाने इतिहास केव्हा होऊ शकतो याचा विचार करून आपली शोधप्रक्रिया सुरू केली पाहिजे. या संदर्भात डॉ. दत्तात्रय पुंडे यांनी संपादित केलेले 'वाङ्.मयेतिहासाची संकल्पना' हे पुस्तक उपयुक्त ठरणारे आहे. 'प्रतिष्ठान'च्या जुलै–ऑगस्ट १९९३ च्या अंकात डॉ. पुंडे यांनी प्रा. गो. म. कुलकर्णी यांची घेतलेली मुलाखत प्रसिध्द झाली आहे. या मुलाखतीत प्रा. कुलकर्णी यांनी वाङ्.मयेतिहासासंबंधी आपल्या अपेक्षा व्यक्त करताना म्हटले आहे, ''वाङ्.मयेतिहासामध्ये कालतत्त्व व कालगतव्यवहार ह्यांचा एक सर्जनशील नातेसंबंध मांडला गेला पाहिजे. वाङ्.मयेतिहास खरे तर कोणताही इतिहास या अर्थाने एक Creative Flash च असतो. त्यामुळे वाचकाच्या जाणिवा प्रसरणशील व्हायला हव्यात. उदाहरणार्थ, ज्ञानेश्वरीच्या बाराव्या अध्यायातले योगदुर्गाचे रूपक हे देवगिरीच्या किल्ल्याचे आहे, हे कळल्याने ज्ञानेश्वरच जास्त कळत जातात. वाङ्.मयेतिहासाने असे वाङ्.मय कळत जाण्याचे किंवा वाङ्.मयासंबंधाने जास्त कळत जाण्याचे काही कार्य साधले पाहिजे.'' वाङ्.मयेतिहासासंबंधीचे संशोधन करणाऱ्याने प्रा. कुलकर्णी यांचे हे उध्दरण अवश्य लक्षात ठेवले पाहिजे.

मराठीत जे वाङ्.मयाचे इतिहास लिहिले गेले त्यांचे संशोधन करणे हा देखील एक महत्त्वाचा विषय होऊ शकतो. वि. ल. भावे, ल. रा. पांगारकर, अ. ना. देशपांडे, म. सा. प. ने प्रसिध्द केलेले वाङ्.मयाचे इतिहास वगैरे अनेकविध वाङ्.मयेतिहास उपलब्ध आहेत. त्यांतील एखादा लेखक निवडून त्याच्या वाङ्.मयेतिहास लेखनासंबंधी संशोधन करता येईल.



## २] साहित्यशास्त्रीय प्रश्नांसंबंधी संशोधन

भारतीय साहित्यशास्त्र आणि पाश्चात्य साहित्यशास्त्र अशा दोन प्रकारच्या साहित्यशास्त्रांवर विपुल लेखन केलेले आढळते. आधी साहित्य निर्माण होते मग साहित्यशास्त्र निर्माण होते. साहित्यशास्त्राच्या निर्मितीमुळे साहित्याचा आस्वाद कसा घ्यावा यासंबंधीची दृष्टी रसिकाला मिळू शकते. कलाकृतीच्या मूल्यमापनासाठी साहित्यशास्त्र अवगत असणे आवश्यक आहे. साहित्यशास्त्रात असे काही प्रश्न आहेत की त्यांचे संशोधन जरी झालेले असले तरी त्यासंबंधी नव्याने संशोधन होणे आवश्यक आहे. अलंकाराच्या मुळाशी असलेले तत्त्व कोणते, त्याचप्रमाणे अलंकार आणि प्रतिमा यांतील भेद कोणता या संबंधीदेखील संशोधन करता येईल. वक्रोक्ती आणि रस यांचे संबंध एखाद्या साहित्यिकाच्या साहित्यात कसे आहेत तेही दाखवता येणे शक्य आहे. संस्कृत साहित्यशास्त्रातील रीतिविचार आणि पाश्चात्य साहित्यशास्त्रातील शैलीविचार यांच्यातील साम्यभेद साहित्यशास्त्राच्या अभ्यासकाला दाखविता येणे शक्य आहे. ध्वनीचा रसाशी असलेला संबंध त्याचप्रमाणे ध्वनीचा सूचकतेशी असलेला संबंध हाही संशोधनाचा विषय होऊ शकतो. भारतीयांचा रसविचार आणि पाश्चात्यांचा सौंदर्यविचार यांतील साम्यभेद संशोधकाला दाखविता येणे शक्य आहे. रससंख्या किती व का मानावी यावर पुष्कळांनी संशोधन केले आहे. औचित्य आणि श्लील अश्लील यांचा संबंध, त्याचप्रमाणे नाट्यभाव व अलौकिक भाव यांचा संबंध साहित्यशास्त्राच्या अनुशंगाने सिध्द करता येईल. सौंदर्यात सत्य व शिवाचा समावेश कसा असतो हेही एखाद्या साहित्यशास्त्राच्या अभ्यासकाला दाखविता येईल. माध्यम आणि साहित्यप्रकार, अनुभव आणि आविष्कार यांच्या परस्पर संबंधावर अनेकांनी प्रकाश पाडला आहे. अजूनही विविध साहित्यकृतींच्या प्रकाशात यांच्या संबंधांचे स्पष्टीकरण करता येण्यासारखे आहे. डॉ. चारुशीला गुप्ते यांचा 'हास्यरस आणि मराठी सुखान्तिका' हा प्रबंध त्याचप्रमाणे 'शोककारण आणि मराठी शोकान्तिका' हा म. मा. आळतेकर यांचा प्रबंध, हे साहित्यशास्त्रीय प्रश्नांवर आधारलेले आहेत. डॉ. के. ना. वाटवे यांनी

रसव्यवस्थेशी संबंधित 'रसविमर्श' हा प्रबंध सादर केला आहे.

१९६० ते १९७५ या कालखंडातील नवकवितेच्या संदर्भात डॉ. रमेश वरखेडे यांनी सादर केलेला 'मराठीतील काव्यविचार व समीक्षा' हा प्रबंध विशेष उल्लेखनीय आहे. साहित्यशास्त्रात ज्यांना रस आहे त्यांना साहित्यशास्त्रीय प्रश्न संशोधनासाठी घेता येतात. वाड्.मयीन कलाकृतींच्या संदर्भात साहित्यशास्त्रीय प्रश्न जर घेतले तर ते विशेष उल्लेखनीय असे संशोधन होऊ शकते. 'अर्वाचीन मराठी कवितेतील प्रक्षोभ' हा डॉ. मधुकर पाठक यांचा प्रबंध कवितेशी संबंधित असला, तरी साहित्यशास्त्राशीही संबंधित आहे. संशोधकांना अशा प्रकारचेही विषय निवडता येतात.

**३] भाषिक संशोधन**

साहित्य हे भाषेच्या माध्यमातून प्रकट होते. भाषा ही एक सामाजिक निर्मिती असते. संशोधन क्षेत्रात भाषेच्या अभ्यासाला महत्त्व असते. भाषेच्या अभ्यासात अनेक विषयांचा समावेश होतो. प्रांरभी भाषेच्या स्वरूपासंबंधीचे संशोधन झाले. त्यानंतर भाषेची निर्मिती व भाषेचा जन्मकाळ यासंबंधीचे संशोधन झाले. विशिष्ट ग्रंथातील व विशिष्ट काळातील भाषेचे स्वरूप पाहणे हे भाषेचे दुसरे अंग असते. मराठीत या संदर्भात बरेच संशोधन झाले आहे. भाषेबरोबर व्याकरणाचाही उल्लेख करणे आवश्यक आहे. अनेकांनी मराठीची व्याकरणे लिहिली आहेत. या सर्व व्याकरणांचा ऐतिहासिक दृष्टीतून अभ्यास होण्याची आजही गरज आहे. साहित्य हे शब्दांनी बनलेले असते. भाषेची निर्मितीदेखील शब्दांनी झालेली असते. यामुळे वाड्.मयीन संशोधनात भाषिक अभ्यासाला महत्त्वाचे स्थान आहे.

भाषा आणि समाज यांचा अतिशय जवळचा संबंध असतो. हल्लीच्या काळात भाषा आणि समाज यांच्या परस्पर संबंधांच्या संशोधनाला अतिशय महत्त्व आहे. समाजभाषाविज्ञान हा हल्लीच्या काळात अतिशय महत्त्वाचा असा एक विषय आहे. बोलींचा अभ्यास करणारे बोलीशास्त्र हे या शाखेचे एक प्रमुख अंग आहे. भाषिक अभ्यास करणाऱ्या संशोधकाला भाषेच्या अध्ययनाच्या विविध शाखांची माहिती असणे आवश्यक असते.



बोलीशास्त्राची परिभाषा त्याला माहीत पाहिजे. बोलीचा अभ्यास हा भाषाविज्ञानात महत्त्वाची भर घालतो. बोलींच्या अभ्यासासाठी अभ्यासकाला क्षेत्रीय कार्य करावे लागते. बोलींच्या अभ्यासासाठी प्रश्नावली, रूपावली, शब्दावली, वाक्यावली इत्यादींची गरज असते. ध्वनिव्यवस्था, रूपव्यवस्था, वाक्यव्यवस्था, अर्थव्यवस्था इत्यादी भाषिक संरचनेच्या विविध अंगांशी संबंधित असलेले साहित्य विचारात घ्यावे लागते. भाषिक संशोधन हे केवळ घरी बसून करता येत नाही. त्यासाठी हिंडावे–फिरावे लागते.

बोलीचा शब्दकोश तयार करताना भाषिक समाजाच्या सांस्कृतिक पार्श्वभूमीचा अभ्यास करावा लागतो. लोकगीतांचा भाषिक अभ्यास करताना एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, लोकगीते साहित्याचे चांगले नमुने नसतात. पुष्कळदा लोकगीतांत कृत्रिमता येते. भाषिक साहित्य जमा करणे महत्त्वाचे असते. संशोधनप्रकार लक्षात घेऊन संकलन किती करावे हे संशोधकाने लक्षात घेतले पाहिजे. पुष्कळदा जमा केलेल्या साहित्यात पुनरावृत्ती असते. बोलीविषयीचे साहित्य मौखिक स्वरूपात उपलब्ध होते. त्यामुळे त्याच्या प्राचीन स्वरूपाविषयी निश्चित सांगणे कठीण असते. बोलीतील लोकसाहित्याचा संग्रह व त्याची शास्त्रीय चिकित्सा हा अभ्यासाचा विषय होऊ शकतो. प्रबंधलेखनात ध्वनिव्यवस्था, रूपव्यवस्था आणि वाक्यव्यवस्था यांना प्रत्येकी एकेक प्रकरण देऊन शेवटी गद्यपाठाचे नमुने व शब्दसंग्रह देणे आवश्यक असते. खानदेशी, मावची, भिलोरी इत्यादी बोलींचे संशोधन विद्यापीठीय पातळीवर झाले आहे. यावर पुन्हा सखोल अध्ययन होणे आवश्यक आहे. या संदर्भात 'भाषा व साहित्य : संशोधन, खंड १' मधील डॉ. सु. बा. कुलकर्णी यांचा लेख महत्त्वाचा आहे.

सूक्ष्मभाषाविज्ञान आणि स्थूलभाषाविज्ञान अशा दोन विभागांत भाषिक संशोधन केले जाते. भाषिक अभ्यास करणाराला ऐतिहासिक भाषाविज्ञान आणि वर्णनात्मक भाषाविज्ञान यांचे ज्ञान असणे आवश्यक आहे. भाषावैज्ञानिक संशोधन विविध स्वरूपात करता येते. या क्षेत्रात अभ्यास



Scanned with OKEN Scanner

करणाऱ्याला भाषावैज्ञानिक क्षेत्रातील विविध पध्दतीची माहिती असणे आवश्यक असते. 'भाषा व साहित्य : संशोधन, खंड २' मधील डॉ. कल्याण काळे यांचा लेख अशा प्रकारचे संशोधन करणाऱ्यांना उपयुक्त ठरू शकेल.

वाङ्.मयाचा संबंध शैलीविज्ञानाशी जवळचा असतो. शैलीच्या अंगानेदखील संशोधन करता येते. शैलीचा अभ्यास तीन प्रकारे करता येतो. लेखकाच्या दृष्टीकोनातून शैलीचा विचार करणे, पाठ्यातील शैलीवैशिष्ट्यांचा अभ्यास करणे आणि वाचकांच्या प्रतिक्रियांच्या आधारे पाठ्याबाबत बोलणे हे ते तीन प्रकार आहेत. शैलीच्या अंगाने संशोधन करणाऱ्यांना 'भाषा व साहित्य : संशोधन, खंड २' मधील डॉ. रमेश वा. धोंगडे यांचा 'वाङ्.मय आणि शैलीविज्ञान : भाषावैज्ञानिक दृष्टीकोन' हा लेख उपयुक्त ठरणारा आहे.

मध्ययुगीन काळातील ग्रंथांचा भाषिक अभ्यास कसा करावा यासंबंधी डॉ. मु. श्री. कानडे यांनी 'भाषा व साहित्य : संशोधन, खंड ३' मध्ये जे विवेचन केले आहे ते महत्त्वपूर्ण आहे. भाषिक अभ्यासात संहितानिश्चिती, लेखनकालाची निश्चिती, पाठकालाची निश्चती, उच्चार प्रक्रिया, रूपविचार, शब्दविचार, शब्दांची भर, शब्दलोप, ग्रंथांतील वाक्प्रचार आणि वाक्यरचना यांचा अभ्यास करावा लागतो.

अशा रीतीने मराठी साहित्यसंशोधनात भाषिक संशोधन विविध प्रकारे करता येते. विविध स्तरांवर होणारे भाषिक संशोधन आत्मसात केल्यावर संशोधकाला या प्रकारचे संशोधन करता येईल.

### ४] लेखकाचा अभ्यास

लेखकाचा अभ्यास करताना लेखकाची निवड करणे महत्त्वाचे असते. लेखक निवडल्यानंतर संशोधकाला लेखकाच्या साहित्यकृतींचा अभ्यास करावा लागतो. त्यासाठी वाङ्.मयप्रकाराचे ज्ञान अभ्यासकाला असले पाहिजे. वाङ्.मयीन प्रवाहांची माहिती तर संशोधकाला असलीच पाहिजे. परंतु काल आणि परंपरा यांचीही जाणीव असली पाहिजे. ज्या लेखकासंबंधी आपण काहीतरी नवीन सांगू शकू असा लेखक अभ्यासकाने निवडला



पाहिजे. एखादा नाटककार जर निवडला असेल तर त्या नाटककाराच्या नाटकांचे प्रयोग अभ्यासकाने पाहिले पाहिजेत. पुष्कळदा 'व्यक्ती आणि वाङ्.मय' या पध्दतीने जे संशोधन केले जाते त्यात लेखकाचे जीवनचरित्र आणि त्याच्या साहित्यकृतींची माहिती या पलीकडे फारसे काहीही नसते. संशोधकाने आपल्या विवेचनासाठी एखादे सूत्र निश्चित करावे आणि त्या सूत्राच्या आधारे आपले संशोधन करावे. लेखकाच्या अभ्यासात काहींचा चरित्रात्मक दृष्टीकोन असतो; परंतु पुष्कळदा वाङ्.मयीन व्यक्तिमत्त्व आणि लौकिक व्यक्तिमत्त्व यांचा संबंध नसतो. लेखकाचा चरित्रात्मक अभ्यास करताना पुष्कळदा निष्कर्ष चुकण्याची शक्यता असते; कारण साहित्यातील पात्रांचा किंवा चित्रणाचा लेखकाच्या जीवनाशी संबंध असतोच असे नाही. एखादा लेखक विविध स्वरूपात प्रकट होत असतो. एका माणसाची ती विविध रूपे असतात, हे लक्षात घेऊन चरित्रात्मक अभ्यास करता येतो.

ऐतिहासिक दृष्टीकोनातूनही लेखकाचा अभ्यास करता येतो. विशिष्ट काळाशी लेखकाचे नाते दृढ झालेले असते, त्याचाही शोध घेता येतो. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातूनही लेखकाचा अभ्यास करता येतो. एखादा लेखक विशिष्ट तत्त्वज्ञान आपल्या साहित्यातून मांडतो, त्याचाही शोध अभ्यासकाला घेता येतो. दोन लेखकांचा तुलनात्मक अभ्यासही करता येतो. लेखकाच्या संहितेची समीक्षा करूनही लेखकाचा अभ्यास करता येतो.

लेखकाचे व्यक्तित्त्व अनेक पदरी असते. त्याचा शोध घेऊन त्याच्या ठिकाणचे प्रतिभासामर्थ्य कशा स्वरूपाचे आहे, याचा शोध अभ्यासक घेऊ शकतो. समकालीन घटना, प्रसंग आणि जीवनविशेष यांचा प्रभाव लेखकावर असतो. लेखकाचा अभ्यास करणाऱ्यास वाङ्.मयप्रकाराचे त्याचप्रमाणे साहित्यकृतीतील सौंदर्याचे ज्ञान असणे आवश्यक असते. आठवणी, पत्रे, आत्मचरित्र यांचा उपयोग काही प्रमाणात लेखककेंद्री संशोधनात होतो. काल आणि परंपरा यांची जाणीव ठेऊन लेखकाचा अभ्यास करावा लागतो. 'संशोधन : स्वरूप आणि पध्दती' या पुस्तकात



Scanned with OKEN Scanner

श्री. अनिल पाठक यांचा 'साहित्यिकाचा शोध' हा जो लेख आहे तो साहित्यिकाचा अभ्यास करणाऱ्यांना उपयुक्त ठरणारा आहे. 'भाषा व साहित्य : संशोधन, भाग १' या ग्रंथात 'विशिष्ट ग्रंथकाराचा अभ्यास' हा डॉ. प्र. ल. गावडे यांचा जो लेख आहे तोही उपयुक्त ठरणारा आहे. ग्रंथकार हा अभ्यासाचा विषय असतो, त्याचे चरित्र हा अभ्यासाचा विषय नसतो. त्याच्या साहित्यसंपदेचा अभ्यास महत्त्वाचा असतो. ग्रंथकाराचा अभ्यास करताना अभिनिवेश टाळावा, त्याचप्रमाणे पूर्वग्रहदूषितवृत्तीही टाळावी. लेखकाच्या साहित्यकृतीचा, तिच्यातील सौंदर्याचा शोध घेणे महत्त्वाचे असते. लेखक आणि त्याची साहित्यकृती काळाची अपत्ये कशी आहेत, याचा शोध अशा प्रकारच्या संशोधनात घ्यावा लागतो. लेखकाच्या जीवनापेक्षाही त्याची कलाकृती महत्त्वाची असते, हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे. लेखकाच्या अभ्यासात एकेक सुट्या साहित्यकृतीचा अभ्यास करण्यापेक्षा सर्व साहित्यकृती मिळून वाङ्.मयीन/व्यक्तित्त्व सिध्द करता येणे महत्त्वाचे असते.

**५] साहित्यकृतीनिष्ठ संशोधन**

साहित्यकृतींचा शोध घेताना आशय आणि रूप याचा शोध अपरिहार्य असतो. काही साहित्यकृती शोधप्रबंधाच्या लायकीच्या असतात. त्यांनी त्या वाङ्.मयप्रकारात कोणतेतरी नावीन्य निर्माण केलेले असते. त्या वाङ्.मयप्रकारात त्या साहित्यकृती आदर्श स्वरूपाच्या असतात. वाङ्.मयाच्या इतिहासात अशा साहित्यकृतींचा विशेष उल्लेख केला जातो. त्या साहित्यकृती म्हणजे कलाकृती असतात. त्या साहित्यकृतींनी आपले स्वतःचे असे एक वैशिष्ट्य निर्माण केलेले असते. बालकवींच्या 'औदुंबर' ह्या साहित्यकृतीचे संशोधन करताना 'औदुंबर' कवितेच्या संदर्भात व्यक्त झालेली वेगवेगळी मते लक्षात घ्यावी लागतात. 'कोसला', 'रागिणी', 'वज्राघात', 'भाऊसाहेबांची बखर', 'दमयंती स्वयंवर', 'गोतावळा', 'स्मृतिचित्रे' इत्यादी युगकर्त्या कलाकृती आहेत. अशा कलाकृतींचे संशोधन करता येते. साहित्यकृतीनिष्ठ संशोधनात पुष्कळदा परिष्करणे असतात. ही परिष्करणे लक्षात घ्यावी लागतात. साहित्यकृतीनिष्ठ संशोधन



लेखकाचा किंवा कवीचा अभ्यास करतानादेखील उपयुक्त ठरते. एखाद्या नाटककाराचा अभ्यास करताना त्याच्या समग्र नाट्यकृतींचा अभ्यास अभिप्रेत असला तरी त्याच्या एकेक नाट्यकलाकृतीचा अभ्यास करावा लागतो. कलाकृती छोट्या असल्या तरी त्या कलाकृतीच असतात. त्यांच्यात फारमोठे सामर्थ्य असते. अशा कलाकृती मूल्यांचा फेरफार करायला लावतात. नागेश जोशी यांचा अभ्यास करताना त्यांच्या 'फुलपाखरे', 'देवमाणूस', 'मैलाचा दगड', 'विजय' आणि 'अंतरपाट' या नाट्यकृतींचा अभ्यास करावा लागतो. नागेश जोशींच्या 'देवमाणूस' या नाटकाने मराठी वाङ्.मयाच्या इतिहासात एक साचा निर्माण केला. 'मैलाचा दगड' या नाटकात जोशींनी जी परिष्करणे केली ती महत्त्वाची आहेत. नाटकाचा कच्चा खर्डा त्यांनी तयार केला. त्यात नाटक दुःखान्त आहे. प्रत्यक्षात नाटक सुखान्त आहे. नाटकातील पदे छोटा गंधर्व यांची नसून छोट गंधर्व यांनी कवी संजीव यांच्याकडून लिहून घेतली असे लक्षात येते.

मधुसूदन कालेलकर यांची नाट्यप्रकारान्तरे फार मोठी अभ्यास करण्यासाखी आहेत. ना. सी. फडके यांच्या 'अखेरचं बंड' या कादंबरीवर कालेलकरांनी 'हे फूल चंदनाचे' हे नाटक बेतले आहे. प्रभाकर तामणे यांच्या 'जाताना दार लावून घे' या कथेवर 'हा स्वर्ग सात पावलांचा' हे नाटक आधारलेले आहे. कालेलकरांनी आपल्या नाटकात शेवट बदलला. नाटकात रोहिणी बंड करीत नाही. स्वतःचा प्रियकर बहिणीला देते. नाटकात कालेलकर मोठ्या प्रमाणात दिसतात, तर फडके नाममात्र दिसतात. तामण्यांच्या छोट्या कथेवर आधारलेले नाटक संपूर्ण नवीन वाटते. प्रकारान्तरीत कलाकृतींचा अभ्यास करताना दोन साहित्यकृतींचा तौलनिक अभ्यास करावा लागतो.

जी. ए. कुलकर्णी यांची 'प्रदक्षिणा' ही एक उल्लेखनीय साहित्यकृती आहे. ही सबंध कथा नाटकासारखी आहे. बावीस पृष्ठांच्या या कथेचा आवाका फार मोठ आहे. प्रारंभ, शेवट, कल्पकता, दमदार भाषा आणि अतर्क्य अशा मानवी मनाच्या दर्शनामुळे या कथेला जो एक विशिष्ट

आकार प्राप्त झाला आहे, त्याचा शोध घेण्यासारखा आहे.

'भाषा व साहित्य : संशोधन, खंड १' या ग्रंथात 'विशिष्ट साहित्यकृतीचा अभ्यास' हा डॉ. व. दि. कुलकर्णी यांचा लेख आहे, तो लेख या प्रकारचे संशोधन करणाऱ्यांना मार्गदर्शक ठरू शकेल. डॉ. कुलकर्णी यांनी किर्लोस्करांच्या 'संगीत सौभद्र' या नाटकाच्या संदर्भात या लेखात विवेचन केले आहे. 'सगीत सौभद्र'ची मूलाधार कथा कोणती याचा शोध व. दि. कुलकर्णी यांनी घेण्याचा प्रयत्न केला आहे. महाभारतातील ही कथा भागवत पुराणातील कथेला जवळची आहे. महाभारताचे रूपांतर, भागवत कथेचे रूपांतर, मोरोपंतांचे 'कृष्णविजय' यांत डॉ. कुलकर्णी यांना 'सौभद्र'चे मूळ सापडते. सौभद्रची कथा कीर्तनी कथेलाही जवळची आहे. किर्लोस्करांना कानडी रंगभूमी परिचित होती. त्याचप्रमाणे तंजावरी 'सुभद्रा परिणय' या नाटकाचा त्यांच्यावर प्रभाव होता. 'संगीत सौभद्र' या साहित्यकृतीचे संशोधन करताना डॉ. कुलकर्णी यांनी नाट्यकथेचे मूळ शोधण्याचा जो प्रयत्न केला आहे तो महत्त्वाचा आहे. साहित्यकृतीनिष्ठ संशोधन करताना संशोधकाला अनेक अवधाने पाळावी लागतात. साहित्यकृतीचा काळ, तिचा प्रकार, तिच्यात झालेली परिष्करणे, पूर्वीच्या अनेक गोष्टींचा तिच्यावर असलेला प्रभाव यांचा शोध तर घ्यावा लागतो; परंतु त्या साहित्यकृतीने साहित्यक्षेत्रात स्वतःचे स्थान का निर्माण केले आहे, याचाही शोध घ्यावा लागतो.

**६] वाङ्.मयप्रकारनिष्ठ संशोधन**

साहित्याच्या प्रकाराची संकल्पना ही अलिकडच्या काळातील आहे. संस्कृतात काव्य ही संज्ञा कोणत्याही वाङ्.मयप्रकारासाठी वापरत असत. संस्कृतात साहित्याच्या आकृतीबंधाचा फारसा विचार झाला नाही; कारण संस्कृतात रस आणि ध्वनी हे साहित्याचे प्राणभूत तत्त्व मानले. साहित्य प्रकाराचा अभ्यास म्हणजे कलाकृतीच्या अंतर्बाह्य स्वरूपाचा अभ्यास होय. भिन्न माध्यमांमुळे भिन्न कलाप्रकार जन्माला आले. चित्रकलेचे माध्यम रंग, रेषा, कॅनव्हास आणि कुंचला हे असते. शिल्पकलेचे माध्यम दगड, धातू आणि मेण हे असते. संगीताचे माध्यम स्वर असते. साहित्याचे माध्यम



मात्र शब्द असते. मर्ढेकरांनी माध्यम आणि साधने यांत फरक केला आहे. चित्राला आणि शिल्पाला साधने असतात, असे त्यांचे म्हणणे आहे. शब्दमाध्यम मात्र अगदी भिन्न आहे. साहित्य अनेक परिमाणे व्यक्त करू शकते. साहित्याचे रूप बुध्दिगम्य असते. भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ – काळाची ही तीनही परिमाणे एकत्रित आविष्कृत करण्याची ताकद शब्दात असते. इतर कलांना मर्यादा असतात. साहित्यकलेला मर्यादा नसतात. साहित्य अनेक परिमाणे व्यक्त करू शकते. अशा रीतीने साहित्य ही कला अगदी वेगळी आहे.

कथा, कादंबरी, नाटक वगैरे अनेक प्रकार साहित्यात असतात. कोणत्याही कलाकृतीचे नेमके वेगळेपण व्यक्त करण्यासाठी वर्गीकरणाची गरज असते. वाङ्.मयाच्या वर्गीकरणाचा विचार चार अंगांनी करता येतो.

[१] अभिव्यक्तीपध्दतीनुसार [२] संघटनेनुसार [३] अनुभवाच्या गुणधर्मानुसार[४] साहित्यामागील प्रेरणांनुसार. साहित्यप्रकार असल्यामुळे साहित्याला व्यवस्थापन व बांधणी यांची शिस्त येते.

वाङ्.मयप्रकार विविध आहेत. त्यांचे घटक आणि त्यांची लक्षणे वेगवेगळी आहेत. एका वाङ्.मयप्रकारातील घटक दुसऱ्या वाङ्.मयप्रकारात असू शकतात. नाटकात संवाद हा घटक असतो. तो घटक कादंबरीतही असतो. स्वभावरेखन कथा, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, प्रवासवर्णन यांतही असते. वाङ्.मयप्रकारांच्या लक्षणांची व्यवच्छेदकता सांगणे कठिण आहे. वाङ्.मयप्रकारात घटक तेच असले तरी प्रत्येक वाङ्.मयप्रकारात त्यांचे व्यवस्थापन वेगळे असते. नाटकातील संवाद साक्षात असतात. इतर प्रकारातील संवाद निर्देशिलेले असतात.

काही वाङ्.मयप्रकारांत तंत्राला महत्त्व असते. उदा. सुनीत, दशपदी, गझल वगैरे. कादंबरीचेही तंत्र ठरल्यासारखे असले तरी तंत्रवाद बोकाळला आणि कादंबरीकारांनी बंधने झुगारली. काही वाङ्.मयप्रकार आशयानुगामी असतात. कवितेत प्रतिमासृष्टीला अधिक महत्त्व असते. त्या त्या वाङ्.मयप्रकाराची कुवत आशयानुसार ठरविता येते.

आशय आणि अभिव्यक्ती यांच्यातील नाते महत्त्वाचे असते. कलावंत



Scanned with OKEN Scanner

साहित्यप्रकार निवडतो. त्याला काहीतरी सांगावयाचे असते. आशयबीज निर्माण होते आणि मग कलाकृतीच्या रूपाची जाणीव त्याला होते. साहित्य प्रकाराचे वैशिष्ट्य असले तरी आशय आणि अभिव्यक्ती यांच्यांतील नाते साध्य–साधनाचे असते, हे संशोधकाने लक्षात ठेवले पाहिजे. आशय आणि अभिव्यक्तीत औचित्य असेल तर कलाकृती मूल्यवान होते.

आशयाचे बीजभूत गुणधर्म, कलावंताची प्रवृत्ती, त्याच्या प्रतिभेची कुवत आणि वाङ्.मयप्रकाराचे संकेत ह्या सर्वांच्या एकत्रीकरणातून साहित्यप्रकाराच्या आकृतीबंधाची निर्मिती होते.

वाङ्.मयप्रकाराची संकल्पना साचेबंद नसते. एखादा कलावंत नवीन कलाकृती निर्माण करून नवीन आकाराला जन्म देतो. एका वाङ्.मय प्रकाराची वैशिष्ट्ये दुसऱ्या वाङ्.मयप्रकारातही असतात. एखाद्या कथेला आपण काव्यात्म म्हणतो. एखाद्या कवितेत नाट्य आहे असे आपण म्हणतो. एखाद्या कथेला कादंबरीचा आवाका असतो. वाङ्.मयप्रकारनिष्ठ संशोधन अतिशय महत्त्वाचे असते. अशा प्रकारच्या संशोधनात कलाकृतीच्या घाटाचा म्हणजे तिच्या सौंदर्याचा विचार अभिप्रेत असतो. वाङ्.मयप्रकार श्रेष्ठ–कनिष्ठ नसतात. कलावंताने एखाद्या वाङ्.मयप्रकारात कलाकृतीची निर्मिती कशी केली याचा शोध संशोधकाला घ्यावा लागतो. वाङ्.मयप्रकारामुळे कलाकृतीला विशिष्ट रूप प्राप्त झालेले असते. त्या रूपाचा शोध वाङ्.मयप्रकारनिष्ठ संशोधनात घेणे आवश्यक असते. 'भाषा व साहित्य : संशोधन, खंड २' या ग्रंथात डॉ. मधु कुलकर्णी यांचा 'वाङ्.मयप्रकारांचा अभ्यास' हा जो लेख आहे तो या संदर्भात अभ्यासकांनी अधिक माहितीसाठी अवश्य वाचावा.

**७] तौलनिक साहित्याभ्यास**

साहित्याच्या संशोधनात तौलनिक साहित्याभ्यास हा एक महत्त्वाचा प्रकार असतो. तसे पाहिले तर खऱ्या अर्थाने तुलना करणे शक्य नसते; परंतु व्यवहारात तुलना ही अटळ असते. ज्यावेळी आपण व्यास, कालिदास, शेक्सपिअर वगैरे साहित्यिकांना श्रेष्ठ समजतो, तेव्हा तुलना ही झालेलीच असते. आपल्या बोलण्यात जेव्हा श्रेष्ठ, कनिष्ठ असे शब्द येतात तेव्हा त्या



ठिकाणी तुलनेचाही भाग असतो. प्रकट–अप्रकटपणे तुलना होत असते. साहित्यात आपण प्रकट तुलना करत असतो. दोन कवी, दोन कादंबरीकार, दोन कथाकार, दोन साहित्यकृती, दोन भाषा यांचा आपण तौलनिक अभ्यास करत असतो. तुलनात्मक पध्दती ही संशोधनक्षेत्रात अपरिहार्य अशी पध्दती आहे. तुलनात्मक संशोधन ही एक बौध्दिक प्रक्रिया असते. या प्रक्रियेत विश्लेषण महत्त्वाचे असते. तुलनेने आपल्याला साहित्यकृतीतील किंवा साहित्यकारातील श्रेष्ठ–कनिष्ठता कळू शकते. दोन भाषा, दोन साहित्यिक जसे आपण तुलनेसाठी घेऊ शकतो तसेच आपण दोन साहित्यप्रकार किंवा दोन कालखंडदेखील अभ्यासासाठी घेऊ शकतो. या अभ्यासात एका कलाकृतीचा दुसऱ्या कलाकृतीवर असलेला प्रभाव शोधावा लागतो किंवा एका कलावंताचा दुसऱ्या कलावंतावर असलेला प्रभाव शोधावा लागतो.

एकाच भाषेतील दोन साहित्यप्रकार किंवा प्रवृत्तींचा अभ्यास आपण करू शकतो. एकाच भाषा साहित्यातील दोन कालखंडांची तुलनादेखील आपण करू शकतो. एकाच भाषा साहित्यातील दोन लेखकांचा किंवा दोन कलाकृतींचा अभ्यास आपल्याला करता येतो. दोन भाषा व एक साहित्यप्रकार असाही अभ्यासाचा विषय होऊ शकतो. दोन भाषांतील दोन लेखकांच्या साहित्याची तुलनादेखील करता येते. दोन भाषासाहित्यातील एक विशिष्ट कालखंड डोळ्यांसमोर ठेवून तौलनिक अभ्यास करता येतो. दोन भाषांतील एकाच साहित्यप्रकारावर लिहिणाऱ्या दोन लेखकांचा अभ्यासदेखील महत्त्वपूर्ण ठरू शकतो. दोन भाषा साहित्यातील एका विशिष्ट प्रवृत्तीच्या संदर्भातदेखील आपल्याला चर्चा करता येते. दोन भाषांत जे काव्यशास्त्र असते, त्याचाही तौलनिक अभ्यास करता येतो. दोन भाषांत व्याकरण किंवा जे भाषाशास्त्र असते त्यांतील एका भागाचे तौलनिक अध्ययन करता येते. अनुवादित साहित्याचादेखील तौलनिक अभ्यास करता येतो. साहित्यसंशोधनाच्या ज्या तौलनिक पध्दती आहेत त्यासंबंधी 'संशोधन : स्वरूप आणि पध्दती' या पुस्तकात श्री. सुधाकर शंकर कलावडे यांनी जे विवेचन केले आहे ते महत्त्वपूर्ण आहे.



Scanned with OKEN Scanner

तौलनिक साहित्याचा अभ्यास वेगवेगळ्या प्रकारे करता येतो. तौलनिक साहित्याचा अभ्यास भाषिक एकात्मता साधण्याच्या दृष्टीनेदेखील महत्त्वाचा असतो. मुंबई विद्यापीठात तौलनिक अभ्यासासाठी एक स्वतंत्र विभाग सुरू करण्यात आलेला आहे. अशा अभ्यासाची गरज दिवसेंदिवस भासू लागली आहे. मध्ययुगीन मराठी साहित्याचादेखील आपण तौलनिक अभ्यास करू शकतो. विश्वसाहित्य हे सर्वसाधारण साहित्यापेक्षा वेगळे असते. विश्वसाहित्य म्हणजे विश्वातील सर्व साहित्याचा अभ्यास. विश्वमान्य असे जे साहित्य आहे त्याचाही अभ्यास करावा अशीही एक कल्पना अलीकडच्या काळात मांडली जाते. साहित्यकृती युगधर्माचा आविष्कार असतो, त्याचाही शोध दोन भाषांतील साहित्यकृतींच्या अभ्यासात अभिप्रेत असतो. तौलनिक साहित्याभ्यास विविध प्रकारचा असतो. त्याची शोधक्षेत्रे बहुविध आहेत. मध्ययुगीन मराठी साहित्याचा तौलनिक अभ्यास करताना आपल्याला मध्ययुगीन मराठी साहित्याचे संदर्भक्षेत्र लक्षात घ्यावे लागते. संस्कृत साहित्यपरंपरा लक्षात घेऊन आपल्याला प्राचीन साहित्यातील गद्य आणि पद्य यांचा विचार करावा लागतो. वाङ्‌मयीन रूपबंध प्राचीन आणि अर्वाचीन साहित्यात कसे आहेत याचाही विचार करावा लागतो. साहित्यनिर्मिती आणि धर्मसंप्रदाय यांचा जर आपण विचार केला नाही तर मध्ययुगीन मराठी साहित्याचा तौलनिक अभ्यास आपण करू शकणार नाही. ''परभाषेतील साहित्यकृतीचा आधार घेऊन काही साहित्यकृती निर्माण होताना दिसतात. अशावेळी आधारित साहित्यकृतीची मूळ साहित्यकृतीशी तुलना करणे आवश्यक ठरते. अशा तौलनिक साहित्याभ्यासात त्या दोन्ही साहित्यकृतींच्या तुलनीय संहितांचा शोध, छाननी आणि निश्चिती करावी लागते'', असे डॉ. मंचरकर यांनी संहितेचा तौलनिक अभ्यास करण्याच्या संदर्भात जे म्हटले आहे, ते अगदी बरोबर आहे; कारण मराठीकरणाची परंपरा, काळ आणि समाजजीवनातील जीवनमूल्यात झालेला बदल यांमुळे मध्ययुगीन मराठी कवींच्या हातून मूळ ग्रंथलेखनात बदल होत गेले. 'भाषा व साहित्य : संशोधन, खंड २ आणि खंड ३' यांत डॉ. रत्नाकर बापूराव मंचरकर यांचे तौलनिक



साहित्याभ्यासाच्या संदर्भात जे लेख आहेत ते विशेष उल्लेखनीय आहेत. 'भाषा व साहित्य : संशोधन, खंड २' मध्ये भिन्न भाषिक साहित्याचा तुलनात्मक अभ्यास कसा करावा यासंबंधी डॉ. कृष्ण दिवाकर यांनी जे विस्तृत विवेचन केले आहे तेही अशाप्रकारचे संशोधन करणाऱ्यांना निश्चित उपयुक्त ठरणारे आहे.

## ख] आंतर्विद्याक्षेत्रीय संशोधन

इंग्रजीत Interdisciplinary हा जो शब्द आहे त्या शब्दासाठी मराठीत आंतर्विद्याक्षेत्रीय, आंतर्शिस्तीय, आंतर–अनुशासनीयता इ. प्रतिशब्द वापरले जातात. या क्षेत्रात साहित्याच्या कोणत्यातरी एका अंगाची ललितेतर साहित्याशी तुलना केली जाते किंवा त्यांचा एकमेकांवर कोणता प्रभाव आहे हे दाखविण्याचा प्रयत्न असतो. साहित्याचा मानसशास्त्र, तत्त्वज्ञान, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, सामाजिकशास्त्र, लोकसाहित्य इत्यादींशी संबंध असतो. हे संबंध कशाप्रकारचे असतात, त्याचा शोध आंतरर्विद्याक्षेत्रीय संशोधनात घेतला जातो. पुष्कळदा तुलनात्मक संशोधनाचा विषय फार आकर्षक दिसतो, पण संशोधकाला तुलनेचे सूत्र मात्र सापडलेले नसते. त्यामुळे संशोधन परिपूर्ण होऊ शकत नाही.

ज्ञानक्षेत्र सतत वाढत असते. ज्ञानक्षेत्राचा परिणाम साहित्यावर होतो. आंतर्विद्याक्षेत्रीय संशोधन महत्त्वपूर्ण का असते या संदर्भात 'शोधविज्ञानकोश' या ग्रंथात डॉ. दु. का. संत यांनी पहिल्या आवृत्तीच्या एकविसाव्या पृष्ठावर जे उदाहरण दिले आहे ते महत्त्वाचे आहे. अमेरिकेला टेनेसी व्हॅली प्रकल्प खूप गाजला. टेनेसी ही सव्वाशे मैल लांबीची एक नदी. तिला महापूर यायचे आणि त्यामुळे नुकसान खूप व्हायचे. तिला नियंत्रणात आणण्यासाठी अमेरिकन सरकारने विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांच्या समित्या नेमल्या. जलप्रवाहतज्ज्ञ, अर्थतज्ज्ञ, वनस्पतीशास्त्रज्ञ, प्राणीशास्त्रज्ञ, आरोग्यशास्त्रज्ञ, भूस्तरशास्त्रज्ञ, उद्योजक अशा कितीतरी क्षेत्रांतील तज्ज्ञलोकांच्या समित्यांनी स्वतंत्र रीतीने पाहणी करून आपले निष्कर्ष सादर केले. गंमत अशी की, अनेक निष्कर्ष परस्परविरोधी ठरले. त्यामुळे काय करायचे असा प्रश्न निर्माण झाला. त्या भागात मलेरियाचे निर्मूलन



Scanned with OKEN Scanner

करण्यासाठी झाडे उपटून टाकावी अशी एका समितीने शिफारस केली, तर पुराचा प्रतिबंध करण्यासाठी त्या भागात झाडांची लागवड करावी अशी सूचना दुसऱ्या समितीने केली. समित्यांनी वेगवेगळे निष्कर्ष काढले. सर्व समित्यांनी एकत्र येऊन विचार करणे आवश्यक आहे, याची गरज सर्वांना भासली. कोणत्याही क्षेत्रातील ज्ञानाला मर्यादा असतात. ज्ञानाच्या परस्पर संबंधांची गरज असते. एका क्षेत्रातले ज्ञान दुसऱ्या क्षेत्राला उपयुक्त ठरू शकते. ज्ञानक्षेत्रात त्यामुळे आंतर्विद्याक्षेत्रीय संशोधनाला महत्त्व प्राप्त झाले. जी विविध शास्त्रे आहेत त्यांचा साहित्याशी असलेला संबंध शोधण्याची दृष्टी निर्माण झाली. दोन विद्याशाखांचा समन्वय साधणे महत्त्वाचे ठरले. वेगवेगळ्या विद्याशाखा एकमेकीत मिसळलेल्या असतात. 'त्यांच्या सीमा जेव्हा एकमेकींना स्पर्शून जातात तेव्हा त्या सीमाप्रदेशात दोन्हीही ज्ञानक्षेत्रांचा प्रभाव असतो', असे डॉ. संतांनी पृष्ठ २३ वर जे म्हटले आहे, ते अगदी बरोबर आहे. खरे ज्ञान हे आपण ज्या विषयात पारंगत असतो त्याच्याही पलीकडे असते. यासाठी आंतर्विद्याक्षेत्रीय संशोधनाला फार महत्त्व प्राप्त झाले आहे. आपण वाङ्‌मय आणि समाजशास्त्र, वाङ्‌मय आणि मानसशास्त्र, वाङ्‌मय आणि लोकसाहित्य, वाङ्‌मय आणि तत्त्वज्ञान व वाङ्‌मय आणि इतिहास यांचे परस्परसंबंध कसे असतात ते पाहणार आहोत आणि आंतर्विद्याक्षेत्रीय संशोधन या दृष्टीने त्यांचे संशोधन कसे करता येईल याचाही विचार करणार आहोत.

**१] साहित्य आणि समाजशास्त्र यांतील परस्परान्वयासंबंधीचे संशोधन**

साहित्य आणि समाज यांचे संबंध अतिशय गुंतागुंतीचे असतात. साहित्यिक समाजात वावरतो. तो जी कलावस्तू निर्माण करतो ती सामाजिक असते. साहित्याचा अभ्यास समाजशास्त्रीय दृष्टीकोनातूनही करता येतो. साहित्य विशिष्ट काळ आणि परिस्थिती यांनी बध्द असते. विशिष्ट मानवसमूह विशिष्ट काळात आणि विशिष्ट परिस्थितीत वावरत असतो. साहित्यात विशिष्ट प्रवृत्ती असते. याचा अर्थ असा की, साहित्य हे पूर्णपणे व्यक्तिनिष्ठ नसते. साहित्याचा समाजव्यापाराशी जवळचा संबंध असतो. एखाद्या कलाकृतीचा अभ्यास समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून जसा



केला जातो, तसाच तिचा अभ्यास तिच्यातील कलात्मक सत्याच्या अंगानेही करता येतो.

साहित्य हा संस्कृतीचा एक घटक असतो. त्यामुळे साहित्याचा सांस्कृतिक अंगाने अभ्यास करता येतो. साहित्यात वाङ्‌मयीन संस्कृती असते. त्याचप्रमाणे संस्कृतीचे विशिष्ट केंद्र असते. साहित्याच्या सांस्कृतिक विचारातील एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे संस्कृतीनिरपेक्ष मानली जाणारी रसिकता व कलात्मक अभिरुची. या संदर्भात 'भाषा व साहित्य : संशोधन खंड ३' मध्ये 'साहित्याचा सांस्कृतिक विचार' हा प्रा. रा. ग. जाधव यांचा लेख विचारप्रवर्तक असा आहे. साहित्य हे समाजाच्या सृजनशीलतेचे एक सुंदर रूप आहे, सामर्थ्यसंपन्न रूप आहे, शक्तीरूप आहे व ते समाजाचे श्रध्दास्थानही आहे. अलीकडे साहित्य आणि समाज यांच्या अभ्यासाला महत्त्व प्राप्त झाले आहे. साहित्य हा समाजशास्त्रीय अभ्यासाचा विषय आहे, याची यावरून कल्पना येऊ शकते. साहित्याचा विविध दृष्टीकोनांतून अभ्यास करता येतो. दलित सांस्कृतिक दृष्टीकोन, स्त्रीप्रधान सांस्कृतिक दृष्टीकोन, ग्रामीण सांस्कृतिक दृष्टीकोन इ. दृष्टीकोन हल्लीच्या काळात दिसून येतात. या दृष्टीकोनांच्या आधारे वाङ्‌मयाचे संशोधन करता येते. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून संशोधन करताना सौंदर्यशास्त्रीय दृष्टीकोन बाजूला ठेवून चालणार नाही. त्याचाही विचार अशा प्रकारच्या अध्ययनात करावा लागतो.

लेखक स्वकालीन संस्कृतीचे प्रतिनिधित्व करीत असतो. समाजशास्त्रीय अभ्यासात कलाव्यवहाराचा समाजाच्या संरचनेशी आणि संस्कृतीशी कसा संबंध येतो याचा शोध घ्यावा लागतो. कोणत्याही काळात जी साहित्यनिर्मिती होते त्या साहित्यनिर्मितीत निर्मात्याची प्रकृती, त्या निर्मितीक्षेत्रात पूर्वसूरींचे सिध्द झालेले कर्तृत्व, निर्मिती परंपरा, तत्कालीन शैलीविशेष, निर्मात्याच्या मनात विशिष्ट निर्मितीच्या अनुषंगाने चाललेली व्यक्तिगत आणि कालसापेक्ष आंदोलने, अवतीभोवतीची काही निमित्तकारणे आणि योगायोग यांचा अंतर्भाव होतो. 'द ॲक्ट ऑफ क्रिएशन' या ग्रंथात ऑर्थर कोसलर याने यासंदर्भात जे विवेचन केले आहे



Scanned with OKEN Scanner

ते महत्त्वपूर्ण असे आहे. युगप्रवर्तन आणि सामाजिकता यांच्या परस्परसंबंधांचाही अभ्यास करता येतो. कलावंताच्या निर्मितीच्या प्रेरणांपेक्षाही त्याच्या आविष्कार करण्याच्या पध्दतीशी सामाजिकतेचा घटक अधिक निगडित असतो; कारण कोणतीही शैली व्यक्तिसापेक्ष असली तरी समाजनिरपेक्ष नसते. 'नवसमीक्षाः काही विचारप्रवाह' या पुस्तकात प्रा. गो. म. कुलकर्णी यांचा 'समाजशास्त्रीय समीक्षा : काही विचार' हा लेख आहे. या लेखात त्यांनी समाजशास्त्रीय समीक्षा करणाऱ्यांनी काही घटक नजरेसमोर ठेवण्याची आवश्यकता प्रतिपादन केली आहे. खरे म्हणजे, त्यांनी सांगितलेले घटक साहित्याचे समाजशास्त्रीय अंगाने संशोधन करणाऱ्यांनादेखील उपयुक्त आहेत. प्रा. कुलकर्णी यांनी पुढील १२ घटक सांगितले आहेत : [१] तत्कालिन समाजजीवनाची एकंदर जडणघडण, [२] ज्ञानाचा प्रचलित व्यूह, [३] त्या त्या काळातील सांस्कृतिक परंपरा व तिचे विशेष, [४] कलावंताची प्रकृती, [५] संस्कृतीवितरणाची तत्कालीन माध्यमे, [६] श्रोत्यांच्या अभिरुचीची केंद्रे, [७] साहित्य मंडळे, प्रकाशन संस्था, विविध सांस्कृतिक संघटना आणि त्यांचे कार्य, [८] विद्यापीठातील अभ्यासक्रमाची आखणी व पाठ्यपुस्तकांचे स्वरूप, [९] साहित्य आणि साहित्येतर कलांची स्थितीगती आणि त्यांचे परस्पर संबंध, [१०] संवेदनाविषयावर परिणाम करणारे विविध घटक, [११] नवप्रतिभावंत आणि त्यांची प्रभावकक्षा, [१२] परकीय कलाकृती, संस्कृती, विज्ञान इ. चा परिचय.

साहित्य आणि समाज यांच्या परस्परसंबंधांविषयी जरी संशोधन करता येत असले तरी बहुधा साहित्यात सामाजिकतेचे प्रतिबिंब पडते असे मनाशी ठरवून संशोधन केले जाते; परंतु साहित्यातील वास्तव हे कलात्मक असते. कलात्मक सत्य शोधण्याचा प्रयत्न संशोधकाने केला पाहिजे. त्याचप्रमाणे साहित्यप्रकार लक्षात घेऊनही अशा प्रकारच्या संशोधनाचा विचार केला पाहिजे. समाजशास्त्रीय समीक्षा ही कलाकृतीचे मूल्यमापन करण्यासाठी उपयुक्त ठरू शकते. कलाकृतीत विशिष्ट कालखंडातील कलाव्यवहार आणि सामाजिक – सांस्कृतिक परिस्थिती यांचा जवळचा



संबंध असतो. त्या संबधांचा शोध अशा प्रकारच्या संशोधनात घेता येतो.

अनेक मराठी साहित्यिकांच्या साहित्याचा अभ्यास समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून करता येईल. उदा. हरीभाऊ आपटे, भा. वि. वरेरकर, डॉ. केतकर, विभावरी शिरूरकर, वा. म. जोशी, वि. स. खांडेकर इ. च्या साहित्याचा अभ्यास करता येईल. संशोधनक्षेत्रात अशा प्रकारचे संशोधन फारसे झाले नाही; परंतु ते होणे आवश्यक आहे. कारण साहित्य ही एक सामाजिक संस्था आहे व समाजनिर्मित भाषा हे त्याचे माध्यम आहे. साहित्य आणि समाज यांचे परस्परसंबंध जवळचे असतात. साहित्य म्हणजे समाजाची अभिव्यक्ती असते, हे जरी खरे असले तरी साहित्यात सामाजिक परिस्थितीचे आरशासारखे प्रतिबिंब असते, असे जर गृहीत धरले असेल तर ते चूक आहे; कारण साहित्य ही एक कला असते. साहित्याचे समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून ज्याला संशोधन करायचे आहे त्याला हे विसरून चालणार नाही.

**२] साहित्य आणि इतिहास यांतील अनुबंधाविषयीचे संशोधन**

साहित्याचा अभ्यास पुष्कळ वेळा ऐतिहासिक भूमिकेतून करावा लागतो. साहित्यसंशोधन आणि ऐतिहासिक संशोधन यांतील सीमारेषा पुष्कळदा लक्षात न येणाऱ्या असतात. मुद्रणपूर्वकाळात ग्रंथ हस्तलिखित स्वरूपात असत. अभ्यासक त्या ग्रंथाच्या नकला करीत असत. ग्रंथाची नक्कल करणारे बिनचूक नक्कल करीतच असे नाही. या कारणामुळे जुन्या ग्रंथांची अधिकृत संहिता तयार करणे अतिशय अवघड असे. हे फार मोठे संशोधन कार्य आहे असे मानले जात असे. महाभारताची अधिकृत प्रत तयार करण्याचा प्रयत्न अनेकांनी केला आहे. ज्ञानेश्वरीच्या अनेक प्रती उपलब्ध आहेत, त्यामुळे अनेक संशोधकांनी अधिकृत संहिता निश्चित करण्याचा प्रयत्न केला आहे. डॉ. वि. भि. कोलते, डॉ. य. खु. देशपांडे व डॉ. वा. ना. देशपांडे यांनी महानुभाव ग्रंथांच्यासंबंधी संहितेच्या अंगाने बरेच मौलिक शोधकार्य केले आहे. ग्रंथकाराच्या मूळप्रतीचा शोध घेणे हे अतिशय किचकट असे काम असते. त्यासाठी पाठचिकित्साशास्त्र माहीत असावे लागते. परदेशात शेक्सपिअरच्या नाटकांच्या दोन प्रकारच्या प्रती



Scanned with OKEN Scanner

उपलब्ध आहेत. तिकडे संशोधकांनी शोध घेऊन पाठचिकित्सा करून शेक्सपिअरच्या मूळ संहितेचा शोध घेतला आहे. अशा प्रकारच्या संशोधनात पाठचिकित्साशास्त्राला महत्त्व असते. ऐतिहासिक साधन–चिकित्साशास्त्राला महत्त्व असते. तसे पाहिले तर हा एक इतिहास संशोधनाचा भाग आहे; परंतु वाङ्‌मय आणि इतिहास यांची क्षेत्रे एकमेकात मिसळून गेलेली असतात; त्यामुळे अशा प्रकारच्या संशोधनात जी तत्त्वे स्वीकारलेली असतात ती इतिहाससंशोधनातील असतात. यावरून लक्षात येईल की इतिहासाचा वाङ्‌मयीन संशोधनावर फार मोठा परिणाम असतो. विशुध्द वाङ्‌मयीन संशोधन करणाऱ्या संस्था जे कार्य करतात ते पाहिल्यास असे लक्षात येते की, ते कार्य इतिहाससंशोधनाचेच आहे.

ग्रंथाच्या प्रतीसंबंधी जसा शोध घ्यावा लागतो, तसाच शोध ग्रंथकारासंबंधीही घ्यावा लागतो. ग्रंथकारासंबंधी उपलब्ध माहिती आणि त्याची ग्रंथसंपत्ती यांचा विचार अशा संशोधनात करावा लागतो. ग्रंथकाराच्या चरित्रासंबंधी जे वाद असतात त्यासंबंधी जे संशोधन होते ते एक प्रकारचे इतिहाससंशोधनच असते. या संशोधनाला आपण वाङ्‌मयीन स्वरूपाचे संशोधन म्हणतो. परंतु हे संशोधन इतिहास संशोधनाला अधिक जवळचे असल्यामुळे इतिहाससंशोधनाच्या पध्दतीचा अवलंब अशा संशोधनात करावा लागतो.

साहित्यसंशोधनात विविध संदर्भात इतिहासाचा अभ्यास करावा लागतो. काळाचा अभ्यास करताना इतिहासाचीच मदत घ्यावी लागते. काळाचा राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक इतिहास लक्षात घ्यावा लागतो. साहित्याचा इतिहासाशी जवळचा संबंध असतो. मराठी साहित्य संशोधनात त्याचा फार उपयोग होतो. इतिहासातील किंवा पौराणिक व्यक्तीच्या जीवनातील घटना – प्रसंगांवर काव्य, कथा, कादंबरी, नाटक इत्यादींची मांडणी केलेली असते, अशावेळी इतिहासातील ती व्यक्ती ऐतिहासिक प्रसंगात कशी होती आणि ललित साहित्यात कलावंताने आपल्या प्रतिभेने तिची निर्मिती कशी केली, याचा विचार करावा लागतो.



येथे तुलनात्मक अभ्यास अपेक्षित असतो. संशोधनासाठी विश्वसनीय अशा सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहासाची आवश्यकता असते. त्याशिवाय कोणत्याही लेखकाचा अभ्यास करता येत नाही. अशा रीतीने साहित्य आणि इतिहास यांचे परस्परसंबंध अतिशय जवळचे असल्यामुळे साहित्याचा अभ्यास करताना पुष्कळदा इतिहासाचा आधार घ्यावाच लागतो. प्राचीन लेखक असो की, अर्वाचीन लेखक असो, संहिता जुनी असो की परिष्कृत झालेली नवी असो, संशोधकाला इतिहाससंशोधनाचा आधार घेतल्याशिवाय अशा प्रकारच्या संशोधनाला सामोरे जाता येणार नाही.

**३] वाङ्‌मयाचे मानसशास्त्रीय दृष्टीतून संशोधन**

साहित्य आणि मानसशास्त्र परस्परपूरक असतात. साहित्यात मानवी अनुभवांचे चित्रण असते. आधुनिक मानसशास्त्रज्ञ मानवी मनाच्या संदर्भात वेगवेगळ्या संकल्पना मांडताना दिसतात. मानवी वर्तनाचे साहित्यात सखोल असे आविष्करण झालेले दिसते. लेखकाच्या आंतरजीवनाचे त्याचप्रमाणे साहित्यातील पात्रांच्या वर्तनासंबंधीचे स्पष्टीकरण करणे मानसशास्त्रामुळे शक्य झाले आहे. मानसशास्त्राचा संबंध साहित्यनिर्मिती व साहित्यसमीक्षा अशा दोन्ही अंगांशी येतो. समीक्षेत मानसशास्त्राचा जसा उपयोग होतो, तसा संशोधनातही होतो. साहित्य आणि मानसशास्त्र एक नसते; परंतु मानसशास्त्रामुळे साहित्यातील भावनात्मक संबंध स्पष्ट होतात. साहित्यसंशोधन करतानादेखील मानसशास्त्राची मदत होते.

लेखक मानसशास्त्रज्ञ असतो असे नाही. प्रतिभाशक्तीच्या बळावर परमनप्रवेश करून तो व्यक्तिचित्रण करीत असतो. मानसशास्त्रीय ज्ञानाचा उपयोग करून साहित्यातील पात्रांच्या मनोव्यापाराचा शोध घेता येतो. त्यासाठी मानसशास्त्रीय संकल्पना माहीत असणे आवश्यक असते. सबोध, अबोध आणि बोधपूर्व असे तीन मानसिक प्रक्रियांचे गट असतात. अनाकलनीय अशा मानवी मनाचे चित्रण साहित्यात आढळते. मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून केलेले संशोधन हे एक महत्त्वपूर्ण संशोधन असते.

संशोधनात मानसशास्त्राला महत्त्व असले तरी काही मर्यादेपर्यंत



Scanned with OKEN Scanner

त्याचा उपयोग होतो; कारण साहित्य म्हणजे केवळ मानसशास्त्र नसते, तर ती एक सेंद्रिय कलाकृती असते. पुष्कळदा लेखक कलाकृतीत फेरबदल करतो. कुठे काटछाट करतो. विशिष्ट तऱ्हेने स्त्रीपात्रे रंगवितो. या सर्व गोष्टीचा अभ्यास मानसशास्त्राच्या दृष्टीकोनातून करता येतो. कलाकृतीतील विशिष्ट पात्राच्या कृती–उक्तीच्या मागे कुठलेतरी मानसशास्त्रीय कारण असते. या सर्व गोष्टींचा शोध घेणे महत्त्वाचे असते. 'गिधाडे', 'सखाराम बाईंडर', 'अवध्य' या कलाकृतींचा विचार मानसशास्त्रीय दृष्टीकोनातूनच करावा लागतो. मानवी मनातील गुंतागुंत आणि गूढ व्यापार मानसशास्त्रामुळे कळू शकतो.

मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास करताना कलानिर्मितीच्या मुळाशी मनोव्यापार असतात ते लक्षात घ्यावे लागतात; परंतु बरेच व्यापार जाणीवेच्या आणि नेणीवेच्या सीमेवरचे किंवा त्या पलीकडचेही असू शकतात. अशा मनाचा शोध घेणे हे एक आव्हान असते. अशा रीतीने वाङ्.मय आणि मानसशास्त्र यांचा अतिशय जवळचा संबंध असतो. एखाद्या कलाकृतीचा अभ्यास मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून करता येतो. कलाकृतीतील पात्रे, प्रतिमा, प्रतीके यांचा विचार अशा वेळेला करावा लागतो.

संशोधनक्षेत्रात मानसशास्त्र व व्यष्टी अभ्यास (Case Study) यांना देखील महत्त्व आहे. मानसशास्त्रीय संशोधनात अलीकडे एक नवीन संशोधनक्षेत्र उपलब्ध झाले आहे. त्याला विशिष्ट घटकाचा अभ्यास म्हणजे 'केस स्टडी' असे म्हणतात. या ठिकाणी हा घटक व ही केस हा एक वयोगट असतो किंवा व्यक्ती असते किंवा जमात असते किंवा प्रकृतीचा समुदाय असतो. निवडलेल्या घटकांची सखोल चिकित्सक पाहणी हे या पध्दतीचे मर्म असते. निवडलेल्या घटकाबाबत प्रथम विशिष्ट प्रकारचे निदान केले जाते व त्यानंतर पाहणीसाठी योग्य त्या पध्दतीचा अवलंब केला जातो. सर्व प्रकारच्या अंगोपांगांचे निरीक्षण करणे हे घटकनिरीक्षणात मुख्य काम असते. संशोधनाची ही एक पध्दती आहे. घटक निरीक्षणाला खूप महत्त्व प्राप्त झाले आहे. संख्याशास्त्रीय पध्दतीत समुहाच्या प्रवृत्तीला



अधिक प्राधान्य मिळते. तिच्यात व्यक्तिवैशिष्ट्यांना वाव नसतो. घटक निरीक्षणात गुणांचे अवलोकन नसते. निवडलेल्या घटकांचे सर्वांगीण व चिकित्सक निरीक्षण त्यात असते. अशा रीतीने ही पध्दतीदेखील मानसशास्त्राला जवळची आहे. ही पध्दती साहित्याच्या क्षेत्रात वापरता येते. एखादा ग्रंथकार किंवा ग्रंथ किंवा एखादी प्रवृत्ती घटक म्हणून स्वीकारली जाते व त्या दृष्टीने संशोधन केले जाते. संशोधकाने या पध्दतीचा जर अभ्यास केला तर त्याला अतिशय चांगल्या रीतीने संशोधन करता येते.

### ४] लोकसाहित्यासंबंधीचे सांस्कृतिक आणि वाङ्.मयीन संशोधन

लोकसाहित्य हा अलीकडच्या काळात एक अतिशय महत्त्वाचा असा आंतर्विद्याक्षेत्रीय संशोधनातील विषय आहे. लोकसाहित्याचे अभ्यासक्षेत्र दोन स्वरूपाचे असते. खुद्द लोकसाहित्याचा अभ्यास हे एक स्वरूप असते आणि दुसरे म्हणजे साहित्यातून न उकलणारी कोडी लोकसाहित्याच्या अभ्यासातून सुटू शकतात. या अभ्यासामुळे संस्कृतीवर प्रकाश पडत असतो. त्या त्या काळातील लोकजीवनाचे प्रतिबिंब लोकसंस्कृतीत पडलेले असते. निसर्गाचा परिणाम लोकजीवनावर आणि लोकसंस्कृतीवर होत असतो. आणि याच कारणामुळे विशिष्ट काळात लोककथांना प्रभावी असे रूप आलेले दिसते किंवा एखाद्या काळात लोकगीतांना महत्त्व प्राप्त झालेले दिसते. लोकसंस्कृती आणि लोकजीवन यांमुळे असा फरक पडलेला दिसतो. लोकजीवनातील बदल लोकसंस्कृतीत झिरपत असतात. लोकसंस्कृतीचे प्रतिबिंब लोकसाहित्यातून प्रगट होत असते. लोकसाहित्यातील कलाविष्कार हे निसर्गाशी एकरूप होणारे असतात. निसर्गदेवतेची पूजा त्यात असते आणि त्यात समुहाचा आविष्कार असतो.

महाराष्ट्रात अनेक बोली आहेत. अनेक समाजगट आहेत. त्यांचे लोकसाहित्य भिन्न भिन्न स्वरूपाचे आहे. त्यांचा तौलनिक अभ्यास करणे आवश्यक आहे. आदिवासींच्या भाषेचे संशोधन झाले पाहिजे. त्यांच्या भाषेतील शब्दांचे कोश निर्माण केले पाहिजेत. लोकसाहित्याचे संकलन, संपादन, मांडणी आणि जुळवणी केल्यानंतर त्याचे संशोधन करता येते.



Scanned with OKEN Scanner

लोकसाहित्याचा अभ्यास केवळ साहित्यापुरता मर्यादित न राहता त्याचा समाजशास्त्रीय आणि भाषाशास्त्रीय दृष्टीकोनातूनही विचार झाला पाहिजे. लोकसाहित्याचे अभ्यासक्षेत्र अतिशय व्यापक आहे. लोकसाहित्यात जे सौंदर्यघटक आहेत, त्यांचाही शोध घेण्यासारखा आहे. लोकसाहित्यात आदिबंध, प्राक्कथा आणि दैवतकथा असतात, त्यांचाही शोध घेणे आवश्यक आहे. साहित्यसंशोधन जसे एक व्यापक क्षेत्र आहे, तसेच लोकसाहित्याचे संशोधनही अतिशय व्यापक आहे. लोकसाहित्याचा अनेक शाखांशी संबंध असतो, त्यामुळे त्याचा अभ्यास करणे अधिक अवघड होऊन बसते.

साहित्याचा सांस्कृतिक दृष्टीकोनातून विचार करता येतो. लोकसाहित्याचा सांस्कृतिक अंगाने अभ्यास पुष्कळदा करावा लागतो. समाजशास्त्रीय तत्त्वे पुष्कळदा साहित्यात आढळतात, त्यांचाही विचार संशोधकाला करावा लागतो. लोकसाहित्य लोकसाहित्याचा आविष्कार असल्यामुळे त्याचा सांस्कृतिक अंगानेदेखील अभ्यास करणे आवश्यक आहे. विविध दृष्टीकोनांतून लोकसाहित्याचा अभ्यास केला जातो. अभ्यास करत करत संस्कृतीच्या आदितत्त्वापर्यंत आपण पोहचू शकतो. डॉ. रा. चिं. ढेरे यांनी 'खंडोबा', 'लज्जागौरी', 'लोकसाहित्य आणि संतसाहित्य : एक अनुबंध' आणि 'श्री विठ्ठल : एक महासमन्वय' या ग्रंथांच्या आधारे लोकसाहित्याच्या संशोधकांना एक नवी दृष्टी दिली आहे. लोकसाहित्यातून लोकसंस्कृतीचा शोध कसा घेता येतो हे त्यांनी सिध्द केले आहे. लोकसाहित्याचे संशोधन करणाऱ्याला हिंडावे–फिरावे लागते. त्याला पैसा खर्च करावा लागतो. कॅमेरा, ध्वनिफिती, टेपरेकॉर्डर हे साहित्य त्याला जवळ बाळगावे लागते. ग्रामीण बोलीची धाटणी त्याला लक्षात घ्यावी लागते. तिच्या गाभ्यापर्यंत त्याला पोहचावे लागते. लोकसाहित्याचा अभ्यास हा आपल्या देशीपणाचा शोध असतो. हे संशोधनक्षेत्र अतिशय व्यापक आहे, तितकेच मनोरंजकही आहे. अशा प्रकारच्या संशोधनात खूप काही नवीन शोधायला बराच वाव असतो. या प्रकारच्या संशोधनासाठी 'भाषा व साहित्य : संशोधन, खंड २' मधील डॉ. तारा भवाळकर यांचा



'लोकसाहित्याचा क्षेत्रीय अभ्यास' हा लेख उपयुक्त ठरणारा आहे. त्याचप्रमाणे डॉ. उषा मा. देशमुख यांच्या 'साहित्य शोधणी' या पुस्तकात 'लोकसाहित्य संशोधनाच्या नव्या दिशा' हा जो लेख आहे तोदेखील उपयुक्त आहे.

**५] साहित्य आणि तत्त्वज्ञान यांतील अनुबंधाविषयीचे संशोधन**

प्राचीन मराठी साहित्याचे संशोधन तात्त्विक अंगाने झालेले दिसून येते. साहित्याचा आणि तत्त्वज्ञानाचा संबंध असतो. पूर्वी मराठी संशोधकांनी मध्ययुगीन मराठी साहित्याचा अभ्यास करताना तात्त्विक अंगाचाच विचार केला आहे. साहित्य आणि तत्त्वज्ञान यांचे धागे एकमेकात मिसळून गेलेले दिसतात. प्राचीन मराठी साहित्यातील आशय तत्त्वज्ञानात्मक आहे. प्राचीन साहित्याचा अभ्यास करण्यासाठी धर्म आणि तत्त्वज्ञान यांचा परिचय असणे आवश्यक आहे. सर्व संतांनी तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला होता असे नाही, परंतु त्यांच्या जीवनात जे तत्त्वज्ञान कळत न कळत उतरले तेच त्यांच्या साहित्यातून अभिव्यक्त झाले. जेव्हा तुकाराम 'गोडपणे जैसा गूळ । तुका झालासे सकळ' असे म्हणतात तेव्हा त्यांच्या या उक्तीत अद्वैत सिध्दान्त आहे हे आपल्याला लक्षात घ्यावे लागते.

मराठीत तत्त्वज्ञानपर समृध्द वाङ्मय आहे. भगवत्‌गीतेवरच्या टीकांचा तात्त्विक अंगाने अभ्यास करता येण्यासारखा आहे. वेगवेगळ्या संप्रदायांतील कवींनी जे साहित्य निर्माण केले त्या साहित्यात साहित्याबरोबरच तत्त्वज्ञानालाही महत्त्व आहे. किंबहुना त्यांच्या साहित्यात तत्त्वज्ञानविचाराला साहित्यरूप दिलेले आढळते. जुन्या मराठी साहित्याचा विचार करताना साहित्याबरोबर तत्त्वज्ञानाचाही विचार करावा लागतो.

तत्त्वज्ञानविचाराला साहित्यात स्थान असते. एखाद्या व्यक्तीचा जीवनविषयक दृष्टीकोन जेव्हा ग्रंथातून व्यक्त होतो तेव्हा ते जीवनविषयक तत्त्वज्ञान असते. विशिष्ट तत्त्वज्ञानाच्या पार्श्वभूमीवर ते लेखन झालेले असते. 'भाषा व साहित्य : संशोधन, खंड १' या ग्रंथात डॉ. वि. रा.



Scanned with OKEN Scanner

करंदीकर यांचा 'तत्त्वज्ञान विचार आणि मराठी संशोधन' हा लेख आहे. तो या संदर्भात अतिशय उपयुक्त आहे. करंदीकरांनी आपल्या लेखात लोकमान्य टिळकांचे उदाहरण दिलेले आहे. निष्काम कर्मयोगाचे तत्त्वज्ञान टिळकांच्या जवळ होते. टिळकांनी विशिष्ट तत्त्वज्ञान आत्मसात केल्यामुळे त्यांच्यावर जे साहित्य निर्माण होते त्याचे आकलन त्यांच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास केल्याशिवाय होऊ शकत नाही.

तत्त्वज्ञानविचार साहित्याच्या आकलनास मदत करीत असतो. महानुभावांचे तत्त्वज्ञान वैदिक तत्त्वज्ञानाहून वेगळे आहे. त्यांची परिभाषा व संकल्पना वेगळ्या आहेत. डॉ. कोलत्यांनी महानुभावांच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला. या अभ्यासामुळे तत्कालीन ग्रंथांचे आकलन करणे सुलभ झाले. तत्त्वज्ञान पुष्कळदा पार्श्वभूमीसाठी असते. तत्त्वज्ञानाची पार्श्वभूमी कळल्याशिवाय, साहित्याचे आकलन होऊ शकत नाही. 'महानुभावांचे तत्त्वज्ञान आणि आचारधर्म' यावर डॉ. कोलते यांनी दोन संशोधनपर ग्रंथ प्रसिध्द केले आहेत. तो अभ्यास तत्त्वज्ञानाविषयीचा आहे. डॉ. पेंडसे यांचा 'ज्ञानेश्वरांचे तत्त्वज्ञान' हा ग्रंथ तत्त्वज्ञानाविषयीचा आहे. प्राचीन वाड्.मयाचा अभ्यास करताना त्या त्या संप्रदायाच्या तत्त्वज्ञानाचा विचार करावाच लागतो.

तत्त्वज्ञानविचार साहित्याच्या अभ्यासाला उपकारक ठरतो. साहित्य संशोधन करताना तत्त्वज्ञानविचाराला कमी महत्त्व द्यावे. परंतु साहित्य विचाराला मात्र जास्त महत्त्व द्यावे. कारण आपण साहित्याचा अभ्यास करत असतो, तत्त्वज्ञानाचा नाही. साहित्याच्या अभ्यासात तत्त्वज्ञानविचार येतो; परंतु तो अनुषंगाने आला पाहिजे.

मराठी साहित्यसंशोधनाचे वाड्.मयीन संशोधन आणि आंतर्विद्याक्षेत्रीय संशोधन असे दोन मुख्य प्रकार आपण पाहिले. दोन्ही प्रकारांत येणारे जे उपप्रकार आहेत त्यांचाही विचार आपण केला. साहित्यसंशोधन करणाऱ्यांनी आपले संशोधन कोणत्या प्रकारांत आणि कोणत्या उपप्रकारात बसते याचा आधी विचार केला पाहिजे. साहित्याशी संबंधित असे जर संशोधन असेल तर संशोधकाला साहित्याचे स्वरूप आणि साहित्यशास्त्र



माहीत पाहिजे. आंतर्विद्याक्षेत्रीय संशोधन करणाऱ्याला इतर जी विद्याक्षेत्रे आहेत, त्यांचा अभ्यास करावा लागतो. साहित्याशी त्यांचा अनुबंध कसा असतो याचा शोध त्याने घेतला पाहिजे. हा शोध घेताना साहित्य हे शेवटी साहित्य असते हे लक्षात घेणे आवश्यक असते. समाजशास्त्रीय दृष्टीकोन, मानसशास्त्रीय दृष्टीकोन, सांस्कृतिक दृष्टीकोन, तात्त्विक दृष्टीकोन वगैरे दृष्टीकोन हे त्या त्या कलाकृतीच्या निर्मात्याचे असतात. ते लक्षात घेऊन त्या पार्श्वभूमीवर त्याच्या साहित्याचे मूल्यमापन करणे आवश्यक असते.

दुसरे असे की, साहित्यसंशोधनाचे जे विविध प्रकार आहेत ते सोयीसाठी आहेत. संशोधकाला विशिष्ट दिशा मिळावी यासाठी ते आहेत. पुष्कळदा एका विशिष्ट प्रकारच्या संशोधनातही ओघाने दुसऱ्या प्रकारांचा उल्लेख येतो. साहित्यकृती आणि लेखक लक्षात घेऊन कोणत्या प्रकारे संशोधन करावे हे संशोधकाने ठरविले पाहिजे. लेखकाचा अभ्यास करताना साहित्यकृतीनिष्ठ संशोधन, वाड्.मयप्रकारनिष्ठ संशोधन, भाषिक संशोधन आणि तौलनिक अभ्यास यांचाही समावेश त्यात असतो. एवढेच काय, परंतु आंतर्विद्याक्षेत्रीय संशोधनाचाही आधार पुष्कळदा घ्यावा लागतो. या सर्व विवेचनाचा अर्थ असा की, मराठी साहित्यसंशोधनाचे प्रकार हे विशिष्ट प्रकारच्या संशोधनाला दिशा देण्यासाठी आहेत. प्रत्येक प्रकाराला जसे महत्त्व आहे, तसे प्रत्येक प्रकार दुसऱ्या प्रकाराला पूरक असा आहे. संशोधनात समीक्षेचा भाग असतो आणि समीक्षा ही कुठल्याही एकाच प्रकारे करता येत नाही. मराठी साहित्यसंशोधनही एकाच प्रकारे करता येते असे नाही. प्रारंभी म्हटल्याप्रमाणे एखादा संशोधक नवीन प्रकारालादेखील जन्म देतो.

✧ ✧



Scanned with OKEN Scanner

# ३ : संशोधनप्रक्रिया

संशोधन ही एक गुंतागुंतीची प्रक्रिया असते. या प्रक्रियेत काही टप्पे असतात. या टप्प्यांतील विषयाची निवड हा एक महत्त्वाचा टप्पा असतो. विषय कोणता निवडावा यासंबंधी संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मनात विविध प्रकारच्या शंका असतात. विद्यार्थ्यांनी स्वतः विषय निवडला पाहिजे. ज्या विषयात अभ्यासकास रस असेल असा विषय त्याने निवडावा. विद्यार्थ्याने स्वतःची आवड–निवड, स्वतःची पात्रता, साधनसामुग्रीची उपलब्धता या गोष्टी लक्षात घेऊन विषय निवडला पाहिजे. नावडता विषय शक्यतो अभ्यासकाने निवडू नये. आपले कुतूहल जागृत राहील असा विषय अभ्यासकाने निवडावा. केवळ मार्गदर्शकाने एखादा विषय सुचविला म्हणून तो अभ्यासकाने निवडला पाहिजे असे नाही. आवडीचा विषय निवडून स्वतःच्या प्रयत्नावर अवलंबून राहून अभ्यासकाने संशोधनाला प्रारंभ करावा. मार्गदर्शक केवळ मार्गदर्शनसाठी असतो, हे लक्षात घेऊन अभ्यासकाने स्वतःच्या आवडीचा विषय निवडावा.

संशोधन हे शास्त्रीय स्वरूपाचे असते हे लक्षात घेऊन एम. ए. पर्यंतच्या अभ्यासात विद्यार्थ्याला संशोधनासाठी वाव असलेला एखादा विषय सापडला असेल तर तो अवश्य निवडावा. विषयाची क्षेत्रमर्यादा फार मोठी नसावी आणि सीमितही नसावी. साधनांची उपलब्धता लक्षात घेऊन विषय निवडावा. संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्याला जर विचारले की, तू संशोधन कशावर करणार? तर तो सांगतो, 'दलित साहित्यावर.' परंतु दलित



साहित्यावर निश्चित संशोधन कोणते करणार यासंबंधी तो काहीच सांगू शकत नाही. दलित साहित्याशी संबंधित असा विषय त्याने निवडला पाहिजे की ज्यावर आतापर्यंत कोणी लिहिले नसेल. मग तो विषय दलित कथा, कादंबरी, आत्मचरित्र व कविता यांच्याशी संबंधित, किंवा दलित साहित्याच्या भाषेशी संबंधित किंवा वास्तववादाशी संबंधित किंवा प्रतिमासृष्टीशी संबंधित किंवा स्त्रीजीवनाशी संबंधित किंवा विद्रोहासंबंधीही असू शकेल.

Presented Books

विषय निवडण्यापूर्वी ज्या विषयावर संशोधन झाले असेल असा विषय निवडू नये. डॉ. वसंत कुळकर्णी यांनी विविध विद्यापीठांतील प्रबंधांची सूची पुस्तकरूपाने प्रसिध्द केली आहे, ती अभ्यासकाने जरूर पहावी. त्याचप्रमाणे एम्. फिल.साठी प्रबंधिका लिहू इच्छिणाऱ्यांनी विविध विद्यापीठांत ज्या विषयांवर लेखन झाले आहे असा विषय निवडू नये. अभ्यासासाठी असलेली मुदत लक्षात घेऊन अत्यंत व्यापक असा विषय अभ्यासकाने निवडू नये. खूप व्यापक विषयाच्यासंबंधी चिकित्सकपणाला वाव कमी असतो आणि त्यामुळे निष्कर्ष काढणेही अवघड जाते. 'संत तुकारामाच्या गाथेचा अभ्यास' असा विषय निवडला तर चूक होईल; त्याऐवजी 'तुकारामांच्या गाथेतील बोधवाद' असा विषय निवडता येईल किंवा 'तुकारामांची प्रतिमासृष्टी' किंवा 'तुकारामांच्या गाथेतील म्हणीचा समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास' असा विषय निवडता येईल किंवा 'तुकारामांचे व्यक्तित्व आणि कवित्व' असाही विषय निवडता येईल. तुकारामांच्या गाथेशी संबंधित अशा अनेक विषयांवर संशोधन करता येईल. तुकारामांच्या गाथेशी संबंधित असा विषय निवडला तर तो त्या गाथेचा सर्वांगीण अभ्यास नसेल, परंतु गाथेशी संबंधित अशा एका अंगावर निश्चित प्रकाश पाडणारा असेल. याचा अर्थ असा की, संशोधनाचे स्वरूप लक्षात घेऊन, विषयाची व्याप्ती निश्चित असलेला व जो विषय निवडल्याने काहीतरी नवीन मांडता येईल असा विषय निवडावा. निवडलेल्या विषयाला योग्य न्याय देणे महत्त्वाचे असते.

ज्या विषयावर खूप लिहिले गेले आहे असा विषय न निवडता ज्या

Dayanand College of Arts, Latur. Acc. No. 1325 Date 26.11.08 LIBRARY



Scanned with OKEN Scanner

विषयावर कोणी फारसे लिहिले नाही असा विषय निवडावा, असे जेव्हा म्हटले जाते तेव्हा अभ्यासकाने एक गोष्ट अवश्य लक्षात ठेवली पाहिजे ती ही की, प्रबंधलेखन किंवा प्रबंधिकालेखन ही एक शास्त्रशुध्द कला असते. ज्या विषयावर पूर्वी लिहिले गेले आहे अशा विषयावरदेखील एखादा कुशल संशोधक नव्याने प्रकाश पाडू शकतो. नवा अन्वयार्थ लावून पूर्वी जे काही मांडले गेले ते कसे चूक होते हे पुराव्यानिशी मांडता आले पाहिजे. पूर्वीचे पुरावे तपासून नवी तथ्ये संशोधकाला प्रस्थापित करता आली पाहिजेत. अशा रीतीने विचारपूर्वक विषय निवडून संशोधकाने आपल्या संशोधन प्रक्रियेचा शुभारंभ करावा. अंतर्गत आणि बाह्य पुरावे गोळा करून त्यांची चिकित्सा करून संशोधकाला निष्कर्ष काढता आले पाहिजेत. संशोधनात नावीन्य आणि मौलिकता नसेल तर त्या संशोधनाला काडीचीही किंमत नसते.

मागील प्रकरणात साहित्यसंशोधनाच्या प्रकारांसंबंधी विवेचन केले आहे. त्यातील ज्या प्रकारात संशोधकाला गती असेल असा विषय त्याने निवडावा. निवडलेल्या विषयाचे शब्दांकन करणे महत्त्वाचे असते; कारण शब्दांकनामुळे शोधप्रकल्पाची कल्पना येऊ शकते. निवडलेल्या विषयातून काय मांडावयाचे आहे हे विषयाचे शीर्षक सुचवीत असते. 'मधुसूदन कालेलकरांच्या नाटकांचा चिकित्सक अभ्यास', 'नाटककार मधुसूदन कालेलकर : एक अभ्यास', 'मधुसूदन कालेलकरांच्या नाटकांचा समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास' हे सर्व विषय नाटककार मधुसूदन कालेलकर यांच्याशी संबंधित असले तरी त्यांच्या अभ्यासाच्या दिशा वेगवेगळ्या आहेत म्हणून विषयाचे शब्दांकन विचारपूर्वक करणे आवश्यक असते. संशोधनाचे स्वरूप विषयाच्या शब्दांकनाने निश्चित होते.

निवडलेल्या विषयासाठी साधनसामुग्रीचे संचयन अभ्यासकाला करावे लागते. त्यासाठी त्याला ग्रंथालयांची मदत घ्यावी लागते. साहित्यसंशोधनासाठी ग्रंथालये उपयुक्त असतात. अभ्यासकाचे ग्रंथालय हे अभ्यासक्षेत्र असते. विविध ठिकाणच्या ग्रंथालयांना भेटी देऊन त्याठिकाणी दुर्मिळ ग्रंथवाचन करण्याची तयारी संशोधकाची असली पाहिजे. ग्रंथालयात



अनेक प्रकारच्या सूची असतात. त्यांचाही उपयोग अभ्यासकाला करावा लागतो. संदर्भ ग्रंथांचे वाचन करून अभ्यासकाने योग्य प्रकारे टिपणे काढली पाहिजेत. यासाठी वाचनाचे संयोजन करणे आवश्यक असते. टिपणे काढण्यासाठी अभ्यासकाला वेगवेगळ्या प्रकारे नोंदी कराव्या लागतात. ह्या नोंदी करण्याची विशिष्ट पध्दत असते. त्या पध्दतीसंबंधी अधिक माहिती डॉ. स. गं. मालशे यांच्या 'शोधनिबंधाची लेखनपध्दती' या पुस्तकात 'पुष्टिकांची पध्दती' या शीर्षकाखाली दिलेली आहे, ती जिज्ञासूंनी अवश्य पहावी.

## [क] समस्यानिर्धारण आणि अभ्युपगमनिश्चिती

संशोधनाच्या शास्त्रीय पध्दतीत पाच पायऱ्यांचा उल्लेख पहिल्या प्रकरणात आला आहे. कोणत्याही व्यवहारात आधी मनात शंका उपस्थित होतात. त्यामुळे काही अडचणी जाणवतात. ह्या अडचणींचे स्वरूप ओळखणे महत्त्वाचे असते. संशोधनातील ही अडचण एक प्रकारची समस्या असते. ह्या समस्येच्या सोडवणुकीसाठी उपाययोजना करावी लागते. म्हणजे विशिष्ट प्रकारचा अंदाज बांधावा लागतो. त्यासाठी काही गृहितकल्पना निश्चित करावी लागते. या गृहितकल्पनेला 'अभ्युपगम' असे म्हणतात. पहिल्या प्रकरणात 'संशोधनशास्त्र' या नावाचा जो घटक आहे त्यात यासंबंधीची अधिक माहिती आहे.

संशोधनाची सुरुवात समस्येने होते. या समस्येचे स्वरूप निश्चित करणे महत्त्वाचे असते. समस्या निश्चित करून गृहितकृत्याची मांडणी करणे महत्त्वाचे असते. साहित्यसंशोधन शास्त्रीय पध्दतीचे असल्यामुळे त्यात गृहितकल्पना अतिशय महत्त्वाची असते. किंबहुना सबंध संशोधनच गृहितकल्पनेवर आधारलेले असते. संशोधकाच्या समोर निर्माण झालेली समस्या गृहितकल्पना निश्चित केल्यानंतर सुटू शकते. गृहितकल्पना निश्चित न करता केलेले संशोधन दिशाहीन असते. शास्त्रीय पध्दतीत समस्येची जाणीव झाल्यानंतर तिच्या सोडवणुकीसाठी विचारचक्रे फिरू लागतात. परिस्थितीचे अवलोकन करून कल्पनेच्या बळावर समस्येच्या सोडवणुकीचा मार्ग सुचू लागतो. यामुळे संशोधनाला चालना मिळते.



Scanned with OKEN Scanner

गृहितकृत्य प्रयोगांनी सिध्द झाल्यानंतर त्याला सिध्दांताचे स्वरूप प्राप्त होते. गृहितकल्पना ही एक संभाव्य शक्यता असते. गृहितकल्पना शोधणे हे नैपुण्याचे काम असते. शास्त्रीय पध्दतीचा तो एक आवश्यक भाग असतो. वाङ्‌मयीन संशोधनातही गृहितकल्पना निश्चित करून जर संशोधन केले तर ते दिशाहीन न होता सुसूत्र होते व त्यातून निश्चित अशा निष्कर्षाप्रत पोहोचता येते.

साहित्यक्षेत्रातील संशोधकापुढे साहित्यकृतीसंबंधी किंवा साहित्यप्रकारासंबंधी किंवा साहित्यिकासंबंधी किंवा साहित्याशी संबंधित अशा एखाद्या विषयासंबंधी समस्या असते. निर्माण झालेल्या समस्येमुळे संशोधकाच्या मनात जिज्ञासा निर्माण होते. साधनसामुग्रीची पुसट कल्पना त्याच्या मनात येऊ लागते. संशोधकाची विचारसरणी एका विशिष्ट संकल्पनेवर स्थिर होते. आपल्या साध्यासाठी संशोधक मनात कल्पनेने एखादे विधान गृहित धरतो. अशा विधानाला 'अभ्युपगम' असे म्हणतात. या अभ्युपगमासंबंधी डॉ. स. गं. मालशे यांनी 'भाषा व साहित्य : संशोधन, भाग १' या ग्रंथात पुढीलप्रमाणे जे विचार व्यक्त केले आहेत ते अतिशय महत्त्वाचे आहेत. ''गृहितकृत्याच्या बुरुजावर उभे राहून आपणास संशोधन कार्यातील भावी टप्पे अजमाविता येतात. गृहितकृत्य म्हणजे सिध्दीची दिशा दाखविणारा संकल्प. तो जसा प्रस्थानबिंदू असतो तसाच भावी वाटा जिथे एकत्र येऊन मिळतात, असा केंद्रबिंदूही असतो. वाटचालीच्या प्रारंभी अभ्यासकाचे ज्ञान अपुरे असते. तो साधनसामग्रीशी चाचपडत असतो. गृहितकृत्याला रूप प्राप्त झाले की, संशोधनाच्या वाटचालीची दिशा स्पष्ट होते. मराठी साहित्याच्या संशोधनात काही सुटसुटीत गृहितकृत्ये अशी मांडता येतील :

१] 'दमयंती स्वयंवरा'चा कर्ता, शिवाजीचा प्रधान रघुनाथ पंडितच.

२] 'एकनाथी रुक्मिणी स्वयंवरा'चा साचा पुढील स्वयंवरकाव्यांनी उचललेला आहे.

३] प्रा. ना. सी. फडके यांचे समीक्षासिध्दान्त हे त्यांच्या स्वतःच्या साहित्यावरून घेतलेले आहेत.



४] शाहिरी काव्य म्हणजे मराठी काव्याची प्रभात.

५] फ्राइडची मतप्रणाली गंगाधर गाडगीळांच्या कथालेखनाला नेटकेपणाने लावता येते.

६] 'एकच प्याला' ही मानी स्वभावाबरोबरच संशयी स्वभावाचीही शोकान्तिका आहे.

७] विसाव्या शतकाच्या तिसऱ्या व चौथ्या शतकांना 'आभासमय वास्तवतेचे युग' म्हणता येईल.

८] आधुनिक मराठी साहित्य इतके परपुष्ट आहे की ते पुरेसे परपुष्ट नाही.

९] रविकिरण मंडळाने सामान्यांच्या भावभावनांचा ढोबळ आविष्कार केला.

१०] रामदास हे शिवाजी महाराजांचे राजकीय गुरू होते.

११] धनुर्धारीकृत 'वाईकर भटजी' हे इतके यशस्वी रूपांतर आहे की ते रूपांतरच वाटत नाही.''

गृहितकृत्य पूर्णपणे सत्य ठरतेच असे नाही, परंतु त्यामुळे संशोधनाची वाटचाल करणे सोयीचे होते. गृहितकृत्याच्या बाजूने संशोधकाने पुरावे गोळा करणे आवश्यक असते. पुराव्यात विविधता जर असेल तर गृहितकृत्याला बळकटी येते. पुष्कळदा एखादे तथ्य पुढे येते आणि गृहितकृत्य कोलमडून पडते. अशा वेळेला गृहितकृत्य बदलणे भाग असते. गृहितकृत्याच्या बाजूने जर पुरावे मिळत गेले तर गृहितकृत्य उभे राहते. अनुकूल–प्रतिकूल असे पुरावे मिळत जातात. त्यात सबळ पुरावे ज्या गृहितकृत्याच्या बाजूने असतील ते गृहितकृत्य निश्चित करता येते. गृहितकृत्यापासून संशोधनपध्दती सुरू होते. संशोधकाला गृहितकल्पनेसाठी सर्व प्रकारचे पुरावे गोळा करावे लागतात, नव्हे त्याने गोळा केले पाहिजेत. सर्व पुराव्यांची छाननी करून निःपक्षपातीपणाने आणि चिकित्सक दृष्टीने निर्णय घेतला पाहिजे. अनुकूल किंवा प्रतिकूल अशा कोणत्याही पुराव्यांचा संशोधकाने आदर करून त्यांचा समावेश त्याने जरूर केला पाहिजे. पुष्कळदा पर्यायी निष्कर्ष निघाला तरी संशोधकाने कोणतेही पुरावे न टाळता खंडन–मंडन करून त्याने संशोधन केले पाहिजे. साहित्य

संशोधनात समस्यानिर्धारण आणि अभ्युपगमनिश्चिती यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे हे संशोधकाने लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

## [ख] संशोधनसाधने :

साहित्यसंशोधन करताना संशोधनसाधने अतिशय महत्त्वाची असतात. प्राचीन मराठी साहित्याचे संशोधन करताना तर या साधनांना खूपच महत्त्व असते. संशोधनासाठी उपलब्ध होणारी साधने विविध प्रकारची असतात. कोरीव लेख, हस्तलिखिते, दैनंदिनी, पत्रे, अभिलेखागारे, ग्रंथालये, कोशवाङ्.मय, सूचिवाङ्.मय, सांखिकी, प्रश्नावली, मुलाखती, गणकयंत्र वगैरे विविध प्रकारची साधने संशोधनासाठी उपयुक्त ठरतात. यांतील काही साधनांचा उपयोग प्राचीन साहित्याच्या संशोधनासाठी होतो, तर काहींचा उपयोग आधुनिक मराठी साहित्याच्या संशोधनासाठी व क्षेत्रीय संशोधनासाठी होतो. या साधनांचा यथायोग्य उपयोग केला तर मौलिक संशोधन होऊ शकते. भूतकाळ आणि भविष्यकाळ यांत अंतर असले तरी सातत्य असते. वर्तमानकाळातील सांस्कृतिक आणि साहित्यिक जीवनाचे काही विशेष भूतकाळात कुठेतरी सापडतात. असे विशेष सापडले म्हणजे वर्तमानकाळाला त्या क्षेत्रापुरता अर्थ प्राप्त होतो. संशोधनसामुग्री जशी उपलब्ध होते तशी संशोधनाला विशिष्ट दिशा प्राप्त होत जाते. पुढे काही संशोधनविषयक साधनांच्या उपयुक्ततेविषयी व उपयोजनांविषयी माहिती दिली आहे.

### १] कोरीव लेख

शिलालेख आणि ताम्रपट यांना कोरीव लेख म्हणतात. ही साधने अस्सल समजली जातात. यांचा संबंध स्थलकालाशी असतो. ही साधने टिकाऊ असतात; कारण दगडावरील रेघ आणि तांब्यावरील रेषा कितीही वर्षे गेली तरी बदलत नाही. ही साधने जीर्ण होत नाहीत. हस्तलिखिते मात्र जीर्ण होतात. प्राचीन ग्रंथांपेक्षाही कोरीव लेख हे साधन या दृष्टीने महत्त्वाचे असतात. डॉ. शं. गो. तुळपुळे या कारणामुळे 'भाषा व साहित्य : संशोधन खंड ३' या पुस्तकातील 'मराठी कोरीव लेखांचा अभ्यास' या लेखात म्हणतात, ''शिलालेख भंगतो पण विकार पावत नाही. ग्रंथसृष्टीला



मायाबाजार म्हटले तर कोरीवलेखांची सृष्टी सत्यसृष्टी म्हणता येईल. अर्थात या सत्यसृष्टीतही क्वचित एखादा बनावट ताम्रपट खऱ्याचे सोंग घेऊन वावरताना आढळतो हे खरे. पण त्याचे हे सोंग जाणते लोक तात्काळ ओळखतात आणि त्याचा दंभस्फोट करतात. कोरीव लेख सर्वभक्षक काळाच्या प्रभावातून वाचतात. इतिहासाचे एक अस्सल साधन त्यामुळे आपल्या हाती येते.''

प्राचीन काळी लिहिलेला जो मजकूर असतो त्याला पुराभिलेख असे म्हणतात. कोरीव लेखांचा जो अभ्यास असतो त्याला पुराभिलेखविद्या असे म्हणतात. प्राचीन काळी भारतीय लोक शिळा, धातू, लाकूड, स्तंभ, धातूंचे पत्रे, भांडी, विटा, शिंपले, हस्तदंती मुद्रा इ. वस्तूंवर लेख लिहीत असत. हे लेख कोरलेले असत. हे लेख राज्यकर्ते कोरून घेत अगर एखादी व्यक्ती असे लेख कोरून घेत असे. भारतात विविध भागांत विविध शिलालेख वाचण्याचा प्रयत्न आजपर्यंत अनेकांनी केला आहे. इंग्रज व परदेशी संशोधकांनी या संदर्भात महत्त्वाचे कार्य केले आहे. त्यातील बहुतेक लेख ब्राह्मी लिपीत आहेत. ते वाचण्याचे प्रयत्न या संशोधकांनी केले. वैदिक वाङ्.मयातील लेखविद्येचे पुरावे त्यांनी गोळा केले. त्याचप्रमाणे बौध्द वाङ्.मयातील लेखनाचे पुरावेही गोळा केले. ब्राह्मी लिपीची व्युत्पत्ती शोधून भारतीय संशोधकांनी काही सिध्दांत मांडले.

सम्राट अशोकाने आपल्या राजाज्ञा शिळेवर कोरून ठेवल्या आहेत. देवळासमोरील स्तंभांवरही लेख लिहिलेले दिसून येतात. एखादा वीर युध्दात मरण पावला तर त्याच्या नावाने स्तंभ उभारून त्याचे नाव चिरंतन करून ठेवीत. अशा स्तंभांना वीरगळ असे म्हणत. स्त्री सती गेली तर सतीचा स्तंभ उभारत. नातेवाईकांच्या नावाने गोत्रशैलीका स्तंभ निर्माण करत. पूर्वी खाजगी व्यक्तीदेखील दानधर्म केल्यास माहिती कोरून ठेवीत असत.

प्राचीन काळी ताम्रपत्र हे अतिशय लोकप्रिय साधन होते. दानधर्माविषयीची माहिती या ताम्रपटावर असे. या ताम्रपटाला प्रारंभ, मध्य व शेवट असे. ताम्रपटाच्या सुरुवातीला मांगल्यसूचक शब्द असत.



Scanned with OKEN Scanner

पुरालेखात जी भाषा असे तिची खास वैशिष्ट्ये होती. प्राकृत भाषेतील लेख शिलालेखावर आढळतात. काही लेखांत संस्कृतचा प्रभाव आढळतो. मराठी शिलालेख आणि ताम्रपट १० व्या शतकापासून सापडतात. शिलालेखातील अंकलेखन वैशिष्ट्यपूर्ण असे. तांबे, रूपे, कासे, लोह, पितळ, शंख, ताडपत्र, भूर्जपत्र, कापड वगैरेंचा वापर पूर्वी लेखनासाठी करीत असत.

पुराभिलेखविद्या हे एक कठीण शास्त्र आहे. लिपीवाचन, निरनिराळ्या प्रादेशिक लपेटी यांचा अभ्यास, विविध राजवंशांची माहिती यांचा अभ्यास करून संशोधकाला ऐतिहासिक सत्याचा शोध घ्यावा लागतो. 'भाषा व साहित्य : संशोधन, खंड १' या पुस्तकात सौ. शोभना गोखले यांचा 'लेखविद्या' नावाचा लेख या संदर्भात अत्यंत उपयुक्त आहे.

कोरीव लेखांचे ठसे घ्यावे लागतात. हे ठसे घेऊन कोरीव लेखांचे वाचन करावे लागते. कोरीव लेखातील लेखनपध्दती विचारात घ्यावी लागते. कोरक्याच्या हातून चुका पुष्कळ झालेल्या असतात. त्या शोधाव्या लागतात. अनेक ठिकाणी संक्षिप्त रूपे असतात. या सर्व कारणांमुळे कोरीव लेखांचे वाचन अचूक करणे आवश्यक असते. कोरीव लेखांची कालनिश्चिती ठरविणे हा संशोधनातील एक महत्त्वाचा भाग असतो. 'भाषा व साहित्य : संशोधन, खंड ३' या पुस्तकात डॉ. शं. गो. तुळपुळे यांचा 'मराठी कोरीव लेखांचा अभ्यास' हा लेख या संदर्भात संशोधन करणाऱ्यांना अत्यंत उपयुक्त ठरणारा आहे.

**२] हस्तलिखिते**

हस्तलिखित हे प्राचीन साहित्याच्या संशोधनातील आणखी एक महत्त्वाचे साधन असते. एखाद्या ग्रंथाची संहिता तयार करण्यासाठी भिन्नभिन्न काळांत वेगवेगळ्या व्यक्तींनी जी हस्तलिखिते तयार केलेली असतात, त्यांचा अभ्यास करणे अतिशय जिकिरीचे असते. मुद्रणकलेच्या आधी ग्रंथप्रसार हस्तलिखित ग्रंथांच्याच आधारे होत असे. वेदवाङ्.मयापासून ते मराठी साहित्यापर्यंत झालेली वाङ्.मयनिर्मिती हस्तलिखित स्वरूपातील ग्रंथांनीच जतन करून ठेवलेली आहे. निरनिराळ्या



पंथांचे वाङ्.मय हस्तलिखित स्वरूपातच प्रारंभीच्या काळात होते. हस्तलिखितांनी ग्रंथलेखनाची एक परंपरा जोपासली आहे.

वेद आणि वैदिक परंपरा मान्य नसणाऱ्यांनीही भाषाशास्त्रीय अभ्यासाचे आधारभूत साधन या दृष्टीने वेदवाङ्.मयाचे महत्त्व मान्य केले आहे. वेदवाङ्.मयातील भाषा तिच्या उच्चार पध्दतीसह वर्तमानकाळापर्यंत सुरक्षित राहिली आहे.

अनेक ग्रंथांतून प्राचीन विद्याकुळांचे उल्लेख आढळतात. ऋषिमुनींच्या आश्रमांत विद्यार्थी शिकत असत. अशा आश्रमांत अध्ययन व अध्यापन यासाठी उपयुक्त असे ग्रंथ असत. जीर्ण ग्रंथांचे नूतनीकरण होत असे.

धर्मपीठातदेखील हस्तलिखितांचा संग्रह असे. संपन्न देवस्थानातही ग्रंथसंग्रह होत असे. ग्रंथसंग्रह हे प्रतिष्ठेचे प्रतीक मानले जात असे. काही राजांना ग्रंथसंग्रह करण्याचे वेड होते. काही पुराणिक व हरदास हेदेखील ग्रंथसंग्रह करीत. याला व्यावसायिक स्वरूप होते. ग्रंथलेखनात आनंद मानून स्वानंदे लेखन करणाऱ्यांनी प्राचीन ग्रंथांची प्रतिलिपी करण्यातच सार्थकता मानली. संग्रही असलेल्या ग्रंथांचे सत्पात्री दान करण्यात अशा लेखकांना आनंद वाटत असे. मोलाने ग्रंथलेखन [नक्कल] करणारेही या देशात होते. सत्पुत्राप्रमाणे ग्रंथांचा सांभाळ पूर्वी केला जात असे.

हस्तलिखित ग्रंथांत संस्कृत भाषेतील आदर्शांचे अनुकरण केलेले आढळून येते. समाप्तीलेखात तर बरीच संशोधनसामग्री मिळू शकते. श्रोत्यांना आवाहन काही ठिकाणी दिसून येते. सैन्याच्या वाटचालीतही ग्रंथलेखन होत असे. निरनिराळ्या जातीजमातीतील नकलाकार दिसून येतात. हस्तलिखितांच्या लेखनाची एक परंपराच भारतात निर्माण झाली होती. परोपकार, पुण्यसंपादन, स्वतःला होणारा आनंद ह्या प्रेरणा हस्तलिखितांच्या प्रती तयार करण्याच्या पाठीमागे दिसून येतात. डॉ. श्री. रं. कुळकर्णी यांनी 'प्राचीन मराठी हस्तलिखिते' या पुस्तकातील चौथ्या प्रकरणात या संदर्भात सविस्तर माहिती दिली आहे, तिचा उपयोग जिज्ञासूंना होऊ शकेल.



Scanned with OKEN Scanner

### ३] दैनंदिनी

दैनंदिनी हे एक महत्त्वाचे साधन आहे. साधनांच्यामध्ये समकालीन साधने महत्त्वाची मानली जातात. ही साधने वास्तव असतात. यांच्यावर संस्करण होत नाही. अशी साधने अविकृत राहतात. दैनंदिनी लिहिणारी व्यक्ती मात्र तोलामोलाची असावी लागते. दैनंदिनी लिहिण्याचा हेतू शुध्द असायला हवा. ती प्रसिध्दीसाठी किंवा कुणाला खुश करण्यासाठी लिहिलेली नसावी. दैनंदिनीतील घटनांना महत्त्व असते. त्या घटना सिध्द करता आल्या पाहिजेत. इंग्रजीत पीपीजची डायरी प्रसिध्द आहे. दोनशे वर्षांपूर्वी लंडन शहर आगीत भस्मसात झाले, त्या प्रसंगाचे वर्णन या डायरीत मिळते. हे वर्णन प्रमाण मानले गेले. आत्मलेखनासाठी लिहिलेली डायरी विश्वसनीय मानली जाते.

आत्मचरित्राचे साधन या दृष्टीने दैनंदिनीस अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यातील माहिती वास्तवावर आधारलेली असते. तरीपण आत्मचरित्रातील माहिती अस्सल पुरावा म्हणून वापरता येतेच असे नाही. एक पूरक माहिती एवढेच तिचे स्थान असते. आत्मचरित्रातील वस्तुनिष्ठता वादविषय होऊ शकते. तरीपण आत्मचरित्रातील माहिती त्या काळच्या जीवनविषयक संकल्पनांच्या संदर्भात महत्त्वाची असते. मानसशास्त्रीय पाहणी करण्याच्या दृष्टीने आत्मचरित्राला महत्त्व असते. तशात काही लेखक बहिर्मुख असतात, तर काही अंतर्मुख असतात. अशावेळी निष्कर्ष काढणे अवघड असते.

### ४] पत्रे

पत्रे वेगवेगळ्या व्यक्तींनी, वेगवेगळ्या काळी, वेगवेगळ्या संदर्भात लिहिलेली असतात. संशोधनात पत्र हेदेखील एक साधन असते. व्यक्तीने इतरांना लिहिलेली पत्रे जशी महत्त्वाची असतात, तशीच त्या व्यक्तीला इतरांनी लिहिलेली पत्रेही महत्त्वाची असतात. व्यक्तिगत पत्रात व्यक्तीच्या मनःस्थितीचे, तिच्या जीवनविषयक विचारसरणीचे, त्याचप्रमाणे त्या काळाचे प्रतिबिंब उमटलेले असते. व्यक्तीला आलेल्या पत्रात त्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वावर क्वचित प्रकाश पाडलेला असतो किंवा त्या



व्यक्तीच्या इतरांशी असलेल्या अनुबंधांच्या संदर्भात आपणास माहिती मिळू शकते. गणेश चौधरी यांची 'काचेचे मन' या पुस्तकात प्रसिध्द झालेली पत्रे अभ्यास करण्यासारखी आहेत. ही आधुनिक काळातील पत्रलेखन पध्दती झाली; परंतु याशिवाय जी ऐतिहासिक कागदपत्रे असतात त्यांचेही खूप महत्त्व असते. ऐतिहासिक कागदपत्रे इतिहासलेखनाचे महत्त्वाचे असे साधन असते. अशा पत्रांचे संशोधन अतिशय किचकट असते. ऐतिहासिक कागदपत्रांच्या संशोधनात आणि संपादनात प्रा. ग. ह. खरे आणि शं. ना. जोशी यांनी मोलाची भर घातली आहे. ऐतिहासिक पत्रांचे वाचन करणे महत्त्वाचे असते. या पत्रांतील मोडी अक्षरे पुष्कळदा दुर्बोध असतात. कालनिश्चिती, स्थलनिश्चिती आणि व्यक्तिनिश्चिती या दृष्टीने या पत्रांचा अभ्यास करावा लागतो. ऐतिहासिक कागदपत्रांचे संशोधन व संपादन कसे करावे याबाबत 'भाषा व साहित्य : संशोधन, खंड १' मध्ये गो. त्र्यं कुळकर्णी यांचा 'ऐतिहासिक कागदपत्रे : संशोधन व संपादन' हा जो लेख आहे त्याचा जिज्ञासूंनी अवश्य अभ्यास करावा.

### ५] अभिलेखागारे

व्यक्ती, संस्था, कंपनी, राज्य इत्यादींना त्यांनी केलेले व्यवहार नीट लिहून ठेवावे असे वाटणे साहजिक असते. या व्यवहारासंबंधीची माहिती लिहून ठेवणे आवश्यकही असते. अशी लिहून ठेवलेली जी माहिती असते, म्हणजे लिखाण असते, अशा लिखाणाला पुराभिलेख किंवा अभिलेख असे म्हणतात. या संदर्भात ग. ह. खरे 'अभिलेखागारे [भाषा व साहित्य : संशोधन, खंड १] या लेखात म्हणतात, "जुने लेख सुरक्षित ठेवण्याची पध्दती, असुरक्षित लेखांना सुरक्षित करण्याची पध्दती, सुरक्षित ठेवलेले लेख वाचून त्यांचे सारांश काढणे आणि अन्य तऱ्हेने ते लेख रोजचा कारभार किंवा इतिहास लेखन यास कसे उपयोगी पडतील याचा विचार करून त्याप्रमाणे व्यवस्था करणे इ. अनेक गोष्टींचा पुराभिलेखविद्या या विषयात समावेश होतो. हे काम ज्या ठिकाणी चालते त्याला पुराभिलेखागार किंवा अभिलेखागार असे म्हणतात."

ही लेखागारे खूप मोठी असतात, किंवा लहानही असतात. केंद्र सरकार



Scanned with OKEN Scanner

जी राज्ये चालविते त्यात त्या त्या राज्याची लेखागारे आहेत. लेखागारातील कागदपत्रे जपण्याच्या विशिष्ट पध्दती असतात. कागद निर्जंतुक करावे लागतात. त्याचप्रमाणे कागद फाटू नयेत म्हणून शक्यतो घडीविरहित ठेवले जातात. महाराष्ट्रात मुंबई, पुणे, कोल्हापूर, नागपूर, औरंगाबाद याठिकाणी महाराष्ट्राची शासकीय लहानमोठी अभिलेखागारे आहेत. महाराष्ट्र शासनाच्या अधिकारात असलेले एक मोठे लेखागार पुणे येथे आहे. त्याला 'एलिएनेशन ऑफिस' असे म्हणतात. विविध भाषांतील कागद या ठिकाणी आहेत. पुण्याच्या 'भारत इतिहास संशोधन मंडळा' कडे सर्वात मोठा पत्रसंग्रह आहे. तेथे १५ लाख कागदपत्रे आहेत. नागपूर येथे विदर्भ संशोधन मंडळाकडे अल्पसा कागदसंग्रह आहे. धुळ्यास 'राजवाडे संशोधन मंडळ' आणि 'समर्थ वाग्देवता मंदिर' या दोन्ही ठिकाणी अनेक कागदपत्रे आहेत. नांदेडच्या 'गोदातीर इतिहास संशोधन मंडळा' तही काही कागदपत्रे आहेत. अभिलेखागारातील कागदपत्रे संशोधकांना संशोधनासाठी अत्यंत उपयुक्त ठरत असतात.

**६] ग्रंथालये**

साहित्याच्या संशोधनात ग्रंथालयांना तीर्थक्षेत्रे असे मानले जाते. ग्रंथालयाशिवाय साहित्याचे संशोधन केवळ अशक्य आहे. विषय निवडीसाठी ग्रंथालयाचा उपयोग होतो. नवनवे विषय निवडण्यास मराठीत अजून खूप वाव आहे. या निवडीसाठी अभ्यासकाला ग्रंथालयाची मदत घ्यावी लागते. प्रबंधविषय निश्चित केल्यानंतर अभ्यासकाला ग्रंथालयीन संदर्भ साह्याकडे वळावे लागते. तात्पुरती अभ्यास सूची प्रथम करावी लागते. हे काम परिश्रमाचे असते. ज्ञानकोश, चरित्रकोश, ग्रंथकारसूची, ग्रंथसूची यांसारख्या संकलनात्मक संदर्भ ग्रंथांच्या आधारे एखाद्या विषयावरील संदर्भांची तात्पुरती यादी तयार करता येते. परंतु यासाठी ग्रंथालयपध्दती व संदर्भ ग्रंथरचनेचा पूर्व परिचय आवश्यक असतो. काहींना तर वर्णानुक्रमदेखील आठवत नाही. मराठी वर्णमाला जर माहीत नसेल तर ग्रंथालयाचे साह्य घेता येणार नाही; त्याचप्रमाणे सूचीदेखील करता येणार नाही. तात्पुरती संदर्भसूची कशी करावयाची यासंबंधी एक उदाहरण देता



येईल. 'वा. गो. आपटे : व्यक्ती आणि वाङ्मय' असा जर विषय असेल तर आधी वा. गो. आपट्यांची एकूण पुस्तके किती हे मराठी ग्रंथसूचीच्या आधारे, त्याचप्रमाणे या संदर्भात असलेल्या इतर सूचीच्या आधारे निश्चित करता येईल. वा. गो. आपट्यांसंबधी लिहिलेल्या लेखांची सूची 'मराठी नियतकालिकांची सूची'च्या आधारे करता येईल. 'आनंद' मासिकाचे अंकही यासाठी वाचावे लागतील. कारण वा. गो. आपटे 'आनंद' मासिकाचे संपादक होते व त्यात ते लिहीत असत. ग्रंथालयाचे साह्य संशोधकांना खूपच होत असते. वा. गो. आपट्यांचेच आणखी उदाहरण द्यायचे झाले तर पुढीलप्रमाणे देता येईल. वा. गो. आपट्यांच्या पुस्तकांच्या शेवटी त्यांच्या मृत्यूनंतर प्रसिध्द केलेल्या त्यांच्या पुस्तकांच्या याद्या दिलेल्या आहेत. यादीत 'मोती मिनार' या त्यांच्या पुस्तकाच्या नावाची चिरफाड होऊन 'मोतीमहल' व 'कुतुबमिनार' अशी दोन नावे आढळतात. या नावाची पुस्तके सर्वत्र शोधून मी अक्षरशः हताश झालो. शेवटी पुणे येथील विश्रामबागवाड्यातील शासकीय ग्रंथालयातील ग्रंथपालांना सांगितले की, वा. गो. आपट्यांची जेवढी पुस्तके तुमच्याजवळ असतील तेवढी मला काढून द्या. त्यांनी काढून दिलेल्या पुस्तकांत 'मोती मिनार' हे पुस्तक होते. ते पुस्तक पाहिल्यावर मला कोडे उलगडले.

तात्पुरत्या संदर्भसूचीत विशिष्ट माहिती असावी लागते. ग्रंथांसंबंधी नोंद करताना पुढील माहिती आवश्यक असते :

१] लेखकाचे नाव

२] ग्रंथनाम

३] प्रकाशन स्थल, प्रकाशक, प्रकाशन वर्ष

४] उपलब्धी [यात ग्रंथालयाचे नाव द्यावे]

५] बोधांक.

नियतकालिकांतील लेखांची नोंद करताना तीत पुढील गोष्टी असणे आवश्यक आहे :

१] लेखकाचे नाव

२] लेखाचे नाव



Scanned with OKEN Scanner

३] नियतकालिकाचे नाव, वर्ष अथवा अंक क्रमांक अथवा दिनांक, महिना व वर्ष
४] उपलब्धी [ग्रंथालयाचे नाव]
५] बोधांक

ज्ञानसाधने मिळविण्यासाठी खूप प्रयत्न करावे लागतात. त्यांची विश्वसनीयता ठरविणे महत्त्वाचे असते. पुष्कळदा तोंडी पुरावे किंवा आठवणी महत्त्वाच्या ठरतात. पुष्कळदा अनावश्यक संदर्भांची नोंद वगळावी लागते. ग्रंथपाल ज्ञानसाधन उपलब्ध करून देत असतो. ''ज्ञानसंशोधनात ग्रंथपाल हा अभ्यासकाचा मित्र आहे, साहाय्यकर्ता आहे; पण तो मार्गदर्शक नव्हे, तर अभ्यासक व मार्गदर्शक यांच्यामधील दुवा आहे, ही जाणीव सर्वांनी ठेवली, तरच ग्रंथालयीन संदर्भ साहाय्याचे मर्म समजल्यासारखे होईल'', असे 'भाषा व साहित्य : संशोधन, खंड १' मधील 'ग्रंथालयीन संदर्भ साहाय्य' या लेखात म. प. पेठे यांनी जे म्हटले आहे ते अगदी बरोबर आहे.

शासकीय विभागीय ग्रंथालय, पुणे; मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, दादर; मुंबईचे रॉयल एशियाटिक सोसायटीचे ग्रंथालय; राष्ट्रीय ग्रंथालय कलकत्ता; समर्थ वाग्वदेवता मंदिर, धुळे; राजवाडे संशोधन मंदिर, धुळे; भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे; भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था, पुणे इत्यादी ठिकाणी संशोधकांना ग्रंथ त्याचप्रमाणे नियतकालिकांचे अंक अभ्यासासाठी मिळू शकतात.

संकलन आणि संशोधन ही एकाच प्रक्रियेची दोन अंगे आहेत. एखाद्या विषयात संशोधन करावयाचे तर त्या विषयावर उपलब्ध असलेली सर्व ज्ञानसाधने एकत्रित करणे हे पहिले कार्य असते. संशोधनाची सुरुवातच या संकलनातून होते. मराठी वाङ्.मयाच्या संशोधनाला आवश्यक अशा स्वरूपाचे संकलन अजून झालेले नाही.

विद्यापीठाच्या ग्रंथालयांना संशोधन–ग्रंथालये असे म्हणतात. ग्रंथालयातील सेवा अचूक, कार्यक्षम आणि तत्पर असावी लागते. पुस्तके, नियतकालिके, प्रबंध, चर्चासत्रांचे वृत्तान्त, विद्वत संस्थांचे अहवाल,



हस्तलिखिते, कागदपत्रे वगैरे संशोधनात्मक साहित्य संशोधनपर ग्रंथालयात उपलब्ध होऊ शकते. संशोधनपर ग्रंथालयातील सेवकांशी सलोख्याचे संबंध ठेवून आपली साधनसामुग्री जमविली पाहिजे. ग्रंथालयांचा वापर कसा करावा यासंबंधी संशोधकाने माहिती करून घेणे आवश्यक आहे. ग्रंथालय हे साहित्य संशोधनात एक अपरिहार्य साधन आहे याची जाणीव संशोधकाने ठेवली पाहिजे. 'भाषा व साहित्य : संशोधन, खंड ३' मध्ये कृष्णाजी शंकर हिंगवे यांचा 'संशोधन ग्रंथालये' या नावाचा जो लेख आहे तो या संदर्भात अत्यंत उपयुक्त आहे.

**७] कोशवाङ्.मय व सूचिवाङ्.मय**

कोशरचनेत पुढील तीन टप्पे असतात :
१] प्रथम केवळ विविध माहिती मिळविणे व ती टिपून ठेवणे.
२] माहितीचे विषयवार वर्गीकरण करणे.
३] आकारविल्ह्यानुसार मांडणी करणे.

कोशवाङ्.मय हे ज्ञानसंपादनाचे सर्वात महत्त्वाचे साधन असते. डॉ. सु. रा. चुनेकर यांनी 'भाषा व साहित्य : संशोधन, खंड १' मध्ये 'कोशरचना व मराठी कोशवाङ्.मय' या लेखात कोशवाङ्.मयाचे या संदर्भात केलेले विवेचन जिज्ञासूंनी अवश्य वाचावे. कोशवाङ्.मयाचे पुढीलप्रमाणे चार वर्ग करता येतात. त्यातील प्रत्येक वर्गातील कोशाची उपयुक्तता संशोधकाच्या दृष्टीने खूप असते.

**शब्दकोश :** शब्दकोशात शब्दांचा संग्रह असतो आणि त्यांचा अर्थही असतो. शब्दकोशांचे अनेक प्रकार संभवतात. [१] सर्व संग्राहक शब्दकोश, याचे एकभाषी, द्वैभाषी, बहुभाषी, असे प्रकार होतात. [२] विशिष्ट शब्दकोश [३] परिभाषा कोश [४] व्युत्पत्तीकोश, [५] एकेका ग्रंथातील शब्दांचा अर्थसंग्रह केलेला कोश, ६] समानार्थक किंवा विरुध्दार्थक शब्दांचे कोश, ७] म्हणी, वाक्प्रचार यांचे कोश.

**विश्वकोश :** ज्ञानाचा संग्रह करणाऱ्या कोशांचा हा दुसरा वर्ग. यांना 'ज्ञानकोश' किंवा 'विश्वकोश' असेही म्हणतात. ज्ञानाचे आकलन करण्याच्या जेवढ्या पध्दती आहेत, तेवढ्या पध्दतीनी तयार केलेले कोश



Scanned with OKEN Scanner

पुढीलप्रमाणे आढळतात :[१] सर्वसंग्राहक, सर्वसमावेशक असे सर्वसाधारण विश्वकोश. [२] विशिष्ट शाखीय विश्वकोश, [३] चरित्रकोश, [४] धर्मकोश, [५] दैवत कोश, [६] संस्कृति कोश, [७] भौगोलिक कोश, [८] ऐतिहासिक कोश, [९] वाड्.मय कोश इत्यादी. विश्वकोशांचा संशोधनात अनेक संदर्भात उपयोग होतो. या साधनाचा उपयोग संशोधकाला करून घेता आला पाहिजे.

**कोशसदृश वाड्.मय :** ''याची रचना प्रत्यक्षात कोश पध्दतीने झालेली नसते. पण त्याचा उद्देशही एखादा विषय, एखादा प्रदेश यासंबंधी माहिती वस्तुनिष्ठपणे संकलित करून वाचकांना बहुश्रुत करणे हाच असतो'', असे डॉ. चुनेकरांनी जे म्हटले आहे ते अगदी बरोबर आहे.

**सूचिवाड्.मय :** सूची हे एक शास्त्र आहे. संशोधकाला वेगवेगळ्या सूचींचा परिचय असणे आवश्यक असते. त्याला वेगवेगळ्या प्रकारची सूचीदेखील करता आली पाहिजे. 'संशोधन : स्वरूप आणि पध्दती' या पुस्तकात 'सूची : शास्त्र व उपयोग' हा सु. रा. चुनेकरांचा लेख आहे, तो संशोधन करणाऱ्यांनी अवश्य वाचावा. त्याचप्रमाणे 'भाषा व साहित्य : संशोधन खंड २' मध्ये डॉ. कृ. शं. हिंगवे यांचा 'सूचिविज्ञान' हा जो लेख आहे तोही उपयुक्त आहे.

ज्ञानसंचयाच्या दिशा दाखविण्याचे कार्य सूचिवाड्.मय करीत असते. संशोधनात हे महत्त्वाचे साधन असते. शं. ग. दाते यांची 'मराठी ग्रंथ सूची' त्याचप्रमाणे 'मराठी नियतकालिकांची सूची' अतिशय महत्त्वाची अशी आहे. पेठ्यांनी 'ज्ञानदेव वाड्.मय सूची' केली आहे. निरनिराळ्या नियतकालिकांतून ग्रंथसूची येत असते. अशा विविध प्रकारच्या सूचींचा उपयोग संशोधकांना खूप होत असतो.

वर्णानुक्रमरचना कोशकारांनी वेगवेगळ्या पध्दतींनी केलेली आढळते. याबाबत बराच गोंधळ आहे. डॉ. मो. रा. वाळंबे यांचे या संदर्भात मत स्वीकारता येण्यासारखे आहे. [पाहा : भाषा व साहित्य : संशोधन, खंड १ 'वर्णानुक्रमपध्दती' ] कोशकारांना भेडसावणारे प्रश्न पुढीलप्रमाणे आहेत. वाळंब्यांनी त्यांची पुढीलप्रमाणे उकलही करून दाखविली आहे.



१] अनुस्वार व विसर्ग यांना वर्णमालेत कोठे स्थान द्यावे? 'अं' व 'अः' हे स्वतंत्र वर्ण मानावेत का? उकल : अनुस्वार व विसर्ग हे स्वरानुवर्ती म्हणून त्यांचे स्थान प्रत्येक स्वरानंतरच आहे. 'अं' हा स्वतंत्र वर्ण मानू नये. अं = अ + ं असे मानून त्याला अ वर्णातच स्थान द्यावे. विसर्गाचे स्थान अनुस्वाराच्या नंतरचे आहे. जसे : अ, अं, अः; क, कं, कः, क्र, क्रं, क्रः

२] 'क्ष' व 'ज्ञ' यांचे वर्णमालेतील स्थान कोणते ? उकल :– हे दोन स्वतंत्र वर्ण मानून, मराठी वर्णमालेतील त्यांना परंपरेने जी शेवटची स्थाने दिली आहेत, ती तशीच ठेवावीत.

३] 'ळ' चे स्थान कोणते? उकल : त्याचे स्थान 'ह' नंतर.

४] अॅ, ऑ या उच्चारांना स्थान कोणते? उकल : यांची स्थाने 'ए, 'औ' नंतर.

५] 'ह' चे स्थान कोणते? उकल : उच्चाराप्रमाणे. जसे ब्रम्ह, चिन्ह, जिव्हा.

६] अनुस्वाराचे स्थान कोणते? उकल : अक्षरांचा क्रम लावताना विरनुस्वार अक्षर आधी व तेच सानुस्वार अक्षर नंतर येईल.

ही पध्दती अनुसरली तर 'क' वर्णाने सुरू होणाऱ्या अक्षरांचा क्रम पुढीलप्रमाणे राहील :

क, कं, कः, का, कां, कि, किं, कु, कुं, कूं, कृ, के, कें, कॅ, कँ, कै, कैं, को, कों, कॉ, काँ, कौ, कौं, क्र, क्रं, क्रा, क्रां..........

'क' गटातील शब्द पुढीलप्रमाणे क्रमाने येतील : कई, कऊल, कच, कंटाळा, कःपदार्थ, काढा, कांडण, किमान, किंबहुना, कुदळ, कुंकू, कूर्म, कृत्य, केधवा, केंदाळ, कॅटलॉग, कँटीन, कैलास, कोनाडा, कोंदट, कॉलरा, काँग्रेस, कौतुक, कौंतेय, क्रम, क्रंदन, क्राफ्ट, क्रांती....... क्रोध, क्रॉमवेल, क्रौर्य, क्रौंच.

वर्णानुक्रमरचना पुढीलप्रमाणे करतात :

१] पपई, टरबूज, ईडलिंबू, अननस, फणस या शब्दांची सूची करताना शब्दातील पहिले अक्षर पाहून क्रम लावावा लागेल, तो असा : अननस, ईडलिंबू, टरबूज, पपई, फणस.



Scanned with OKEN Scanner

२] अशोक, अरविंद, अहमद, अजय, अविनाश, अनंत या शब्दांची सूची करताना पहिली अक्षरे सारखी असल्यामुळे दुसरी अक्षरे लक्षात घेऊन क्रम लावावा लागेल, तो असा : अजय, अनंत, अरविंद, अविनाश, अशोक, अहमद.

३] करवत, करकर, करणे, करडू, करमणे या शब्दांची सूची करताना पहिली दोन अक्षरे सारखी असल्यामुळे तिसरी अक्षरे लक्षात घेऊन क्रम लावावा लागेल, तो असा : करकर, करडू, करणे, करमणे, करवत.

सूचीचा उपयोग संशोधनक्षेत्रात खूप होतो. संशोधकाला निरनिराळ्या सूचींच्या आधारे संशोधनसामग्री उपलब्ध करून घेता आली पाहिजे. त्याचप्रमाणे त्याला सूचीही करता आली पाहिजे.

**८] सांख्यिकी**

संहितेचा संख्याशास्त्रीय अभ्यास हा विविध कारणान्वये करण्यात येतो. सांख्यिकी हे संशोधन क्षेत्रातील एक नावीन्यपूर्ण असे साधन आहे. 'भाषा व साहित्य : संशोधन, खंड १' मध्ये सु. ग. प्रभु–आजगावकर यांचा 'संहितेचा संख्याशास्त्रीय अभ्यास' हा या संदर्भात परिपूर्ण अशी शास्त्रीय माहिती देणारा लेख आहे. या साधनाचा उपयोग ज्यांना करावयाचा आहे, त्यांना तो अत्यंत उपयुक्त असा आहे. या लेखात प्रभू–आजगावकरांनी पुढील मुद्दे चर्चिले आहेत :

**लेखनशैली :** एकाच लिखाणाबद्दल जेव्हा टीकाकार भिन्नभिन्न मते प्रदर्शित करतात अशावेळी त्या लिखाणाला संख्याशास्त्रीय कसोट्या लावून त्या लिखाणाबद्दलच्या कर्त्यासंबंधीच्या वादावर प्रकाश टाकला जातो. संख्याशास्त्रीय कसोटी ही शास्त्रीय पध्दती असल्यामुळे तिच्या निर्णयासंबंधी दुमत होऊ शकत नाही. पाश्चिमात्य देशात लेखकासंबंधीचे गूढ या पध्दतीमुळे उकलले आहे. या संदर्भात पुढील काही प्रयत्न झाले.

**डॉ. यूडनी यूल यांचा प्रयोग :** काही लेखकांची वाक्ये मोठी असतात, तर काहींची लहान. वाक्यांची लांबी शब्दांमध्ये मोजली असता ती लेखकाच्या शैलीवर प्रकाश टाकते. इ. स. १९३९ साली डॉ. यूडनी यूल यांनी केंब्रिज विद्यापीठात हे नमूद केले. त्यांनी एका ग्रंथाच्या कर्त्याबद्दलचा वाद या



पध्दतीने सोडविला.

**श्री यार्दींचा प्रयोग :** संख्याशास्त्रीय पध्दतीचा उपयोग करून शेक्सपिअरच्या नाटकांचा काळानुसार क्रम लावण्याचा प्रयत्न श्री. एम्. आर. यार्दी यांनी केला. त्यासाठी त्यांनी शेक्सपिअरच्या नाटकांतून आढळणाऱ्या पदांचा सखोल व तपशीलवार अभ्यास केला. लेखनाच्या आरंभी साधी व सरळ वाटणारी लेखकाची शैली पुढे पुढे गंभीर व क्लिष्ट बनते. शेक्सपिअरही याला अपवाद नाही.

**यूलचा शैलीमापक :** लेखकाची शब्दसंपत्ती ठराविक असते. तेच तेच शब्द लिहिण्याचे लेखक टाळतो. लेखकाच्या व्यासंगानुसार एकाच अर्थाचे अनेक शब्द लेखनात येत असतात. नवीन लेखक शब्दांची पुनरावृत्ती करतो. याच्या आधारे लेखकाची शैली किती प्रगल्भ आहे हे जाणून घेता येते. लेखकाच्या शैलीचे मूल्यमापन करण्यासाठी त्याने सूत्रही सुचविले आहे. हर्डनने यूलच्या लेखनशैलीच्या मापकामध्ये बदल करून नवीन सूत्र सुचविले.

**ध्वनीची वारंवारिता :** झिपने भाषेतील ध्वनीत जी वारंवारिता असते त्या संदर्भात सिध्दांत सुचविला आहे. कोणत्याही भाषेचा अभ्यास करण्यासाठी त्या भाषेतील मूलभूत ध्वनी व मूलभूत वर्ण यांच्या प्रमाणाची म्हणजे वारंवारिताची जरूरी असते. संहितांमध्ये भाषेचे ध्वनी मूर्त स्वरूपात प्रकट होतात. वारंवारिता ठरविण्याची विशिष्ट रीत असते. त्यासंबंधी मुळातच माहिती वाचावी.

संशोधनात सांख्यिकी हे साधन शैलीचा अभ्यास करणाऱ्यांना अत्यंत उपयुक्त आहे. विज्ञानशाखा आणि साहित्यशाखा या दोन्ही शाखांत ज्यांची गती आहे त्यांना या साधनाचा चांगला उपयोग करून घेता येतो.

**९] प्रश्नावली**

क्षेत्रीय सर्वेक्षणात प्रश्नावलीचा खूपच उपयोग होतो. एवढेच काय, परंतु पुष्कळदा लेखकांच्या वगैरे मुलाखती घ्याव्या लागतात, म्हणून प्रश्नावली हेदेखील संशोधनातील एक साधन आहे. निरनिराळ्या व्यक्तीकडून माहिती मिळवावी लागते किंवा मागवावी लागते. ही माहिती



Scanned with OKEN Scanner

उपलब्ध झाल्यावर त्या माहितीचे पृथक्करण करावे लागते. निष्कर्ष काढण्यासाठी ही माहिती उपयुक्त असते. प्रश्नावलीची रचना करणे अतिशय महत्त्वाचे काम असते. मिळवावयाची माहिती ही वस्तुनिष्ठ असावी लागते. अचूक प्रश्न विचारून माहिती देणाऱ्याकडून आवश्यक ती माहिती काढून घ्यावी लागते. प्रश्न सुगम, असंदिग्ध असे असावेत. प्रश्नांचा क्रम सुसंगत असा असणे आवश्यक असते. ही उत्तरे देणाऱ्याला कमी वेळात उत्तर देता आले पाहिजे. काही प्रश्न व्यक्तिगत स्वरूपाचे असतील, तर त्यासंबंधीची माहिती गुप्त राखली जाईल, असे आश्वासन त्याला द्यावे.

प्रश्नावलीच्या साधनात सहकारभावना महत्त्वाची असते. आपणाकडे एखाद्या संशोधकाने तज्ज्ञ व्यक्तीकडे प्रश्नावली पाठवून माहिती मागवली तर ती माहिती न पाठविण्याची पध्दती असते. वास्तविक सामाजिक जाणीव ठेवून अशा प्रश्नमालिकेला प्रतिसाद देणे आवश्यक असते. पुष्कळदा प्रश्नावलीकरिता आलेल्या माहितीचा उपयोगदेखील करून घेत नाहीत असेही घडते. प्रश्नमालिका तयार करण्यासाठी ग्रंथालयाची मदत जरूर घेतली पाहिजे. व्यक्तिगत अनुभव, अवलोकन आणि गृहितकृत्य ह्या गोष्टी प्रश्नावलीत महत्त्वाच्या असतात. प्रश्नावली तयार करण्यासाठी तज्ज्ञ व्यक्तीची मदत जरूर घ्यावी. प्रश्नावली विश्वसनीय आणि प्रामाणिक जर नसेल तर संशोधनाला तिचे साहाय्य होऊ शकणार नाही.

प्रश्नावली तयार करताना गृहितकृत्य लक्षात घेऊन माहिती कोणत्या प्रकारची आहे, ती कोणाकडून मिळवायची आहे व कोणत्या मार्गाने मिळवायची आहे ह्या गोष्टी लक्षात घ्याव्या लागतात. प्रश्नावली हे साधन संशोधन क्षेत्रात एक महत्त्वाचे साधन आहे, याची जाणीव संशोधकाने ठेवली पाहिजे.

**१०] मुलाखती**

साहित्याचे संशोधन असो की, आंतर्विद्याक्षेत्रीय संशोधन असो, संशोधकाला पुष्कळदा मुलाखतीचे साधन उपयोगात आणावे लागते. संशोधकाला मुलाखतीची एक योजना आखावी लागते. तसे पाहिले तर



प्रश्नावली आणि मुलाखती ही दोन्ही साधने एकाच वेळी उपयोगात आणावी लागतात. मुलाखतीत अचूक प्रश्न विचारणे आवश्यक असते. मुलाखत कोणत्या संदर्भात आहे यासंबंधीची पूर्ण कल्पना मुलाखत देणाऱ्याला असावी लागते. मुलाखतीत जी उत्तरे मिळतात त्या उत्तरांचे शब्दांकन योग्य पध्दतीने करावे लागते. दिलेली उत्तरे त्याचवेळी त्याच्या शब्दांत गुंफणे आवश्यक असते. मुलाखतीच्या संदर्भातील माहितीची नोंद परिपूर्ण व विश्वसनीय असावी लागते. मुलाखत घेणाऱ्याला मुलाखतीचा आशय नीट मांडता आला पाहिजे.

मुलाखत घेण्यापूर्वी मुलाखत घेणाऱ्याने मुलाखत देणाऱ्याची सर्व माहिती मिळविणे आवश्यक असते. अशी जर माहिती मिळविली असेल तर मुलाखतीत एक प्रकारचा मोकळेपणा निर्माण होऊ शकतो. प्रत्येक प्रदेशाचे काही ठराविक प्रश्न असतात. त्यावर सहानुभूतीचे बोट ठेवले तर मुलाखत देणाऱ्याचे मन लवकर खुले होते.

मुलाखत घेण्यापूर्वी आधी प्रश्नावली तयार करून ठेवावी किंवा छापील प्रश्नावली मुलाखत देणाऱ्याच्या समोर ठेवून माहिती मिळवावी. मुलाखत घेण्याचा दृष्टीकोन कोणता आहे याची कल्पना मुलाखत घेणाऱ्याला येणे आवश्यक असते. एकंदरीत मुलाखतीचा अहवाल संशोधनासाठी कितपत महत्त्वाचा ठरला ह्यासंबंधी आपले मत संशोधकाने मांडले पाहिजे.

लोकसाहित्याच्या संशोधनात तर लोकसाहित्य गोळा करण्यासाठी व लोकसाहित्याच्या अनुषंगाने माहिती मिळविण्यासाठी मुलाखत या साधनाचा उपयोग करावाच लागतो.

प्रभाकर नारायण परांजपे यांनी 'भाषा आणि जीवन' मराठी अभ्यास परिषद पत्रिका, वर्ष १ : अंक २, ऑक्टोबर १९८३ या अंकातील 'मुलाखत : एक घेणे' यात जे म्हटले आहे, ते मुलाखतीचे साधन वापरणाऱ्या संशोधकाने अवश्य लक्षात ठेवले पाहिजे. परांजप्यांनी मुलाखत घेणाऱ्यासाठी 'मुलाखत्या' हा शब्द वापरला आहे, आणि 'मुलाखत देणार' यासाठी 'मुलाखतमूर्ती' हा शब्द वापरला आहे. परांजपे म्हणतात, ''सगळ्याच माध्यमांतल्या मुलाखत्यांना आवश्यक गुणवत्ता म्हणजे



Scanned with OKEN Scanner

अनुभव, सैध्दांतिक ज्ञान, मनोविज्ञानाची समज आणि मुलाखतमूर्तीला रस असणाऱ्या विषयाची चांगली माहिती. एकाच वेळी प्रश्न विचारणे, उत्तर ऐकणे, प्रश्नाचे व आपल्या विचाराचे विश्लेषण करणे, त्यात सुधारणा करीत जाणे, मुलाखतमूर्तीच्या उत्तराच्या आधारावर तिच्या प्रक्रियेची नोंद व विश्लेषण करणे इत्यादी अनेक अवधाने सांभाळण्याची कुवत मुलाखत्याच्या अंगी असली पाहिजे.'' [पृ. १९]

### ११] गणकयंत्रादि तांत्रिक साधने

आधुनिक काळात संशोधनक्षेत्रात तांत्रिक साधनांचीदेखील भर पडत आहे. गणकयंत्राच्या शोधामुळे संशोधकांना संशोधन करण्यासाठी खूप साहाय्य झाले आहे.

'कॉम्प्युटर' म्हणजे गणकयंत्र. हे तंत्रविद्येच्या क्षेत्रातील असामान्य प्रगतीचे प्रतीक आहे. आधुनिक जगातील विविध सुखसोई कॉम्प्युटरने भागविल्या आहेत. रोजच्या व्यवहारात गणकयंत्राचा मोठ्या प्रमाणात उपयोग केला जातो. या साधनाचा उपयोग करणाऱ्या संशोधकाने गणकयंत्राविषयी जी तांत्रिक माहिती आहे, ती मिळविणे आवश्यक आहे. या दृष्टीने 'संशोधन : स्वरूप आणि पध्दती' ह्या पुस्तकात 'गणकयंत्र : संशोधकाचा साहाय्यक' हा श्रीनिवास गोसावी यांचा जो लेख आहे तो अत्यंत उपयुक्त आहे.

'शोधविज्ञानकोश' ह्या ग्रंथात डॉ. दु. का. संतांनी गणकयंत्र व त्याची कार्यपध्दती या संबंधी जी माहिती दिली आहे तीही अत्यंत उपयुक्त आहे.

गणकयंत्राची यांत्रिक रचना, त्याचप्रमाणे त्यात हार्डवेअर व सॉफ्टवेअर वगैरेंचा जो समावेश असतो त्याचीही माहिती करून घेणे आवश्यक आहे. गणकयंत्राकडून काम करवून घेणे जिकिरीचे असते. आधुनिक काळात या संशोधनसाधनांचा अधिकाधिक उपयोग होत जाणार आहे.

संशोधनप्रक्रियेत गृहितकृत्य निश्चित केल्यानंतर कोणकोणत्या साधनांचा कसाकसा उपयोग करून घेता येईल याचा संशोधकाने जाणीवपूर्वक विचार केला पाहिजे. सर्वच साधने एकावेळी उपयोगात येतील असे नाही. विषयाच्या स्वरूपानुसार कोणत्या साधनांचा उपयोग



करावयाचा याचा अभ्यासकाने विचार केला पाहिजे. कोरीव लेख, हस्तलिखिते, अभिलेखागारे ही साधने प्राचीन साहित्याचा अभ्यास करताना उपयोगात आणावी लागतील. ग्रंथालय हे साहित्याचे संशोधन करणाऱ्यांना तर अटळ असे साधन असते. प्रश्नावली, मुलाखती ही साधने साहित्याच्या संशोधनासाठी जशी उपयुक्त ठरतात, तशीच क्षेत्रीय संशोधनासाठीही उपयुक्त ठरतात. सांख्यिकी, गणकयंत्र वगैरे वैज्ञानिक साधनेदेखील हल्लीच्या काळात वापरून साहित्याचे संशोधन काहींनी केले आहे. संशोधनसाधने ह्या शब्दासाठी डॉ. दु. का. संत यांनी 'शोधआयुधे' हा जो शब्द वापरला आहे तो लक्षात ठेवण्यासारखा आहे. 'आयुध' म्हणजे 'हत्यार.' हत्याराचा काळजीपूर्वक उपयोग करणे आवश्यक असते. तसे झाले नाही तर या आयुधाचा उलट परिणाम होण्याचीही शक्यता असते, याची जाणीव संशोधकाने ठेवली पाहिजे.

## ग] माहितीचे व्यवस्थापन व विश्लेषण :

संशोधनप्रक्रियेत संशोधनसाधनांचा वापर करणे जसे महत्त्वाचे असते. तसेच माहितीचे व्यवस्थापन व विश्लेषण यांनाही महत्त्व असते. निरनिराळ्या मार्गांनी साधनसामग्री प्राप्त करून घेणे हा संशोधनाचा एक भाग असतो. मिळविलेली साधनसामग्री अभ्यासकाच्या जवळ टिप्पणींच्या स्वरूपात उपलब्ध असते. शोधप्रकल्प जसा लहानमोठा असेल त्याप्रमाणे साधनसामग्रीचे स्वरूप बदलते. शोधकार्यासाठी सामग्री जमविणे व टिप्पणी काढणे ह्याला जवळ–जवळ ठरविलेल्या वेळापैकी निम्माअधिक वेळ लागतो. मिळविलेल्या माहितीच्या आधारे महत्त्वाचे निष्कर्ष काढावे लागतात. निष्कर्ष सादर करण्यावर शोधप्रकल्पाचे यश अवलंबून असते आणि म्हणून माहितीचे व्यवस्थापन करून तिची मांडणी करणे महत्त्वाचे असते. संशोधकाच्या डोक्यात काही कल्पना असतात. त्यांच्या आधारे तो साधनशोध करीत असतो. हळूहळू त्याच्या कल्पना समूर्त होत जातात आणि त्याला आराखडा तयार करता येतो. प्रारंभीची रूपरेषा त्याला त्याच्या आधारे तयार करता येते. रूपरेषा तयार झाल्यानंतर संशोधकाचे काम सोपे होते; कारण रूपरेषेच्या आधारे त्याच्या जवळच्या टिप्पणींची तो



Scanned with OKEN Scanner

जुळवाजुळव करू शकतो. एखादा नवीन विचार किंवा नवीन कल्पना सुचली तर मांडणी बदलावी लागते. मांडणी, पुनर्मांडणी, छाननी ह्या क्रिया संशोधनात सुरू असतात आणि यातूनच संशोधनाचे अभियोजन साकार होत जाते. अभियोजना म्हणजे 'संरचना.' इंग्रजीत ह्या शब्दाला 'डिझाइन' असे म्हणतात. माहितीच्या व्यवस्थापनासाठी पुड्डिका, टिपणे काढणे, पदटीपा निश्चित करणे, संदर्भ नोंदणीच्या पध्दतीचा अवलंब करणे, सारण्या, तक्ते, कोष्टके, नकाशे, माहितीचे चिन्हीकरण वगैरेंना महत्त्व असते. ह्या प्रक्रियासंबंधी पुढे माहिती दिलेली आहे.

**१] पुड्डिका**

संशोधनात पुड्डिकांची पध्दती संशोधकाला माहीत पाहिजे. टिपणे काढण्यासाठी सुट्या कागदांचा किंवा पुड्डिकांचा उपयोग केला जातो. पुड्डिका जाड असतात, त्यामुळे त्या अधिक टिकतात. वहीतील पाने लवकर खराब होतात. पुड्डिका हाताळण्यासाठी सुटसुटीत असतात. पुड्डिकांवर आकारविल्हेक्रम लावला तर त्या अधिक सोयीच्या होतात. एका पुड्डिकेवर एकाच घटकाची नोंद करावयाची असते. विशिष्ट मथळ्यानुसार पुड्डिकांचे वर्ग करता येतात. पुड्डिकांना जर क्रमांक दिला तर अधिक सोयीचे होते. एखाद्या पुड्डिकेतील नोंद पुन्हा जर पाहावयाची असेल तर पूर्वीच्या पुड्डिकेचा क्रमांक दिला तरी चालतो. सुट्या कागदांवर टिपणे काढली तरी चालतात. त्या कागदांच्या विषयाच्या मथळ्यानुसार संचिका मात्र तयार कराव्या लागतात. पुड्डिकांची किंवा सुट्या कागदांची विभागणी पुढीलप्रमाणे केली तर ते सोयीचे होते. [१] ग्रंथाची नोंद करणाऱ्या पुड्डिका [२] संदर्भ ग्रंथातील अवतरणचिन्हांच्या किंवा टिपणांच्या पुड्डिका [३] संशोधकाला वेळोवेळी सुचलेल्या विचारांच्या पुड्डिका. संदर्भसूचीच्या पुड्डिका ३ इंच×५ इंच आकाराच्या असतात. टिपणांच्या पुड्डिका ४ इंच × ६ इंच आकाराच्या असतात. विषयाच्या टिपणासाठी ८ इंच × ११ इंच आकाराचे सुटे कागदही चालतात. अशा रीतीने माहितीच्या व्यवस्थापनात पुड्डिकांना महत्त्व आहे. संशोधनाला आकार येऊ लागला की पुड्डिकांचे विभागवार वर्गीकरण करता येते. काही संशोधक विभागवार वेगवेगळ्या रंगांच्या पुड्डिकाही वापरतात.



**२] टिपणे काढणे**

टिपणे दोन प्रकारची असू शकतात. अस्सल साधनांवरील टिपणे आणि अवांतर माहितीसाठी काढलेली टिपणे. दुसऱ्या प्रकारची टिपणे उपयोगात येतातच असे नाही. अशी टिपणे विस्तृत असावीत म्हणजे त्यातील कोणती माहिती घ्यायची व कोणती वगळायची हे ठरविता येते. प्रबंधात उद्धृत करावयाची जी अवतरणे असतात ती मुळाबरहुकूम शब्दशः उतरवून घ्यावीत.

जसा विषय असेल तशी टिपणे काढावी लागतात. त्या विषयासाठी जी प्रकरणे असू शकतील त्या प्रकरणांना उपयुक्त अशी टिपणे काढली पाहिजेत. उदा. जयवंत दळवींच्या नाटकांचा अभ्यास करताना लैंगिक भावनेशी संबंधित अशी जी कथानके असतील त्यांचा निर्देश करणाऱ्या पुड्डिका तयार केल्या पाहिजेत. पुड्डिकेवर एकाच घटकाची नोंद करावी. त्याचप्रमाणे मूळ ग्रंथातील पृष्ठ क्रमांक वगैरे माहिती बरोबर द्यावी. टिपणे जर व्यवस्थित असतील तर पुढे प्रत्यक्ष लेखन करताना त्रास होत नाही.

**३] पदटीपा**

संशोधन साधार आणि सप्रमाण असावे लागते. आधाराला जे साधन घेतले जाते त्याचा उल्लेख पदटीपेत असणे आवश्यक असते. पदटीपा अतिशय साक्षेपी असाव्या लागतात. पदटीपा पुढील कारणांमुळे आवश्यक असतात : आधारासाठी दुसऱ्याचे मत स्वतःचे म्हणून मांडणे बेकायदेशीर असते; त्याचप्रमाणे दुसऱ्याचे मत जसेच्या तसे त्यात कसलाही बदल न करता दिले पाहिजे. संशोधनासाठी ज्यांच्या ग्रंथांचे साहाय्य झाले, त्यांचा ऋणनिर्देश त्यातून व्यक्त होतो. प्रबंधात जी विधाने आली असतील ती विधाने वाचकाला किंवा परीक्षकाला पदटीपांच्या साह्याने पडताळून पाहता येतात. दुसरे असे की, पदटीपांतील माहिती भावी अभ्यासकाला मार्गदर्शक ठरू शकते. अभ्यासकाचा जो विषय असेल त्याच्याशी संबंधित संदर्भ पदटीपेत नोंदवून ठेवला तर दुसऱ्या अभ्यासकाला त्यावर विचार करता येतो. योग्य अशा साधनाचा शोध कसा घेतला ह्याचीही माहिती पदटीपेतून वाचकाला कळू शकते. पुष्कळदा विवेचनाच्या ओघात तांत्रिक माहिती

किंवा तपशील देणे शक्य नसते. अशा वेळेला पदटीपेचा उपयोग होतो. पदटीपा जर नसतील, म्हणजे टीपदर्शक काही माहिती नसेल, तर केवळ संदर्भ साहित्याची नोंद त्या ठिकाणी 'संदर्भसाहित्य' ह्या शीर्षकाखाली येईल. प्रबंधातील माहिती साधार सप्रमाण असावी लागते. त्यासाठी पदटीपांची गरज असते. आपण प्रतिपादन केलेल्या एखाद्या मुद्याला आधार म्हणून पदटीप किंवा संदर्भ येतो. एखाद्या ग्रंथकाराच्या मताशी आपण सहमत नसतो, त्यावेळीदेखील पदटीपेचा उपयोग होतो.

पदटीपा देण्याच्या अनेक पध्दती आहेत. सबंध प्रबंधात त्या एकाच पध्दतीच्या असणे आवश्यक असते. दुसऱ्याचे मत साररूपाने दिले तरी पदटीप दिली पाहिजे. पदटीपा व मजकूर ह्यांच्यात सरळरेषा असावी. पदटीपा ज्या त्या पानावर पूर्ण होणे आवश्यक असते. पदटीपांना अंक द्यावे लागतात. प्रबंधातील अवतरणे दुहेरी किंवा एकेरी कोणत्याही अवतरण चिन्हात चालतात. अवतरण संपताच ओळीच्या व अवतरण चिन्हाच्याहीवर टीपांक द्यावा. पदटीपांक बाळबोधलिपीत टाकावेत. प्रत्येक प्रकरणात वेगळे टीपांक असावेत.

**४] संदर्भनोंदणी पध्दती**

संदर्भनोंदणी विशिष्ट पध्दतीने करावयाची असते. अभ्यासकाने त्या नोंदणीत पुढील गोष्टींचा अंतर्भाव होतो; ह्याची जाणीव ठेवली पाहिजे. [१] ग्रंथकारनाम [२] ग्रंथनाम, [३] प्रकशनविषयक माहिती : [प्रकाशनाचे स्थळ, प्रकाशकाचे किंवा प्रकाशनसंस्थेचे नाव, आवृत्ती, प्रकाशनवर्ष], [४] पृष्ठक्रमांक.

ग्रंथविषयक संपूर्ण माहिती पुढीलप्रमाणे द्यावी :

१] ग्रंथकाराचे नाव : आधी आद्याक्षरे, नंतर आडनाव आणि त्यापुढे स्वल्पविराम. उदा. ह. ना. आपटे,

२] ग्रंथनाम : हे अधोरेखित करावे किंवा अवतरणचिन्हात टाकावे आणि त्यापुढे स्वल्पविराम द्यावा. उदा. 'पण लक्षात कोण घेतो?',

३] पुस्तकाचा संपादक किंवा भाषांतरकार असल्यास क्रमांक १ प्रमाणे त्याचे नाव टाकून त्यापुढे कंसात 'संपा.' किंवा 'भाषां'. हे शब्द टाकावेत व



पुढे स्वल्पविराम द्यावा. उदा. [संपा.], [भावां.],

४] आवृत्ती : संदर्भ म्हणून जी आवृत्ती वापरली असेल तिचा उल्लेख प. आ., दु. आ. ह्याप्रमाणे करून पुढे स्वल्पविराम द्यावा. उदा. प. आ.,

५] प्रसिध्दीस्थळ : गावाचे नाव देऊन, त्यापुढे स्वल्पविराम द्यावा. त्यापुढे प्रकाशनस्थळ द्यावे. उदा. मुंबई, मौज.

६] प्रसिध्दी काळ : ह्यात प्रकाशनवर्ष द्यावे. उदा. १९९२, शके असल्यास तसा उल्लेख करावा. वृत्तपत्राचा संदर्भ द्यायचा असल्यास पूर्ण दिनांक द्यावा.

७] खंड किंवा अंकक्रमांक : काही पुस्तकांचे खंड असतात किंवा काही नियतकालिकांना अनुक्रमांक असतात, ते देणे आवश्यक असते. उदाहरणार्थ, [१] वसंत स. जोशी [संपा.], 'भाषा व साहित्य : संशोधन' खंड २ : पुणे, म. सा. परिषद, प्रथम आ., १९८५ [२] 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका' [अंक २६५, एप्रिल–जून, १९९३]

८] पृष्ठक्रमांक : 'पृ.' असे संक्षेपीकरण करून पुढे पूर्णविराम द्यावा.

एकाच साधनाचा संदर्भ जेव्हा लागोपाठ येतो तेव्हा 'तत्रैव' हा अधोरेखित शब्द टाकावा व पृष्ठक्रमांक द्यावा. पूर्वी ह्यासाठी 'कित्ता' हा शब्द योजीत असत. एखाद्या साधनाचा संदर्भ एकदा पूर्ण येऊन गेल्यानंतर इतर साधनांचे संदर्भ मध्ये येऊन पुन्हा त्याच साधनग्रंथाचा संदर्भ आल्यास ग्रंथकाराचे नाव देऊन उनि. [उपरिनिर्दिष्ट] हा संक्षेप योजावा व पृष्ठक्रमांक द्यावा. उदा :

१. वा. गो. आपटे, मराठी भाषेचे संप्रदाय व म्हणी, पुणे, आनंद, स. आ., १९७४, पृ. १९.

२. विष्णुशास्त्री चिपळूणकर, अरबी भाषेतील सुरस व चमत्कारिक गोष्टी, पुणे, चित्रशाळा, १९५७, पृ. २५.

३. तत्रैव, पृ. ३०.

४. वा. गो. आपटे, उनि. पृ. ४०.

★ पदटीपेतील नोंद करताना ग्रंथकाराच्या नावाची आधी आद्याक्षरे देऊन नंतर आडनाव द्यावे लागते व पृष्ठक्रमांक आवश्यक असतो. या टीपेत



Scanned with OKEN Scanner

प्रकाशनाचे नाव किंवा प्रकाशन संस्थेचे नाव टाकले नाही तरी चालते. संदर्भसूचीतील नोंद करताना मात्र आडनाव आधी द्यावे लागते. नंतर आद्याक्षरे द्यावी लागतात. ह्या टीपेत पृष्ठक्रमांक नसतो. प्रकाशकाचे किंवा प्रकाशनसंस्थेचे नाव व प्रकाशन वर्ष मात्र आवश्यक असते.

**५] सारणीकरण** (Tabulation)

तथ्यांच्या सांख्यिकीय विश्लेषणातील एक तांत्रिक प्रक्रिया म्हणून सारणीकरणाला महत्त्व असते. सारणीच्या द्वारे निष्कर्ष सारांशरूपात मांडता येतात. तथ्यांचे वेगवेगळे गट पाडून प्रत्येक गटात व वर्गात किती तथ्ये येतात याची मोजणी करून निष्कर्ष काढता येतात. तथ्यांचे वर्ग पाडणे व त्यांचे संस्करण करणे महत्त्वाचे असते. तथ्यांचे संकलन करून त्यांचे सारणीकरण करता येते. संशोधनात किती आणि कोणत्या सारण्या महत्त्वाच्या आहेत, याची पूर्वकल्पना संशोधकास असतेच असे नाही; परंतु संशोधकास संशोधन समस्येची जर चांगली कल्पना असेल तर कशा प्रकारच्या सारण्या आवश्यक आहेत याची कल्पना त्यास येऊ शकते. वर्गीकरण, संकेतन, मोजणी इत्यादी गोष्टी सारणीकरणात येतात. सारणीकरणासाठी स्वयंचलित यंत्राचा उपयोग करता येतो किंवा हाताचा देखील उपयोग करता येतो. हस्तसारणीकरण व यांत्रिक सारणीकरण यांत गुणदोष आहेत. यांत्रिक सारणीकरणासाठी बरेच कारकुनी काम करावे लागते. यांत्रिक सारणीमुळे बहुचलीय सारणी (Cross Tables) तयार करणे सोपे जाते. सारणीकरणासाठी खर्च येतो.

सामाजिक संशोधनपध्दतीत किंवा विज्ञान संशोधनपध्दतीत सारणीकरणाला खूप महत्त्व असते. निवेदनस्वरूपी किंवा भाष्यस्वरूपी माहितीची नोंद करून तिचे विश्लेषण करून तिचेही सारणीकरण करता येते. सर्वेक्षणातून काही मते प्रकट होतात. विविध प्रकारची माहिती मिळत असते. विविध निवेदने, भाष्ये यांची नोंद करून हस्तसारणीकरण करून माहितीची नोंद पुठ्ठिकेवर करता येते. अलीकडच्या काळात यांत्रिक सारणीकरणात खूप प्रगती झाली आहे. कॉम्प्युटरमुळे हे सहज शक्य झाले आहे. ज्या व्यक्तींना यांत्रिक माहिती आहे त्यांनी यांत्रिक सारणीचा जरूर



**उपयोग करावा. डॉ. पु. ल. भांडारकर यांच्या 'सामाजिक संशोधन पध्दती' या पुस्तकात 'तथ्यांचे विश्लेषण व निर्वचन' या नावाचे एक प्रकरण आहे ते या संदर्भात अभ्यासूंना उपयुक्त ठरू शकेल.**

**६] तक्ते**

संशोधनात तक्त्यांनादेखील महत्त्व असते. शोधविषयांचे प्रतिपादन किंवा साधनसामग्रीचे आकलन होण्यासाठी तक्त्यांचा उपयोग होतो. संशोधनात पुष्कळदा तक्ते वगैरे गोष्टी आकर्षकपणा वाढविण्यासाठी असतात. परंतु समर्पक तक्ते आवश्यक म्हणून दिले तर त्यांची उपयुक्तता असू शकते. पुष्कळदा चित्रकाराच्या साह्याने चित्रलेखांचा उपयोग केला जातो. निरनिराळ्या प्रकारचे तक्ते सामाजिक संशोधन पध्दतीत असू शकतात. साहित्य संशोधनातही ज्यावेळी मुलाखती किंवा प्रश्नावली यांचा उपयोग केला जातो तेव्हा तक्ते उपयोगी ठरू शकतात. तक्त्यांचे अनेक प्रकार असतात. असे तक्ते परिशिष्टात दिले जातात. माहितीच्या व्यवस्थापनासाठी तक्त्यांचा उपयोग करता येतो. उभे–आडवे रकाने पाडून तक्ते तयार करता येतात. तक्त्यांमुळे सर्व माहिती एकत्रित आणि कमी प्रयासाने वाचता येते.

**७] कोष्टके**

कोष्टकाचादेखील संशोधनात उपयोग केला जातो. कोष्टकाची रचना मात्र काळजीपूर्वक केली जाते. कोष्टकासाठी जमा करावयाची माहिती वस्तुनिष्ठ पाहिजे. आशयाच्या दृष्टीने अशी माहिती पुरेशी असावी लागते. कोष्टकासाठी पुष्कळदा माहिती जमविण्यासाठी मुलाखती घ्याव्या लागतात. माहिती मिळवून तिचे पृथक्करण करावे लागते. कोष्टकाला रेखापत्रक असेही म्हणतात. कोष्टकात विशिष्ट संदर्भासाठी विशिष्ट दर्शक गोष्टी असतात. कोष्टकात पुष्कळदा आकडे असतात. कोष्टकात विशिष्ट पध्दतीचा अवलंब करून मांडणी केलेली असते. डिक्शनरी म्हणजे एक कोष्टकरूप ग्रंथ असतो. कोष्टकांच्या अवलंबामुळे माहितीतील नेमकेपणा उपयुक्त ठरतो. कोष्टके कोणत्यातरी गृहितकृत्यांचा वापर करून तयार केलेली असतात. कोष्टकवाचन सरावाने आत्मसात करावे लागते. कोष्टक



Scanned with OKEN Scanner

देण्यासाठी साधनभूत म्हणून जी जी माहिती असते, ती ती द्यावी लागते. दिलेल्या माहितीला विशिष्ट आधार असतो. क्षेत्रीय पाहणी केल्यानंतर कोष्टकाचा वापर करता येतो. सामाजिक व वैज्ञानिक संशोधनात कोष्टकातील माहिती महत्त्वाची असते, कारण तिच्यापासूनच निष्कर्ष काढता येतात. विवेचनानंतर परिशिष्टरूपात कोष्टक द्यावे लागते.

**८] नकाशे**

संशोधनात पुष्कळदा नकाशाला म्हणजे रेषाकृतीदर्शनाला महत्त्व असते. ज्याठिकाणी भौगोलिकदृष्ट्या महत्त्वाची माहिती द्यावयाची असते त्या ठिकाणी नकाशांचा वापर उपयुक्त ठरतो. नकाशामुळे माहितीची नेमकी कल्पना येते. भाषेचा भौगोलिक विस्तार किंवा विशिष्ट भौगोलिक विभागातील लोकसाहित्याचा अभ्यास केला जातो, अशावेळी नकाशा दिला तर माहिती ताबडतोब लक्षात येते. नकाशा मात्र बिनचूक असावा लागतो. नकाशा बोधकारक होण्याच्या दृष्टीने त्याच्याखाली स्पष्टीकरण आवश्यक असते. नकाशा पाहण्यासाठी नसून वाचनासाठी असतो हे लक्षात घेऊन वाचकाला तो वाचता आला पाहिजे याची खबरदारी घेणे आवश्यक असते. नकाशात दर्शविलेल्या बाबीचे विवेचन विस्तृतपणे प्रबंधात येणे आवश्यक असते.

**९] माहितीचे चिन्हीकरण**

शोधलेखनात संक्षिप्त लेखनास महत्त्व असते. एखादा शब्द लेखनात वारंवार आला असेल तर तो संक्षिप्तपणे लिहिण्याची पध्दती आहे. संशोधकाने ग्रंथ, मासिके यांसाठी कोणती संक्षिप्त रूपे वापरणार आहे यासंबंधीची सूची, आकारविल्ह्यानुसार द्यावी. संक्षिप्त चिन्हे देण्याची विशिष्ट पध्दती असते. उदा. 'भाषांतरकर्ता' या शब्दासाठी 'भा. क.' असे संक्षिप्त रूप वापरतात. 'पृष्ठ' या शब्दासाठी 'पृ.' असे संक्षिप्त रूप वापरतात. 'त्याचठिकाणी' यासाठी 'तत्रैव' असे संक्षिप्त रूप वापरतात. 'उपरिनिर्दिष्ट' म्हणजे वर सांगितलेले यासाठी 'उनि.' असे संक्षिप्त रूप वापरतात. 'विविधज्ञानविस्तार' यासाठी 'वि. वि.' असे संक्षिप्त रूप वापरतात. माहितीचे चिन्हीकरण केल्याने शब्द किंवा तीच तीच माहिती



पुनः पुनः देण्याची गरज नसते.

अशा रीतीने संशोधनप्रक्रियेत माहितीचे व्यवस्थापन व विश्लेषण या गोष्टींना महत्त्व असते. संशोधन हे एक शास्त्र असल्यामुळे अशा प्रकारच्या व्यवस्थापनाची गरज असते. व्यवस्थापनामुळे प्रबंधाचे लेखन सुलभ होते. त्याचप्रमाणे वाचकाला अनेक मार्गांनी मिळविलेली माहिती थोडक्यात व सहज आकलन होऊ शकते.

## घ] संशोधनातील विविध समस्या :

संशोधनात लिपीचे आकलन, कालनिर्णय, अर्थनिर्णय, प्रामाण्य, अभ्युपगमपरीक्षण वगैरे विविध समस्या असतात. माहितीची प्रतवारी ठरविणे हेही अवघड काम असते. संशोधनासाठी आपण जी उपाययोजना करतो तिचे तारतम्य जर सांभाळले नाही तर फार मोठी समस्या निर्माण होते. संशोधन क्षेत्रात समस्या निर्माण होणारच हे गृहीत धरून अभ्यासकाने माघार न घेता विचारपूर्वक निर्णय घेणे आवश्यक असते. ज्या विविध समस्या निर्माण होतात त्यांच्या संदर्भात जर माहिती करून घेतली तर त्या समस्या निर्माण न होता संशोधकाचे काम सोपे होऊ शकेल. सर्वसामान्यपणे पुढील समस्या संशोधनक्षेत्रात असतात :

**१] लिपीचे आकलन**

कोरीव लेखांचा किंवा पोथ्यांचा अभ्यास करताना लिपीची अडचण निर्माण होते. त्यासाठी ज्या लिपीत ते लेखन असेल त्या लिपीचे ज्ञान करून घेणे आवश्यक असते. कोरीव लेख ब्राह्मी लिपीत असतात. म्हणून ब्राह्मी लिपी अवगत असल्याशिवाय कोरीव लेखांचे वाचन करता येणे शक्यच नाही. महानुभावीय सांकेतिक लिप्या जर माहिती नसतील तर महानुभावांच्या पोथ्या वाचता येणार नाहीत. महानुभावीय लेखनासाठी ज्या सकळा, सुंदरी, पारमांडल्य, कवीश्वरी, अंकलिपी, वज्रलिपी, सुभद्रालिपी व हंसलिपी यांचा अवलंब केला आहे त्यांचा अभ्यास राजवाडे, चांदोरकर, वि. ल. भावे, कोलते वगैरे अनेकांनी करून ह्या साहित्याचा सखोल अभ्यास केला. पोथ्या मोडी लिपीत असतात. ही लिपी आल्याशिवाय पोथ्यांचा किंवा बाडांचा अभ्यास केवळ अशक्य आहे. 'भाषा व साहित्य :

संशोधन, खंड २' मध्ये डॉ. व. वि. पारखे यांचा 'महानुभावीय सांकेतिक लिप्या : काही विचार व त्यांचा परिचय' हा अभ्यासपूर्ण लेख आहे तो या संदर्भात अधिक अभ्यास करणाऱ्यांनी जरूर वाचावा. 'भाषा व साहित्य : संशोधन, खंड १' मध्ये डॉ. यू. म. पठाण यांचा 'महानुभावांच्या सांकेतिक लिप्या : निर्मितीमीमांसा' हा लेख आहे तोही जिज्ञासूंनी अवश्य वाचावा.

**२] कालनिर्णय**

साहित्य संशोधनात कालनिश्चितीला महत्त्व असते. कालगणना भिन्नभिन्न प्रकारच्या असतात. त्यामुळे कालगणनेत अडचणी व अडथळे निर्माण होतात. काळाचा उल्लेख नसणे, काळाची अपूर्ण नोंद, काळाची संदिग्ध नोंद असणे, काळाची नोंद चुकीची असणे, एकाच मजकुरासंबंधी भिन्नभिन्न नोंदी उपलब्ध होणे इत्यादी प्रकारचे अडथळे कालनिर्णय ठरविताना येतात. कालगणनेबाबत संशोधनात आग्रही वृत्ती नसावी. संशोधकाने तौलनिक कालपटाच्या आधारे पाहणी करणे आवश्यक असते. आधुनिक काळातील लेखकांच्या संदर्भातही पुष्कळदा कालनिर्णय ठरविणे कठीण असते. जन्मकाळ, कलाकृतीचा जन्मकाळ वगैरेबाबत बरेच घोटाळे असतात. संशोधकाने बारकाईने विचार करून कालनिर्णय निश्चित केला पाहिजे. कारण संशोधनात कालतत्त्वाला महत्त्व असते. 'भाषा व साहित्य : संशोधन, खंड ३' मध्ये डॉ. गं. ना. जोगळेकर यांचा 'वाङ्मय संशोधनातील कालनिर्णय साधनाचे महत्त्व' हा लेख या संदर्भात उपयुक्त आहे. त्याचप्रमाणे खंड १ मधील 'कालनिर्णयपध्दती' हा ग. ह. खरे यांचा लेख विविध प्रकारच्या कालगणनेच्या संदर्भात सविस्तर माहिती देणारा आहे.

**३] अर्थनिर्णय**

संशोधनात अर्थनिर्णयालादेखील महत्त्व असते. पुष्कळदा अर्थनिर्णय न झाल्यामुळे संशोधनच अपुरे राहते. महानुभावांच्या ग्रंथांचा अर्थ लावताना तो विशिष्ट पध्दतीने लावावा लागतो. कारण त्यांच्या तत्त्वज्ञानाची चौकट वैदिक परंपरेपेक्षा वेगळी आहे. संस्कृत टीकाभाष्याची परंपरा मराठीला लाभली आहे. या परंपरेत दोन प्रवाह दिसून येतात. [१] मूळ ग्रंथातील



पारिभाषिक संज्ञांचे स्पष्टीकरण करून भावार्थ सांगणारी टीकाभाष्याची परंपरा. [२] एका विशिष्ट परंपरेची तत्त्वे गृहीत धरून सांप्रदायिक अर्थ प्रतिपादणारी टीकाभाष्याची परंपरा. प्राचीन मराठीतील टीकाभाष्यादी ग्रंथांचे अवलोकन केले तर अर्थनिर्णयदृष्ट्या त्या ग्रंथांचे चार प्रकारांत विभाजन करता येते. [१] व्यवहारोपयोगी शास्त्रग्रंथांवरील टीकाभाष्ये, [२] अध्यात्मपर शास्त्रग्रंथांवरील टीकाभाष्ये, [३] इतिहास, पुराणादी सांस्कृतिक व धार्मिक ग्रंथांवरील टीकाभाष्ये, [४] स्फुट टीकाभाष्ये.

या टीकाभाष्यग्रंथांमुळे मराठी भाषेला सौष्ठव प्राप्त झाले. ती तर्कनिष्ठ व बुद्धिनिष्ठ बनली. अर्थनिर्णय करीत असताना शास्त्रकारांची चिकित्सक वृत्ती दिसून येते. प्राचीन ग्रंथांचे अध्ययन करण्यासाठी अर्थनिर्णयशास्त्र अवगत नसेल तर समस्या निर्माण होतात. अशा समस्या निर्माण होऊ नयेत म्हणून भास्कर लक्ष्मण भोळे यांनी संपादित केलेल्या 'संशोधनाची क्षितिजे' या ग्रंथातील डॉ. व. दा. कुळकर्णी यांचा 'अर्थनिर्णयशास्त्र आणि महानुभावीय भाष्यपध्दती' हा लेख जरूर वाचावा.

**४] प्रामाण्य**

संशोधनात संदर्भसाधनांच्या साह्याने आपल्या प्रतिपादनाच्या संदर्भात अनुकूल व प्रतिकूल पुरावे किंवा आधार सादर करणे याला खूप महत्त्व असते. कोणत्याही क्षेत्रातील संशोधन असो त्यात अंदाजापेक्षा सत्य प्रतिपादनाला महत्त्व असते. संशोधक जी मते मांडतो ती प्रमाण असली पाहिजेत. यासाठी सत्य प्रतिपादनाची गरज असते. शोधप्रक्रिया ही न्यायदानप्रक्रियेला जवळची असते. वकील घडलेल्या घटनेचे पृथक्करण करतो. तिच्यामागील धागेदोरे तो शोधतो. त्यासाठी पुरावे जमवितो. जे काय घडले ते कसे घडले याचा छडा लावतो. आधारांच्या साह्याने सगळे दुवे व्यवस्थित रचणे हे संशोधनाचेच काम असते. घटनेच्या मागील उद्दिष्टांचा त्यात शोध असतो. साहित्याच्या संशोधनातही असेच पुरावे सादर करून एखादा मुद्दा स्थिर करता येतो.

पुष्कळदा योग्य न्याय दिला जात नाही, कारण पुरावे चुकीचे असतात. संशोधनातही तसे होऊ शकते. निष्कर्ष पुराव्यासहित मांडावे लागतात.



Scanned with OKEN Scanner

संशोधनात सारे काही सप्रमाण, साधार असावे लागते. त्यासाठी संशोधकाने पुराव्याचे महत्त्व लक्षात ठेवले पाहिजे. कर्णोपकर्णी आलेली माहिती पुरावा म्हणून बरोबर असतेच असे नाही. पुरावा सिध्द करणे महत्त्वाचे असते. जो निष्कर्ष काढला असेल त्याच्याशी सुसंगत असा पुरावा असावा लागतो. पुष्कळदा योग्य प्रामाण्याच्या अभावी संशोधन चुकीच्या दिशेने जाते. यासाठी प्रामाण्य पारखून त्याचा उपयोग केला पाहिजे.

**५] माहितीची प्रतवारी व उपयोजनातील तारतम्य**

शोधलेखनासाठी अस्सल साधने असावी लागतात. साधने अस्सल किंवा दुय्यम स्वरूपाची असू शकतात. संशोधनाच्या साधनांची प्रतवारी पुढीलप्रमाणे उतरत्याक्रमाने लावता येते :

१] प्रत्यक्ष प्रयोगाने सिध्द झालेली साधने
२] हस्तलिखिते
३] शोधनिबंध किंवा प्रबंध
४] संशोधनसंस्थांची नियतकालिके
५] पत्रव्यवहार, दैनंदिन्या, आत्मचरित्रे
६] मुलाखती
७] ग्रंथांतील संकलनात्मक माहिती
८] साहित्यक्षेत्रातील आविष्कारातून व्यक्त झालेली माहिती
९] समकालीन नियतकालिकांतून आलेली माहिती

प्रथम दर्जाच्या अस्सल साधनांवरून रचले गेलेले ग्रंथ दुय्यम साधनात मोडतात. उदा. विश्वनाथाच्या मूळ संस्कृत ग्रंथात 'महाकाव्याची पौर्वात्य लक्षणे' सांगितली आहेत. ही लक्षणे अस्सल साधन म्हणून सांगता येतील. परंतु रा. श्री. जोगांच्या पुस्तकात जर त्यासंबंधी लक्षणे दिली असतील तर ती दुय्यम साधनात मोडतील. शिवाजीसंबंधी विश्वकोशातील माहिती दुय्यम साधनात मोडेल; परंतु तत्कालीन पत्रव्यवहार अस्सल साधनात मोडेल. काही साधने तिय्यम दर्जाचीही असतात. लोकप्रिय पुस्तकांचा आधार हे तिय्यम साधन होऊ शकेल.



एखादा ग्रंथ प्रमाण मानताना तारतम्य ध्यानी घ्यावे लागते. ग्रंथाची विश्वसनीयता, त्यातील विधानपध्दती, त्याचा अद्ययावतपणा, त्याची अधिकृतता, त्याची व्याप्ती, त्याची शैली, त्यातील संदर्भयुक्तता, त्याचे प्रचारकी किंवा व्यासंगी स्वरूप, त्याच्या लेखकाची पात्रता, प्रकाशनसंस्थेचा दर्जा इत्यादी गोष्टी तारतम्याने लक्षात घेऊन ग्रंथाची प्रमाणभूतता ठरवावी लागते.

पुष्कळदा टीकाकाराची मते नंतर बदलतात. त्यासाठी सर्व लेखनसामग्री बघणे आवश्यक असते. साधनातील माहितीच्या प्रतवारीवरून त्या साधनाची उपयुक्तता लक्षात घ्यावी व त्या साधनाचा कितपत उपयोग करावयाचा हे संशोधकाने ठरविले पाहिजे. संशोधनात समस्या निर्माण होतातच. संशोधकाने खचून न जाता त्या समस्यातून मार्ग काढणे महत्त्वाचे असते. नाहीतरी समस्येच्या सोडवणुकीसाठीच तर संशोधनाचा प्रपंच असतो.

## च] अभ्युपगम परीक्षण

संशोधनात कल्पितपक्षाला महत्त्व असते. गृहितकृत्य किंवा अभ्युपगम सिध्द झाला तर त्याला सिध्दान्ताचे स्वरूप प्राप्त होते. पुरावे उपलब्ध झाले नाहीत तर काल्पितपक्ष सोडून द्यावा लागतो. कल्पितपक्ष म्हणजे संभाव्य शक्यता असते. समाजशास्त्रीय व वाड्.मयीन क्षेत्रांतही गृहितकृत्याला महत्त्व असते. सूक्ष्म अवलोकन करून निर्माण झालेल्या प्रश्नाचे स्वरूप लक्षात घेऊन गृहितकृत्य शोधून काढणे हे एक कसब असते. अभ्युपगमाचे परीक्षण करणे तितकेच महत्त्वाचे असते. संशोधन म्हणजे फार मोठे पांडित्य नव्हे, तर ती एक शिस्त असते, विशिष्ट दृष्टीकोनातून केलेली पाहणी असते. अभ्युपगमनिश्चितीमुळे संशोधनाला गती येते व तत्त्वचिकित्सेच्या दिशेने शोधक्रियेची वाटचाल सुरू होते. अभ्युपगमाचे परीक्षण करणे हे अत्यंत महत्त्वाचे काम असते. यासाठी तर्कशास्त्रातील विगमनात्मक किंवा आगमनात्मक ही एक पध्दती माहीत पाहिजे. इंग्रजीत या पध्दतीला Inductive Method असे म्हणतात. या पध्दतीचे वैशिष्ट्य पुढीलप्रमाणे असते :

भिन्नभिन्न घटना किंवा वस्तू किंवा मुद्दे यांत आढळणाऱ्या साम्याच्या आधारे त्या घटना किंवा वस्तू किंवा मुद्दे यांच्या वर्गाबाबत सामान्य विधान केले जाते. म्हणजे विशिष्ट तत्त्वाकडून सामान्यत्त्वाकडे ज्ञान प्रमाणित करण्याची ही पध्दती असते. उदा. [१] अ हा पक्षी काळा आहे. [२] ब हा पक्षी काळा आहे. [३] क हा पक्षी काळा आहे. [४] म्हणून अ ब क वगैरे पक्षी ज्यात समाविष्ट आहेत अशा सर्व पक्षांचा रंग काळा आहे.

तर्कशास्त्रातील दुसऱ्या पध्दतीला निगमनात्मक पध्दती म्हणतात. इंग्रजीत या पध्दतीला Deductive Method असे म्हणतात. या पध्दतीत सामान्य विधानाकडून विशिष्ट विधानाकडे जाता येते. उदा. [१] मानव हा मर्त्य प्राणी आहे. [२] अ हा मानव आहे. [३] म्हणून अ हा मर्त्य आहे.

संशोधनात अभ्युपगमाच्या परीक्षणासाठी या दोन्ही पध्दती माहीत पाहिजेत. अभ्युपगम योग्य आहे किंवा अयोग्य आहे हे बघण्यासाठी काही कसोट्या लावाव्या लागतात, त्या पुढीलप्रमाणे :

१] साधनसामग्री पुरेशी हस्तगत केल्यानंतर साध्या विगमनात्मक तर्कपध्दतीचा अवलंब करून संशोधकाला चालचलावू असा निष्कर्ष काढता आला पाहिजे.

२] त्यानंतर निगमनात्मक तर्कपध्दतीचा अवलंब करून संशोधकाला त्या निष्कर्षाला पोषक असा कोणत्या पध्दतीचा पुरावा आवश्यक आहे हे सांगता आले पाहिजे. त्याच्या निष्कर्षाची फलश्रुती त्याला स्पष्ट करता आली पाहिजे.

३] आवश्यक ती साधनसामग्री आणि पुरावे यांच्या आधारावर काढलेले निष्कर्ष व संशोधकाने मानलेले अभ्युपगम हे एकमेकांशी जुळते आहे याची खात्री पटली पाहिजे.

४] निष्कर्ष जर अभ्युपगमाशी जुळले नाहीत तर संशोधकाने तो टाकून दुसरा अभ्युपगम शोधला पाहिजे. पहिला अभ्युपगम कसोट्यांना उतरला तर अभ्युपगम बरोबर आहे असे मानावे. अभ्युपगम हा एक अंदाज असतो. समस्येचे ते उत्तर नसते. त्याच्या योगाने एक नवी दिशा मिळते. पुरावे मिळाले तरच अभ्युपगम सिध्द होतो. संशोधनात विशिष्ट तंत्र अपरिहार्य



असते. समस्येच्या सोडवणुकीसाठी साधनसामग्री जमविणे, साधनसामग्रीचे व पुराव्यांचे वर्गीकरण करणे आणि नंतर अभ्युपगम ठरविणे महत्त्वाचे असते. हे काम कष्टाचे असते. संशोधक अतिशय साक्षेपी व वस्तुनिष्ठ असला तरच त्याला शोधकार्याचा मनोरा उभारता येतो.

## छ] निष्कर्ष व फलश्रुती

संशोधनात निष्कर्ष महत्त्वाचे असतात. निष्कर्षाच्या आधारे गृहितकृत्य पडताळून पाहता येते. जे अभ्युपगम असेल, त्याला अनुलक्षून निष्कर्ष निघाले पाहिजेत. प्रबंधाच्या प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी निष्कर्ष काढलेला असतो. निष्कर्ष सारभूत असतो. त्या त्या प्रकरणांतील साधनसामग्रीच्या आधारे संशोधकाला निष्कर्षापर्यंत पोहोचता येते. निष्कर्ष तर्कसुसंगत असा असावा लागतो. अनेक प्रकरणांतील निष्कर्षांच्या आधारे शेवटी एखादा सिध्दान्त हाती लागतो. अभ्युपगम लक्षात ठेवून निष्कर्ष काढता आला पाहिजे. निष्कर्ष जर अभ्युपगमाला अवलक्षून नसेल तर अभ्युपगम बदलावा लागतो.

अभ्युपगमातून एखादा सिध्दान्त निर्माण होण्यासाठी त्याला काही निकषांच्या आधारे पारखून घ्यावे लागते. संशोधकाच्या अवलोकनात जे निरनिराळे घटक असतात त्या सर्वांना तो लागू पडला पाहिजे. सर्व घटकांना लागू पडणे ही त्याची फलश्रुती असते. संशोधनातून नवे ज्ञान आणि नवी सिध्दान्तसूत्रे निर्माण होतात. या सर्वांचे उगमस्थान अभ्युपगम असते. अभ्युपगम माहीत नसेल, तर संशोधन करता येणे शक्य नाही. कोणत्याही क्षेत्रातील ज्ञानाच्या प्रगतीसाठी अभ्युपगमाला महत्त्व असते.

संशोधनात चिंतनाचा भाग महत्त्वाचा असतो. सतर्क चिंतन, सर्जक चिंतन आणि सहेतूक चिंतन असे चिंतनाचे तीन प्रकार असतात. [१] सतर्क चिंतनात सत्याच्या शोधाचा प्रयत्न असतो. त्यासाठी विषयाचे स्वरूप नक्की करावे लागते. त्यासाठी विगमन व निगमन या पध्दतींचा अवलंब करावा लागतो. या चिंतनात कार्यकारण संबंधांना महत्त्व असते. संशोधनात अशा प्रकारचे चिंतन महत्त्वाचे मानले जाते. [२] सर्जक चिंतन हे विविध संबंधी घटक अवयवांच्या पृथक्करणावर अवलंबून असते.



Scanned with OKEN Scanner

विशिष्ट टप्प्यानंतर संश्लेषणाचा अवलंब करावा लागतो. यात विचारांचे सर्जन असते. यात नवनिर्मिती असते. अशा प्रकारच्या चिंतनात सतर्कचिंतनाचा बराच भाग असतो. यातील प्रकटमन बरेच कार्य करीत असते. काही ठिकाणी मात्र आंतरमनातील गोष्टींच्या आधारे बाह्यमनाला चालना मिळते. ह्या दोन्ही चिंतनक्रिया एकमेकीत मिसळलेल्या असतात. [३] सहेतूक चिंतन हा चिंतनाचा तिसरा प्रकार असतो. कित्येकदा विशिष्ट हेतू मनात धरून चिंतन केलेले असते. अशा चिंतनातून शेवटी निष्कर्ष किंवा फलश्रुती हाती येते. विशिष्ट हेतूने हे केलेले असते म्हणून याला सबीज चिंतन असेही म्हणतात. अभ्युपगमाला अनुसरून निष्कर्ष निघणे महत्त्वाचे असते. संशोधनाची तीच तर फलश्रुती असते.

✧ ✧



# ४ : संशोधनपध्दती

दुसऱ्या प्रकरणात मराठी साहित्यसंशोधनाच्या विविध प्रकारांविषयी विचार केला. तसे पाहिले तर प्रकार आणि पध्दती यांचा जवळचा संबंध आहे. निवडलेला विषय कोणत्या प्रकारचा आहे, हे लक्षात घेऊन त्याची पध्दती निश्चित करावी लागते. भाषिक संशोधन हा एक प्रकार झाला, परंतु या प्रकारच्या संशोधनाची एक विशिष्ट पध्दती असते. त्या पध्दतीचा अवलंब संशोधनात करावा लागतो. मग ती पध्दती शैलीवैज्ञानिक असेल किंवा भाषावैज्ञानिक असेल. तौलनिक साहित्याचा अभ्यास हा साहित्य संशोधनाचा जसा एक प्रकार आहे; तशीच त्याची विशिष्ट पध्दतीही आहे. आंतरविद्याक्षेत्रीय संशोधनात लोकसाहित्याचे संशोधन हा एक प्रकार आहे. परंतु क्षेत्रीय संशोधन ही त्याची पध्दती आहे. विशिष्ट पध्दतीचा अवलंब करणाऱ्याला त्या पध्दतीशी संबंधित प्रकारही माहीत पाहिजे. तसे पाहिले तर प्रकार आणि पध्दती यांच्या सीमारेषा एकमेकीत मिसळलेल्या असतात. जसे पाकशास्त्रात गाजराची कोशिंबीर, मुळ्याची कोशिंबीर, पत्ताकोबीची कोशिंबीर, टोमॅटोची कोशिंबीर वगैरे कोशिंबिरीचे वेगवेगळे प्रकार आहेत. प्रत्येक प्रकारात वेगवेगळे घटक असतात आणि त्या त्या प्रकाराची पध्दती प्रकारानुरूप भिन्नभिन्न असते, याचा अर्थ असा की, संशोधनाचे प्रकार माहीत असल्याशिवाय संशोधनाची पध्दती माहीत असणे शक्य नाही.

साहित्य हे सर्जनशील असते; त्यामुळे काहींच्या मते त्याचा आस्वाद



Scanned with OKEN Scanner

घेणे हाच खरा त्याचा अभ्यास होय. अशा लोकांच्या मते साहित्याचे रसग्रहण करणे महत्त्वाचे असते. टीकेच्या क्षेत्रात सर्जनशील टीका ही वाङ्.मयाच्या अभ्यासाला उपयुक्त ठरते. साहित्याचा अभ्यास हे एक ज्ञानक्षेत्र असते. वाङ्.मयाच्या क्षेत्रात वैज्ञानिक पध्दतीचा अवलंब केला तर आपणास वाङ्.मयाचा सामाजिक, राजकीय आणि आर्थिक क्षेत्रांसाठी अभ्यास करावा लागेल. साहित्याच्या संशोधनासाठी विज्ञानप्रणित मूल्यांचा काटेकोरपणाने अवलंब करता येत नाही. तरीपण शास्त्रीय पध्दतीतील बराचसा भाग साहित्याच्या संशोधनात येऊ शकतो. दुसरे असे की, साहित्याचा अभ्यास वेगवेगळ्या पध्दतींनी करता येतो. काळ, व्यक्ती आणि अभिरुची यांनुसार या अभ्यासाच्या पध्दतीत फरक होत असतो. साहित्याच्या संशोधनासाठी संशोधकाने कोणत्या पध्दतीचा अवलंब केला आहे यासंबंधी त्याने प्रारंभीच सांगणे आवश्यक असते. विशिष्ट पध्दतीने संशोधन केले तर ते संशोधन दिशाहीन होत नाही. एक प्रकारची शिस्त अशा संशोधनाला प्राप्त होते. साहित्य संशोधनाच्या काही प्रमुख पध्दतींचा विचार पुढे केला आहे.

**१] ऐतिहासिक किंवा कालक्रमनिष्ठ पध्दती**

ऐतिहासिक किंवा कालक्रमनिष्ठ पध्दती ही शोधलेखनाची एक प्रतिपादन पध्दती आहे. ह्या प्रतिपादन पध्दतीची काही वैशिष्ट्ये आहेत. ऐतिहासिक स्वरूपाची पाहणी करण्याचा प्रयत्न पुष्कळ संशोधक करतात. निवडलेल्या विषयाच्या अनुषंगाने ग्रंथांतून किंवा नियतकालिकांतून आलेले विवेचन या पध्दतीत नोंदविले जाते. निवडलेल्या विषयाच्या संदर्भात जे काही उपक्रम झाले असतील त्यांचीही ऐतिहासिक दृष्टीने या पध्दतीत नोंद केली जाते. ऐतिहासिक माहिती देण्याची एक विशिष्ट पध्दती असते. उपलब्ध असलेली माहिती किंवा तथ्ये कालानुक्रमाने या पध्दतीत दिली जातात. असे करीत असताना पुढील तीन गोष्टी लक्षात ठेवणे आवश्यक असते. [१] ऐतिहासिक आढावा घेताना एक प्रकारचा विकासक्रम दाखविता आला पाहिजे. विषयाशी संबंधित असे जे घटक असतात ते समोर ठेवून त्या त्या घटकाचा विकास कसा झाला ते सांगितले पाहिजे.



विकास झाला नसेल तर का झाला नाही त्याची कारणे सांगता आली पाहिजेत. ऐतिहासिक दृष्टीतून आढावा घेताना विविध गोष्टींचे, घटकांचे व उपक्रमांचे मूल्यमापन करता आले पाहिजे.
[२] ऐतिहासिक आढावा घेताना चिकित्सक दृष्टीची गरज असते. ऐतिहासिक काळात जे झाले ते अपरिहार्य होते असे पुष्कळदा म्हटले जाते. किंवा जे घडले त्याच्याकडे दोषयुक्त दृष्टीने पाहिले जाते. या पध्दतीचा अवलंब करताना ऐतिहासिक घटनांच्याकडे चिकित्सकपणे पाहून गुण व दोष दर्शविणारा आढावा घेता आला पाहिजे. [३] ऐतिहासिक उत्क्रांतीची जाणीव संशोधकाने ठेवली पाहिजे. उत्क्रांतीची जाणीव ठेवणे म्हणजे प्रारंभीचा काळ आणि शेवटचा काळ या दोन टोकांतील काळ निश्चित करून टप्याटप्यांनी विकास कसा झाला हे दाखविणे. त्यासाठी सोयीस्कर असे कालखंड निश्चित करावे लागतात. हे कालखंड उत्क्रांतीदर्शक व स्वयंपूर्ण असले पाहिजेत.

वरील गोष्टी लक्षात ठेवल्यानंतर ऐतिहासिक स्वरूपाचा आढावा घेणारी संशोधनपध्दती मौलिक संशोधन करू शकते. कोणत्याही पध्दतीत ऐतिहासिक आढावा प्रारंभी घ्यावा लागतो. त्याच्या आधारेच आपल्याला नवेपण दाखविता येते. ऐतिहासिक आढावा घेणारी पध्दती पूर्वी लोकप्रिय होती. या पध्दतीतून संशोधक आता बाहेर पडले आहेत; कारण नवीन पध्दती आता पुढे आल्या आहेत. पुष्कळदा जमविलेली साधनसामग्री अशी असते की तिला ऐतिहासिक पध्दतीच योग्य असते. या भूमिकेतून केलेले विवेचन कालक्रमनिष्ठ असावे. अशा प्रकारचे संशोधन करताना कालतत्त्व आणि साहित्यसर्जन यांचा विचार करणे आवश्यक असते. तसेच जीवनमूल्ये आणि साहित्यमूल्ये यांचाही विचार या पध्दतीत करणे आवश्यक असते. वाङ्.मयव्यापार आणि त्याला पूरक ठरणाऱ्या विविध घटना यांचा अभ्यास करणे आवश्यक असते. बदलत्या राजवटींचाही परिणाम साहित्यावर होतो हेही या पध्दतीत संशोधन करताना लक्षात ठेवले पाहिजे. प्राचीन साहित्याचा अभ्यास करताना त्या साहित्याची अंगोपांगे लक्षात घेतली पाहिजेत.



Scanned with OKEN Scanner

## २] तौलनिक पध्दती

(६·३४)

या पध्दतीसाठी 'संशोधनाचे प्रकार' या दुसऱ्या प्रकरणात 'तौलनिक साहित्याभ्यास' हा जो घटक आहे त्या संबंधीची माहिती अवश्य वाचावी. ती माहिती या पध्दतीस पूरक असल्यामुळे या ठिकाणी पुनरावृत्ती टाळण्यासाठी ती पुन्हा दिली नाही.

भारतात चौदा भाषा आहेत. त्यामुळे तुलनात्मक अभ्यासाला खूप वाव आहे. साहित्याचा एखादा कालखंड किंवा वाङ्मयप्रकार घ्यायचा. त्याचे एखादे अंग विचारात घ्यायचे. उदा. मराठी नाटकांतील किंवा कादंबऱ्यांतील गेल्या पंचवीस वर्षांत चर्चिले गेलेले सामाजिक प्रश्न किंवा तंत्रात्मक उपक्रम असे विषय घेतले तर त्या दृष्टीने प्रश्नांची एक व्यापक यादी तयार होईल. त्यांपैकी काही विशिष्ट घटक विचारात घ्यावे लागतील. त्यांचे पृथक्करण करावे लागेल. प्रत्येक घटकाचे वैशिष्ट्य त्यामुळे स्पष्ट होईल. काही प्रश्न तयार केल्यानंतर त्यांच्या आधाराने त्या कालखंडात किंवा त्या वाङ्मयप्रकारात इतर भाषांत किंवा एखादी कलाकृती निवडून तिच्यात काय स्थिती आढळते ते पाहता येईल.

या पध्दतीत चिकित्सा महत्त्वाची असते. तुलना कशाची करावयाची व कोणती अवधाने ठेवून करावयाची हे मात्र नीटपणे समजून घेणे आवश्यक आहे. तुलनात्मक ही एक दृष्टी असते. तिच्या वापराला किंवा अवलंबनाला मर्यादा नाहीत. विविध कलाकृती, विविध व्यक्ती, समकालीन किंवा समप्रवृत्तीचे भिन्न भाषिक लेखक यांत समाविष्ट होऊ शकतात: ललित कला आणि ललित वाङ्मय यांचा तुलनात्मक अभ्यास करता येतो. कालतत्त्व, रूपबंध, आशय, अभिव्यक्ती हे घटक लक्षात घेऊन तुलना करता येते.

दोन लेखक किंवा दोन वाङ्मय प्रकार घेऊन दोन्ही भाषांतील संबंधित माहिती एकमेकापुढे मांडली म्हणजे तुलनात्मक साहित्याभ्यास झाला असे होत नाही. कोणतेतरी साधर्म्य, सूत्र, प्रभाव, दाखविणे महत्त्वाचे असते. भिन्न भाषिक साहित्याचा अभ्यास विविध अंगांनी करता येतो. कालखंड,



लोकसाहित्य, साधर्म्य असलेले साहित्यिक, विशिष्ट विचारप्रवाह, भाषाशैली, साहित्यविचार, वाङ्मयप्रकार, यांच्या आधारे असा अभ्यास करता येतो.

भाषांतर, रूपांतर, अनुवाद, पुनर्निमिती अशा अनेक रूपांनी परभाषेतील श्रेष्ठ साहित्यकृती रसिकांच्या समोर असते. अशा साहित्यकृती स्वतंत्र नसतात; परंतु श्रेष्ठ असतात. अशांचाही अभ्यास करता येतो. मूळ संहिता आणि तिच्यात झालेले बदल लक्षात घेऊन हा अभ्यास करता येतो.

अर्वाचीन साहित्याचा तौलनिक अभ्यास करताना प्रेरणा, भिन्न संस्कृती, संप्रदाय, प्रादेशिकत्व असे अनेक घटक लक्षात घेऊन अभ्यास करता येतो. या अभ्यासाची व्याप्ती खूप आहे. असा अभ्यास म्हणजे संशोधकाला एक आव्हान असते.

## ३] सूक्ष्म संहिताचिकित्सा पध्दती [भाषावैज्ञानिक, शैलीवैज्ञानिक]

या पध्दतीला पूरक अशी माहिती दुसऱ्या प्रकरणात 'भाषिक संशोधन' या मुद्यात आलेली आहे. अभ्यासकांनी ती अवश्य ध्यानी घ्यावी. या ठिकाणी या पध्दतीची वैशिष्ट्ये तेवढी सांगितली आहे.

भाषेच्या अभ्यासासाठी मौखिक किंवा लिखित किंवा सलग नमुने गोळा करावे लागतात. मौखिक नमुने मिळविण्यासाठी क्षेत्रीय पाहणी करावी लागते. 'भाषिक सर्वेक्षण ही एक प्रकारची खानेसुमारी आहे', असे डॉ. अशोक केळकरांनी जे म्हटले आहे ते अगदी बरोबर आहे. भाषिकांमध्ये कोणत्या प्रकारची भाषावैशिष्ट्ये दिसून येतात, याचा शोध घ्यावा लागतो. अशा पाहणीसाठी टेपरेकॉर्डरचा उपयोग करावा लागतो. ऐतिहासिक भाषाविज्ञान, वर्णनात्मक भाषाविज्ञान, अर्थविज्ञान, समाजभाषाविज्ञान, मनोवैज्ञानिक भाषाविज्ञान व गणितीभाषाविज्ञान ही क्षेत्रे भाषाविज्ञानाच्या क्षेत्रात मोडतात. त्यांची माहिती करून घेणे आवश्यक असते. त्यांचा अभ्यास केल्याशिवाय सूक्ष्म संहिताचिकित्सा करणे शक्य नाही.

भाषेचा वैज्ञानिक पध्दतीने अभ्यास करण्यासाठी वस्तुनिष्ठता आवश्यक असते. शैलीविज्ञान हे पाठ्याचा भाषावैज्ञानिक दृष्टीक्षेपातून अभ्यास करते. ललित वाङ्मयातील शैलीचा तीन प्रकारे अभ्यास करता येतो. शैली हे



Scanned with OKEN Scanner

रचनेचे तत्त्व मानून लेखकाच्या दृष्टीकोनातून तिचा विचार करता येतो. दुसरा प्रकार म्हणजे पाठ्येतर संदर्भाचा विचार न करता फक्त पाठ्यातील शैलीविशेषांचा वस्तुनिष्ठ अभ्यास करता येतो. तिसऱ्या प्रकारात वाचकांच्या प्रतिक्रियांच्या आधारे पाठ्याबाबत बोलता येते. मराठी समीक्षेत आतापर्यंत झालेल्या शैलीचा विचार हा प्रामुख्याने तिसऱ्या प्रकारात मोडणारा आहे. याला प्रत्ययवादी शैली असे म्हणता येईल. अशा प्रकारात वाचक ढोबळ मानाने शैलीविषयी वस्तुनिष्ठता टाळून बोलत असतो.

'वाङ्मय आणि शैलीविज्ञान : भाषावैज्ञानिक दृष्टीक्षेप' या लेखात [भाषा व साहित्य : संशोधन, खंड २] डॉ. रमेश धोंगडे यांनी जे विचार व्यक्त केले आहेत ते अत्यंत उपयुक्त आहेत. ते म्हणतात, ''शैलीविषयक अभ्यासाचे व्यक्तिनिष्ठ आणि वस्तुनिष्ठ अभ्यास असे दोन प्रकार मानता येतील. व्यक्तिनिष्ठ अभ्यासात समीक्षक स्वतःच्या आवडी–निवडीला, स्वतःच्या कलेसंबंधीच्या दृष्टीकोणाला स्वतःवर त्या कलाकृतीने घडणाऱ्या परिणामांना जास्त महत्त्व देतो. शैलीविषयीचे तो स्वतःचे निवेदनच समीक्षेत देत असतो...... मराठीतील शैलीविचार हा प्रामुख्याने असा 'व्यक्तिनिष्ठ निवेदन' स्वरूपाचा आहे. शैलीचा वस्तुनिष्ठ अभ्यास म्हणजे केवळ स्वप्रत्यय न मानता पाठ्यांची त्या दृष्टीने छाननी करणे, पुरावे सादर करणे आणि स्वप्रत्ययावर आधारलेले मूल्यमापन करणे. [उदा. 'भाषा ओघवती आहे', 'मला भाषेने मोहिनी घातली', 'लेखन रुक्ष आहे' अशी विधाने टाळणे.] शैलीचा वस्तुनिष्ठ अभ्यास सहा दृष्टीकोनांतून करता येईल. या दृष्टीकोनाची स्थूल मानाने ओळख करून घेऊन भाषावैज्ञानिक पध्दतीचा म्हणजेच शैलीवैज्ञानिक चिकित्सेचा त्यातील वाटा आणि त्याचे महत्त्व यांचा विचार करता येईल. प्रथम या सहाही दृष्टीकोनांतून शैलीच्या कोणत्या व्याख्या केल्या आहेत ते पाहू आणि मग प्रत्येक व्याख्येची थोडक्यात चर्चा करू :

१] आशयावरचे वेष्टण म्हणजे शैली.

२] आविष्कारणातील पर्यायांपैकी विशिष्ट पर्यायाची निवड म्हणजे शैली.

३] शैली म्हणजे लेखकाच्या व्यक्तिगत वैशिष्ट्यांचा संच.



४] शैली म्हणजे नियमोल्लंघन

५] शैली म्हणजे विशिष्ट काळातील शैलीविशेषांचा संच.

६] शैली म्हणजे वाक्यातील घटकांच्या परस्पर संबंधांचा आणि वाक्यावाक्यातील संबंधाचा विचार.'' [पृष्ठ ४६–४७]

वरील व्याख्यांची चर्चा मुळात वाचावी म्हणजे शैलीचा अभ्यास करणाऱ्यांना अधिक फायदा होईल. कारण डॉ. धोंगडे यांनी या संदर्भात जी उदाहरणे दिली आहेत ती महत्त्वाची असून त्या त्या व्याख्येचा प्रत्यय आणून देणारी आहेत.

**४] नमुना पाहणी पध्दती [सँपलिंग सर्व्हे]**

संख्याशास्त्रीय माहितीच्या आधारावर बिनचूक असे निष्कर्ष काढता येतात. संशोधनात नमुना पाहणी महत्त्वाची असते. तिच्यातील निष्कर्ष विश्वसनीय असण्यासाठी निवडलेला नमुना हा प्रातिनिधिक स्वरूपाचा असला पाहिजे. उदा. पन्नास ते सत्तर या वयोगटातील दोन लाख व्यक्तींच्या धुम्रपान सवयींचा अभ्यास करून ही सवय व कॅन्सर यांच्या परस्पर संबंधांविषयी निष्कर्ष काढावयाचे ठरविले तर निष्कर्ष असा निघू शकतो की, सिगरेट ओढल्याने कॅन्सर व हृदयविकार होण्याची शक्यता असते. त्यासाठी सर्व लोकांचे मृत्यू कसे झाले त्याची कारणे शोधावी लागतील. दुसरे असे की, दोन लाख ही संख्या एक प्रातिनिधिक नमुना [सॅम्पल] आहे. निष्कर्ष विश्वसनीय काढण्यासाठी निवडलेला नमुना पूर्णपणे प्रातिनिधिक पाहिजे. सर्व लोकांतील विविध विशेष या नमुन्यातील लोकांत असावयास पाहिजेत. हे लोक प्रातिनिधिक नसून वैशिष्ट्यपूर्ण [टिपिकल] असतील तर त्या पाहणीमधून निघालेले निष्कर्ष महत्त्वाचे ठरू शकणार नाहीत. म्हणून निवडलेला नमुना पूर्ण प्रातिनिधिक असावा हे संशोधकाने लक्षात ठेवले पाहिजे.

निवडलेला नमुना यदृच्छया [रॅन्डम] पध्दतीने घेतलेला असावा. निवडलेला गट फार मोठा नसावा. नमुना निवडीसाठी पुढील संकेत पाळावा लागतो. पाहणीखालील लोकसंख्या लहान असेल तर नमुना मोठा असावा. लोकसंख्या मोठी असेल तर संख्येच्या दहा टक्के किंवा त्याहून लहान असा



Scanned with OKEN Scanner

नमुना चालतो. या पध्दतीने निष्कर्षापेक्षा नमुन्यासाठी निवड कटाक्षाने करणे महत्त्वाचे असते.

नमुना पाहणीची वरील तात्त्विक बैठक झाली. आता या पध्दतीत अनेक वस्तू, पदार्थ, व्यक्ती इ. घटकांचा अभ्यास ज्यावेळी करावयाचा असतो त्यावेळी दोन पध्दतीचा अभ्यास केला जातो.

१] विचारात घेतलेला गट मर्यादित असेल तर त्यासाठी पाहणीसाठी विशिष्ट गमके ठरवून सरासरी काढता येते.

२] मोठ्या गटाचा अभ्यास करताना सरासरी काढणे अशक्य असते. अशावेळी विशिष्ट प्रश्न, समस्या, लोकांची मते, प्रतिक्रिया इत्यादींचे अवलोकन या नमुना पध्दतीने केले जाते.

**५] क्षेत्रीय सर्वेक्षण पध्दती [फील्ड सर्व्हे]**

या संदर्भात दुसऱ्या प्रकरणातील ख [४] च्या मुद्यातील माहिती पूरक माहिती म्हणून अवश्य वाचावी. या ठिकाणी या पध्दतीची वैशिष्ट्ये सांगितली आहेत. आज सामाजिक संशोधनाला खूप महत्त्व प्राप्त झाले आहे. यात सामाजिक, आर्थिक पाहणी असते. भाषाशास्त्रज्ञ भाषांची पाहणी करतात. विश्वसनीय माहिती गोळा करणे हा या पाहणीचा उद्देश असतो. ही पध्दती उपयुक्त असली तरी तिच्या काही मर्यादा आहेत. व्यक्तीगत संशोधनासाठी ही पध्दती उपयुक्त नाही. एक योजना [प्रोजेक्ट] म्हणून सामुदायिकरीतीने ही पाहणी करता येते. काही संस्था ही पाहणी हाती घेऊ शकतात. ह्या पाहणीचा रोख विस्तृत व तपशीलवार माहिती मिळविण्यावर नसतो. समाजजीवनातील प्रमुख प्रवृत्तींचा रोख कोणाकडे आहे, हे स्पष्ट करण्यावर या पाहणीचा भर असतो. यात सामाजिक संबंधांची कारणमीमांसा असते. ही पध्दती लोकप्रिय आहे; परंतु ठराविक पध्दतीनेच ही केली जाते; त्यामुळे तिच्यातील संशोधनमूल्य कमी होते. या पाहणी पध्दतीमुळे नवीन माहिती उपलब्ध होऊ शकते. प्रश्नावली, मुलाखती या संशोधनातील साधनांचा उपयोग या पध्दतीत केला जातो.

नमुन्याची पाहणी किंवा निवड बरोबर झाली नाही तर अगदी चुकीचे निष्कर्ष निघू शकतात, याची जाणीव या पध्दतीचा अवलंब करणाऱ्याने



ठेवली पाहिजे. अलिप्तपणे ही पाहणी होणे आवश्यक असते. प्रयोजित माहिती जमविल्यानंतर तिचे संकलन व वर्गीकरण करून तिची सुबोध रीतीने मांडणी करावी लागते. यात माहितीचे पृथक्करण आपोआपच होते. पाहणी विषयाला बंधने नसतात. सूक्ष्म दृष्टी, आपल्या विषयाची जाण, पाहणीचे त्या क्षेत्रातील महत्त्व या गोष्टींची कल्पना मात्र अभ्यासकाला असावी लागते.

लोकसाहित्याचा क्षेत्रीय पध्दतीने अभ्यास करावा लागतो. हा अभ्यास अनेक अंगांनी युक्त असतो. लोकजीवनातील अनेक घटकांचा तो अभ्यास असतो. म्हणून अभ्यासकाने आपला दृष्टीकोन आधीच निश्चित करणे आवश्यक असते. लोककथांचा अभ्यास धर्मश्रध्दा, भाषा वैशिष्ट्ये, लोकमानस, लोकजीवन, इत्यादी अंगांनी करता येतो. कोणत्या अंगाने अभ्यास केला आहे हे आधी सांगणे आवश्यक असते. त्याचप्रमाणे अभ्यास क्षेत्र म्हणजे भौगोलिक परिसर निश्चित करणे आवश्यक असते. प्रवासाची दिशा, वाहन व्यवस्था, प्रवासखर्च, कॅमेरा, ध्वनिफिती, टेपरेकॉर्डर इत्यादी गोष्टींचा विचार करून ठेवणेही आवश्यक असते; लोकसाहित्याचा पसारा मौखिक असतो, त्यामुळे संहिता तयार करण्यासाठी ध्वनिफितींना फार महत्त्व असते.

लोकसाहित्यासंबंधी अकारण उमाळा असता कामा नये, त्याचप्रमाणे अकारण तिरस्कारही असता कामा नये. काही संशोधक उगाचच गहिवर संप्रदायात सहभागी होतात व वस्तुनिष्ठ पध्दतीच्या संशोधनाला मुकतात. लोकसाहित्याच्या क्षेत्रात क्षेत्रीय कार्यानंतर एक नकाशा तयार करून लोकसाहित्य संशोधनविषयक अनेक बाबी त्यात दाखविता येतात. तारा भवाळकर यांनी लोकसाहित्याच्या संशोधनाच्या संदर्भात पुढील उदगार काढले आहेत ते यथार्थ आहेत. ''लोकसाहित्याच्या संशोधनाचे क्षेत्र अत्यंत व्यापक आणि तितकेच मनोरंजकही आहे आणि क्षेत्रीय अभ्यास ही त्यासाठी एक अनिवार्य अट आहे.'' [भाषा व साहित्य : संशोधन, खंड २' 'लोकसाहित्याचा क्षेत्रीय अभ्यास.']

### ६] अनुभवाधिष्ठित पध्दती

वाड्.मयाच्या अभ्यासात अलीकडे अनुभवाचा विचार हा अतिशय महत्त्वाचा आहे. लेखक साहित्याच्या माध्यमातून आपला अनुभव देण्याचा प्रयत्न करीत असतो. हा अनुभव अव्वल, एकजिनसी व सखोल असेल तर त्याला अधिक महत्त्व असते. लेखकाची अनुभव घेण्याची विशिष्ट पध्दत असते. काहीच्या अनुभवाचा आवाका मोठा असतो, तर काहींचा छोटा असतो. वाचकाने तो अनुभव लेखकाच्या भूमिकेशी समरस होऊन घेतला तर त्यालाही आनंद होतो. ह्या अनुभवाला स्थळ आणि काळ यांच्या मर्यादा नसतात. अनुभवविश्व कालातीत असते. साहित्यात व्यक्त झालेले हे अनुभवविश्व कसे असते याचा शोध संशोधकाला घेता आला पाहिजे. यासाठी मानवी मनाचा विचार करावा लागतो. साहित्यात नैतिकता आहे की अनैतिकता आहे, वास्तवता आहे की अवास्तवता आहे, याचा शोध घ्यावा लागतो. काही लेखकांना जीवनातील विकृतीच दिसते. तसे असेल तर त्या संदर्भात शोध घेतला पाहिजे.

या पध्दतीचा अवलंब करण्यासाठी अभ्यासकाला मानसशास्त्राचा आधार घ्यावा लागतो. साहित्यातून जो आविष्कार झालेला असतो, त्याचे मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून विवेचन करावे लागते. साहित्यात जो अनुभव व्यक्त झालेला असतो, त्याचे पोत कशा स्वरूपाचे आहे याचा विचार करावा लागतो. साहित्याच्या संशोधनात अनेक विद्याक्षेत्रांचा उपयोग होतो, हे जरी खरे असले तरी साहित्य हे अनन्यसाधारण असते हेही लक्षात ठेवले पाहिजे. साहित्य मानवी जीवनाचे सत्यदर्शन घडवीत असते. त्यातील माणूस महत्त्वाचा असतो. विज्ञान, समाजशास्त्र, तत्त्वज्ञान, मानसशास्त्र यांचा मानवी जीवनाशी संबंध असतो. ही सारी शास्त्रे माणसाचे, त्याच्या विश्वाचे, त्याच्या समाजाचे, त्याच्या मनाचे दर्शन घडवितात. साहित्यातील माणसाचे माणूसपण शोधणे महत्त्वाचे असते.

साहित्याचे सामर्थ्य खूप मोठे असते. त्यातील माणूसपणाचा विशिष्ट पार्श्वभूमीवर शोध घेणे महत्त्वाचे असते. माणसाने माणसासंबंधीचे जे अनुभव व्यक्त केलेले असतात त्यांचे वेगवेगळ्या दृष्टीकोनातून दर्शन



घेऊन त्या अनुभवाची विशिष्टता या प्रकारात अभ्यासकाला शोधावी लागते.

### ७] वैज्ञानिक पध्दती

वैज्ञानिक पध्दतीचे महत्त्व संशोधन क्षेत्रात नक्कीच आहे. या पध्दतीतील विगमन, निगमन, पृथक्करण, संकलन, कार्यकारण व तुलना ह्या गोष्टी कोणत्याही ज्ञानक्षेत्रात उपयुक्त अशा आहेत. साहित्याच्या अभ्यासाच्या काही खास पध्दती आहेत. त्या तर उपयुक्तच आहेत. त्यातील काहींची पुनर्घटना करून त्यांची उपयुक्तता वाढविणे आवश्यक आहे. साहित्याचा अभ्यास अनेक भूमिकांतून करता येतो. शास्त्राच्या अभ्यासात हे शक्य नसते. अभ्यासाच्या भूमिकांत कालपरत्वे, व्यक्तिपरत्वे बदल होतो म्हणून एकाच कलाकृतीवर किंवा कलावंतावर निरनिराळ्या व्यक्तींनी निरनिराळ्या काळी लिहिलेली भाष्ये सारखीच महत्त्वाची असतात. वैज्ञानिक पध्दतीत पुढील सहा टप्पे असतात. त्यांच्या साह्यानेदेखील साहित्याचे संशोधन करता येते.

**उद्दिष्ट स्पष्ट करणे :** संशोधकाने विषय नक्की करून स्वतः त्याची रूपरेषा तयार केली पाहिजे. त्या रूपरेषेत संशोधनाचे उद्दिष्ट स्पष्ट करणे आवश्यक असते. विषय निवडण्याचे कारण, विषयाचे शब्दांकन विशिष्ट पध्दतीने करण्याचा उद्देश, व गृहितकृत्य कोणते यासंबंधीची माहिती प्रारंभी देणे आवश्यक असते. एकूणच संशोधनाचे उद्दिष्ट कोणते व त्याची व्याप्ती कोणती या विषयीचे स्पष्टीकरण या टप्प्यात दिले पाहिजे.

**साधनसामग्रीची जुळवणी :** साधन सामग्री कोणती आवश्यक आहे यासंबंधीची सूची करणे आवश्यक असते. साधनसामग्रीची प्रतवारी ठरवून तिची उपलब्धी कुठे आणि कशी होऊ शकेल यासंबंधी विचार करण्याचा भाग या टप्प्यात येतो. ग्रंथालयात जाऊन संदर्भग्रंथांचा शोध घेणे, नियतकालिकांतील लेखांचा शोध घेणे वगैरे गोष्टींचा समावेश या टप्प्यात येतो.

**साधनसामग्रीचे व्यवस्थापन :** ही पध्दती समस्येवर उपाय शोधणारी असते, त्यामुळे या पध्दतीत तथ्यांना फार महत्त्व असते. जी तथ्ये आपण



Scanned with OKEN Scanner

मिळविलेली असतात व जी माहिती गोळा केलेली असते तिचे वर्गीकरण करून ती नीट मांडणे आवश्यक असते. साधनसामग्रीचे व्यवस्थापन [मांडणी] करणे महत्त्वाचे असते. त्यासाठी आधी माहितीचे पृथक्करण करणे आवश्यक असते. मुख्य समस्या जी असते तिच्याशी संबंधित लहान लहान समस्या असतात. त्यांचे उपाययोजन केल्यानंतर मोठ्या समस्येचे उपाययोजन आपोआपच होते. यासाठी संशोधकाने प्रथम सर्व माहितीचे सूत्रबध्दरीतीने व्यवस्थापन केले पाहिजे. तिची प्रतवारी ठरविली पाहिजे. वैज्ञानिक क्षेत्रात मापनाला महत्त्व असते, हे संशोधकाने लक्षात ठेवले पाहिजे.

**संशोधनाची पध्दती :** संशोधनासाठी कोणती पध्दती वापरणे आवश्यक आहे ते निश्चित करून त्या पध्दतीचा अभ्यास करणे तितकेच आवश्यक असते. साधनसामग्रीच्या आणि विषयाच्या आधारे गृहितकृत्य नक्की करणे महत्त्वाचे असते. गृहितकृत्यासंबंधी [अभ्युपगम] तिसऱ्या प्रकरणात जी माहिती दिलेली आहे ती या संदर्भात अवश्य वाचावी. अभ्युपगम निश्चित केल्याशिवाय संशोधनाला निश्चित दिशा मिळू शकत नाही.

**गृहितकृत्याचे परीक्षण :** वैज्ञानिक क्षेत्रात गृहितकृत्याला फार महत्त्व असते. कौशल्यपूर्ण संशोधनाची काही गमके असतात. संशोधनात शास्त्रीय पध्दतीचा अवलंब करणे महत्त्वाचे असते. गृहितकृत्याचे परीक्षण संशोधकाला करावे लागते. साधनसामग्रीच्या साह्याने जी रूपरेषा तयार केली असेल तिच्यातील प्रत्येक प्रकरणात गृहितकृत्याला अनुलक्षून निष्कर्ष निघतात किंवा नाहीत याचाही शोध संशोधकाला घ्यावा लागतो. 'संशोधन प्रक्रिया' या तिसऱ्या प्रकरणातील 'च' घटकात या संदर्भात जी माहिती दिलेली आहे ती अभ्यासकांनी जरूर वाचावी. पुनरावृत्ती होऊ नये म्हणून ती माहिती या ठिकाणी दिली नाही.

**निष्कर्ष :** हा या पध्दतीत शेवटचा टप्पा असतो. गृहितकृत्य निश्चित केल्यानंतर त्याला अनुरूप निष्कर्ष निघाले नाहीत तर गृहितकृत्य चुकले असे संशोधकाने समजले पाहिजे. संशोधनात निष्कर्ष खूप महत्त्वाचे असतात. संशोधकाचे ते फलित असते. त्याने जे काय शोधले ते त्याने



निष्कर्षांच्या आधारे सांगितलेले असते. विज्ञान पध्दतीत तर निष्कर्षांना अनन्यसाधारण महत्त्व असते. 'संशोधन प्रक्रिया' या तिसऱ्या प्रकरणात 'छ' घटकात 'निष्कर्ष व फलश्रुती' हा' जो मुद्दा आहे तो अभ्यासकांनी अवश्य वाचावा.

**८] समीक्षातत्त्वप्रधान संशोधन पध्दती :**

पहिल्या प्रकरणात 'च' मुद्यात संशोधन आणि समीक्षा यांतील साम्यभेद स्पष्ट केला आहे, तो भाग या पध्दतीला पूरक म्हणून अवश्य वाचावा. बेब्स्टर आपल्या कोशात 'रिसर्च' ही संज्ञा पुढीलप्रमाणे स्पष्ट करतो : "Research is a careful or critical inguiry, an examination in seeking facts or principles, diligent investigation in order to ascertaining something." या व्याख्येत चिकित्सक चौकशी, परीक्षण यांना महत्त्व आहे. दुसऱ्या पर्यायी अर्थात परिशोधनाला महत्त्व आहे. तसे पाहिले तर अभ्यासपूर्ण व चिकित्सक लेखन हे संशोधन असते. संशोधनाची संकल्पनाच मुळात व्यापक आहे असा याचा अर्थ होतो. शोध घेणे ही एक मानसिक प्रक्रिया असते. समीक्षापर लेखन व शोधन लेखन यांत पुसट अशी सीमारेषा असते.

समीक्षापर लेखन व शोधदृष्टीने केलेले लेखन यांत फरकही असतो. लेखन, विवेचन, शैली, इत्यादीत फरक असतो. यांच्यात वेगळेपणा तसा खूपच असतो. शोधलेखन हे समस्यामूलक असते. समीक्षालेख निबंधसदृश असतो. त्यात एखादादुसरा नवीन विचार मांडलेला असतो किंवा विशिष्ट दृष्टीकोण व्यक्त केलेला असतो. शोधलेखन मात्र ज्ञानात नवीन भर घालत असते. समीक्षालेखन जर साक्षेपी असेल तर ते शोधलेखनाला जवळचे असू शकते.

साहित्याच्या अभ्यासात साहित्यसमीक्षेचे स्थान केंद्रवर्ती आहे. संशोधन प्रक्रिया हे पायाभूत साधन आणि समीक्षा हे अंतिम फलित असते, असे म्हटले तर वावगे होऊ नये. संशोधनाला चिकाटीची आणि सापेक्षाची, तर समीक्षेला एक प्रकारच्या आंतरदृष्टीची आवश्यकता असते; तरीसुध्दा या दोन्ही क्षेत्रांचे विभाजन करता येत नाही. साहित्याचे संशोधन करणारा हा



Scanned with OKEN Scanner

समीक्षक असावाच लागतो. त्याला समीक्षाव्यवहार माहीत असल्याशिवाय संशोधन करता येणार नाही. दुसरे असे की, परंपरा आणि नवता यांचा अतूट संबंध असल्यामुळे संशोधन आणि समीक्षा यांची फारकत करता येत नाही, हे अभ्यासकांनी लक्षात ठेवून संशोधन करताना समीक्षातत्त्वप्रधान पध्दती जर लावायची असेल, तर समीक्षेची कोणती पध्दत लावली आहे याचा निर्देश केला पाहिजे. आदिबंधात्मक आहे की अस्तित्त्ववादी आहे, चरित्रात्मक आहे की रूपनिष्ठ आहे किंवा अन्य कोणती आहे याचा उल्लेख करणे आवश्यक असते. संशोधन करण्यासाठी योजावयाची समीक्षापध्दती आधी आत्मसात केली तरच ही संशोधनपध्दती संशोधनासाठी वापरता येईल. समीक्षातत्त्वप्रधान पध्दतीची अंमलबजावणी करायची म्हणजे केवळ जुजबी समीक्षा करून संशोधन करणे नव्हे, तर त्या समीक्षापध्दतीच्या आधारे कलाकृतीतील नवीनतेचा शोध घेणे होय.

संशोधनाच्या विविध पध्दतींसंबंधी वर विवेचन केले आहे. कोणती पध्दती संशोधनासाठी योजावयची हे विषयाच्या स्वरूपावरून ठरवावे लागते. विषयाच्या स्वरूपावरून व साधनसामग्रीच्या आधारे गृहितकृत्याची निश्चिती केल्यानंतर कोणती पध्दती योग्य होईल याचा विचार संशोधकाने केला पाहिजे. पुष्कळदा संशोधनात एकाच पध्दतीचा अवलंब केलेला नसतो, तर विविध पध्दतींचा अवलंब विविध प्रकरणानुसार करावा लागतो. कुठे तौलनिक पध्दती असेल, तर कुठे सूक्ष्म संहिताचिकित्सा पध्दती असू शकेल. भिन्न भिन्न पध्दतींचा अवलंब करूनही गृहितकृत्याला अनुलक्षून निष्कर्ष मात्र निघाले पाहिजेत. प्रकार आणि पध्दती यांचे जवळचे नाते असते, हेही अभ्यासकाने लक्षात ठेवले पाहिजे. अमूकच पध्दती लावायची असे बंधन संशोधकावर नसते. पध्दती ही एक सोय आहे. शिस्त आहे. साहित्याचे स्वरूपच मूळात व्यामिश्र असल्यामुळे त्याचे अनेक विद्याशाखांशी संबंध असतात. सर्जनशीलता जरी साहित्यात असली तरी त्याचा संबंध अनेक शाखांशी येतो, म्हणून त्याचा अभ्यास करणे तसे कठीण असते. त्यात प्रयोग नसतात, तर चिंतन असते. नवीन शोधणे महत्त्वाचे असते. केवळ संकलन म्हणजे संशोधन होत नाही. संशोधन हेच



मुळात एक शास्त्र आहे. संशोधन शास्त्रशुध्द होण्यासाठी त्यास अनुरूप अशी पध्दती योजणे हे तितकेच महत्त्वाचे काम असते. त्यात प्रयत्नांचा व बुध्दीचा बराच भाग असतो.

✧ ✧



Scanned with OKEN Scanner

# ५ : पाठचिकित्सा व संहितासंपादन

### पाठचिकित्साशास्त्र म्हणजे काय?

प्राचीन मराठी साहित्य हे पठण आणि मौखिक परंपरेतून आविष्कृत झाले आहे. काळमानानुसार ह्या साहित्याच्या ग्रंथलेखनात अनेक बदल झालेले आढळतात. एकाच ग्रंथाच्या अनेक संहिता उपलब्ध होताना आढळतात. त्या ग्रंथाचा मूळ लेखक कोण हे ठरविणे अवघड असते. त्याचप्रमाणे त्या ग्रंथाची मूळ संहिता कोणती हे ठरविणेही अवघड असते. संहितेचा काळ आणि लेखकाचा काळ ठरविणे हेही अतिशय अवघड काम असते. या कारणांमुळेच पाठ्यसंशोधनशास्त्राची निर्मिती झाली. या शास्त्राची खूप गरज असते. कारण हस्तलिखिते, ऐतिहासिक कागदपत्रे, कोरीवलेख, वगैरेंच्या वाचनासाठी पाठनिश्चितीची गरज असते. संशोधकाला पाठनिश्चित करून मूळसंहितेपर्यंत पोहचणे आवश्यक असते. लेखकाने लिहिलेली त्याच्या हस्तलिखितातील मूळप्रत उपलब्ध होऊ शकत नाही. अशावेळी पाठसंशोधकाला लेखकाच्या मानसिकतेच्या जवळ जाणारी मूळप्रत सिध्द करावी लागते. ती सिध्द करण्यासाठी तो पाठसंशोधनशास्त्राची मदत घेतो. यामुळे पाठसंशोधनशास्त्र ही मराठी साहित्यसंशोधनातील एक महत्त्वाची पध्दती म्हणून मानली गेली आहे. प्राचीन साहित्याच्या संशोधनासाठी तीच पध्दती उपयुक्त ठरू शकते. पाठसंशोधनशास्त्र हे संपादनशास्त्राच्या जवळ जाणारे शास्त्र आहे. संशोधनातून सिध्द झालेली संहिता ही लेखकाची असते. त्या संहितेचे



संपादन अभ्यासक करीत असतात. संहिता ही संकल्पना व्यापक अशी आहे. संहिता म्हणजे केवळ एक हस्तलिखित नसते, तर ताम्रपट, शिलालेख, चित्र, मूर्ती, नाणी यांच्याही संहिता उपलब्ध होऊ शकतात. या कारणामुळे पाठसंशोधन हा संहितासंशोधननिष्ठ असा शोध असतो. ग्रंथनिश्चितीचे शास्त्र म्हणजे पाठसंशोधनशास्त्र असते. मुद्रित ग्रंथांच्या संहितेचीही चिकित्सा करता येते. उदा. डॉ. स. गं. मालशे यांनी 'झेंडूची फुले' या मुद्रित काव्यग्रंथाच्या संहितेची चिकित्सा केली आहे. प्रा. श्री. ना. बनहट्टी यांनी 'विष्णुपदी' या ग्रंथाच्या संहितेची चिकित्सा केली आहे. जयंत परांजपे यांनी श्री. ना. पेंडसे यांच्या कादंबऱ्यांची हस्तलिखिते आणि परिष्करणे यांचा अभ्यास केला आहे.

पाठसंशोधकाला पाठनोंदणी, पाठनिश्चिती, पाठसंकलन, परंपरासंशोधन, अंतर्गतपुरावे व बाह्यपुरावे मिळविणे, ग्रंथ व ग्रंथकार यांचा काळ निश्चित करणे, संहिता संपादित करणे इत्यादी कामे करावी लागतात. पाठसंशोधन हे एकप्रकारचे प्रात्यक्षिक संशोधन असते. या पध्दतीत समीक्षेपेक्षा संशोधनाला अधिक महत्त्व असते. म्हणून प्राचीन साहित्याच्या संशोधनात पाठचिकित्साशास्त्राची गरज असते. या शास्त्राला Textual Criticism असे म्हणण्यापेक्षा Textual Research असे म्हणणे अधिक योग्य होईल. मराठीत याला 'संहिता संशोधन' हा जो शब्द डॉ. उषा देशमुख यांनी सुचविला आहे, तो अगदी बरोबर आहे. 'पाठचिकित्साशास्त्र' या शब्दात 'पाठ' म्हणजे मूळ संहितेतील शब्द, त्याचा आशय किंवा त्याचे भाषाशास्त्रीय व व्याकरणीय स्वरूप असा अर्थ होतो. मूळ संहितेतील पदरचना किंवा वाक्यरचना यांमधील शब्दविचार अशी पाठ या शब्दामागे भूमिका आहे. अशा पाठाची चिकित्सा, संशोधन आणि शुध्दता निश्चित करणारे शास्त्र ते म्हणजे पाठचिकित्साशास्त्र होय.

पूर्वी ग्रंथ हाताने लिहून ठेवीत असत. शतकानुशतके ग्रंथांची हस्तलिखिते तयार होत असत. शतकातील भाषिक वळण, सांस्कृतिक वातावरण आणि लेखनिकाची पात्रता यांचा परिणाम पोथी वाङ्मयावर झाला. एकाच हस्तलिखितात काळानुरूप, व्यक्तीनुरूप बदल होत गेले.



Scanned with OKEN Scanner

पाठचिकित्सेच्या ज्ञेयनिष्ठ (Objective) आणि ज्ञातृनिष्ठ (Subjective) अशा दोन पध्दती आहेत. ज्ञेयनिष्ठ पध्दतीला 'वस्तुनिष्ठ' आणि ज्ञातृनिष्ठ पध्दतीला 'व्यक्तिनिष्ठ' पध्दती असेही म्हणतात. वस्तुनिष्ठ पध्दतीत अधिकृत संहिता व पाठव्यवस्थापन या पध्दतीचे काम करावयाचे असते. व्यक्तिनिष्ठ पध्दतीत चिकित्सक बुध्दीला पटलेला पाठ स्वीकारून मूळ संहितेची पुनःस्थापना करावी लागते. शाखा, परंपरा आणि वंशपरंपरेतून चार-पाच हस्तलिखिते, स्वतंत्र पाठ दर्शवीत असली तर चिकित्सकाने पाठाची निवड करताना 'बऱ्या'पेक्षा 'खरा' पाठ निवडणे महत्त्वाचे असते. त्याठिकाणी आवड महत्त्वाची नसते, तर निवड महत्त्वाची असते. भाषाविज्ञानाच्या आधारावर त्याला पाठशुध्दीही करावी लागते. पूर्वी मुद्रणकलेच्या अभावामुळे प्रतिलेखन करावे लागत असे. याला नकला करणे असे म्हणत असत. नकला करण्याच्या विविध पध्दती असत. एक जण सांगत असे व दुसरा लिहीत असे, त्यामुळे पाठांतरे निर्माण होत. चुकीचे वाचन, शब्द तोडण्याच्या चुका, नजरचुका, ऐकण्यातील चुका यांमुळे पाठांतरे होत असत. काहीवेळा यथाप्रती लेखन होत असे. अशा पध्दतीत पदभ्रंश, अक्षरभ्रंश, वाक्यभ्रंश, प्रक्षेप, अवक्षेप [गळणे] हे दोष निर्माण होत. नकलकार जर सांप्रदायिक असेल तर मूळ संहितेत तो अनेक बदल करत असे, त्यामुळे मूळ संहिता भ्रष्ट होत असे. काही बदल बुध्दिपुरस्सर होत असत, तर काही अबुध्दिपुरस्सर होत असत.

पोथीवर्गीकरणामुळे पोथीवंशवृक्ष तयार होतो. हस्तलिखितांचा वंशवृक्ष असेही याला म्हणतात. याची चिकित्सामान्यतत्त्वे पुढीलप्रमाणे :

१] संहितेची पृष्ठसंख्या, अक्षरवळण, तिचा आकार, कागदाचे जुनेपण, संहिता कुठे मिळाली व कुणाजवळ मिळाली त्याचा तपशील, प्रत्येक पृष्ठावरील ओळी, प्रत्येक ओळीतील शब्द, मंगलाचरण, फलश्रुती ह्या सर्व गोष्टी लक्षात घेऊन पोथीचे स्वरूप निश्चित करणे महत्त्वाचे असते. कालनिर्देश नसलेली संहिता व कालनिर्देश असलेली संहिता असेही वर्गीकरण करता येते. भाषाशास्त्रीय व व्याकरणविषयक साम्यावर भर देऊन वर्गीकरण करावे लागते. ह्या सर्व गोष्टी लक्षात घेतल्यानंतर वंशवृक्ष



नक्की होतो व परंपरेच्या मुळापर्यंत पोचता येते.

२] मूळ ग्रंथकाराच्या दृष्टीकोनातून पाठनिश्चित करणे.

३] नकल समकालीन की पश्चातकालीन याचा शोध घेणे.

४] सारखे पाठ, सारखी वैशिष्ट्ये असलेल्या संहिता एकत्र आणून वर्गीकरण करणे.

५] शब्दप्रयोगातील साम्य लक्षात घेऊन वर्गीकरण करणे.

६] लिपिसाम्य, पाठसाम्य, ओवीसाम्य, प्रक्षेपसाम्य व अवक्षेपसाम्य यांवरून संहितांचा वंशवृक्ष तयार करता येतो. यातूनच मुख्यपरंपरा, उपपरंपरा, मिश्रपरंपरा, स्वतंत्र परंपरा निश्चित करता येते व त्यानंतर पाठनिश्चिती करता येते.

७] महानुभावांच्या संहिता व भागवत संप्रदायाच्या संहिता यांच्या तौलनिक अभ्यासातून भाषिक कसोटी मूळ आधार धरून हस्तलिखिताची परंपरा निश्चित करता येते.

पाठचिकित्सक तर्ककुशल, रसिक, निराग्रही, परिश्रमशील, कुशाग्र, समृध्द ज्ञान असलेला व साक्षेपी असेल तर त्याने केलेले संशोधन महत्त्वपूर्ण ठरू शकते. पाठचिकित्साशास्त्राच्या संदर्भात अभ्यासकांनी 'भाषा व साहित्य : संशोधन, खंड १' मधील डॉ. वि. भि. कोलते यांचा 'पाठचिकित्सा' हा लेख, डॉ. श्री. रं. कुळकर्णी यांचे 'प्राचीन मराठी हस्तलिखिते : संशोधन व संपादन' हे पुस्तक, डॉ. उषा मा. देशमुख यांच्या 'साहित्य शोधणी' या पुस्तकातील 'पाठसंशोधनशास्त्र' हा लेख व 'मराठी संशोधन पत्रिके'चा वर्ष २५, अंक ३ रा व ४ था [एप्रिल ते सप्टेंबर १९७८] हा अंक अवश्य वाचावा.

**१] हस्तलिखित ग्रंथ : परंपरा व लेखनप्रेरणा**

मुद्रणकला अस्तित्वात येण्यापूर्वी ग्रंथप्रसार हस्तलिखित ग्रंथांच्या आधारे होत असे. एखाद्या ग्रंथाची संहिता सिध्द करण्यासाठी वेगवेगळ्या काळातील वेगवेगळ्या व्यक्तींनी लिहिलेली हस्तलिखिते विचारात घ्यावी लागतात. हस्तलिखित ग्रंथ विशिष्ट परंपरेतून निर्माण झाले. या हस्तलिखितांना विविध प्रेरणा कारण झाल्या.



Scanned with OKEN Scanner

सुमारे पाच हजार वर्षांपूर्वी वैदिकभाषा वेदवाङ्.मयाच्याद्वारे अस्तित्त्वात होती. ही भाषा उच्चारांच्या लाघवीसह वर्तमानकाळात उपलब्ध होऊ शकते. त्याचे कारण वेदांच्या अध्ययनाची विशिष्ट पारंपरिक पध्दती आहे. मौखिक परंपरेने वेदवाङ्.मय चालत आले म्हणून ते अविकृत राहिले असे नाही. वेदांच्या अध्ययनास विशिष्ट शिस्त होती, म्हणून भाषेच्या मूळ स्वरूपास संरक्षण मिळाले. त्याकाळी व्यक्ती आणि संस्था ग्रंथसंग्रह करून ठेवीत असत. ऋषीमुनींच्या आश्रमांतून विद्यार्थ्यांना विद्यादान होत असे. या विद्यादानासाठी उपयुक्त असा ग्रंथसंग्रह केला जात असे. जुन्या ग्रंथांचे नूतनीकरण केले जात असे आणि नवीन ग्रंथांचे लेखन विद्याकुलातून केले जात असे. विद्येची परंपरा टिकविण्यासाठी अशा रीतीने आश्रमांतून किंवा विद्याकुलांतून ग्रंथांची प्रतिलिपी केली जात असे. धार्मिक पंथोपपंथ यांची पूर्वीच्या काळात धर्मपीठे होती. ही पीठे आपापल्या संप्रदायास आणि विचारसरणीस अनुसरून प्रमाणग्रंथावर टीकाभाष्ये लिहून घेत असत. स्वमताचे प्रतिपादन आणि प्रतिपक्षाचे खंडन यांसाठी बराच ग्रंथसंग्रह केला जात असे. अशा रीतीने संप्रदायाच्या प्रसारासाठी देवस्थाने व मठ यांनी मोठ्या प्रमाणात ग्रंथसंग्रह करून ठेवला.

काही राजांना ग्रंथनिर्मिती करण्याचे वेड होते. तंजाऊर येथील सरस्वतीमहाल ग्रंथालय या प्रवृत्तीचे निदर्शक आहे. कलकत्याची रॉय एशियाटिक सोसायटी, मुंबईची एशियाटिक सोसायची आणि मद्रासची ओरियंटल मॅनस्क्रीप्टस् लायब्ररी यांनी संशोधन सामुग्रीचा संग्रह करण्याची फार मोठी कामगिरी केली आहे. पुराणकथनासाठी व श्रवणासाठी एक व्यवसाय म्हणून देखील वैयक्तिक पातळीवर ग्रंथसंग्रह काही लोक त्या काळात करीत असत. ग्रंथलेखनात आनंद मानून काहीजण स्वानंदे लेखन करीत असत. प्रतिलिपी करण्यात त्यांना सार्थकता वाटत असे. संग्रही असलेल्या ग्रंथांचे सत्पात्रीदान करणे काहींना पुण्यप्रद वाटत असे. काही जुन्या प्रतींवर प्रतलेखकांनी प्रतीच्या शेवटी 'यथामूलं लिख्यते, मम दोषो न विद्यते ।' असे जरी लिहून ठेवले आहे, तरी त्याचे पालन योग्य रीतीने झाले आहे असे नाही. हस्तलिखिताच्या समाप्तीलेखात तेलापासून,



जलापासून, सैलबांधणीपासून आणि मूर्खापासून ग्रंथांचा सांभाळ करावा, असे प्रतलेखकांनी लिहून ठेवले आहे. ग्रंथलेखन व ग्रंथसंग्रह करणे हे त्या काळात अतिशय कष्टाचे काम होते आणि म्हणून त्या लेखकांनी पुत्राप्रमाणे ग्रंथाचा सांभाळ करावा अशी अपेक्षादेखील व्यक्त केली आहे. समाप्तीलेखात एखाददुसरा संस्कृत श्लोक आढळतो; कारण संस्कृत भाषेतील आदर्शाचे अनुकरण प्रतलेखकांनी केले. समाप्तीलेख संशोधन सामुग्रीच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे असतात. त्यात प्रतलेखकाच्या नावाचा, स्थळाचा आणि काळाचा उल्लेख असतोच असे नाही. तसा उल्लेख असेल तर संशोधनासाठी त्याचा फार उपयोग होतो. त्याकाळी श्रवणाच्याद्वारे ज्ञानसंग्रह होत असे, म्हणून तत्कालीन ग्रंथ हे सामुदायिक वाचनासाठी असत. काही ग्रंथ सैन्याच्या वाटचालीत होत. वाटचाल करता करता एखाद्या ग्रंथाची प्रत सिध्द होत असे.

निरनिराळ्या जातीजमातीतील नकलाकार ग्रंथाच्या नकला करीत असत. गुरव, कासार, सुतार, सोनार या समाजातील लेखकांनी नकला करून ठेवल्या आहेत. अशा रीतीने हस्तलिखितांच्या मागे एक विशिष्ट परंपरा होती. प्रतलेखनासंबंधी त्यांचे काही विचार होते. ज्या काळात लेखन झाले त्या काळातील भाषेला काही मर्यादा होत्या. प्रतलेखकाची उच्चारपध्दती व त्या त्या काळातील उच्चारविशेष या सर्व बाबींचा विचार केल्यानंतर प्रतलेखकासंबंधी आपल्याला विचार करणे शक्य होऊ शकते.

धर्मपंथाचा अथवा धर्मसंप्रदायाचा प्रसार व्हावा, आपली विचारसरणी शिष्यांच्या समुदायास परिचित असावी व पंथाभिमान्यांना त्या त्या पंथाची भूमिका योग्य रीतीने आकलन करता यावी या हेतूने मान्यता पावलेल्या धार्मिक व सांप्रदायिक ग्रंथांच्या प्रतीचे लेखन झालेले दिसते. धर्म आणि संप्रदाय यांच्या प्रसाराव्यतिरिक्त प्रतलेखक अन्य प्रेरणांचाही उल्लेख करताना आढळतात. परोपकार आणि पुण्यसंपादन ही प्रेरणा काहींच्या लेखनामागे होती. ज्यांना स्वतः प्रत करणे जमले नाही त्यांनी इतरांकडून ग्रंथ लिहून घेतले आहेत, त्यात परोपकाराचीच भावना दिसते. काही प्रतीत प्रत लिहून घेणारा आणि प्रत लिहिणारा यांची नावे आढळतात.



Scanned with OKEN Scanner

काही लेखक व्यावसायिक नव्हते. पुण्याची जोड मिळावी हा हेतूदेखील त्यांचा नव्हता; परंतु स्वतःच्या आनंदासाठी त्यांनी लेखन केले आहे. अशा रीतीने प्रत लेखनात सांप्रदायिक, पुण्यमार्गी, व्यावसायिक आणि अध्ययनासाठी आवश्यक म्हणून काही अभ्यासक प्रतलेखन करीत असत. प्रतलेखकांनी मोठ्या निष्ठेने आणि परिश्रमाने प्राचीन वाङ्‌मयाचा प्रसार केला. त्यांनी ज्ञानप्रसाराचे काम तर केलेच; परंतु तत्कालीन वाङ्‌मय जनत करून ठेवले. त्यांच्या हातून ग्रंथाची नक्कल करताना काही चुका झालेल्या असल्या तरी त्यांनी केलेले कार्य साहित्याच्या संदर्भात दृष्टीआड करता येत नाही.

**२] हस्तलिखित ग्रंथांची लेखनपध्दती**

हस्तलिखितांत अनेक कारणांनी दोष उत्पन्न होतात. काना, मात्रा, वेलांटी, अनुस्वार वगैरे राहून गेल्यामुळे काही दोष निर्माण होतात. तर काही दोष प्रतलेखकाच्या निष्काळजीपणामुळे निर्माण होतात. मूळ प्रतीतील अक्षर नीट लागत नाही म्हणून काही दोष निर्माण होतात. मूळ प्रतीतले दोष तसेच चालू राहतात. ते प्रतलेखक शुध्द करून घेतातच असे नाही. शुध्दलेखनाचे नियम अनेकदा बदलत आलेले आहेत. त्या त्या काळातील शुध्दलेखन त्या त्या प्रतीत वापरलेले दिसून येते. दुसरे असे की, प्रतलेखकाची लेखनपध्दती विशिष्ट प्रकारची असते. त्याच्या अक्षराची वळणे त्याची असतात. ही वळणे ध्यानात येतातच असे नाही.

प्रतलेखन करणे परिश्रमाचे काम तर असेच; परंतु कागद आणि शाई यांसाठीदेखील त्याला बराच खटाटोप करावा लागत असे. कागदाचा पृष्ठभाग सारखा नसे, म्हणून त्यासाठी तुरटीच्या पाण्याचा शिडकावा तारतम्याने देऊन कवड्यांच्या किंवा शंखाच्या साह्याने तो गुळगुळीत करावा लागत असे. कागद ओलसर असतानाच घड्या घालून त्यावर रेघा उमटतील अशी व्यवस्था करावी लागत असे.

विशेष म्हणजे, काही पोथ्यांत एक पान चित्र आणि एक पान आख्यान असे चित्रण आणि लेखन आहे. अनेक हस्तलिखितांत अशी चित्रे आढळून येतात. या चित्रांचाही अभ्यास होणे आवश्यक आहे.



या हस्तलिखित ग्रंथांच्या अंतरंगात शिरण्यासाठी ग्रंथ लावावा लागत असे. 'ग्रंथ लावणे' म्हणजे हस्तलिखित ग्रंथांचे यथार्थ वाचन करणे असा अर्थ आहे. ग्रंथ लावण्याचा प्रारंभ वाचनाने होत असे. काना, मात्रा, जोडाक्षरेच नव्हे, तर एकूणच प्रतलेखकाची लेखनपध्दती लक्षात घेऊन संशोधकाला ग्रंथ लावता आला पाहिजे. शिलालेखांचे वाचन करावे लागते व हस्तलिखिते लावावी लागतात. एकात कोरणे असते, तर दुसऱ्यात लिहिणे असते. संशोधकाला मोडी लिपी, महानुभावीय लिपी यांचे ज्ञान तर पाहिजेच; परंतु त्याने प्रतलेखकाच्या अक्षरवळणाचा बारकाईने अभ्यास करणेही आवश्यक आहे. डॉ. श्री. रं. कुळकर्णी यांनी 'प्राचीन मराठी हस्तलिखिते : संशोधन आणि संपादन' या ग्रंथात 'रसकौमुदी'तील अक्षरांच्या वळणासंबधी पोथ्यातील अक्षरांच्या छायाचित्रांसह जी माहिती दिली आहे ती अभ्यासकांनी अवश्य वाचावी. या संदर्भात त्यांनी लेखन विशेषांची जी साधार चर्चा केली आहे ती महत्त्वपूर्ण आहे. हस्तलिखितात दोष असतात. ते लेखन अशुध्द नसते, ते लावावे लागते. दृष्टिभ्रम, चुकीचे वाचन व निष्काळजीपणा यांमुळे हस्तलिखितांत चुका राहून जातात. ऱ्हस्व, दीर्घ, अनुस्वार, शब्दांची तोडजोड यांमुळे चुका होतात. हस्तलिखितांचे संशोधन ही एक तडजोड आहे. हस्तलिखित वाचता आले, तरी ते लावणे त्याहीपेक्षा महत्त्वाचे आहे.

**३] पाठांतरमीमांसा, पाठनोंदणी आणि पाठचिकित्सा :**

हस्तलिखित ग्रंथांच्या नक़ला होत राहतात. त्यांच्या लेखनात काही बदल होत जातात. प्रतलेखकाच्या हातून काही लेखनप्रमाद घडतात. ग्रंथाची नक्कल केलेली प्रत शुध्द असेलच याची खात्री देता येत नाही. भिन्न काळी व भिन्न प्रतलेखकांनी लिहिलेल्या हस्तलिखितांत पाठभेद दिसून येतात. ओवी किंवा श्लोक यांच्या संख्येत वधघट झालेली आढळते. काही भाग सोडूनही दिलेला आढळतो. या कारणांमुळे मूळ ग्रंथ नक्की कोणता हा संभ्रम पडतो. याचे निराकरण करून शक्य तो मूळ ग्रंथकाराच्या हस्तलिखिताच्या जवळपास असलेली संहिता सिध्द करणे हा हस्तलिखितांच्या संपादनाचा हेतू असतो. पाठचिकित्सा आणि पाठनिर्णय ही



Scanned with OKEN Scanner

संहितासंपादनाची दोन महत्त्वाची अंगे आहेत.

**पाठांतरमीमांसा**

मौखिक परंपरेने चालत आलेल्या वैदिक संहितांचा शब्द, वर्ण व उच्चार कायम ठेवण्यावर कटाक्ष असे. अशा वाड्.मयात आढळून येणारे भिन्न पाठ परंपरेच्या भिन्नतेतून आलेले आहेत. कालिदासाच्या ग्रंथांतील काही पाठांची चर्चा टीकाभाष्यकारांनी केली आहे. मेघदुताच्या १ ल्या श्लोकात 'आषाढस्य प्रथम दिवसे' या पदांना 'आषाढस्य प्रशम दिवसे' असा पर्यायी पाठ भाष्यकार देतात. टीकाभाष्यात यावर चर्चाही होत असे. महानुभावांच्या साहित्यात पाठांतरासंबंधी चर्चा आढळते. महानुभावेतर साहित्यात पाठांतराविषयी चर्चा आढळत नाही. महानुभाव पंथात पाठांच्या शुध्दाशुध्दाचा विवेक प्रारंभापासून होता. 'लीळाचरित्रा'तील लीळांचे संकलन एका विशिष्ट प्रकारे केले. काही ग्रंथ नाहीसे झाले. घोकलेल्या लीळा लक्षात घेऊन लीळाचरित्राचे लेखन केले. या लेखनात पाठांतरे होती. त्यांची सोय त्यांनी नव्या संकलनात 'वासना' या नावाने केली. महानुभाव पंथातील 'वासना' म्हणजे पाठभेदच आहेत. परशरामबासाने सर्व चरित्रग्रंथांच्या भिन्न पाठांचे संकलन करून चरित्रग्रंथाची संहिता सिध्द केली तो पिढीपाठ. या पाठात वासनांतरे [पाठांतरे] नोंदविली आहेत. एकापरीने परशरामबासाने चरित्रग्रंथाची 'संपादित संहिता' सिध्द केली, असे म्हणावयास हरकत नाही. शके १२३१ पासून संहितासंपादनाची पध्दती महानुभाव पंथात होती, असे यावरून दिसून येते. महानुभाव संशोधकांनी पाठभेदांची नोंद केली आहे. तशीच प्रक्षेपांचीदेखील नोंद इतिहास प्रकरणात केली आहे. पाठभेद का निर्माण होतात, याचीही चर्चा या प्रकरणात आहे.

महानुभावपंथीयांनी काव्यग्रंथांवर टीपग्रंथ लिहिले. त्यांत त्यांनी मूळ काव्याचा व्यावहारिक व सांप्रदायिक अर्थ स्पष्ट केला आहे. टीकाकारांनी आपल्या काळात रूढ असलेल्या पाठांतराचादेखील परामर्श घेतला आहे. १४ व्या शतकापासून १६ व्या शतकापर्यंत हे टीपकार होऊन गेले.

एकाच हस्तलिखिताच्या आधाराने संहितासंपादन करावयाचे असते. अशा ग्रंथाच्या बाबतीत संपादकाची जबाबदारी मोठी असते. लेखनदोष,



चुकीचे पाठ, न लागणारे संदर्भ, गहाळ झालेला भाग, फाटलेला कागद, कसरीने भक्षण केलेली संहिता, न लागणारे शब्द इत्यादीसंबंधी संपादकाने प्रास्ताविकातून किंवा तळटीपांतून माहिती देणे आवश्यक असते. संहिता संपादनासाठी एकापेक्षा अधिक प्रती मिळाल्या तरच प्रक्षेप, अवक्षेप व अपपाठ शोधता येतात. पाठांतरे पुढील कारणांमुळे होतात :

१] काही वर्णांच्या लेखनात बरेच साम्य असते. नकलकाराने [नकलनवीस] काळजीपूर्वक वाचन केले नाही, तर लेखनसाम्य असलेले वर्ण प्रतलेखनात परस्परांच्या जागी येतात व पाठभेद निर्माण होतात. प, म, भ त्याचप्रमाणे ध, घ यांच्यांत बरेच साम्य असल्यामुळे पाठभेद निर्माण होतात.

२] प्रतलेखन करणाराला पुष्कळदा मूळ प्रतीतील अक्षर नीट लागत नाही त्यामुळे पाठांतर निर्माण होते.

३] दुर्बोध शब्द आढळला तर नकलनवीस स्वतःच्या पदरचा शब्द त्याठिकाणी घालतो. तो शब्द अनुरूप असतोच असे नाही.

४] प्रतलेखक पुष्कळदा पदरच्या ओव्या लिहून ठेवतो. त्यामुळेही पाठांतरे निर्माण होतात.

५] नकलकार अलीकडच्या काळातील असेल तर त्याच्या लेखनात संस्कृत शब्दांचे प्रमाण जास्त असते. 'पसाय' जागी 'प्रसाद', 'पाच' जागी 'पाद', 'वाकुडै' ऐवजी 'व्यंकटी' असे होते.

६] पुष्कळदा भाषेचे आधुनिकीकरण पाठान्तराला कारण होते. उदा. बइल [बैल], तइसा [तैसा] इ.

प्रतलेखकाच्या तोंडी असलेली व त्याच्या काळात रूढ असलेली भाषा नकळत प्रतलेखनात शिरते. पाठभेद आणि लेखनदोष यांमध्ये तारतम्य बाळगले पाहिजे. लेखनदोषांची गणना पाठभेदात करण्याचे कारण नसते. हस्तलिखित ग्रंथांत तीन दोष प्रामुख्याने दिसतात; ते म्हणजे अपपाठ, प्रक्षेप आणि अवक्षेप.

**पाठनोंदणी**

संहितासंपादनात पाठनोंदणी हा एक घटक असतो. या घटकाच्या नियमनामुळे संहिता निश्चित होते. पाठनोंदणी करण्यासाठी प्रथम मूळप्रत



Scanned with OKEN Scanner

म्हणून गृहित धरलेल्या हस्तलिखितातील ओवी घ्यावी लागते आणि कालानुक्रमाने लावलेल्या इतर हस्तलिखितांतील त्या ओवीत असणारी पाठांतरे खाली नोंदवावी लागतात. हस्तलिखितांची छाननी करून कोणती हस्तलिखिते संहिता निश्चित करण्यासाठी उपयोगात आणावयाची याचा निर्णय संपादकाने घ्यावयाचा असतो. संहितांची निश्चिती केल्यानंतर पाठांतरांची नोंद करावी लागते. ही नोंदणी सुलभ होण्यासाठी तक्ता तयार करावा लागतो. पाठनोंदणीसाठी प्रत्येक ओवीसाठी एक स्वतंत्र कागद घ्यावा लागतो. प्रथम मूळ प्रतीत असलेल्या ओव्या लिहून घ्याव्या लागतात. तक्त्याच्या शेवटी संपादित पाठ पाठचिकित्सा झाल्यानंतर भरावयाचा असतो.

पाठनोंदणी झाल्यावर पुढे प्रत्येक पाठास असलेल्या पर्यायी पाठांची चिकित्सा करून योग्य पाठाची निवड करावी लागते. संहितासिध्दीसाठी पाठनिर्णयाला महत्त्व असते. पाठनिर्णय योग्य रीतीने व्हावा म्हणून संशोधकाला पूर्व तयारीसाठी पुढील गोष्टींची गरज असते :

१] संशोधकाला प्राचीन मराठी वाङ्.मयाचा इतिहास माहीत पाहिजे.

२] भिन्नभिन्न काळांतील मराठी भाषेच्या स्वरूपांची त्याला माहिती असली पाहिजे.

३] प्राचीन मराठी वाङ्.मयातील शब्दसंपत्तीचे त्याला ज्ञान हवे.

४] संहिता संपादण्यासाठी घेतलेल्या ग्रंथकाराचे इतर साहित्यदेखील माहीत पाहिजे.

५] ग्रंथकाराचा काळ आणि त्या काळातील सामाजिक व राजकीय घडामोडी यांचे सखोल ज्ञान अभ्यासकाला पाहिजे.

पाठचिकित्सा करण्यासाठी भरपूर तयारी असावी लागते. संहितेत अनेक अपपाठ असतात. त्यासाठी पाठचर्चा व पाठनिर्णय यांना महत्त्व असते. संपादनाच्या या नव्या पध्दतीला पुनःस्थापन पध्दती असे म्हणतात. पारंपरिक पध्दतीत पाठभेदांची केवळ नोंद तळटीपातून होत असते. तळटीपांत आलेल्या चांगल्या पाठांवर संपादक टिपणे लिहू शकतो. संपादकांच्या पाठनिर्णयाच्या क्षमतेवर संपादित संहितेचे यशापयश



अवलंबून असते. नव्या संपादनपध्दतीत पाठनिर्णयाला खूप महत्त्व आहे. पाठासंबंधी निर्णय घेताना संपादकाला अनेक व्यवधाने सांभाळावी लागतात. पाठचिकित्साशास्त्र गहन असते; त्यामुळे त्यासंबंधी काही सरधोपट नियम सांगणे कठीण असते; कारण प्रत्येक हस्तलिखितात नवे प्रश्न उपस्थित होण्याची शक्यता असते.

पाठचिकित्सा करताना पाठ अर्थवाहक असला पाहिजे. तो पाठ संदर्भयुक्त असला पाहिजे. मूळ ग्रंथकाराच्या तत्त्वज्ञानाशी तो पाठ जुळणारा पाहिजे. संशोधकाला शास्त्रीय परिभाषा माहीत असणे आवश्यक असते. ज्या ग्रंथकाराची संहिता असेल त्याच्या शैलीचा परिचय संशोधकाला असला पाहिजे. योग्य पाठाची निवड करण्यासाठी संपादकाची दृष्टी चौफेर पाहिजे. संहितासिध्दीचे मूळ उद्दिष्ट ग्रंथकाराच्या मूळ प्रतीस जवळची संहिता सिध्द करणे हे असते.

**पाठचिकित्सा**

पाठचिकित्सेचे मुख्य कार्य संहितेचे मूलस्थापन हे असते. संहिता संपूर्ण ग्रंथाची, त्यातील काही भागाची, वाक्याची किंवा शब्दाचीही असू शकते. वर्षानुवर्षे हस्तलिखितांच्या नकला होत असत. त्या मुळाबरहुकूम असतातच असे नाही आणि त्यामुळे पाठभेद निर्माण होत असत. प्रत्येक नकलकार आपल्या प्रतीत दोष नकलतोच, पण तो स्वतःच्या चुकाही करून ठेवतो, यामुळे पाठचिकित्सेचा प्रश्न कठीण होऊन बसतो. हस्तलिखित समोर ठेवून नकलकार नक्कल करीत असे. काहीवेळा एकजण हस्तलिखित वाचत असे व दुसरा ते ऐकून लिहून घेत असे. नकलकाराला 'नकलनवीस' असेही म्हणतात. नकलकाराकडून जे दोष होत त्याचे दोन भाग करता येतात. [१] अबुध्दिपुरस्सर दोष, [२] बुध्दिपुरस्सर दोष.

अबुध्दिपुरस्सर दोष निष्काळजीपणामुळे किंवा अजाणता होत असत. अक्षरभ्रंश, पदभ्रंश आणि मात्राबिंदुहीनत्त्व हे त्याचे प्रामुख्याने तीन भाग करता येतात.

**अक्षरभ्रंश** : नक्कल करणारा अनवधानाने एखादे अक्षर गाळतो किंवा एखादे अक्षर चुकून पुनः लिहितो, तेव्हा अक्षरभ्रंशाचा दोष होतो. सारख्या



Scanned with OKEN Scanner

वर्णांची अक्षरे असली तर अनवधानाने एकाऐवजी दुसरे अक्षर लिहिले जाते. उदा. ट–ठ. वर्णविपर्याचा दोष हाही अक्षरभ्रंश असतो. उदा. 'प्रणामे' ऐवजी 'प्रमाणे.' 'रसे' ऐवजी 'सरे.' दृष्टीदोषामुळे, नजरचुकीमुळे किंवा अनवधानाने अक्षरभ्रंश होतात. ते संहितासंपादनाच्यावेळी संपादकाने दुरुस्त करून घ्यायला पाहिजेत. पुष्कळदा दोन अक्षरांच्या उच्चारसाम्यामुळे अक्षरभ्रंशाचे दोष निर्माण होतात, उदा. ण–न किंवा ष–श. अ आणि आ या स्वरांच्या उच्चारामुळेही अनेकदा बदल होतो. उदा. 'अगाध, 'आगाध' किंवा 'आगम–अगम'. मात्राहीनत्त्व व बिंदुरहितत्त्व हेही दोष अनवधानाने राहून जातात.

**पदभ्रंश** : नक्कल करताना अनवधानाने जशी अक्षरे गळतात किंवा एकाऐवजी दुसरी अक्षरे लिहिली जातात; तसेच शब्द आणि वाक्ये गळतात किंवा चुकीची लिहिली जातात. त्यामुळे पदभ्रंश होतो.

**वाक्यभ्रंश** : कधीकधी संपूर्ण वाक्य किंवा वाक्ये आणि ओव्यांचे चरण किंवा एखादी संपूर्ण ओवी किंवा अनेक ओव्या गळतात, तेव्हा वाक्यभ्रंश होतो.

नक्कल करणारा पुष्कळदा बुध्दिपुरस्सर दोष निर्माण करीत असे. ''नकलकार अडाणी व कमी शिकलेला असेल तर त्याने तयार केलेली प्रत पाठचिकित्सेच्या दृष्टीने उपयोगी असते'', असे प्रियोळकरांनी जे म्हटले आहे ते योग्य आहे; कारण अडाणी माणसाने केलेल्या चुका सहज लक्षात येतात. परंतु सुशिक्षित माणूस बेमालूम बदल करून टाकतो. त्यामुळे अस्सल पाठ कोणता आणि नकली पाठ कोणता हे लक्षात येत नाही. नकलकार मूळ प्रतीत चुकीची दुरुस्ती करतो, त्यामुळेही नवीन पाठ निर्माण होतात. जुना पाठ दुर्बोध असेल तर तो बदलवून त्याऐवजी नवीन पाठ निर्माण करतो. नकलकाराकडून बुध्दिपुरस्सर निर्माण होणाऱ्या दोषात प्रक्षेप, अवक्षेप व स्थानांतरण यांचा समावेश होतो. नकलकार काही ओव्या स्वतः रचून घालतो तेव्हा प्रक्षेप होतो. अशा भागास प्रक्षिप्त असे म्हणतात. नकल करताना अक्षरे, शब्द, वाक्य, ओव्या किंवा एखादा भाग वगळला जातो तेव्हा अवक्षेप होतो. पूर्वी शब्द तोडून लिहीत नसत, जोडून लिहीत. त्या चरणातील शब्दांचा योग्य पदच्छेद करून संहितासंपादन करावे लागते.



चुकीच्या पदच्छेदामुळे अनर्थकारक पाठ निर्माण होतात.

हस्तलिखिते गोळा करणे हे पाठचिकित्सकाचे कार्य असते. नकलान्तरांमुळे पाठांतरे निर्माण होतात. पाठचिकित्सकाला विरुध्द दिशेने कार्य करावे लागते. अपपाठाचा मागोवा घेतघेत त्याला ग्रंथकाराच्या मूळ संहितेपर्यंत जावे लागते व पाठ निश्चित करावा लागतो. हस्तलिखिताची माहिती पाठचिकित्सकाने स्वतंत्रपणे टिपून ठेवणे आवश्यक असते. हस्तलिखित कोठून मिळाले, कोणाच्या मार्फत मिळाले, त्याचा क्रमांक, त्याची एकूण पाने, त्याची लांबीरुंदी वगैरे संबंधीची माहिती त्यात हवी. त्यानंतर पाठनोंदणी केली पाहिजे.

ज्ञातृनिष्ठ (Subjective) आणि ज्ञेयनिष्ठ (Objective) अशा पाठचिकित्सेच्या दोन पध्दती आहेत. राजवाड्यांना ज्ञातृनिष्ठ पध्दतीपेक्षा ज्ञेयनिष्ठ पध्दती मान्य होती. आधुनिक संशोधकांना ज्ञातृनिष्ठ पध्दती अधिक योग्य वाटते. या दोन्ही पध्दतींत गुणदोष आहेत.

पाठचिकित्सेसाठी पुढील काही बाह्य प्रमाणे असतात : [१] मूळग्रंथ जर संस्कृत ग्रंथाचे रूपांतर किंवा त्यावरील टीका असेल तर तो संस्कृत ग्रंथ पाठचिकित्सेचे महत्त्वाचे प्रमाण होऊ शकतो. [२] जुन्या काळातील टीका टिप्पण्यांचा उपयोगही होऊ शकतो. [३] संबंधित ग्रंथातील उतारे अन्य ग्रंथात घेतलेले असतात किंवा त्यांचे भाषांतर केलेले असते. बाह्यप्रमाणे म्हणून त्यांचा पाठचिकित्सेसाठी उपयोग होतो. [४] ग्रंथकाराने इतर जे ग्रंथ लिहिलेले असतात त्यांचाही उपयोग करून घेता येतो.

पाठचिकित्साशास्त्र ही एक कला आहे. पाठचिकित्सकाने कठीण पाठ, जुना पाठ, खरा पाठ [बरा नव्हे] व भाषिक कसोटीच्या साह्याने अर्थसंगतीस अनुकूल असलेला पाठ निवडावा.

**४] संपादनपध्दती**

कोणत्याही हस्तलिखितात अपपाठ, प्रक्षेप आणि अवक्षेप हे तीन दोष उत्पन्न होत असतात. एकच प्रत उपलब्ध असेल तर संहिता सिध्द करता येत नाही. ज्यावेळी अनेक हस्तलिखिते उपलब्ध असतात, त्यावेळी ग्रंथाची संहिता चिकित्सकरीतीने सिध्द करावी लागते. यासाठी संपादकाची



Scanned with OKEN Scanner

निर्णयबुध्दी महत्त्वाची असते. संपादकाच्या साक्षेपावर संहितासिध्दीचे यशापयश अवलंबून नसते. संहितासंपादन हे शास्त्र आहे. विज्ञानशास्त्राप्रमाणे ते निश्चित व अपरिवर्तनीय नाही. भाषाशास्त्रीय अभ्यासाच्या वाढत्या कक्षांबरोबरच हस्तलिखिताचे संपादनही काटेकोरपणे होत नाही.

संहिता संपादनाच्या पध्दतीत अ. का. प्रियोळकर यांनी संपादिलेल्या 'दमयंती स्वयंवरा'च्या संहितेने एक नवे पर्व सुरू केले. पाठचिकित्साशास्त्राच्या आधुनिक पध्दतीनुसार संहितासिध्दीची प्रक्रिया पुढीलप्रमाणे होत असते :

१] एका ग्रंथाची अनेक हस्तलिखिते गोळा करून, त्यांची वर्गवारी करून, त्या हस्तलिखितांचे परस्परसंबंध लक्षात घेऊन हस्तलिखितांचा वंशवृक्ष तयार करावयाचा.

२] विश्वसनीय मूळ प्रत म्हणून निवडून तिच्या साह्याने पाठभेदांची नोंद करणे.

३] पाठनोंदणी, पाठचिकित्सा व पाठनिश्चिती या क्रमाने जाऊन पाठभेद तळटीपातून देणे.

४] भाषा, संदर्भ व मूळ लेखकाची शैली यांचा विचार करणे.

५] पाठांतरातून योग्य पाठाची निवड करणे. श्री. ना. बनहट्टी यांनी संपादिलेली 'ज्ञानदेवी' [अ. १, ७ व १२] ही आदर्श संहिता ठरते.

प्राचीन साहित्याचे संशोधन दोन पध्दतीनी झालेले दिसून येते. [१] पारंपरिक पध्दती [२] पुनःस्थापन पध्दती. पहिल्या पध्दतीनुसार संहिता सिध्द करण्यास फारसा खटाटोप करावा लागत नाही. जास्तीत जास्त हस्तलिखिते गोळा करावयाची व विश्वसनीय वाटणारी प्रत निवडावयाची. त्यानंतर ग्रंथाची संहिता या प्रतीप्रमाणे मुद्रित होते. इतर हस्तलिखितांतून येणारे पाठभेद तळटीपेत नोंदविले जातात. मूळ ग्रंथाचा काळ कोणताही असो संपादकाने निश्चित केलेली मूळ प्रत ज्या काळातील असेल त्याच काळातील भाषा संपादित संहितेत ठाण मांडून बसते. अशा प्रती भाषेच्या अभ्यासास फारशा उपयुक्त नसतात.



दुसरी पध्दती संपादनाचा आदर्श मानली जाते. हस्तलिखिताच्याद्वारे उपलब्ध होणाऱ्या सामग्रीतून मूळ ग्रंथकाराच्या प्रतीजवळ पोचू शकणारी संहिता सिध्द करणे हे संहितासंपादनाच्या पुनःस्थापन पध्दतीचे उद्दिष्ट असते. या पध्दतीत हाती आलेल्या हस्तलिखितांतून विश्वसनीय मूळप्रत निवडावयाची असते. पाठभेदांची नोंदणी मूळ प्रतीच्या आधारे करण्यात येते. पाठभेद नसतील तर मूळभाग संहितेत कायम ठेवण्यात येतो. इतर प्रतीत असलेली पाठांतरे केवळ तळटीपेत न नोंदविता मूळ प्रतीतील पाठांना असलेले पर्यायी पाठ अभ्यासून त्यांची चिकित्सा या पध्दतीत करावयाची असते. चिकित्सापूर्वक निवडलेला पाठ मूळ प्रतीत असो नसो तो संपादित प्रतीत समाविष्ट करण्यात येतो. बाकीचे पाठ तळटीपांतून नोंदविण्यात येतात. या पध्दतीप्रमाणे तयार झालेल्या संहितेस पुनःस्थापित संहिता असे म्हणतात. या पध्दतीत पाठचिकित्सा व पाठनिर्णय यांना महत्त्व असते. हस्तलिखितांचे वर्गीकरण आणि मूळ प्रतीची निवड, हस्तलिखितांच्या परस्परसंबंधांतून निश्चित होणारा वंशवृक्ष, पाठांतरांची नोंदणी, पाठचिकित्सा आणि पाठनोंदणी व प्रक्षेपावक्षेपांच्या निर्णयासह संहितेचे पुनःस्थापन या पाच अंगांनी या पध्दतीतील प्रक्रिया होत असते.

प्रक्षेप, अवक्षेप, तळटीपा आणि शब्दकोश यांच्या संदर्भात पुढे थोडक्यात माहिती करून घेऊ.

**प्रक्षेप :** काही शब्द, काही चरण, काही ओव्या किंवा काही भाग नकलकार जेव्हा नक्कल करताना आपल्या हस्तलिखितात नव्याने घालतो तेव्हा प्रक्षेप निर्माण होतो. स्वमतप्रसार किंवा मुळातील आदर्श प्रतीतील भाग अस्पष्ट असल्यामुळे न लागणे यांमुळे प्रक्षेप निर्माण होतो. नकलकार बहुश्रुत असेल तर मोठ्या प्रमाणात प्रक्षेप निर्माण होतात. मूळ ग्रंथाविषयी प्रतलेखकाच्या मनात काही समजुती पक्क्या झालेल्या असतात. नक्कल करताना तो भाग आढळला नाही तर नकलकार तो भाग त्यात नव्याने घालतो. प्रतिपादन अस्पष्ट वाटले तर नकलकार काही भाग प्रक्षिप्त करतो. नकल करताना काहींना स्फूर्ती येते व त्यातूनही प्रक्षेप निर्माण होतो. यालाच डॉ. श्री. रं. कुळकर्णी 'वाहत्या गंगेत हात धुण्याचे पुण्य नकलकार जोडतो' असे



Scanned with OKEN Scanner

म्हणतात. शब्दयोजना, ओवीची घडण, वर्णनातील विसंगती यांमुळे प्रक्षेप ओळखता येतो. पडताळा घेण्यासाठी इतर हस्तलिखितांच्या त्याच भागात त्याच ओव्या आल्या आहेत किंवा नाही हे तपासून पहावे. आख्यानपर काव्यात आडकथा येतात. त्या वगळून मूळ कथाभागात उणेपणा येत असेल तर प्रक्षेप ओळखता येतो. स्थलवर्णन, युध्दवर्णन, सौंदर्यवर्णन, प्रसंगवर्णन इत्यादी ठिकाणी प्रक्षेपाला वाव असतो. अशा वेळी इतर हस्तलिखिते ताडून पहावीत. ग्रंथकाराची शैली लक्षात घेऊनही प्रक्षिप्त भाग ओळखता येतो.

**अवक्षेप :** नजरचुकीने, अनवधानाने, निष्काळजीपणामुळे किंवा आदर्श प्रतीतील अक्षरे, शब्द, वाक्ये, ओव्या किंवा एखादा लहान भाग गळतो, तेव्हा अवक्षेप निर्माण होतो. हे अबुध्दिपुरस्सर अवक्षेप होत.

स्वमताभिमान, आटोपशीरपणाची दृष्टी, अश्लिलपरिहार यांमुळे अवक्षेप निर्माण होतात. शुध्द पाठाचे मूळस्थापन, प्रक्षेपांचे निराकरण आणि अवक्षेपांचे निर्मूलन या प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्रतिशुध्द संहिता सिध्द होते. संहितेचे संपादन करताना अवक्षेप शोधणे हे एक महत्त्वाचे काम असते.

**तळटीपा :** संपादनात तळटीपांचा सहभाग महत्त्वाचा असतो. तळटीपा विद्वत्तेच्या प्रदर्शनासाठी नसतात, तर संहितेचे सर्वांगीण आकलन होण्यासाठी असतात. संपादित संहितेतील पाठांना असलेले पर्यायीपाठ व संपादनास आधारभूत असलेल्या निरनिराळ्या हस्तलिखितांसंबंधीचे आवश्यक तपशील या गोष्टीची नोंद तळटीपांत असते. तळटीपांचे लेखन विशिष्ट पध्दतीने होत असते. डॉ. कोलते यांनी भास्करभट्ट बोरीकरांच्या शिशुपावधाची संपादित केलेली आवृत्ती या संदर्भात बघावी किंवा श्री. ना. बनहट्टी यांनी ज्ञानेश्वरीच्या काही अध्यायांचे संपादन केले आहे, ते संपादित अध्यायही बघावेत.

तळटीपांतून निरनिराळ्या पाठांची माहिती तर मिळतेच; परंतु महत्त्वाची भाषिक सामग्रीही त्यामुळे एकत्रित होत असते. भाषेच्या कालिक खुणा व भाषेचे आधुनिकीकरण यांचे दर्शन त्यांतून होते. त्यामुळे



भाषिक परिवर्तनाची कल्पना येऊ शकते. डॉ. कोलते यांनी 'शिशुपालवध', 'ज्ञानप्रबोध', 'वछाहरण' इत्यादी ग्रंथांचे जे संपादन केले आहे, ते या दृष्टीने लक्षात घेण्याजोगे आहे. विविध हस्तलिखिते मिळवून त्यांनी संपादन केले आहे. एका विशिष्ट पाठाच्या निमित्ताने भिन्न काळांतील पाठ एकत्र येतात व त्यामुळे भाषिक परिवर्तन कळू शकते. पाठांतरे कशी होतात याचीही कल्पना येते.

तळटीपांत पाठांतराव्यतिरिक्त काही गोष्टींचा समावेश करावा लागतो. प्रक्षेप, अवक्षेप, दुर्बोध भागावर स्पष्टिकरणात्मक टीपा, पोथी कसरीने खाल्लेली असल्यास त्या संदर्भात नोंद, व पाठभेदांच्या नोंदीत ज्या बाबींचा समावेश होत नाही, अशा हस्तलिखितांशी संबंधित असलेल्या सर्व बाबींचा अंतर्भाव तळटीपांतून करण्यात येतो. परंतु संहिता संपादनाचे काम येथेच संपत नाही, तर संपादकाला संपादित आवृत्तीला प्रास्ताविक जोडावे लागते. त्यात संहितेच्या माध्यमातून घडणारे सामाजिक व सांस्कृतिक दर्शन आणि साहित्याच्या इतिहासात संपादित संहितेचे स्थान यांचाही विचार करावा लागतो.

**शब्दकोश आणि स्पष्टीकरणात्मक टीपा :** संहितासंपादनात शब्दकोश व स्पष्टीकरणात्मक टीपा यांनाही खूप महत्त्व असते. शब्दकोश आणि स्पष्टीकरणात्मक टीपा हे परस्परावलंबी असतात. काही ठिकाणी केवळ शब्दार्थ देऊन भागते. काही ठिकाणी केवळ शब्दार्थ देऊन भागत नाही. अर्थवलये स्पष्ट करावी लागतात. अशा वेळी स्पष्टीकरणात्मक टीपांची गरज असते. शब्दकोशात कोणते शब्द घ्यायचे व कोणत्या स्थळांची स्पष्टीकरणात्मक टीपांसाठी निवड करावयाची हे संपादकाने ठरविले पाहिजे.

शब्दकोश तयार करताना दिलेला शब्दार्थ संहितेच्या संदर्भात बसतो किंवा नाही याकडे लक्ष द्यावे लागते. शब्दाच्या अर्थाशी सामाजिक व सांस्कृतिक संकेत असतील तर त्यांचाही उलगडा केला पाहिजे.

संहितेत काही स्थळे अशी असतात की, त्यावर स्पष्टीकरणात्मक टीपा देणे आवश्यक असते. साहित्यसौंदर्याच्या दृष्टीने संहितेचे परीक्षण



Scanned with OKEN Scanner

प्रस्तावनेत जरी द्यावे लागते, तरी त्याचा उल्लेख स्पष्टीकरणात्मक टीपांतूनही केला पाहिजे. सांस्कृतिक परंपरा, संप्रदायाची भूमिका, स्थल, काल इत्यादीचे सर्वांगीण परीक्षण स्पष्टीकरणात्मक टीपांत असावे लागते. शब्दकोश व स्पष्टीकरणात्मक टीपा यांत न बसणारी माहिती संहिता समजून घेण्यासाठी आवश्यक असते, म्हणून अशी माहिती परिशिष्टातून द्यावी.

**५] संहितासंपादनाची फलश्रुती**

संहितेचे पुनःस्थापन, स्पष्टीकरणात्मक टीपा, शब्दकोश वगैरे सिध्द झाल्यावर संहितेचे स्वरूप, विवेचन आणि सर्वांगीण परीक्षण करणारी प्रस्तावना लिहावी लागते.

संहितासिध्दीचा दृष्टीकोण प्रस्तावनेत व्यक्त होतो. ग्रंथकार, त्याची ग्रंथनिर्मितीमागील प्रेरणा, कालपरिस्थितीशी संहितेचा असलेला संबंध, संहितेतील साहित्याचा आकृतिबंध, समाजजीवनाशी असलेला ग्रंथाचा संबंध इत्यादि गोष्टींचे विवेचन प्रस्तावनेत अपेक्षित असते.

प्रस्तावनेच्या पहिल्या भागात संशोधनाची सामग्री आणि त्या सामग्रीचा संहितासंपादनासाठी कसा उपयोग केला, यासंबंधीची माहिती दिली जाते. दुसऱ्या भागात संहितेचा आशय, आकृतिबंध, कालपरिस्थितीशी असलेला संहितेचा अनुबंध हे विषय येतात.

प्रस्तावनेत संहितेच्या भाषेसंबंधी देखील विवेचन अपेक्षित असते. सर्वांगपरिपूर्ण प्रस्तावना, पाठनिर्णय, पाठनिश्चिती, स्पष्टीकरणात्मक टीपा, शब्दार्थ वगैरे संहितासंपादनासाठी ज्या गोष्टींची गरज असते, अशा गोष्टींचा अवलंब जेव्हा संशोधक करतो, तेव्हा त्याचे संपादन महत्त्वपूर्ण होते. त्यासाठी विवेचक दृष्टी आणि परिश्रमांची गरज असते. असे संशोधन म्हणजे एक प्रकारचा ध्यास असतो. संशोधन दर्जेदार होण्यासाठी कोणकोणत्या गोष्टींची गरज असते याचा संशोधकाने आधी अभ्यास करणे आवश्यक असते. प्राचीन साहित्यात त्याची वृत्ती रमणारी असावी लागते. त्या काळातील भाषावाचनाची त्याला सवय असावी लागते. संहितासंपादनातील सर्व अंगोपांगांचा विचार करून, संहितासंपादन करणे



हे एक शास्त्र असले, तरी ती एक कलाही आहे, याची जाणीव संशोधकाने ठेवली पाहिजे.

✧ ✧



Scanned with OKEN Scanner

# ६ : मराठीतील काही संशोधक

मराठीत आतापर्यंत अनेक संशोधकांनी विविध प्रकारचे संशोधन करून संशोधनाचे दालन समृध्द केले आहे. पूर्वीच्या संशोधकांनी तर केवळ संशोधनालाच वाहून घेतले होते. त्यांचा पिंडच संशोधनाला अनुरूप असा होता. केवळ पदवीसाठी या संशोधकांनी संशोधन न करता मराठीच्या समृध्दीसाठी, मराठीच्या सखोल अध्ययनासाठी संशोधन केले. संशोधनाच्या वेडाने पछाडलेली अशी एक पिढी होती. त्यांचे संशोधन शास्त्रशुध्द नसेल; तरीपण त्यात संशोधनाचा भाग अधिक होता. त्यांनी संशोधनाची एक विशिष्ट दिशा दाखवून मराठी संशोधनाची अनेक कवाडे उघडी केली. संशोधनाचे काही प्रकार सांगितले जात असले व त्याच्या पध्दतींविषयी चर्चा केली जात असली, तरी मराठीत काही संशोधकांनी जे संशोधन केले त्यामुळे संशोधनाची व्याप्ती किती असू शकते, याची कल्पना येऊ शकते. काहींनी तर संशोधन म्हणून कार्य हाती घेतले नसले, तरी त्यांचे लेखन म्हणजे एक प्रकारचे संशोधनच आहे. किंबहुना, संशोधनाला नवे परिमाण प्राप्त करून देणारे आहे. मराठीतील काही संशोधकांच्या संशोधनविषयक कार्याचा आढावा या ठिकाणी घेतला आहे. त्यामुळे संशोधन क्षेत्रातील विविधता तर लक्षात येऊ शकेलच; परंतु या संशोधकांनी अथक प्रयत्न करून, साधन सामग्री जमवून, जे संशोधन केले ते किती महत्त्वपूर्ण होते, याचीही कल्पना येऊ शकेल.



**१] वि. का. राजवाडे [विश्वनाथ काशीनाथ राजवाडे] १८६४–१९२६**

राजवाड्यांनी इतिहासाच्या, समाजशास्त्राच्या आणि भाषाशास्त्राच्या प्रांतात महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. १८९४ मध्ये त्यांनी 'भाषांतर' मासिक सुरू केले. यात ॲरिस्टॉटल, बर्क, प्लूटार्क, मिल यांचे ग्रंथ मराठीत भाषांतरून आणले.

१८९७ ते १९१८ पर्यंत मराठ्यांच्या इतिहासाची साधने त्यांनी शोधली. अस्सल ऐतिहासिक पत्रांचे संशोधन त्यांनी केले. 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' या नावाने त्यांनी २१ खंड प्रसिध्द केले. यांची साडेपाच हजार पृष्ठे असून त्यात ४४१७ ऐतिहासिक पत्रे आहेत. मराठ्यांचा इतिहास लिहिण्यासाठी विश्वसनीय ऐतिहासिक साधने राजवाड्यांनी उपलब्ध करून दिली. इतिहाससंशोधनातील हा अभूतपूर्व असा उपक्रम होता. शेकडो पत्रे त्यांनी संशोधून आणि संपादून मराठ्यांच्या इतिहासाला अधिकृत अशी साधने उपलब्ध करून दिली. प्रत्येक खंडाला त्यांनी विवेचक आणि विचारप्रवर्तक अशी प्रस्तावना लिहिली आहे. पहिल्या खंडाला १२७ पृष्ठांची प्रस्तावना आहे. अनेक इतिहासकारांना ही प्रस्तावना उपयुक्त ठरली आहे.

सहावा आणि आठवा खंड यांना त्यांनी ज्या प्रस्तावना लिहिल्या आहेत त्या प्रस्तावना म्हणजे ऐतिहासिक प्रबंध आहेत. प्रा. द. वा. पोतदार यांनी त्यांच्या सहाव्या खंडातील प्रस्तावनेची स्तुती केली आहे. तात्त्विक विवेचन आणि मूलगामी विचार यांनी युक्त अशी ही प्रस्तावना आहे. शास्त्रीय पध्दतीने इतिहास कसा लिहावा, यासंबंधीचे विवेचनही त्यांच्या प्रस्तावनेत आहे.

'राधामाधवविलासचंपू' व 'महिकावतीची बखर' या दोन ग्रंथांचे त्यांनी संशोधन आणि संपादन केले. या दोन्ही ग्रंथांना त्यांच्या ज्या प्रस्तावना आहेत त्या पांडित्यपूर्ण आहेत.

राजवाड्यांचे भाषाशास्त्रविषयक आणि व्याकरणविषयक लिखाणही भरपूर असून ते विद्वत्तापूर्ण आणि मूलगामी स्वरूपाचे आहे. या संदर्भात त्यांचे पुढील लेखन महत्त्वपूर्ण आहे.

१] बीड पटांगण येथील मठातून मिळविलेल्या ज्ञानेश्वरीच्या मुकुंदराजी

प्रतीला लिहिलेली प्रदीर्घ प्रस्तावना.

२] ज्ञानेश्वरीतील मराठी भाषेचे व्याकरण.

३] गुणवृध्दी.

४] संस्कृत भाषेचा उलगडा.

५] मराठी धातुकोश

६] नामादिशब्दव्युत्पत्ती कोश इ.

भाषाशास्त्रविषयक आणि व्याकरणविषयक राजवाड्यांचे कर्तृत्त्व गौरवास्पद होते. राजवाड्यांनी आणखी एक महत्त्वपूर्ण कामगिरी केली आहे. महानुभावीय वाङ्मय गुप्त सांकेतिक लिपींच्या कड्याकुलुपात बंद होते. राजवाड्यांनी पहिल्यांदा त्या सांकेतिक लिपीचा उलगडा करून मराठी संशोधकाला हे दालन उघडे करून दिले. राजवाड्यांनी समाजशास्त्रीय स्वरूपाचे अनेक लेख लिहिले आहेत. श्री समर्थ रामदास यांच्यासंबंधी त्यांनी त्याकाळी व्यक्त केलेले विचार रामदासी संशोधकांना प्रेरक ठरले. 'कांदबरी' या निबंधात त्यांनी मराठी कादंबरीचे ऐतिहासिक आणि तात्त्विक दृष्टींनी विवेचन केले आहे. अशा रीतीने राजवाड्यांनी त्या काळात जे संशोधनविषयक कार्य केले ते निश्चित महत्त्वपूर्ण असे होते.

**२] डॉ. श्री. व्यं. केतकर [१८८४ ते १९३७]**

केतकरांना चालता–बोलता ज्ञानकोश असे म्हणत असत. समाजशास्त्रविषयक लेखन आणि 'महाराष्ट्रीय ज्ञानकोश' हे त्यांचे महत्त्वपूर्ण कार्य आहे. डॉ. केतकरांनी महाराष्ट्राला समाजशास्त्रीय दृष्टी दिली. महाराष्ट्रीय ज्ञानकोशाची निर्मिती हे त्यांचे महनीय कार्य आहे. एकूण तेवीस विभाग आणि तीन खंड यांत विभागलेला हा कोश आहे. पाच विभागांचा पहिला प्रस्तावना खंड आहे. या खंडावरून त्यांची मर्मग्राही दृष्टी प्रत्ययास येते. भारतीय संस्कृतीची वैशिष्ट्ये त्यांनी यात पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे. मौलिक अशा समाजशास्त्रीय भूमिकेवर त्यांच्या प्रस्तावना खंडाला खूप महत्त्व प्राप्त झाले आहे.

१९३५ साली 'प्राचीन महाराष्ट्र' हा ग्रंथ त्यांनी हाती घेतला. दुर्दैवाने हा ग्रंथ अपुरा राहिला. कुरुयुध्दापासून शातवाहन काळापर्यंतचा



जवळजवळ पंधराशे वर्षांचा काळ त्यांनी या ग्रंथात विवेचनासाठी घेतला आहे. 'महाराष्ट्र' या नावाच्या उपपत्तीचाही त्यांनी विचार केला आहे. 'महाराष्ट्रीयांचे काव्यपरीक्षण' हा छोटासा ग्रंथ असला तरी त्यावरून डॉक्टरांच्या मौलिक विवेचनशक्तीची साक्ष पटते. महाराष्ट्रीय संत कवींच्या काव्यात काव्यपरीक्षणविषयक नवी मूल्ये शोधण्याचा प्रयत्न केतकरांनी प्रथम केला. केतकरांनी समाजसापेक्षित भूमिकेवरून काव्याचा विचार केला. त्यांची समाजशास्त्रीय जीवनदृष्टी त्यांच्या कादंबऱ्यांतूनही प्रकट झाली आहे. 'भारतीय समाजशास्त्र' या ग्रंथात त्यांच्या समाजशास्त्रीच विचाराचे परिणत स्वरूप प्रकट झाले आहे. अशारीतीने समाजशास्त्रीय विचारसरणीची दृष्टी डॉ. केतकरांनी महाराष्ट्राला आपल्या लेखनाद्वारे दिली.

**३] प्रा. अ. का. प्रियोळकर [१८९५ ते १९७३]**

प्रियोळकरांना 'दमयंती स्वयंवर' या काव्याच्या संपादनामुळे खूप प्रसिध्दी मिळाली. प्राचीन मराठी काव्याच्या संपादनाचा एक उत्तम नमुना म्हणून या पुस्तकाकडे पाहिले जाते. अतिशय बारकाईने या काव्याचा शोध घेतला आहे. शास्त्रोक्त आणि उपलब्ध साधनांच्या साह्याने तयार केलेला हा ग्रंथ प्रियोळकरांच्या व्यासंगाचे आणि संशोधनवृत्तीचे द्योतक आहे. या ग्रंथाच्या दुसऱ्या आवृत्तीला त्यांनी जी प्रस्तावना लिहिलेली आहे, ती संशोधनात्मक आणि विद्वत्तापूर्ण आहे. या काव्याचा कर्ता रघुनाथ पंडित हाच आहे, हे प्रियोळकरांनी साधार पटवून दिले आहे. हे पटवून देण्यासाठी प्रियोळकरांनी कित्येक साधनांचा आधार घेतला आहे. रघुनाथ पंडिताने 'दमयंती स्वयंवर' काव्य लिहिले, त्यावेळी त्याच्यासमोर महाकाव्याचा आदर्श होता. रघुनाथ पंडिताने हे काव्य लिहिताना कोणकोणत्या ग्रंथांचा आधार घेतला आहे, याची चर्चा प्रियोळकर करतात.

या ग्रंथाच्या भाषेचे आणि वर्णनशैलीचे विस्तृत विवेचन प्रियोळकरांनी केले आहे. या ग्रंथात दोनशे चोपन्न पद्ये आहेत. त्यांतील वृत्तांविषयी व अलंकारांविषयी प्रियोळकरांनी परिशिष्टात जी माहिती दिली आहे, ती उपयुक्त अशी आहे. या ग्रंथात प्रक्षिप्त भाग कोणता याचीही चर्चा केली

आहे. विस्तृत टिपांनी युक्त हा ग्रंथ संहितासंपादनाचा एक आदर्श आहे.

प्रियोळकरांनी अनेक पुस्तके संपादित करून आपले संपादनकौशल्य सिध्द केले आहे. संपादित केलेले काही ग्रंथ पुढीलप्रमाणे :

१] मुक्तेश्वरकृत महाभारत – आदिपर्व खंड १ ते ४

२] महाराष्ट्र भाषेचे व्याकरण

३] नवनीत

४] प्रोफेसर केरुनाना छत्रे यांची टिपणवही

५] यदुमणीकृत गणेशपुराण

६] कविवर्य मोरोपंतांचे समग्र ग्रंथ. खंड १ ते १२

७] मराठी संशोधन खंड १ व २

८] श्री. मंगेशकवीकृत शिवदर्पण इ.

प्रियोळकरांनी याशिवाय अनेक ग्रंथ लिहिले आहेत. त्यांतील काही महत्त्वाचे ग्रंथ पुढीलप्रमाणे :

१] गोमंतकाची सरस्वती

२] मराठी व्याकरणाची कूळकथा

३] रावबहादूर दादोबा पांडुरंग : आत्मचरित्र आणि चरित्र

४] पिताजी तोमसस्टिफन्सकृत ख्रिस्तपुराण

५] श्री मुक्तेश्वराचा शोध

६] सांतु आंतोनिची अचर्चा

७] सांतु आंतोनिची जिवित्त्वकथा

८] फ्रेंच कवीने लिहिलेले मराठी पुराण

९] मुसलमानांची जुनी मराठी कविता

१०] डॉ. भाऊ दाजी : व्यक्ती, काल व कर्तृत्त्व

११] गोविंद नारायण माडगावकर

'प्रिय आणि अप्रिय' या पुस्तकात त्यांचे सोळा लेख आहेत. त्यांतील 'आपली नावे आणि आडनावे', 'कानडाविठ्ठल', 'संशोधनाचे संशोधन' वगैरे लेख संशोधनात्मक स्वरूपाचे आहेत. प्रियोळकर संशोधनप्रवृत्तीला धर्मप्रवृत्ती मानतात. ही प्रवृत्ती कधीच लोप होणार नाही, असे ते म्हणतात.



ही प्रवृत्ती शुध्द राखली पाहिजे असे ते प्रतिपादन करतात.[1] 'संशोधनात सिध्दान्त स्थापन करण्यात चूक होणे कमीपणाचे नसून अप्रामाणिकपणे एखादा सिध्दान्त स्थापन करू पाहणे हे लाजिरवाणे आहे', असे प्रियोळकर म्हणतात.

**४] डॉ. वि. भि. कोलते आणि अन्य वैदर्भीय संशोधक**

महानुभाव संशोधन हा विदर्भाचा एक विशेष आहे. हा पंथ विदर्भात अधिक प्रसार पावला. विदर्भातील संशोधकांनी या पंथातील वाङ्‌मयाचे मोठ्या प्रमाणात संशोधन केले आहे. य. खु. देशपांडे, वा. ना. देशपांडे, ह. ना. नेने, डॉ. वि. भि. कोलते, डॉ. सुरेश डोळके यांचा उल्लेख या संदर्भात करावा लागेल.

डॉ. कोलते यांचे महानुभाव संशोधन कार्य सर्वश्रुत आहे. महानुभाव साहित्यसंशोधन आणि महानुभाव ग्रंथसंपादन हे दोन प्रमुख प्रवाह त्यांच्या संशोधनाचे दिसतात. पाठचिकित्सात्मक संशोधन हे त्यांच्या संपादनाचे वैशिष्ट्य आहे. 'महानुभाव तत्त्वज्ञान', 'महानुभावांचा आचारधर्म', 'श्री चक्रधर चरित्र', 'श्री चक्रधर शेवटचे प्रकरण', 'महानुभाव संशोधन भाग १६२', 'प्राचीन मराठी साहित्यसंशोधन', 'संतोका सामाजिक कार्य', 'चक्रधर आणि ज्ञानदेव' हे ग्रंथ मूलतः महानुभाव संप्रदाय, त्याचे तत्त्वज्ञान, त्यातील पंचकृष्ण संकल्पना यांसंबंधीचे आहेत. साती ग्रंथांतील 'ऋध्दीपूरवर्णन' हे काव्य वगळता इतर सर्वच्या सर्व सहा काव्यांची संपादने त्यांनी केली आहेत. पाठचिकित्सा शास्त्राचा एक वस्तुपाठ डॉ. कोलत्यांनी संशोधकांना दिला आहे. ताम्रपट आणि शिलालेख यांचे संशोधन करून लिपीचे वाचन कसे करावे याचाही आदर्श त्यांनी घालून दिला आहे.

डॉ. कोलत्यांनी प्राचीन भारतीय इतिहासाच्या संशोधनातही भरीव कार्य केले आहे. मौर्यकालापासून देवगिरी यादवांच्या कालापर्यंतच्या दीड हजार वर्षांच्या काळातील इतिहासावर त्यांनी जो प्रकाश पाडला त्यामुळे प्राचीन इतिहासाच्या ज्ञानात खूप भर पडली आहे. सातवाहन काळ, वाकाटक काळ, चालुक्य काळ, राष्ट्रकूट काळ यांवर भाऊसाहेबांनी केलेले संशोधन महत्त्वपूर्ण आहे.



Scanned with OKEN Scanner

डॉ. कोलते यांनी एकूण ११ महानुभाव ग्रंथांची संपादने केली आहेत. पोथ्यांची विश्वसनीयता पारखून त्यांनी संपादन केले आहे. पोथीवरील सांस्कृतिक, भौगोलिक, प्रादेशिक परिणामांचाही विचार त्यांनी केला आहे. पोथीचे बाह्यांग व अंतरंग लक्षात घेऊन डॉ. कोलते संपादन करतात. पोथीची लांबीरुंदी, पृष्ठसंख्या, एकूण स्वरूप, सामासिक लेख, मंगलाचरण, एकूण ओळी, ओळीतील अक्षरे, अक्षरांचे वळण, भाषेच्या लकबी, शब्दप्रयोग अशा कितीतरी गोष्टी लक्षात घेऊन डॉ. कोलत्यांनी संपादन केले आहे. ''डॉ. कोलते यांनी संपादिलेल्या 'लीळाचरित्र' आणि 'पंचोपाख्यान' या गद्य ग्रंथांनी तर संपादनशास्त्राच्या प्रगतीचे परमोच्च शिखर गाठले आहे. या दोन्ही ग्रंथांच्या संपादनविशेषांचा अभ्यास स्वतंत्र लेखास आवाहन करणारा आहे. त्यामुळे मराठी प्राचीन ग्रंथांच्या संपादनशास्त्रात एक नवे युग निर्माण करणारे हे ग्रंथ आहेत'', असे डॉ. श्री. रं. कुळकर्णी यांनी जे म्हटले आहे ते अगदी सत्य आहे. [संशोधनाची क्षितिजे – संपा. डॉ. भास्कर भोळे, अमेय, नागपूर, प. आ. १९८५, पृ. २९०]

**डॉ. य. खु. देशपांडे** यांनी मार्कंड, उनकेश्वर, जैनद, नंदगाव येथील शिलालेख प्रसिध्द केले आहेत. 'वत्सगुल्ममहात्म्य' या ग्रंथाची छापील शंभर पानांची प्रस्तावना उल्लेखनीय आहे. अलीकडे त्यांनी खेरला येथील शिलालेखाचे वाचन केले. डॉ. देशपांडे यांचा 'महानुभावीय मराठी वाङ्‌मय' हा ग्रंथ महत्त्वाचा आहे. यात त्यांनी महानुभावांची धर्ममते आणि त्यांचे ग्रंथ यांविषयी केलेली चर्चा मूलगामी अशी आहे. यादवकालीन शिलालेखांचे संशोधनही त्यांनी केले आहे. 'श्री चक्रपाणी चरित्र' व 'ऋध्दिपूरवर्णन' हे महत्त्वपूर्ण ग्रंथ डॉ. देशपांड्यांनी संपादित केले आहेत. 'यक्षदेववृध्दान्वय', 'महानुभावांचे चरित्रग्रंथ' इ. निबंधही डॉ. देशपांडे यांनी प्रसिध्द केले आहेत.

**ह. ना. नेने** यांनी 'लीळाचरित्र', 'सूत्रपाठ', 'दृष्टांतपाठ' हे ग्रंथ संपादित केले आहेत. **वा. ना. देशपांडे** यांनी 'महदंबेचे धवळे' व 'स्मृतिस्थळ' या दोन ग्रंथांचे संपादन केले आहे. स्मृतिस्थळाचे संपादन



करताना त्या ग्रंथाला त्यांनी विस्तृत प्रस्तावना लिहिली आहे. पाठभेद, टीपा, शब्दकोश, परिशिष्टे यांनी युक्त असे हे संपादित पुस्तक साक्षेपी संशोधकाचे आहे, हे सहज लक्षात येते. 'विमर्शिनी' या त्यांच्या ग्रंथात त्यांची समीक्षात्मक व संशोधनात्मक वृत्ती प्रकट झाली आहे.

**५] डॉ. शं. गो. तुळपुळे**

'पाच संतकवी', 'प्राचीन मराठीतील कोरीव लेख', 'महानुभाव पंथ व त्याचे वाङ्‌मय', 'मराठी ग्रंथनिर्मितीची वाटचाल', 'महाराष्ट्र सारस्वत पुरवणी', 'मराठी वाङ्‌मयाचा इतिहास खंड १ [संपादन व लेखन]' इ. अनेक ग्रंथांचे लेखन त्यांनी केले आहे. डॉ. तुळपुळ्यांनी इंग्रजीतून प्राचीन मराठी वाङ्‌मयाचा इतिहास प्रसिध्द केला आहे. अनेक शोधनिबंध वेळोवेळी प्रसिध्द करून, अनेक ग्रंथांचे त्यांनी संपादन केले आहे. 'मराठी संतसाहित्य', 'महानुभाव वाङ्‌मय' व 'प्राचीन कोरीव लेख' यांचे व्यासंगी अभ्यासक म्हणून तुळपुळ्यांची ख्याती आहे. पश्चिम जर्मनीतील हायडेल बर्ग विद्यापीठात इतिहास व धर्म या विभागात अभ्यागत प्राध्यापक म्हणून ते जात असत. बॉन [प. जर्मनी] येथे १९८२ साली झालेल्या भारतीय वाङ्‌मयविषयक परिषदेत त्यांनी महत्त्वपूर्ण निबंध वाचला. लीळाचरित्राच्या पाच खंडांचे त्यांनी साक्षेपी संपादन केले. कोरीव लेखांचा अभ्यास हे डॉ. तुळपुळ्यांचे एक महत्त्वपूर्ण संशोधनकार्य आहे. कोरीव लेखांची प्राप्तिस्थळे, त्यांचे खरेखोटेपण, त्यांचे ठसे घेणे, त्यांचे वाचन, त्यांची लेखनपध्दती, त्यांची कालनिश्चिती यांविषयी त्यांनी केलेली चर्चा कोरीवलेखाच्या संशोधकास उपयुक्त अशी आहे. त्या क्षेत्रातील त्यांचा अभ्यास कौतुकास्पद असा आहे.

**६] दुर्गा भागवत**

दुर्गा भागवतांनी विविध प्रकारचे विपुल लेखन केले आहे. संशोधनात्मक लेखन हा त्यांच्या लेखनाचा एक पैलू कसा आहे, हे दाखविण्याचा या ठिकाणी प्रयत्न आहे. दुर्गा भागवतांच्या संशोधनात पुढीलप्रमाणे विविधता आहे :

१] शास्त्रीय पध्दतीने केलेले संशोधन



Scanned with OKEN Scanner

२] खंडनमंडनात्मक लेखन
३] लेखकाचा अभ्यास
४] लोकसाहित्यविषयक संशोधन
५] तौलनिक अभ्यास
६] सर्वेक्षण पध्दती
७] साहित्यप्रकारनिष्ठ संशोधन
८] भाषांतरविषयक कार्य

संशोधन हे एक शास्त्र आहे, याची जाणीव ठेऊन संशोधनात त्यांनी शास्त्रीय पध्दतीचा अवलंब केला आहे. त्यांच्या संशोधनात सुसूत्रता आहे. [१] शंका [२] शंकेचे स्वरूप [३] शंकेचे निरसन कसे करता येईल याचा अंदाज [४] गृहितकल्पना निश्चित करणे. [५] निष्कर्ष काढणे या पाच पायऱ्यांच्याद्वारे त्या संशोधन करतात.

संकलन, पृथक्करण, मीमांसा आणि निष्कर्ष यांचा कटाक्षाने अवलंब केल्यामुळे त्यांचे संशोधन साक्षेपी व पध्दतशीर असे झाले आहे.

**शास्त्रीय पध्दतीचा अवलंब :** 'सत्यं, शिवं, सुंदरम्' ही उक्ती कशी आली याचा शोध त्यांनी घेतला आहे. त्यासाठी शास्त्रीय पध्दतीचा अवलंब त्यांनी केला आहे. त्यांनी या लेखनाला 'आढावा' असे म्हटले आहे; परंतु तो शोध आहे. संशोधन आहे.

वरील वचन भारतीयच नव्हे, तर फार प्राचीन असे औपनिषधिक अगर पुराणातले वचन आहे, अशी बहुतेकांची धारणा आहे; परंतु प्रा. श्री. म. माटे यांनी १९४०–४२ च्या सुमारास 'रोहिणी' मासिकात 'सत्यं, शिवं, सुंदरम्' हा लेख प्रसिध्द केला. त्यास त्यांनी म्हटले आहे, 'हे वचन अभारतीय असून हे इंग्रजीवरून आपण उचलले आहे.'

ही प्रेरणा घेऊन १९४२ ते १९७८ पर्यंत या संदर्भात भागवतांनी माहिती गोळा केली. १९७८ मध्ये पुणे विद्यापीठात या विषयावर त्यांनी व्याख्याने दिली. "The Trué, the Beautiful and the Good." हा Victor Cousions [व्हिक्तोर कुझँ ऊर्फ व्हिक्टर कझिन्स] या फ्रेंच लेखकाचा मूळ लेख आहे. 'वाइट' (G. W. Wight) यांनी त्याचा इंग्रजी



अनुवाद केला. तो अनुवाद भागवतांच्या वाचनात आला.

कुणा बंगाली माणसाने भागवतांना सांगितले की ही उक्ती फ्रेंच उक्तीवरून बनलेली आहे. त्यानंतर त्या बंगालीही शिकल्या.

कुझँची उक्ती भारतात कुणी आणली हा प्रश्न होता. ही उक्ती ज्योतिरिन्द्र नाथांनी आणि देवेन्द्रनाथांनी व्हिक्तोर कुझँ यांच्या तत्त्वज्ञानात्मक वाङ्मयातून घेतली व लोकप्रिय केली. पूर्वी शान्तिनिकेतनचे हे ब्रीदवाक्य होते, ही माहिती भागवतांना मिळाली. पुढे बडोद्याच्या महाराजा सयाजीराव गायकवाड विद्यापीठाने हे आपले ब्रीदवाक्य ठेवले. भारतीय दूरदर्शनचे ते बोधवाक्य आहे. विचार, कर्तेपण व भावना वाटणे ह्या तीन मानवी क्षमतांचा उल्लेख यात आहे असे भागवत म्हणतात. ही उक्ती मुळात विदेशी विचारवंताची आहे. भारतीयं विचार, स्वभाव व समजूत यांच्याशी या वाणीचे मिळतेजुळते आहे, त्यामुळे आपणास ती भारतीय वाटते. हा शोध घेण्यासाठी भागवतांनी घेतलेले परिश्रम, हे त्यांच्यातील संशोधकाने घेतलेले परिश्रम आहेत, असे कुणीही म्हणेल.

**रामकृष्णाचे कोडे : खंडन मंडन :** 'रिडल्स ऑफ राम ॲन्ड कृष्ण' या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लेखाचा अनुवाद 'लोकसत्ता'त प्रसिध्द झाला. त्या संदर्भात या पुस्तकात भागवतांनी केलेला उहापोह वैशिष्ट्यपूर्ण आहे. रामकृष्ण यांना देव का मानावे, या प्रश्नाच्या संदर्भात यात केलेले खंडनमंडन चिकित्सक स्वरूपाचे आहे. 'दशरथ जातका'मध्ये राम व सीता ही भावंडे दाखविली आहेत. ती गोष्ट डॉ. आंबेडकर उचलतात व राम व्यभिचारी होता, असे सांगतात. भागवत म्हणतात, 'डॉ. आंबेडकरांना अंबट्ठसुत्तातले बुध्दाचे उद्गार आठवायला हवे होते.' क्षत्रिय, ब्राह्मण, वैश्य, शूद्र अशी वर्णश्रेणी मानणारा गौतम बुध्द अंबट्ठ ब्राह्मणाला म्हणतो, 'आम्ही क्षत्रिय वंशाचे शुध्दत्त्व राहण्यासाठी बहिणीशी लग्न करतो.' रामाबद्दल बोलताना 'वाल्मीकी रामायण' हा ग्रंथ आधारभूत हवा, असे भागवत प्रतिपादितात.

वालीवर बाण मारणारा राम भेकड होता, हा एक आरोप



Scanned with OKEN Scanner

डॉ. आंबेडकरांनी केला आहे. त्याचे खंडन करताना त्या म्हणतात, ''वाली हा मल्लयुध्द, गदायुध्द करीत असे. राम धनुष्य बाण वापरीत असे. दुरून मारागिरी करण्याची शस्त्रे कशी वापरावीत याचे एक शास्त्र आहे, ती वापरताना आडोसा घ्यावाच लागतो.''

'शंबुक कोळ्याचे पारिपत्य म्हणजे वरच्या वर्गाचा खालच्या वर्गावर अत्याचार', असे आंबेडकरांनी म्हटले आहे; परंतु त्यासाठी रामायणकालीन समजुती लक्षात घेणे आवश्यक आहे. त्यासाठी २० व्या शतकातील समजुती गैरलागू आहेत, असे भागवत म्हणतात.

सीतेला समाजाने मानाने वागविले नसते, असे सांगून सीतात्यागाचे समर्थन भागवत करतात. राम हे एक कल्पनाचित्र आहे. रामायण हे रामाचे चरित्र आहे; आत्मचरित्र नव्हे, म्हणून रामाला फटके मारण्यात अर्थ नाही असे ठामपणे भागवत म्हणतात. खंडनमंडनाचा एक आदर्श या लेखनात पहावयास मिळतो.

**लेखकाचा अभ्यास :** राजारामशास्त्री भागवत यांचे निवडक साहित्य सहा भागांतून भागवतांनी प्रसिध्द केले आहे. त्यांतील सहावा प्रस्तावना खंड महत्त्वाचा आहे. निबंधकार, समाजसुधारक, विध्वंसक रुढीचा नाश करणारे, भविष्यकाळाची नाडी ओळखणारे राजारामशास्त्री होते, हे भागवत सिध्द करतात व त्यांचे या संदर्भात जे लेखन आहे त्याचा परामर्श घेतात.

जीवनकथा, आठवणी, सामाजिक मते, धर्मविषयक मते, वाङ्.मय सेवा, इतिहासविषयक लेखन इत्यादी प्रकरणांतून भागवतांच्या लेखनाचे मूल्यमापन करून, शेवटी निबंधकारांत त्यांचे कोणते स्थान आहे, याचा शोध त्यांनी घेतला आहे. एका लेखकाचा अभ्यास कसा करावा, याचे हा ग्रंथ म्हणजे मूर्तिमंत उदाहरण आहे.

**लोकसाहित्य :** लोकसाहित्याचा अभ्यास भागवतांनी मोठ्या प्रमाणात केला आहे. 'लोकसाहित्याची रूपरेखा' हा त्यांचा ग्रंथ महत्त्वाचा आहे. त्याला जी प्रस्तावना आहे तिच्यात भारतीय लोकसाहित्याचा परिचय करून दिला आहे. भारतीय लोकसाहित्याचा पाया, भारतीय



लोकसाहित्याचे वर्गीकरण, लोकसाहित्याच्या अभ्यासकास इशारा, लोकसाहित्याचे जागतिक अभ्यासक्षेत्र, भारतीय परंपरेची ओळख, पारंपरिक वाङ्.मयाचे संग्राहक, दैवतकथा, परीकथा, दंतकथा, कल्पित कथा, उखाणे, वाक्‌संप्रदाय, म्हणी, लोकसाहित्यातील विनोद, लालित्य इ. प्रकरणे महत्त्वाची आहेत. त्या पाठीमागे सखोल अभ्यास दिसून येतो.

'समाजशिक्षणमाले'त भागवतांचा 'आम्ही आदिवासी' हा लेख आहे. तो आदिवासींची माहिती देणारा आहे. 'धर्म आणि लोकसाहित्य' या पुस्तकात 'हादग्याची किंवा भोंडल्याची गाणी' हे एक प्रकरण आहे. ही चाल कशी आली, तिचा अन्वयार्थ त्या लावतात. या पुस्तकात 'डोहाळे' हे प्रकरणही महत्त्वाचे आहे. लोकसाहित्याचे विवेचन, विशेषतः लोकगीतांचे मूलगामी विवेचन त्या करतात.

'कथासरित्सागर' हे भाषांतर ह. न. भावे यांचे आहे. पुस्तकाला प्रस्तावना, टिप्पणी व परिशिष्टे ही दुर्गा भागवतांची आहेत. यांतून लोकसाहित्याचा अभ्यास कसा करावा, यासंबंधीचे विवेचन त्यांनी केले आहे. यांतील संकलन व विवेचन महत्त्वाचे आहे. यांतील कल्पनाबंधाची केलेली चर्चा तर फारच महत्त्वाची आहे.

**तौलनिक अभ्यास :** भागवतांच्या 'डूब' या पुस्तकात 'डूब' या नावाचा एक लेख आहे. त्यात दोन कलाकृतींची तुलना आहे. रवींद्रनाथ आणि बंकिमचंद्र यांची एकाच विषयावरची जुगलबंदी करण्याचा प्रयत्न या लेखात आहे. वेळ संध्याकाळची. सरता पावसाळा. कोळ्यांचे गाणे. अशावेळी काव्य न स्फुरले तरच नवल. रवींद्रनाथ टागोर मोठे साहित्यिक होते. बंकीमचंद्रही मोठेच होते; परंतु रवींद्रनाथ काठावर होते, तर बंकीमचंद्र अक्षरशः अस्तित्त्व हरवून बसले होते. 'दुर्गा हे नाव घ्यावे नि या गंगेत कायमचे झोपून जावे' असे बंकीमचंद्र म्हणतात. गंगेत झोपावे हा आशय महत्त्वाचा. या अनुभवात डूब आहे. अनन्यसाधारण कलानुभवाचा साक्षात्कार कसा आहे, हे भागवत स्पष्ट करून दाखवतात.

**सर्वेक्षण पध्दती :** आदिजन, गिरीजन यांच्यांत हिंडून त्यांनी साहित्य संकलित केले. १९३५ साली त्यांनी पीएच. डी. साठी नोंदणी केली होती.



Scanned with OKEN Scanner

डॉ. घुर्ये त्यांचे गाईड होते. 'सिंथेसिस ऑफ हिंदू अँड ट्रायबल कल्चर्स ऑफ सेंट्रल प्राव्हिन्सिस ऑफ इंडिया' हा त्यांचा विषय होता. त्यासाठी ४ वर्षे त्या आदिवासी भागात फिरल्या. सबंध मध्यप्रदेश त्यांनी पायी तुडवला. या जमातीच्या चालीरीती, रिवाज, धर्म, सण, भाषा, प्रचलित कथा, कहाण्या यांचे संकलन त्यांनी केले. परंतु गाईड व भागवत यांच्यात वाद झाल्यामुळे त्यांनी प्रबंध सादर केला नाही.

'वैदिक संस्कृतीच्या आधीपासून जी भारतीय संस्कृती होती ती सर्वत्र अविभाज्य होती', असा आपल्या पाहणीतून त्यांनी निष्कर्ष काढला आहे.

**साहित्यप्रकारनिष्ठ संशोधन :** 'केतकरी कादंबरी' हा त्यांचा ग्रंथ केतकरांच्या कादंबऱ्यांची नव्या दृष्टीकोनातून समीक्षा करणारा आहे. या ग्रंथाची प्रबंधसदृश्य प्रकरणे असून एकूण सर्वच ग्रंथांची मांडणी साहित्य प्रकारनिष्ठ संशोधनात समाविष्ट होणारी आहे.

**भांषातरविषयक कार्य :** सिध्दार्थ जातकच्या ७ खंडांची त्यांनी बंगाली व हिंदीतही भाषांतरे केली आहेत. भाषांतरविषयक कार्य हे संशोधनात मोडणारे असते. या सातही खंडांत शेकडो टीपा आहेत. अनेक ग्रंथांचे संदर्भ तर खूपच आहेत. खंड २ मध्ये पृ. १२७ वर बॉवेर हस्तलिखिताचा उल्लेख आहे. ही टीप मिळविण्यासाठी भागवतांनी दोनशे ग्रंथ उपसले. खंड ७ ला ते 'निवेदन' आहे, त्यात त्यांनी याचा उल्लेख केला आहे.

ऑगस्ट डर्लेथ याचे 'काँकॉर्डचा क्रांतिकारक' हे चरित्र एक कुशल चरित्र आहे. हे चरित्र काव्यमय चरित्र आहे. त्याचे भाषांतर भागवतांनी केले आहे. मूळ शैली कायम ठेवून भाषांतराचे कसब त्यांनी दाखविले आहे.

भागवतांचे एकांगी संशोधन नाही, तर ते बहुविध स्वरूपाचे आहे. त्यांच्या संशोधनाला विशिष्ट शिस्त आहे. त्यात चिकित्सक दृष्टीकोण आहे. खंडनमंडन करण्याची कला त्यांना साधली आहे. लोकसंस्कृतीबद्दलचा जिव्हाळा असल्यामुळे लोकसाहित्याच्या संशोधनात त्या विशेष रमतात. आपले लेखन संशोधनात्मक नाही, असे प्रास्ताविकात वगैरे त्या म्हणतात; परंतु त्यांच्या लेखनाचा बारकाईने शोध घेतला तर उपरोक्त त्यांचे लेखन नक्कीच संशोधनात्मक स्वरूपाचे आहे, असे कुणीही जाणकार



म्हटल्याशिवाय राहणार नाही.

**७] डॉ. रा. चिं. ढेरे**

सध्याच्या काळातील आघाडीचे संशोधक म्हणून ढेऱ्यांना प्रसिध्दी मिळाली आहे. साहित्याचे संशोधन तर त्यांनी केले आहेच; परंतु मूर्तिविज्ञान, लोकसाहित्य, लोकसंस्कृती, धर्म आणि संप्रदाय हे विषयही त्यांच्या संशोधनात येतात. 'विविधा', 'गंगाजळी', 'शोधशिल्प' इ. ग्रंथांतून त्यांचे प्राचीन मराठी साहित्यावरील संशोधनपर लेख प्रसिध्द झाले आहेत. प्राचीन ग्रंथांचे नव्या दृष्टीकोणातून त्यांनी संशोधन आणि संपादन केले आहे. धर्मसंप्रदायाचा इतिहास त्यांनी दिला आहे. देवताविज्ञानविषयक ग्रंथलेखनही त्यांनी केले आहे.

'लज्जागौरी', 'खंडोबा', 'संतसाहित्य व लोकसाहित्य', 'चक्रपाणी', 'श्री विठ्ठल : एक महासमन्वय' हे त्यांचे ग्रंथ महत्त्वपूर्ण आहेत. मध्ययुगीन भारतीय संस्कृती आणि साहित्य यांचे परस्परात जे धागे गुंफले गेले आहेत त्यांचा निरनिराळ्या अंगांनी शोध घेण्याचा प्रयत्न करून, त्यांनी प्राचीन साहित्याकडे पाहण्याची एक वेगळी दृष्टी अभ्यासकांना दिली.

'चक्रपाणी' हा ग्रंथ विसोबा खेचरांच्या 'षट्स्थळ' या प्रकरणावर आधारित आहे. महानुभाव पंथातील अवतारी पुरुषांची त्यांनी दाखविलेली नाथ परंपरा ही पंथीयांच्या दृष्टीने टीकास्पद गोष्ट ठरली. चांगदेव आणि मुक्ताबाईविषयक त्यांनी जे विचार मांडले तेही वादाला कारण झाले. श्रीविठ्ठलविषयक संशोधनाने त्यांनी संशोधनाचे एक व्यापकक्षेत्र अभ्यासकांसमोर ठेवले. एका वीरगळाचे, वीरभद्राचे रूपांतर श्रीविठ्ठलात कसे होत गेले याचा शोध त्यांनी घेतला आहे. महाराष्ट्राच्या महान दैवताचे स्वरूप उलगडण्याच्या निमित्ताने संपूर्ण दक्षिण भारतातील गोपजनीय संस्कृतीचे महत्त्व स्पष्ट करणारी मीमांसा त्यांनी 'श्री विठ्ठल एक महासमन्वय' मध्ये केली आहे. लोकतत्त्वीय दृष्टीने केलेले संपादन आणि मातृदेवतेच्या स्वरूपाचा आणि उपासनापंरपरेचा त्यांनी शोध घेण्याचा जो प्रयत्न केला आहे, तो स्पृहणीय आणि नावीन्यपूर्ण असाच आहे.



Scanned with OKEN Scanner

**८] डॉ. श्री. रं. कुळकर्णी [१९१६] :** 'नाथांचा भागवतधर्म' हा डॉ. कुळकर्णी यांचा महत्त्वपूर्ण प्रबंध प्रसिध्द झाला आहे. 'प्राचीन मराठी गद्य : प्रेरणा आणि परंपरा' हा त्यांचा अभ्यासपूर्ण ग्रंथही मान्यता पावला आहे. 'रसकौमुदी' हा आयुर्वेद शास्त्रावरील मराठीतील पहिला ग्रंथ डॉ. कुळकर्णी यांनी संपादित केला आहे. संगीत शास्त्रावरील मराठीतील पहिला ग्रंथ 'संगीतदर्पण' या नावाने त्यांनी संपादित केला आहे. 'तेलंगणातील अरे मराठा' हा भाषा आणि संस्कृतीच्या संदर्भातील महत्त्वाचा ग्रंथदेखील त्यांनी प्रसिध्द केला आहे. प्राचीन मराठीतील अनेक महत्त्वाच्या हस्तलिखितांचे संपादन त्यांनी केले आहे. भारतीय संस्कृतीच्या संदर्भात मराठी वाङ्.मयाचे व सांस्कृतिक जीवनाचे परिशीलन करणे हा त्यांच्या संशोधनाचा महत्त्वाचा भाग आहे. भक्तिसाहित्याची वेदकाळापासूनची परंपरा भारतातील वेगवेगळ्या भाषांत कसकशी विकसित होत गेली याचे तौलनिक व समग्र आकलन त्यांच्या एकनाथांवरील प्रबंधात दिसून येते. भारतीय साहित्यावर असलेली नाथपंथाच्या प्रभावाची चिकित्सक पाहणी त्यांनी केली आहे. पाठचिकित्साशास्त्र आणि हस्तलिखितांचे संपादन यांत त्यांनी केलेले कार्य महत्त्वपूर्ण आहे. आधुनिक हिंदीचा पाया दखनी भाषेने घातला व मराठी संत हे दखनी-हिंदी साहित्याचे प्रणेते होते, हा त्यांचा निष्कर्ष त्यांच्या दखनीवरील संशोधनाचे फलित आहे. 'प्राचीन मराठी हस्तलिखिते : संशोधन व संपादन' हा त्यांचा ग्रंथ अलीकडेच प्रसिध्द झाला आहे. 'ओवी ते लावणी' हा ग्रंथही प्रसिध्द करून त्यांनी टीकाभाष्यपर पदरचना, आख्यान काव्ये, पदे, भारुडे, पोवाडे, लावणी इत्यादींच्या अध्ययनाला नवे परिमाण प्राप्त करून दिले आहे.

रामचंद्रपंत अमात्य यांच्या 'आज्ञापत्र' या छोट्या पुस्तकाचे त्यांनी केलेले संशोधन व संपादन वैशिष्ट्यपूर्ण असून शिवकालीन राजनीती व रणनीतीवर प्रकाश पाडणारे आहे. मध्ययुगीन मराठी साहित्याचे एक अग्रगण्य साक्षेपी संशोधक म्हणून त्यांची ख्याती आहे.

**९] द. ग. गोडसे**

गोडसे यांना चित्रकार व कलांवत म्हणून प्रसिध्दी मिळालेली आहे.



'पोत', 'शक्तिसौष्ठव', 'गतिमानी', 'लोकधाटी', 'मातावळ', 'समन्दे तलाश', 'ऊर्जायन' आणि 'नांगी असलेले फुलपखारू' ही पुस्तके त्यांनी प्रसिध्द केली आहेत. त्यांची संशोधनपध्दती वेगळी आहे. चित्र, शिल्प, संगीत, कलावंत व लोकजीवन, लोकसाहित्याचा अभ्यास, साहित्य व इतर कला यांच्याकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टीकोन महत्त्वाचा आहे. त्यांच्या संशोधनाचा व्याप खूप मोठा आहे, याची कल्पना त्यांच्या पुस्तकांवरून येते. संशोधन म्हणजे केवळ माहिती शोधणे नव्हे किंवा संकलित करणे नव्हे. त्यामागे निरीक्षण हवे. सिध्दान्त प्रतिपादन हवे. सिध्दान्ताची नवीनता हवी. गोडशांच्या पुस्तकांमुळे या गोष्टींची साक्ष पटते.

**'पोत'** मध्ये ते एक सिध्दांत मांडतात : 'त्या त्या कलाकृतीत त्या त्या कालखंडातील जीवनाचे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे झालेले चित्रण स्थिती सापेक्षच असल्याचे आढळून येते. एवढेच नव्हे, तर जीवनाची छाया प्रत्येक आविष्कारावर एवढी अनिवार्यपणे पडलेली असते की, एकाच कालखंडातले, परंतु भिन्न प्रवृत्तीतून निर्माण झालेले, दोन भिन्न आविष्कार तपासून पाहिले तरी स्वभावभेदाने परस्परविरुध्द असलेल्या या आविष्काराच्या दोन्हीही पोतातील जीवनबंध एकच असल्याचे स्पष्ट दिसते.'

हा सिध्दांत ते छद्दन्त जातकाची कथा आणि वेगवेगळ्या कालखंडांतील तिचे शिल्प, चित्रांकित आविष्कार यांचे विश्लेषण करून त्या आधाराने प्रस्थापित करतात. याच सिध्दांताच्या अनुषंगाने ते यादवकालातील ज्ञानदेवाची 'भावार्थदीपिका', भास्करभट्ट बोरीकर यांचे 'शिशुपालवध' यांवर भाष्य करतात. त्यांची कालविशिष्ट मर्यादा ते दाखवतात. व्यासांच्या भगवद्गीतेचा पहिला अध्याय व 'भावार्थदीपिके'चा पहिला अध्याय यांचा ते तौलनिक अभ्यास करतात. भावार्थदीपिकेतील भाष्याच्या आविष्कारयंत्रणेचे स्वरूप कसे सांकेतिक आहे, हे ते स्पष्ट करतात. ज्ञानेश्वरीकडे पाहण्याची त्यांची वेगळी दृष्टी प्रत्ययास येते. गोडसे सिध्दान्त मांडताना पुष्कळ शोध घेतात. साधनसामग्री गोळा करतात.



Scanned with OKEN Scanner

पदनिविष्ट पोतकल्पना व कलानिविष्ट पोतकल्पना यांचे समीकरण गोडसे पुढीलप्रमाणे मांडतात :

कापड ज्या पदार्थाचे बनवितात, तो मूळ पदार्थ = जीवनविषयक मूळ तत्त्व.

धागा = तत्त्व विशद करणारी जाणीव.

ताणाबाणा = या जाणीवांची उभी आडवी वीण

यंत्रणा = जाणिवांचा आविष्कार घडवून आणणारे माध्यम [भाषेचे]. या पोतात त्या काळातील कलावंताची जीवनविषयक निष्ठा हा पहिला, त्या जाणीवेचा पीळ हा दुसरा व यंत्रणा हा तिसरा महत्त्वाचा घटक असतो असे त्यांनी म्हटले आहे.

**'शक्तिसौष्ठव'** या ग्रंथात गोडसे शिवाजीच्या एका पत्रावरून शिवकालीन शक्तिसौष्ठव शैलीचे विवेचन करतात. त्या आधाराने ते शिवकालीन साहित्याचे विश्लेषण करतात.

शक्तितत्त्वामुळे आकृतिबंधाचा बांधा घाटाने ठसठोंबस होतो. आकृतिबंधाच्या अंतर्गत संघटनेतील लहानमोठे आकार अवकाश घनभावाचे व शक्तिभाराचे असतात. घनभावाचे व शक्तिभाराचे असले तरी ते जडभारती व सुस्त नसतात; उलट स्थिर असले तरी चित्शक्तीच्या चैतन्याने भारलेले व गतिशील असतात.

शिवकालात ज्या कोणी जे काही लिहिले, उच्चारले, गायले, चितारले, कोरले अथवा बांधले ते सारे चितशक्तीच्या अंगाने. शिवकालीन मुक्तेश्वर, तुकाराम, रामदास, वामन पंडित यांचे वाङ्.मयीन आविष्कार शक्तिसौष्ठव शैलीतले आहेत, असे ते म्हणतात.

**'गतिमानी'** — यात गोडसे दत्ताजी त्रिमल वाकेनवीस याने लिहिलेल्या 'श्री शिवछत्रपतींची एक्क्याण्णव कलमी बखर' या शिवाजीराजांच्या कथेची चिकित्सा करतात आणि 'हा ग्रंथ शिवकालीन बोलीभाषेतील एक अस्सल मराठी आविष्कार तर आहेच, शिवाय कलात्मक आविष्कार म्हणून त्यात गोवला गेलेला इतिहाससुध्दा अस्सल आहे', हा सिध्दांत मांडतात. या अभ्यासासाठी ते या बखरीच्या अनेक हस्तलिखित, मुद्रित प्रती



मिळवतात. लंडनच्या ब्रिटिश म्युझियम लायब्ररीतून दत्ताजी त्रिमलच्या उपलब्ध 'नव्वद प्रकरणी' मोडी हस्तलिखिताच्या मायक्रो—फिल्म प्रती ते मिळवतात. या शिवकथेच्या मूळ स्वरूपाचा शोध ते घेतात. 'दत्ताजीच्या भावविश्वात मराठी माणसाच्या उत्कर्षाचे आख्यानच शिवकथेच्या निमित्ताने सांगायचे होते', असा सिध्दान्त ते प्रतिपादन करतात. ऐतिहासिक मराठी साहित्याच्या अभ्यासाला वेगळी असांकेतिक दृष्टी देणारे हे लेखन साहित्य संशोधनच आहे.

'अक्षर म्हणजे रेखेचे गुंडाळे. निरनिराळ्या कालखंडांतील नमुने, निरनिराळे आकार, जाडी, लांबी, उंची, तोल, वाकवळणं, मोडमुरडी, फटेलपेटी, शिरोलेखाचा तुटकपणा यांवरून त्या काळाची, व्यक्तीची कल्पना येते', असे ते म्हणतात.

**'लोकघाटी'** मध्ये लोकधाटी आविष्काराची नेमकी कोणती गमके जाणवली हे सांगण्याचा प्रयत्न ते करतात. स्वयंप्रवाही, मुक्त, आवेशी, लवयुक्त, रेषाभाषा आणि स्वर ही आदिवासी आविष्काराची साधने. आजच्या ग्रामीण शेतकऱ्याची जीवनराहटी बदललेली वाटली तरी त्याचे भावविश्व आणि श्रध्दाविश्व थोड्याफार फरकाने अजूनही प्राचीन शिकारी मानवाच्या भाव व श्रध्दा विश्वासारखेच आहे, असे गोडसे म्हणतात.

लव [वाक] तत्त्व नृत्य, चित्र, शिल्प, साहित्य या कलात दिसून येते. लोकसंगीतात 'लवतत्त्व' आहे, असेही ते म्हणतात. गोधडीचा चित्रवाण एकसंध आविष्काराचे एकसंधरूप त्यांना वाटते.

ग्रामीण ओवीचे खरे रूप अक्षररूप नसते. तिचे खरे रूप गेय असते. गेयतेची घडण जात्याची भ्रमण प्रक्रिया आणि गात्याच्या भावनप्रक्रियेनुसार असते. विविध ओव्यांचे दाखले देऊन ग्रामीण आशय कसा व्यक्त होतो त्याचे चित्रण ते करतात.

कुंभाराच्या मडक्यातील बुड, पोट, मान व तोंड या तपशीलाचे वेगळेपण सांगता येणार नाही. बुड कुठे संपते, पोट कुठे सुरू होते हे सांगता येत नाही. प्रत्येक मडके वेगळे. दुसरे पहिल्याची आवृत्ती नसते, असे ते म्हणतात.



Scanned with OKEN Scanner

तमाशात नाचे असतात, कारण तमाशा म्हणजे सत्य वास्तवापेक्षा संभाव्य वास्तवाचा आभास निर्माण करणारा आविष्कार. कुंभाराचे मडके, ग्रामीण ओवी, तमाशा यांच्या निर्मितीप्रक्रियेत आवर्तानुवर्ती वळणे दिसून येतात. लोकनाट्याची बलस्थाने शोधून, त्यांचा अत्याधुनिक नाट्यतंत्रात वापर करण्याचे प्रयत्न आहेत, असे ते म्हणतात.

गतिमानता व तिचा अनियमित लवचिकपणा ही लोक–आविष्काराच्या घडणीची महत्त्वाची सूत्रे आहेत. लोकआविष्कारांना चवकट मान्य नसते. आकार, अवकाशांच्या गणितमानी चवकटीपासून लोक आविष्कार सर्वस्वी मुक्त असतो.

**'मातावळ'**मध्ये लोकधाटी आविष्काराची समीक्षा आहे. यासाठी गोडसे ग्रामीण भागात फिरतात. ग्रामीण गीते गोळा करतात. त्यांचे विश्लेषण करतात. त्या आधाराने आपले स्वतःचे निष्कर्ष काढतात. लोकसाहित्याच्या अभ्यासाचा हा एक भाग आहे.

**'समन्दे तलाश'** म्हणजे शोधाचा घोडा किंवा तर्काचा घोडा [फारशी वाक्प्रचार] चित्र, शिल्प, लेख, पत्रे यांच्या आधारे आपले विचार ते मांडतात. संशोधनाची नवी दिशा व नवीन विचार यात दिसून येतात. यातील 'शिवरायाचे कैसे बोलणे' व 'मस्तानी' हे लेख महत्त्वाचे आहेत.

**'ऊर्जायन'** मधील लेख अधिक स्वैर आहेत. बहुनिरीक्षण, बहुश्रुतता व स्वतंत्र नवी दृष्टी यांचे दर्शन या लेखांत घडते. अवकाश ही संज्ञा फक्त व्याप्तीचा भाव सुचविणारी असते. अवकाश आणि पोकळी यांत फरक असतो. अवकाश भावाने व्याप्त असतो. पोकळी भावाने व्याप्त नसते, भावशून्य असते. पोकळी सर्जनशील नसते, अवकाश सर्जनधर्मी असतो.

ऊर्जा आणि अवकाश यांचे मेहुण असते. दोघांच्या सहवासाशिवाय आकृती संपृक्त होत नाही, असा विचार ऊर्जायनमध्ये गोडसे मांडतात.

'औदुंबर', 'चाफा' यांची नागरसमीक्षा वेगळी आणि ग्रामीण समीक्षा वेगळी, असे ते म्हणतात; कारण अवकाशदर्शन त्यात असते. समीक्षा ही दृश्य आणि अदृश्य रूपाची असते, म्हणजे आविष्कारांतर्गत व आविष्कारसंदर्भित असते.



उत्तम आविष्कार हा बव्हर्थी असतो. 'चाफा' या सबंध कवितेत फक्त ऊर्जाच बोलते असे गोडसे प्रतिपादितात. चाफा निःशब्द असतो. चाफा उर्जारूप झाला आणि फुलून आला. ही कविता पृथ्वीवरील चराचर जीवनाच्या निर्मितीचे...... पुनर्निर्मितीचे...... निर्मितीच्या आनंदाचे..... या आनंदाच्या सातत्याचे........ ऊर्जेचे गीत आहे. चाफा हे लोकगीत आहे. 'औदुंबर' हे निखळ निसर्गचित्रण म्हणून लोकधाटी आविष्कारास ते जवळचे. लोकधाटी अंगाने विचार केला तर ऊर्जेचे निर्मितीक्षम रूप ध्यानात येते, असा नवा विचार ते मांडतात.

लोकधाटी लोककथाः 'गोदावरीची समाधी' : धनगर हकीकत सांगतो : एक पुण्यवान स्त्री, ब्राह्मणाची मुलगी. लगीन झालेली. नवरा जिवंत असताना सती गेली. गोदावरीला संभाजीनं पळवली. त्यानं तिच्यावर जुलूम जबरी केली नाही. आपलं खानदान तो इसरला नाही. ती संभाजीला बधली नाही. सती जातेवेळी तिनं सांगितलं, 'माझी चिता संभाजीनं पेटवली पाहिजे.' 'चिता संभाजीनं पेटवली.' 'शब्द वृंदावन' ही लोककथा आहे, इतिहास नाही. लोककथा प्रवाही आणि प्रवासी. संभाजी नावापुरताच. लोककथेतील संभाजी इतिहासातील नाही. तो परिकथेतील राजपुत्र आहे. तिला सती जाण्याची प्रेरणा ऊर्जेने दिली. गोदावरी सती गेली, पण कशी.? 'संभाजीनं चिता पेटवली पाहिजे.' ऊर्जा सर्वव्यापी आहे. अशा रीतीने एका वेगळ्या दृष्टीकोनातून गोडसे या लोककथेकडे पाहतात.

**नांगी असलेले फुलपाखरु** : यात चित्रकला, स्थापत्य, साहित्य, इतिहास, नाट्यसंगीत आणि चित्रपट ह्या कलांकडे पाहण्याचा नवीन दृष्टीकोन दिसून येतो. गोडशांच्या लेखनात आग्रह व अभिनिवेश आहे. त्यांच्या संशोधनाचा आवाका मोठा आहे. त्यात प्रतिभेचा भाग आहे. कधी एकांगीपणाही येतो.

संशोधन आणि समीक्षा दोन्हींचे दर्शन त्यांच्या लेखनात होते. ते सिध्दान्तसूत्र शोधतात. त्याचे प्रस्थापन करतात. सर्जनशील असे त्यांचे लेखन आहे. संशोधन ही त्यांची जीवनवृत्ती आहे. साहित्य हा संस्कृतीचा



Scanned with OKEN Scanner

एक भाग असतो. साहित्याचे संशोधन हे सांस्कृतिक कार्य असते, याची जाणीव गोडशांना आहे. गोडसे कलामीमांसा करतात. अनेक पदरी वीण त्यांच्या लेखनात दिसून येते. सुरुवात गृहितकाने ते करतात. मराठीतील महत्त्वाचे मीमांसक ते ठरतात. अपरिचित प्रश्न त्यांनी उपस्थित केले व दृश्यकलेच्या बाबतीत नवे परिमाण दिले. संशोधन क्षेत्रातील त्यांचे कार्य अद्वितीय स्वरूपाचे असे आहे.

**१०] मराठीचे पाश्चात्य संशोधक**

पाश्चात्य देशात मराठीचा अभ्यास मोठ्या प्रमाणात चालू आहे. अव्वल इंग्रजीच्या काळात मोल्सवर्थचा मराठी – इंग्रजी शब्दकोश प्रसिध्द झाला. मराठीच्या अभ्यासाचा खरा पाया या कोशाने घातला. प्रो. झुल ब्लोक याने फ्रेंच भाषेत मराठी भाषेच्या विकासासंबंधी एक ग्रंथ लिहिला. त्याचे 'मराठी भाषेचा विकास' या नावाने भाषांतर झाले आहे. मोल्सवर्थचा कोश आणि ब्लोकचा भाषाभ्यास या दोन ग्रंथांच्या आधारावर लंडनच्या 'स्कूल ऑफ ओरिएन्टल स्टडीज'ने मराठीच्या अभ्यासाला सुरुवात केली. या स्कूलमध्ये **डॉ. रेसाईड** यांनी मराठीचा अभ्यास सुरू केला. त्यांनी महानुभावीय मराठी ग्रंथांची वर्णनात्मक सूची तयार केली. या सूचीत ३३९ ग्रंथांचा उल्लेख आहे. ही सूची करताना त्यांना खूप अडचणी आल्या. महानुभाव काव्यसूचीत महानुभावांचे ५००० ग्रंथ आहेत, असे वि. ल. भावे यांनी जे म्हटले आहे, ते कसे अवास्तव आहे, हे डॉक्टरसाहेबांनी पटवून दिले आहे. 'बुलेटिन'मध्ये त्यांनी महानुभाव पंथ, त्याचा इतिहास आणि तत्त्वज्ञान यांचा परिचय करून दिला आहे. सकळ लिपीचे मूलगामी विवेचनही त्यांनी केले आहे. डॉ. रेसाईड हे मराठीचे प्राध्यापक होते. 'श्रीधरकृत पांडुरंग माहात्म्य' हा त्यांचा लेख महत्त्वपूर्ण आहे. पंढरपुरास स्वतः हिंडून त्यांनी त्या तीर्थक्षेत्राचा भूगोल तपासला आहे. 'दत्तात्रेय', 'बारा मावळ' हे त्यांचे लेख त्यांच्या व्यासंगाची प्रचिती करून देणारे आहेत. मराठी वाङ्‌मयाचा परिचय त्यांनी इटालियन भाषेत करून दिला आहे.

फ्रेंच विदूषी **डॉ. वोदविल** यांनी मराठी संतकाव्याचा अभ्यास केला



आहे. मूळच्या त्या तुलसीकाव्याच्या अभ्यासक आहेत. नंतर त्या कबीराकडे वळल्या. आता त्या ज्ञानेश्वर–तुकारामांकडे वळल्या आहेत. ज्ञानेश्वरांचा हरिपाठ त्यांनी चिकित्सकपणे संपादित केला आहे. त्याला महाराष्ट्रातील भागवत धर्माचे समालोचन करणारी विस्तृत प्रस्तावना आहे. त्यांचा पंढरपुरावरील निबंध महत्त्वपूर्ण आहे. त्यात त्यांनी महाराष्ट्रातील भक्तीची ३ वैशिष्ट्ये सांगितली आहेत :

१] विठ्ठलमूर्ती, पंढरपूर क्षेत्र व पंढरपूरची वारी यांचे सर्वश्रेष्ठत्त्व.

२] विठ्ठलाची विष्णूचा अवतार म्हणून नव्हे तर विष्णूचे स्वरूप म्हणून उपासना आणि त्याचे कृष्ण – गोपाळ या गोपजन देवाशी ऐक्य.

३] संत व संतवाणी याचे अनन्यसाधारण महत्त्व.

अमेरिकेत राहून प्राचीन मराठीचा अभ्यास करणाऱ्यांत **डॉ. अनफेल्ड हाऊस** ह्या एक आहेत. त्या पुण्यात आल्यावर मराठीच बोलतात. पीएच. डी. साठी त्यांनी 'महानुभावांचा सूत्रपाठ' हा विषय निवडला. महानुभावांची सांकेतिक लिपी त्यांनी आत्मसात केली. सूत्रपाठातील पाठभेदांची नोंद त्यांनी केली. 'श्रीगोविंदप्रभुचरित्र' या ग्रंथाचाही इंग्रजी अनुवाद त्यांनी केला आहे. बहिणाबाईंच्या जीवनावर देखील त्यांनी निबंध प्रसिध्द केला आहे. सध्या डॉ. फेल्ड हाऊस महाराष्ट्राच्या धार्मिक भूगोलाचा अभ्यास करीत आहेत.

मराठीच्या अभ्यासकांत **डॉ. गुंयर डी. सोन्थायमर** यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. युरोपमध्ये मराठीचे अध्यापन जर्मनीत होते. डॉ. सोन्थायमर हे तेथे मराठी शिकवीत. महाराष्ट्र–लोकसाहित्य व संस्कृतीचे संशोधक म्हणून प्रसिध्द. मराठी संस्कृतीचे पैलू आपल्या सखोल अभ्यासाने जागतिक स्तरावर नेणारे विद्वान म्हणून त्यांची ख्याती आहे. 'अविभक्त हिंदू कुटुंबाचा धर्मशास्त्रीयदृष्ट्या अभ्यास' या विषयात त्यांना डॉक्टरेट मिळाली आहे. डॉ. धर्मानंद कोसंबी आणि डॉ. इरावती कर्वे यांचा सहवास त्यांना लाभला. 'गोपजन' [गवळी व धनगर] संस्कृतीचा सखोल अभ्यास त्यांनी केला. खंडोबा, म्हसोबा व विरोबा या दैवतांवर जर्मन भाषेत त्यांनी ग्रंथ



Scanned with OKEN Scanner

लिहिला आहे. त्याचा इंग्रजी अनुवाद ॲन फिस्क हाऊस यांनी केला असून ऑक्सफर्ड प्रेसने तो प्रसिध्द केला आहे. 'मेमोरियल स्पेल' हा वीर पुरुष स्मारकांचा अभ्यास करणारा त्यांचा आणखी एक ग्रंथ आहे. व्यंकटेश माडगूळकर यांच्या 'बनगरवाडी'चा जर्मन अनुवाद त्यांनी केला. 'लीळाचरित्र' या ग्रंथाच्या जर्मन अनुवादाचे त्यांचे कार्य चालू असतानाच जर्मनीत हायडेल बर्ग येथे हृदयविकाराने १ जून १९९२ रोजी त्यांचे निधन झाले. पंढरपूर पालखीच्या सोहळ्यात त्यांनी तयार केलेला 'वारी' हा अनुबोधपट भारतात व परदेशातही गाजला.

हे सर्व अभ्यासक धर्मशाखेचे अभ्यासक आहेत. मराठी संतसाहित्याचा ऐतिहासिक दृष्टीने ते अभ्यास करतात. अनेकजण डॉक्टरेटसाठी मराठीचा अभ्यास करीत आहेत. अनेकांनी मराठी पुस्तकांची इंग्रजीत भाषांतरे केली आहेत. मराठीला वाहिलेले 'एकता' हे नियतकालिक कॅनडाहून निघत असते. पाश्चात्यांची कामाची निष्ठा, शिस्त, पध्दतशीरपणा, परिश्रमशीलता, वस्तुनिष्ठता हे गुण लक्षात घेण्यासारखे आहेत. 'ललित' १९९३ च्या दिवाळी अंकात 'मराठीचे परदेशी अभ्यासक' या शीर्षकाखाली सोंथायमर [रा. चिं. ढेरे], मॅक्सीन बर्नसन [माधव पिटके], कथारिना किन्ले [शं. गो. तुळपुळे], ॲन फेल्ड हाऊस [शं. गो. तुळपुळे], इयन रेसाईड [अशोक रा. केळकर], इरीना ग्लुश्कोवा [सुमन बेलवलकर], शोको नाकागावा [वा. ल. मंजूळ], जिम लेन [सुचेता परांजपे], इरीना ॲन आणि इतर [आशा मंडले] हे लेख आले आहेत, ते अभ्यासूंनी अवश्य वाचावेत.

**११] आधुनिक साहित्याचे संशोधन**

वेगवेगळ्या विद्यापीठांतून आधुनिक साहित्याचे पुढीलप्रमाणे संशोधन झालेले दिसून येते. काव्य या वाङ्मय प्रकारावर जवळजवळ पन्नासच्यावर प्रबंध सादर झालेले आहेत. यांतील बरेच प्रबंध कवींचा अभ्यास करणारे आहेत. केशवसुत, ना. घ. देशपांडे, बालकवी, अनिल, मर्ढेकर, तांबे, यशवंत, दे. ल. महाजन, काही कवयित्री, बोरकर, पाडगावकर, सुर्वे, तुकडोजी महाराज, ग. दि. माडगूळकर इत्यादी कवींचा त्यात समावेश



आहे. काही प्रबंध प्रतिमासृष्टीचा अभ्यास करणारे आहेत. काही प्रबंध कवितेतील विविध रसांचा अभ्यास करणारे आहेत. राष्ट्रीय कविता, समाजिक कविता, गूढगुंजनात्मक कविता यांचाही अभ्यास झालेला दिसून येतो.

नाटक, एकांकिका, नाट्यछटा या विषयांवरही जवळ जवळ साठ प्रबंध सादर झालेले दिसून येतात. कानेटकर, तेंडुलकर, शिरवाडकर, रांगणेकर, कोल्हटकर, वरेरकर, अत्रे, गडकरी, किर्लोस्कर, खाडिलकर, देवल, दिवाकर इत्यादी नाटककारांच्या संदर्भात हे प्रबंध आहेत. सामाजिक नाटके, स्त्रीदर्शन, नाट्याविष्कार, स्वगते, बालरंगभूमी, नाट्यसमीक्षा, नाट्यपदे, तंत्रविकास, ऐतिहासिक नाटके, पौराणिक नाटके, फार्स, वगनाट्ये, विनोदी नाटके, दशावतारी नाटके, शेक्सपिअरचा प्रभाव इत्यादी विषयांशी संबंधित काही प्रबंध आहेत.

कादंबरी या वाङ्मय प्रकाराशी संबंधित जवळ जवळ ४० प्रबंध सादर झालेले दिसतात. फडके, खांडेकर, स्त्री कादंबरीकार, माडखोलकर, पु. ल. देशपांडे, श्री. ना. पेंडसे, र. वा. दिघे, जयवंत दळवी, गो. नी दांडेकर, ह. ना. आपटे इ. लेखकांवर बहुतेक प्रबंधलेखन झालेले दिसून येते. ऐतिहासिक कादंबरी, ग्रामीण कादंबरी, चरित्रात्मक कादंबरी, कादंबरीतील वास्तववाद व अस्तित्त्ववाद इ. विषयांशी संबंधित काही प्रबंध आहेत.

कथा–लघुकथा या वाङ्मय प्रकारावर आधारलेले मात्र आठ दहाच प्रबंध दिसून येतात. चोरघडे, पु. भा. भावे, गंगाधर गाडगीळ, स्त्री कथाकार यांच्यावर आधारलेले प्रबंध आढळून येतात. त्याचप्रमाणे कथेचा उगम आणि विकास, कथेची वाटचाल, ग्रामीण कथा, कथेतील मनोदर्शन हेही विषय काहींनी हाताळलेले दिसून येतात.

चरित्र–आत्मचरित्र या प्रकारावर आधारलेले जवळ जवळ चौदा–पंधरा प्रबंध आढळून येतात. त्यांत प्राचीन वाङ्मयातील चरित्रकारांचा अभ्यास आहे; त्याचप्रमाणे स्त्रियांची चरित्रे व आत्मचरित्रे यांचाही विचार आहे.

निबंधाशी संबंधित केवळ तीन–चारच प्रबंध सादर झालेले दिसून



Scanned with OKEN Scanner

येतात. प्रेरणा, प्रवृत्ती, शैली, विकास यांच्या संदर्भातील लेखन यांत आहे. विनोदी वाङ्‌मयावर पाचसहा, कोश वाङ्‌मयावर दोन, प्रवास वर्णनावर तीनचार, बालवाङ्‌मयावर चारपाच, दलित वाङ्‌मयावर दहा–अकरा, नियतकालिकीय वाङ्‌मयावर चौदा–पंधरा, भाषिक अभ्यासावर सहासात, व्याकरणावर चौदा–पंधरा असे प्रबंध सादर झालेले दिसतात.

वेगवेगळ्या विद्यापीठांत भिन्नभिन्न दृष्टीकोनातून मराठीत संशोधन व्हायला लागले आहे. अजूनही मराठीत संशोधनाला खूप वाव आहे. जे संशोधन झाले आहे, त्याचेही पुनर्मूल्यांकन करणे आवश्यक आहे.

✧ ✧



# ७ : प्रबंधाची–प्रबंधिकेची अंगोपांगे

आतापर्यंत आपण मराठी साहित्यसंशोधनाचे स्वरूप, प्रकार, प्रक्रिया व पध्दती यांविषयी विचार केला. संशोधन हे एक शास्त्र असते आणि त्यामुळे त्याची एक विशिष्ट पध्दती असते याची खूणगाठ संशोधकाने आपल्या मनाशी बांधली पाहिजे. एम्. फिल.च्या अभ्यासक्रमातील केवळ एक प्रश्नपत्रिका म्हणून संशोधनाची प्रश्नपत्रिका नसते, तर ती संशोधकाला एकूणच संशोधन कसे करायचे याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी असते. म्हणून अभ्यासकांनी या प्रश्नपत्रिकेचा बारकाईने अभ्यास करणे आवश्यक आहे. मराठीच्या संशोधनक्षेत्रात जे अजराक माजले आहे असे अनेकांना वाटते, ते संशोधनपध्दतीचा अभ्यासकांनी मन लावून अभ्यास केलेला नसतो म्हणून. या प्रश्नपत्रिकेकडे केवळ 'थिअरी' म्हणून न पाहता अभ्यासकांनी आपले संशोधन मौलिक होण्यासाठी या थिअरीचा उपयोग कसा करता येईल याचा विचार केला पाहिजे. प्रबंधाचे किंवा प्रबंधिकेचे सादरीकरण हेदेखील तितकेच महत्त्वाचे असते. यासाठी प्रबंधाची किंवा प्रबंधिकेची पुढील जी काही अंगोपांगे आहेत ती अतिशय महत्त्वाची आहेत.

**भाषा**

अनेकांना अलंकारिक भाषेची आवड असते. प्रबंध किंवा प्रबंधिकेसाठी अलंकारिक भाषेची गरज नसते. संशोधनपर लेखनात भाषाविलासापेक्षा



Scanned with OKEN Scanner

भाषेचा अचूकपणा व सुस्पष्टता यांना महत्त्व असते. काही अभ्यासकांच्या लेखनात उगाचच भारुडभरती असते. अनेक ठिकाणी पुनरुक्ती असते. घोळ घालणारी शैली असते. काही अभ्यासक उगाचच उपरोधिक शैलीचा उपयोग करतात. अनेक ठिकाणी त्यांची आक्रमक प्रवृत्तीही दिसून येते. संशोधनक्षेत्रात या गोष्टींना महत्त्व नसते. नवीन तथ्ये कोणती व कशी शोधली यासंबंधीचे प्रतिपादन महत्त्वाचे असते. साधार व सप्रमाण लेखनाला या क्षेत्रात महत्त्व असते.

दुर्बोधता, संदिग्धता व क्लिष्टता अभ्यासकाने टाळणे आवश्यक असते. उपलब्ध साधनांच्या सहाय्याने विचारमंथन करून विचार प्रतिपादन करणे महत्त्वाचे असते. गृहितकृत्याला अनुलक्षून अभ्यासकाने निष्कर्ष कसे काढले आहेत याला महत्त्व असते. अभिव्यक्तीत ठाशीवपणा, आत्मविश्वास व जिवंतपणा असेल तर अभ्यासकाचे लेखन परिणामकारक ठरू शकते. पुष्कळदा अनेक पूर्वपरिचित संकल्पना व माहिती असते, तिचा नव्याने अन्वयार्थ कसा लावला आहे याला महत्त्व असते. यासाठी चिकित्सक दृष्टी, नियोजन व शिस्तबध्द लेखन या गोष्टींची गरज असते.

भावनापूर्ण व अलंकारिक शैली टाळून अभ्यासकाने वस्तुनिष्ठ शैलीचा वापर केला पाहिजे. अभ्यासकाचे लेखन सटीप, सुसंगत व काटेकोर हवे. विविध संदर्भ देऊन आवश्यक त्या ठिकाणी युक्तिवाद करून संशोधकाला मुद्देसूद प्रतिपादन करता आले पाहिजे. फाफटपसारा व शिथिलता टाळून आवश्यक तेवढी अवतरणे देऊन अभ्यासकाने साक्षेपाने प्रतिपादन केले पाहिजे. अर्थात यासाठी अवलोकन व व्यासंग यांची गरज असते हे सांगावयास नको.

**आकार व बांधणी**

प्रबंध किंवा प्रबंधिकेचा आकार ८ ३/४ व ११ १/४ या आकाराचा असावा लागतो. त्यासाठी सनलीटबाँड किंवा उत्तम प्रकारचा पांढराशुभ्र कागद वापरावा लागतो. हलका कागद वापरला तर तो लवकर पिवळा रंग धारण करतो व त्याचे आयुष्यही कमी असते. कागदाच्या डाव्या बाजूस १॥ इंच जागा सोडावी. कमी जागा सोडली तर बाईंडिंग करता येत नाही.



जास्त जागा सोडली तर तसे बरे दिसत नाही. वरील बाजूस १॥ इंच जागा सोडावी. उजव्या बाजूस १ इंच जागा सोडावी. जागा कमी सोडली तर कटिंगमध्ये मजकूर कापला जाण्याची शक्यता असते. खालच्या बाजूस १ इंच जागा सोडावी.

शक्यतो कापडी बांधणी करावी, कारण ती टिकाऊ असते. बहुतेक जण काळ्या रंगाचे मुखपृष्ठ सुरेख दिसते म्हणून तसे करून घेतात. मुखपृष्ठावर सोनेरी किंवा पिवळ्या अक्षरांत सुस्पष्ट असा मुद्रित केलेला मजकूर असावा.

**मुखपृष्ठावरील मजकूर**

मुखपृष्ठावर शिरोभागी, उदाहरणार्थ, पुढीलप्रमाणे एक ओळ असावी :

.......... विद्यापीठाच्या पीएच्. डी./एम्. फिल् [मराठी] पदवीसाठी सादर केलेला/केलेली प्रबंध/प्रबंधिका.

मध्यभागी प्रबंधाचे/प्रबंधिकेचे शीर्षक असावे. त्याखाली अभ्यासकाचे नाव व पूर्ण पत्ता असावा. त्याखाली मार्गदर्शकाचे नाव व पूर्ण पत्ता असावा. त्याखाली नोंदणी दिनांक द्यायला पाहिजे. त्याखाली प्रबंध/प्रबंधिका सादर केल्याचा महिना व वर्ष यासंबंधीचा निर्देश असावा.

**शीर्षकपृष्ठ**

मुखपृष्ठ उलटल्यानंतर एकदोन पाने कोरी असावीत. त्यानंतर मुखपृष्ठावर जो मजकूर टाकला असेल तोच शीर्षकपृष्ठावर असावा. याला इंग्रजीत 'टायटल पेज' असे म्हणतात. शीर्षकपृष्ठावरील मजकूर मुद्रित करून घ्यावा.

**मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र**

शीर्षकपृष्ठानंतर मार्गदर्शकाच्या सहीचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक असते.

**प्रास्ताविक व ऋणनिर्देश**

प्रबंधाचे प्रास्ताविक महत्त्वाचे असते. प्रास्ताविक थोडक्यात असावे. त्यात संशोधनासाठी निवडलेल्या विषयाची निवड, कुतूहल निर्माण होण्याचे कारण, गृहितकृत्याची निश्चिती, नवीन सिध्दांन्ताचे प्रतिपादन,



Scanned with OKEN Scanner

मूलभूत साधनांचा वापर, विषयाची व्याप्ती, प्रबंधातील प्रकरणांची मांडणी, परिशिष्टे वगैरेसंबंधी विवेचन असावे.

शेवटच्या परिच्छेदात संशोधनाच्या संदर्भात ज्यांचे साह्य झाले, त्यांचा ऋणनिर्देश असावा. शेवटी संशोधकाचे नाव असावे.

**अनुक्रमणिका**

अनुक्रमणिकेत प्रबंधातील सर्व प्रकरणांच्या शीर्षकांची व उपशीर्षकांची नोंद असावी. ते ते प्रकरण कोणत्या पृष्ठापासून कोणत्या पृष्ठापर्यंत आहे याची नोंद अनुक्रमणिकेत असावी. त्याचप्रमाणे त्या त्या प्रकरणातील उपशीर्षकांची नावे देऊन त्यांच्यापुढे पृष्ठक्रमांक टाकावेत. संदर्भ साहित्याची सूची, लेखकाचा जीवनपट, परिशिष्टे वगैरे जो जो मजकूर प्रबंधात/प्रबंधिकेत असेल त्याची नोंद अनुक्रमणिकेत करून त्यापुढे पृष्ठक्रमांक टाकावेत. केवळ अनुक्रमणिका पाहूनही पुष्कळदा वाचकाला आतील मजकूराची माहिती होऊ शकते. पृष्ठक्रमांक असल्यामुळे वाचकाला हवा तो मजकूर लगेच वाचता येतो.

**संक्षेपचिन्हे**

प्रबंधांत काही संक्षेप वापरले असतील तर त्यासंबंधीचा खुलासा प्रारंभी करणे आवश्यक असते. उदा. 'विविधज्ञानविस्तार' साठी 'वि. वि.' किंवा 'विवि.' संक्षेप वापरला असेल किंवा 'काव्यरत्नावली' साठी 'काव्य.' किंवा 'कार.' असा संक्षेप वापरला असेल.

**प्रकरणनिहाय मांडणी**

विषयाच्या स्वरूपानुसार व मार्गदर्शकाच्या सूचनेनुसार प्रकरणांची मांडणी करावी लागते. एखाद्या विषयासाठी तीन ते पाच प्रकरणे पुरेशी वाटतील, तर एखाद्या विषयाला नऊ–दहा प्रकरणेही अपुरी वाटतील. एखाद्या प्रबंधात/प्रबंधिकेत क, ख, ग असे तीन विभागही असू शकतील. यासाठी रचना किंवा मांडणी किंवा आराखडा या गोष्टींना खूप महत्त्व असते. त्यामुळे लेखनाला विशिष्ट प्रकारचा आकार प्राप्त होतो.

प्रत्येक प्रकरणाला छोटेसे प्रास्ताविक आवश्यक असते. त्या प्रकरणात तुम्ही काय सांगणार आहात यासंबंधी थोडक्यात माहिती द्यावी. त्या त्या



प्रकरणाचा तो परिचयात्मक भाग असतो. त्या प्रकरणाची एकूण रूपरेषा या प्रास्ताविकामुळे कळू शकते.

प्रबंधाचे/प्रबंधिकेचे पहिले प्रकरण पुढील लेखनाचा परिचय करून देणारे असते. जसा विषय असेल त्यानुसार पहिल्या प्रकरणाचे स्वरूप बदलत जाते. लेखकनिष्ठ संशोधन असेल तर लेखकाविषयी थोडक्यात माहिती देणे आवश्यक असते. ही माहिती केवळ पृष्ठ भरण्यासाठी नसावी तर एकूणच संशोधनाला उपयुक्त ठरणारी असावी. लेखकासंबंधी अनावश्यक माहिती किंवा त्याच्या साहित्यविषयक कामगिरीविषयी विस्तृतपणे सांगण्याची गरज नसते. साहित्यप्रकारनिष्ठ संशोधन असेल तर त्या प्रकाराची विस्तृतपणे माहिती बरेच अभ्यासक देतात. त्या माहितीचा काही एक उपयोग नसतो. पृष्ठे भरण्यापलीकडे या माहितीचे कोणतेही प्रयोजन नसते.

पुष्कळदा पहिल्या प्रकरणांपासून एकदम विषयप्रवेशही करता येतो. पहिले प्रकरण फार मोठे नसावे. पुढील प्रकरणांची पृष्ठभूमी देणारे हे प्रकरण असते. पहिले प्रकरण आणि शेवटचे निष्कर्षात्मक प्रकरण वाचले तरी मधली प्रकरणे कोणत्या स्वरूपाची असतील याची कल्पना वाचकाला सहज यायला हवी.

अभ्यासकाने निश्चित केलेले गृहितकृत्य, संशोधनाचा प्रकार आणि त्यासाठी वापरलेली पध्दती या गोष्टींचा आवर्जून उल्लेख पहिल्या प्रकरणात केला पाहिजे.

प्रबंधातील किंवा प्रबंधिकेतील मधली प्रकरणे गृहितकृत्याच्या सिध्दीला पोषक ठरणारी असतात. ही प्रकरणेदेखील सुसूत्र अशी असली पाहिजेत.

प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी अभ्यासकाने जी तथ्ये शोधलेली असतात ती 'निष्कर्ष' या शीर्षकाखाली येतात. काहीजण याला 'समारोप' असेही शीर्षक देतात. प्रकरणात जी माहिती दिली असेल त्या माहितीच्या आधारे गृहितकृत्याला अनुलक्षून निष्कर्ष काढले पाहिजेत.

प्रत्येक प्रकरणात प्रास्ताविक व निष्कर्ष यांच्यामध्ये जे काही मुद्दे मांडले असतील त्यांना उपशीर्षके अवश्य दिली पाहिजेत. उपशीर्षके अर्थपूर्ण



Scanned with OKEN Scanner

असली पाहिजेत. प्रत्येक प्रकरणात अभ्यासक काही उध्दरणे देत असतो. ही उध्दरणे अभ्यासकाच्या प्रतिपादनाला आधार देणारी असतात. काही वेळेला अभ्यासकाच्या प्रतिपादनाच्या विरोधात जर कुणी आपले मत मांडले असेल, तर त्याचे खंडन त्याला करावे लागते. ग्रंथातील किंवा साधनसामुग्रीतील संदर्भ यथातथ्य देणे आवश्यक असते. उध्दरण अचूक असावे लागते. त्याचप्रमाणे त्याचा संदर्भदेखील अचूक असावा लागतो. संदर्भ देताना अवतरणचिन्ह जिथे संपते तिथे संदर्भाचा अनुक्रमांक टाकावा लागतो. संदर्भ विशिष्ट पध्दतीने लिहावा लागतो. पदटीपा लेखनाची जी पध्दती असते तिचा अवलंब अभ्यासकाने केला पाहिजे.

कोणत्याही प्रकरणात माहितीचे व्यवस्थापन व विश्लेषण यांना महत्त्व असते. या संदर्भात या पुस्तकाच्या तिसऱ्या प्रकरणात 'ग' विभागात जी माहिती दिली आहे ती लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

प्रबंधाचे किंवा प्रबंधिकेचे शेवटचे प्रकरण 'उपसंहार' या शीर्षकाखाली येते किंवा 'निष्कर्ष' या शीर्षकाखाली येऊ शकते. शीर्षक कोणतेही दिले तरी चालते. या प्रकरणात प्रबंधातील किंवा प्रबंधिकेतील एकत्रित माहिती लक्षात घेऊन तिच्यातील धागेदोऱ्यांची गुंफण करणे महत्त्वाचे असते. सर्व लेखनाचा सार किंवा एकूणच संशोधनात्मक नवीन माहितीपट या ठिकाणी उलगडलेला असावा.

**परिशिष्टे**

प्रबंधाच्या किंवा प्रबंधिकेच्या शेवटी परिशिष्टे द्यावी लागतात. परिशिष्टे कितीही असू शकतात. मधल्या लेखनात जी माहिती देणे आवश्यक होते; परंतु जी देता आली नाही, अशी माहिती परिशिष्टात द्यावी. परिशिष्टातील माहिती पूरक माहिती असते. परिशिष्टांना योग्य ती शीर्षके दिली पाहिजेत. लेखकाचा जीवनपट, त्याच्या साहित्याची सूची, त्याचे हस्ताक्षर, त्याचा पत्रव्यवहार, संदर्भसाहित्याची सूची, प्रश्नावली, मुलाखती वगैरे गोष्टींचा समावेश परिशिष्टांत होतो.

**सूची विभाग**

प्रबंधाच्या शेवटी सूची विभाग आवश्यक असतो. अभ्यासकाला सूची



करता येणे आवश्यक असते. सूचीमुळे पुढे संशोधन करणारांना माहिती सहज उपलब्ध होऊ शकते. कोणत्याही अभ्यासकाने आपल्या प्रबंधात किंवा प्रबंधिकेत किमान संदर्भसाहित्याची सूची, व्यक्तिनामसूची, ग्रंथनामसूची आणि विषयसूची यांचा अंतर्भाव करणे आवश्यक आहे.

**सादरीकरण**

प्रबंध किंवा प्रबंधिका टंकलिखित वगैरे झाल्यावर तपासणे आवश्यक असते. परीक्षकांकडे पाठविण्यापूर्वी त्यात चुका राहणार नाहीत याची काळजी अभ्यासकाने घेतली पाहिजे. चुका राहिल्या तर अभ्यासकासंबंधी परीक्षकाच्या मनात एकप्रकारची अढी निर्माण होण्याची शक्यता असते. प्रबंध/प्रबंधिका सादर करताना योग्य ती फी भरावी लागते व परिपूर्ण भरलेला अर्ज सादर करावा लागतो.

प्रबंधाच्या किंवा प्रबंधिकेच्या ३ ते ५ पर्यंत प्रती तयार कराव्या लागतात. त्या त्या विद्यापीठाच्या नियमानुसार अभ्यासकाने प्रती तयार करून द्याव्यात.

काही विद्यापीठांत प्रबंधाच्या किंवा प्रबंधिकेचा विषय मंजूर करून घेण्यासाठी प्रारंभी निवडलेल्या विषयाची स्थूल स्वरूपाची रूपरेषा पाठवावी लागते. या रूपरेषेत स्थूलमानाने कोणती प्रकरणे राहतील यासंबंधीचा निर्देश असावा. एकूणच संशोधनाची दिशा कोणत्या स्वरूपाची असेल यासंबंधीची ही रूपरेषा असावी लागते.

प्रबंध सादर करताना प्रबंधाचा गोषवारा द्यावा लागतो. या गोषवाऱ्याच्या विद्यापीठाच्या नियमानुसार आवश्यक तेवढ्या प्रती पाठवाव्या लागतात. या गोषवाऱ्यात संशोधनाचे मुख्य सूत्र, संशोधनाचा प्रकार, संशोधनाची पध्दती, संशोधनासाठी घेतलेले आधार, त्या आधारांचे विश्लेषण आणि एकूण निष्कर्ष ही माहिती आवश्यक असते.

प्रबंध किंवा प्रबंधिका अंतर्बाह्य सुंदर पाहिजे. केवळ बाह्यस्वरूप सुंदर असेल आणि आत कुठल्याही प्रकारच्या संशोधनाचा गंध नसेल तर ते संशोधन होऊ शकणार नाही. मराठी साहित्यसंशोधन करणाऱ्यांनी संशोधन हे एक शास्त्र असते हे अवश्य लक्षात ठेवले पाहिजे. परिश्रम घेऊन



Scanned with OKEN Scanner

अभ्यासकांनी काहीतरी नवीन मांडले आहे, असे जर वाचकांच्या लक्षात आले तर सादर केलेल्या प्रबंधाला किंवा प्रबंधिकेला अर्थ प्राप्त होऊ शकतो, नाही तर ती केवळ लेखनकामासाठी ठरते. या पुस्तकाच्या पहिल्या प्रकरणापासून तर शेवटच्या प्रकरणापर्यंत दिलेली संपूर्ण माहिती अभ्यासकाने ध्यानी घेतली तर लेखनकामासाठीचे पातक त्याला कधीही शिवणार नाही.

✧ ✧



# परिशिष्टे

१. संदर्भ साहित्याची सूची
२. विषयसूची
३. डॉ. शरद राघव राणे : जीवनपट
४. डॉ. श. रा. राणे : लेखनसूची

# १ संदर्भ साहित्याची सूची


१. **कुलकर्णी गो. म. [संपा.]** : नवसमीक्षा : काही विचारप्रवाह, मेहता प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १९८२

२. **कुलकर्णी वसंत विष्णु [संक.]** : मराठी प्रबंध सूची, साहित्य प्रसार केंद्र, नागपूर, प्रथम आवृत्ती १९९१

३. **कुळकर्णी श्री. रं.** : प्राचीन मराठी हस्तलिखिते – संशोधन आणि संपादन, का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था, धुळे, प्रथम आवृत्ती १९९२

४. **गोडसे द. ग.** : ऊर्जायन, पॉप्युलर, मुंबई १९८५

५. **गोडसे द. ग.** : गतिमानी, पॉप्युलर, मुंबई, प्रथम, १९७६

६. **गोडसे द. ग.** : पोत, पॉप्युलर, मुंबई, प्रथम, १९६३

७. **गोडसे द. ग.** : लोकधाटी, मुंबई, पॉप्युलर, प्रथम, १९७९

८. **गोडसे द. ग.** : शक्तिसौष्ठव, मुंबई, पॉप्युलर, १९७२

९. **गोडसे द. ग.** : समन्दे तलाश, श्रीविद्या, पुणे, १९७९

१०. **चुनेकर सु. रा. [संपा.] व इतर** : संशोधन : स्वरूप आणि पध्दती, शिक्षण प्रसारक संस्था, संगमनेर, प्रथम, १९८३

११. **जोशी वसंत स. [संपा.]** : भाषा व साहित्य : संशोधन, भाग–१, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, प्रथम, १९८२

१२. **जोशी वसंत स. व गं. ना. जोगळेकर [संपा.]** : भाषा व साहित्य : संशोधन भाग – २, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, प्रथम, १९८५

१३. **जोशी वसंत स. व म. ना. अदवंत [संपा.]** : भाषा व साहित्य : संशोधन, भाग – ३, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, प्रथम, १९८९

१४. **डोळके राजेन्द्र** : वैदर्भीय मराठी साहित्यिक, महाराष्ट्र साहित्य पत्रिका, पुणे, अंक २५४, जुलै सप्टें. १९९०

१५. **ढेरे रा. चिं.** : लोकसाहित्य – शोध आणि समीक्षा, श्रीविद्या, पुणे, प्रथम, १९९०

१६. **ढेरे रा. चिं. आणि इतर** : मराठीचे परदेशी अभ्यासक, ललित, दिवाळी १९९३

१७. **देशपांडे अ. ना.** : आधुनिक मराठी वाङ्.मयाचा इतिहास, भाग १ व २, व्हीनस, पुणे, पुनर्मुद्रण जाने. १९७०

१८. **देशपांडे ज. शा.** : हस्तलिखितांसंबंधी काही अनुभव व विचार, मराठी संशोधन पत्रिका, वर्ष २५ अंक ३ व ४, एमेजू ते जुऑस १९७८





१९. **देशपांडे य. खु.** : महानुभावीय मराठी वाङ्.मय, व्हीनस, पुणे, द्वितीय, १९६०

२०. **देशपांडे वा. ना. [संपा.]** : स्मृतिस्थळ, व्हीनस, पुणे, पाचवी, १९८८

२१. **देशपांडे वि. भा. व स्नेहल तावरे [संपा.]** : मराठी भाषा आणि साहित्य, मेहता, पुणे, प्रथम, १९९०

२२. **देशमुख उषा** : साहित्य शोधणी, नीहारा, पुणे, प्रथम, १९८९

२३. **परांजपे प्र. ना.** : मुलाखत : एक घेणे, भाषा आणि जीवन, अंक २ वर्ष १, १९८३

२४. **प्रियोळकर अ. का. [संपा.]** : दमयंती स्वयंवर, व्हीनस, पुणे, पुनर्मुद्रण १९७८

२५. **प्रियोळकर अ. का.** : प्रिय आणि अप्रिय, विदर्भ–मराठवाडा बुक कंपनी, पुणे, प्रथम, १९६५

२६. **पुंडे दत्तात्रय [संपा.]** : वाङ्.मयेतिहासाची संकल्पना, प्रतिमा, पुणे, प्रकाशन वर्ष दिलेले नाही.

२७. **भागवत दुर्गा** : केतकरी कादंबरी, मौज, मुंबई, १९६७

२८. **भागवत दुर्गा** : कॉंकार्डचा क्रांतिकारक, मॅजेस्टिक, मुंबई, १९६९

२९. **भागवत दुर्गा** : डूब, ग्रंथाली, मुंबई, १९७५

३०. **भागवत दुर्गा** : राजारामशास्त्री भागवत : व्यक्ति आणि वाङ्.मय, स्वस्तिक पब्लिशिंग, मुंबई, १९४७

३१. **भागवत दुर्गा** : रामकृष्णांचे कोडे, वरदा, पुणे, १९८८

३२. **भागवत दुर्गा** : लोकसाहित्याची रूपरेषा, वरदा, पुणे, सुधारित आवृत्ती, १९७७

३३. **भागवत दुर्गा** : सत्यं, शिवं, सुंदरम्, वरदा, पुणे १९७८

३४. **भागवत दुर्गा** : सिध्दार्थ जातक, खंड १ ते ७, वरदा, पुणे, खंड १–१९७५, खंड २ – १९७६, खंड ३ – १९७७, खंड ४,५,६,७ – १९७८

३५. **भोळे भा. ल. [संपा.]** : संशोधनाची क्षितिजे, अमेय, नागपूर, प्रथम, १९८५

३६. **भांडारकर पु. ल.** : सामाजिक संशोधन पध्दती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, नागपूर, द्वितीय, १९८१

३७. **भेंडे सुभाष [संपा.]** : प्रा. अ. का. प्रियोळकर स्मृतिग्रंथ, कै. अ. का. प्रियोळकर स्मृतिग्रंथ समिती, मुंबई, प्रथम, १९७४





Scanned with OKEN Scanner

३८. **मालशे स. गं.** : शोधनिबंधाची लेखनपध्दती, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे १९७५

३९. **संत दु. का.** : वाड्.मयीन विद्वत्ता, पुणे विद्यापीठ, पुणे, जुलै १९७६

४०. **संत दु. का.** : शोध विज्ञानकोश, पुणे विद्यार्थी गृह, पुणे, प्रथम, १९८५

४१. **संत दु. का.** : संशोधन : पध्दती, प्रक्रिया व अंतरंग, पुणे विद्यार्थी गृह, पुणे, द्वितीय, १९८८

४२. **वरखेडे र. ना.** : डॉ. श्री. रं. कुळकर्णी अमृतमहोत्सवी गौरविका – १९९१, का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था, धुळे १९९१

४३. **वेलेक रेने आणि ऑस्टिन वॉरन** : साहित्य–सिध्दांत [अनु. डॉ. स. गं. मालशे] महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथम, १९८२

✧ ✧

Presented Books

Dayanand College of Arts, Latur.
Acc. No. 1325
Date 26-11-88
LIBRARY



# २. विषयसूची

**अभ्युपगम परीक्षण, ८५**

**आधुनिक साहित्याचे संशोधन, १४६**

**आंतर्विद्याक्षेत्रीय संशोधन (प्रकार) : ३७ ते ४९**
- लोकसाहित्याचे संशोधन, ४५
- साहित्य आणि इतिहास, ४१
- साहित्य आणि मानसशास्त्र, ४३
- साहित्य आणि तत्त्वज्ञान, ४७
- साहित्य आणि समाजशास्त्र, ३८

**काही संशोधक : १२४ ते १४८**
- ॲनफेल्ड हाऊस, १४५
- कुळकर्णी श्री. रं., १३८
- केतकर श्री. व्यं., १२६
- कोलते वि. भि., १२९
- गोडसे द. ग., १३८
- ढेरे रा. चिं., १३७
- तुळपुळे शं. गो., १३१
- प्रियोळकर अ. का., १२७
- भागवत दुर्गा, १३१
- राजवाडे वि. का., १२५
- रेसाईड इएन, १४४
- वोदविल, १४४
- सोन्थायमर गुंथर डी., १४५

**ड्युई-केली स्टेप्स, २**

**तात्त्विक व उपयोजित संशोधन, ६**

**निष्कर्ष व फलश्रुती, ८७**

३८. मालः
पुणे :
३९. संत द
४०. संत :
४१. संत :
पुणे,
४२. वरखे
गौरी
धुळे
४३. वेले
[अ
महा


**पाठचिकित्साशास्त्र व संहिता संपादन : १०४ ते १२३**
- तळटीपा, १२०
- पाठचिकित्साशास्त्र, १०४
- पाठचिकित्सा, ११५
- पाठनोंदणी, ११३
- पाठांतरमीमांसा, ११२
- शब्दकोश व स्पष्टीकरणात्मक टीपा, १२१
- संपादनपद्धती, ११७
- हस्तलिखित ग्रंथ, १०७
- हस्तलिखित ग्रंथांची लेखनपद्धती, ११०

**माहितीचे व्यवस्थापन व विश्लेषण : ७३ ते ८१**
- कोष्टके, ७९
- टिपणे काढणे, ७५
- तक्ते, ७९
- नकाशे, ८०
- पदटीपा, ७५
- पुष्टिका, ७४
- माहितीचे चिन्हीकरण, ८०
- सारणीकरण, ७८
- संदर्भ नोंदणी पद्धती, ७६

**वाङ्मयीन संशोधन (प्रकार) : २० ते ३७**
- तौलनिक साहित्याभ्यास, ३४
- भाषिक संशोधन, २६
- लेखकाचा अभ्यास २८
- वाङ्मयप्रकारनिष्ठ संशोधन, ३२
- वाङ्मयेतिहाससंबंधी संशोधन, २१
- साहित्यकृतीनिष्ठ संशोधन, ३०
- साहित्यशास्त्रीय प्रश्नांसंबंधी संशोधन, २५





**विषयाची निवड, ५० ते ५२**

**वैज्ञानिक संशोधन, ९**

**समस्यानिर्धारण आणि अभ्युपगम निश्चिती, ५३**

**सामाजिक संशोधन, १०**

**साहित्यक्षेत्रीय संशोधन, ११**

**सूचीशास्त्र, ६६**

**संशोधकाचे गुण, १६**

**संशोधन आणि समीक्षा, १३**

**संशोधनातील विविध समस्या : ८१ ते ८५**
- अर्थनिर्णय, ८२
- कालनिर्णय, ८२
- प्रामाण्य, ८३
- माहितीची प्रतवारी व उपयोजनातील तारतम्य, ८४
- लिपीचे आकलन, ८१

**संशोधन पद्धती : ८९ ते १०३**
- अनुभवाधिष्ठित पद्धती, ९८
- ऐतिहासिक किंवा कालक्रमनिष्ठ पद्धती, ९०
- तौलनिक पद्धती, ९२
- नमुना पाहणीपद्धती, ९५
- समीक्षातत्त्वप्रधान पद्धती, १०१
- सूक्ष्मसंहिता चिकित्सा पद्धती, ९३
- वैज्ञानिक पद्धती, ९९
- क्षेत्रीय सर्वेक्षण पद्धती, ९६

**संशोधनाची प्रयोजने, ४**

**संशोधनशास्त्र : विविध व्याख्या व स्वरूप, १**




Scanned with OKEN Scanner

३८ संशोधन साधने : ५६ ते ७३
अभिलेखागारे, ६१
३९ कोरीव लेख, ५६
४० कोशवाङ्मय व सूची वाङ्मय, ६५
४१ गणकयंत्रादि तांत्रिक साधने, ७२
ग्रंथालये, ६२
४२ दैनंदिनी, ६०
पत्रे, ६०
४३ प्रश्नावली, ६९
मुलाखती, ७०
सांख्यिकी, ६८
हस्तलिखिते, ५८

संहितासंपादनाची फलश्रुती, १२२



# ३. डॉ. शरद राघव राणे : जीवनपट

१. दि. ११/११/१९३४ रोजी यावल, जिल्हा जळगाव येथे जन्म.
२. प्राथमिक शिक्षण भालोद, तालुका यावल, जिल्हा जळगाव येथे.
३. माध्यमिक शिक्षण न्यू इंग्लिश स्कूल भालोद, न्यू इंग्लिश स्कूल जामनेर आणि एरंडोल हायस्कूल यांठिकाणी.
४. महाविद्यालयीन शिक्षण एम्. जे. कॉलेज जळगाव येथे. १९५६ साली बी. ए. [ऑनर्स, मराठी स्पेशल]
५. १९५६ ते १९५७ न्यू इंग्लिश स्कूल भालोद येथे माध्यमिक शिक्षक.
६. १९५७ ते १९५८ एस्. एम्. टी. टी. कॉलेज, कोल्हापूर येथे बी. टी. साठी.
७. १९५८ ते १९६१ न्यू इंग्लिश स्कूल, भालोद येथे माध्यमिक शिक्षक.
८. दि. १२/६/५९ रोजी फैजपूरचे श्री. तुकाराम आसाराम भंगाळे यांची कन्या वत्सला हिच्याशी विवाह.
९. १९६० एम्. ए. [मराठी] नागपूर विद्यापीठ.
१०. १९६१ ते १९६३ ज्योती विद्यामंदीर सांगवी येथे माध्यमिक शिक्षक.
११. १९६३ पासून सेवानिवृत्तीपर्यंत धनाजी नाना महाविद्यालय फैजपूर येथे मराठीचे प्राध्यापक, नंतर विभागप्रमुख व प्रपाठक.
१२. १९७४ साली महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे यांच्याकडून इयत्ता ५ वी ते ७ वी साठी 'पर्यायी वाचन माले'च्या संपादन स्पर्धेत १ ल्या क्रमांकाचे रु. ४००० चे बक्षीस.
१३. १९८४ साली 'वा. गो. आपटे : व्यक्ती आणि वाङ्.मय' या प्रबंधाला पुणे विद्यापीठाची पीएच्. डी. पदवी प्राप्त.
१४. १९८४ साली पुणे विद्यापीठाची पीएच्. डी. चे मार्गदर्शक म्हणून मान्यता.
१५. १९८४ साली 'मृगजळ' या नाटकास महाराष्ट्र राज्य रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाचे प्रमाणपत्र.
१६. दि. ४/२/८५ रोजी धनाजी नाना महाविद्यालयाच्या रंगमंचावर 'मृगजळ' या नाटकाचा पहिला प्रयोग.
१७. १९८७ साली पु. भा. भावे स्मृती समितीचा समीक्षालेखाबद्दल प्रथम क्रमांकाचा पुरस्कार प्राप्त झाला.

१८. १९८९ साली 'पाचामुखी पांडू' या पुस्तकास १९८६–८७ या वर्षासाठीचा बालवाङ्‌मय विभागातील सर्वोत्कृष्ट पुस्तक म्हणून साने गुरुजी पुरस्कार मिळाला.
१९. १९८९ पासून का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था, धुळे येथे एम्. फिल्. च्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन.
२०. १९९१ साली 'काय सांगितलं तिनं?' या एकांकिकेस 'नाट्यदर्पण' चा सतीश दुभाषी पुरस्कार प्राप्त झाला.
२१. १९९२ साली उपप्राचार्य म्हणून नियुक्ती झाली.
२२. १९९२ साली उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाची पीएच्. डी. चे मार्गदर्शक म्हणून मान्यता मिळाली.
२३. १९९३ साली डॉ. जगन्नाथ चौधरी यांनी 'मृगजळ' नाटकाचा हिंदीत 'मृगजल' या नावाने केलेला अनुवाद अतुल प्रकाशन, कानपूर ने प्रसिध्द केला.
२४. १९९३ साली धुळ्याच्या का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्थेच्या विद्वतसभेवर तज्ज्ञ सदस्य म्हणून नियुक्ती.
२५. १९९३ साली उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथे मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती.
२६. दि. ११/११/१९९४ रोजी धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर येथून सेवानिवृत्त.
२७. **कुटुंबियांविषयी माहिती :** डॉ. राणे यांना दोन मुले. मोठा मुलगा दिवाकर हा व्ही. जे. टी. आय्. मुंबई येथून 'कॉम्प्युटर सायन्स' मध्ये एम. ई. झाला असून, तो नॅशनल सेंटर फॉर सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी जुहू, मुंबई येथे कॉम्प्युटर इंजिनिअर असून, एका विभागाचा मॅनेजर आहे. त्याची पत्नी सौ. शुभलक्ष्मी ही बी. एस्सी., डी. एम्. एल्. टी, एम्. ए. [मराठी] आहे. या दांपत्यास चि. मोहित आणि चि आश्विन ही दोन मुले आहेत. धाकटा मुलगा रत्नाकर हा एम्. व्ही. एस्सी. आहे. तो सोलापूरच्या वेंकिज फिड डिव्हिजन मध्ये न्यूट्रिशनिस्ट आहे. त्याची पत्नी सौ. उज्ज्वला ही एम्. ए. [मराठी] आहे. या दांपत्यास चि. तोषित हा मुलगा आहे.

✧ ✧



# ४. डॉ. श. रा. राणे : लेखनसूची

**[क] प्रबंध**

१. वा. गो. आपटे : व्यक्ती आणि वाङ्‌मय [पीएच्. डी. पदवीप्राप्त अप्रकाशित प्रबंध]
२. मराठी कवितेतील सामाजिक विचार : प्रेरणा आणि स्वरूप [१८८५ ते १९५०] [अप्रकाशित]

**[ख] पुस्तके**

१. बेगड [बालकादंबरी] प्रबोधिनी प्रकाशन, खिरोदा, प. आ. १९७५
२. पाचामुखी पांडू [बालकादंबरी] चेतश्री प्रकाशन, अमळनेर, प. आ. १९८५ [राज्य सरकारचा साने गुरुजी पुरस्कार प्राप्त]
३. डोंगरावरची माणसं [ललित लेख], समाजशिक्षण माला, क्र. ४३७, १९८७
४. भुताची ज्योत [बालकथा], समाजशिक्षण माला, क्र ४५६, १९८८
५. रुची–अभिरुची [समीक्षात्मक लेखसंग्रह] चेतश्री प्रकाशन, अमळनेर, १९८९
६. मृगजळ [नाटक] रत्नदीप प्रकाशन, फैजपूर, १९८९
७. आंब्याचं झाड [बालकथा] अनघा प्रकाशन, ठाणे, १९९२
८. मृगजल ['मृगजळ'चा डॉ. जगन्नाथ चौधरी यांनी केलेला हिंदी अनुवाद, अतुल प्रकाशन, कानपूर, १९९३

**[ग] संपादित पुस्तके [सहकार्याने]**

१. व्यावहारिक मराठी : पाठ्यपुस्तक, पुणे, विद्यापीठ प्रकाशन, १९८५
२. काव्यरत्नावली : उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव, प्रथम वर्ष कला या वर्गासाठी, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, नागपूर, १९९२
३. मराठी भाषा : अध्ययन व अध्यापन, सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे. प. आ. १९८९
४. साहित्य प्रकार : ललित लेख, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक. प्र. प्र. १९९१

**[घ] लेख व समीक्षणात्मक लेख**

१. टिपणे काढण्याची सवय – 'एस्. एम्. टी. टी. कॉलेज, कोल्हापूर, वार्षिक, १९६३–६४



Scanned with OKEN Scanner

२. पिंजरा [पु. भा. भावे यांच्या कादंबरीची समीक्षा] 'साप्ताहिक गावकरी', १–५–१९६६
३. उर्मिला [कृ. ब. निकुंब यांच्या काव्यसंग्रहाची समीक्षा] 'धनाश्री', १९६६
४. केशवसुत आणि फैजपूर – 'साप्ताहिक गावकरी', ४–१२–६६
५. केशवसुतांची निसर्गपूजा – 'जळगाव समाचार, केशवसुत विशेषांक' २८–१२–६६
६. नेहरू विद्यानगर – नेहरूंचे जिवंत स्मारक, 'धनाश्री' १९६६
७. चालू कविता : एक प्रतिक्रिया, 'महाराष्ट्र टाइम्स' १–१०–६७
८. अंजन [जी. ए. कुलकर्णी यांच्या कथेची समीक्षा] 'महाराष्ट्र टाइम्स', ३१–१२–६७
९. जगबूड [दि. बा. मोकाशी यांच्या कथेची समीक्षा], 'धनाश्री' १९६८
१०. अजून पुन्नाग बहरले आहेत! 'स्मृतिपुष्प', लेवा बोर्डिंग, जळगाव, १९६८
११. बीची उपेक्षित प्रेमकविता, 'मराठा, रविवार पुरवणी', १४–१२–६९
१२. शृंगारिया कवी कवीश्वर, 'महानुभाव', ऑक्टोबर १९७०
१३. शिक्षण विचार श्री. मधुकरराव चौधरी यांच्या भाषणसंग्रहाची समीक्षा, 'जीवन शिक्षण', नोव्हे.–डिसें. १९७०
१४. नरेंद्राची भावकविता, 'महानुभाव' मार्च १९७१
१५. आराध्य मुरलीधरशास्त्री, 'साधना', १७ एप्रिल १९७१
१६. पाथेय, 'एम्. जे. कॉलेज रौप्य महोत्सव स्मरणिका', १९७१
१७. एक शामदान विझले आहे!, 'धनाश्री' १९७१–७२
१८. सोनेरी स्वप्नांच्या रूपेरी किनारी, 'न्यू इंग्लिश स्कूल भालोद, सुवर्ण महोत्सव स्मरणिका' १९७२
२०. महानुभाव गद्याच्या प्रेरणा, 'महानुभाव', मार्च १९७२
२१. 'भाऊबंदकी'तील आनंदी–राघोबा, 'बातमीदार' २–१२–७२
२२. प्राजक्त कथा [मुमताज रहिमतपुरे यांच्या कथासंग्रहाची समीक्षा] 'मराठा', ३–११–७३
२३. माझा गाव : फैजपूर, 'महाराष्ट्र दर्शन', १९७५
२४. केवडा [अनिल डांगे यांच्या कथेवर चर्चा] 'सत्यकथा', मे १९७९
२५. साने गुरुजींची साहित्यविषयक दृष्टी, 'आमोद' १९८०
२६. के. नारखेडे यांचे साहित्यशिवार, 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका', जाने–फेब्रु–मार्च १९८१
२७. आनंदयुग, 'समाज प्रबोधन पत्रिका', सप्टेंबर–ऑक्टोबर १९८१



२८. अ. भा. मराठी साहित्य संमेलन, जळगाव, 'गौराई' स्मरणिका, जाने. १९८३
२९. पुस्तके : औरस आणि अनौरस, ललित, सप्टेंबर, जाने. १९८४
३०. जंगलझडी : संवेदनाशील मनाची तगमग, अनुष्टुभ, जुलै–ऑगस्ट १९८४
३१. इथलेच जळ – इथलीच माती, अनुष्टुभ, सप्टें–ऑक्टो. १९८४
३२. उजेड विकणारी बाई, अनुष्टुभ, मे–जून १९८५
३३. वाङ्मयचौर्य, बाशिंग, दिवाळी १९८५
३४. ज्ञानस्रोतांची कुचंबणा [मुरलीधर गंधे : एक अनिकेत या ग्रंथात समाविष्ट] चेतश्री, अमळनेर, १९८६
३५. भाषेचा शिक्षक, 'शिक्षण संक्रमण', मे १९८६
३६. बालसाहित्याचा राजा : राजा मंगळवेढेकर, 'साधना', दिवाळी १९८६
३७. वैश्विक अनुभवाचा आविष्कार ['गर्जा जयजयकार – एक जागरण' या पुस्तकात समाविष्ट] चेतश्री, अमळनेर, १९८७
३८. पु. भा. भावे यांच्या निर्वासितविषयक कथा, 'मेनका' सप्टेंबर १९८७
३९. वा. गो. आपटे : एक उपेक्षित निबंधलेखक – 'रुची–अभिरुचीत' समाविष्ट १९८९.
४०. सूर्य मध्यरात्रीचा [गणेश चौधरी यांच्या एकांकिकांची समीक्षा] 'रुची अभिरुचीत' समाविष्ट १९८९
४१. साने गुरुजींचे कादंबरीलेखन : एक चिकित्सा ['रुची अभिरुची'त समाविष्ट] १९८९
४२. 'पत्रसेतू', 'स्मृतिपूजा' आणि पु. भा. भावे, 'रुची अभिरुची'त समाविष्ट १९८९
४३. परिपूर्तीतील ललित लेख : एक चिकित्सा, 'साहित्य सूची' फेब्रुवारी १९९१.
४४. काही रंग : काही रेषा – [डॉ. निर्मलकुमार फडकुले यांच्या लेखसंग्रहाची जीवनवादी समीक्षा] 'आलोचना' मार्च १९९१.
४५. माझी माय सरसोती : एक आस्वाद, 'गाणं', दिवाळी अंक, १९९१
४६. मंथन : मराठी निबंधाच्या स्थितीगतीचे दर्शन ['मंथन' या निबंधसंग्रहाची समीक्षा] 'साहित्य सूची' जुलै १९९२
४७. पु. भा. भावे यांच्या जीवननिष्ठा [अप्रकाशित निबंध]
४८. कुंभारकला ['कारागिरी' या पुस्तकात समाविष्ट] महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य माला, पुष्प २९, १९९२.

४९. कवितेचे अध्ययन : काही दिशा ['काव्यरत्नावली' या पाठ्यपुस्तकाचे प्रास्ताविक, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, प्रथम वर्ष कला, पाठ्यपुस्तक – प. आ. १९९२]
५०. अयोध्याकांड आणि दोन कविता, 'धनाश्री' १९९२–९३
५१. 'घराबाहेर' : एक अभिजात स्वरूपाचे नाटक [कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, भडगाव येथे चर्चासत्रात वाचलेला निबंध. १९९३
५२. संशोधक : दुर्गा भागवत, 'साहित्य सूची', एप्रिल १९९४.
५३. संहितासंपादनाची गुरुकिल्ली : 'आमची श्रीवाणी', ऑगस्ट १९९४
५४. झडीचे दिवस आणि अक्षरांचे घरी : 'साहित्य सूची', ऑक्टोबर १९९४
५५. एका मुस्लिम मराठी कवीच्या व्यथा, 'लोकमत–साहित्यजत्रा', ५–२–९५
५६. वृत्तपत्रासाठी लेखन : 'साहित्य सूची' मार्च १९९५
५७. एक मौलिक संशोधन : 'आमची श्रीवाणी', मार्च १९९५
५८. खुसखुशीत शैलीयुक्त विनोदी लेख : महाराष्ट्र साहित्य पत्रिका, अंक २७४, जुलै १९९५

**[च] ललित लेख**

१. सुखविणारे शब्द, 'लोकसत्ता', २३–१–५९
२. चंचल, पण नम्र सेवक, 'लोकसत्ता', ५–४–६०
३. एक अपरिहार्य कला, 'लोकसत्ता', ३–७–६१
४. वाहनचालक, 'लोकसत्ता', १–२–६१
५. पत्रांचे फाईल, 'जनशक्ती', दिवाळी अंक १९६२
६. कलियुगातील विश्वकर्मा, 'राष्ट्रसेवक', दिवाळी अंक, १९६२
७. विकत घेतलेले अनुभव, 'नवजागृती', दिवाळी अंक, १९६३
८. कपड्यांचे व्यक्तिमत्त्व, 'जनशक्ती', दिवाळी अंक, १९६३
९. मनुष्य : एक तक्रारप्रिय प्राणी, 'बातमीदार', दिवाळी अंक, १९६३
१०. दोन शब्दांविषयी चार शब्द, 'जनशक्ती', दिवाळी अंक, १९६४
११. खुदपसंत, 'धनाश्री', १९६४
१२. दुपारची झोप, 'साप्ताहिक गावकरी', १६–१–६५
१३. धक्का, 'जळगाव समाचार', दिवाळी अंक, १९६७
१४. काचमहल, 'धनाश्री', १९७३
१५. मुसळधारी माणसं, 'दिलासा', दिवाळी अंक, १९८०



१६. चुंबळ, 'लोकमत', १२–१–८८
१७. डोळे, 'लोकमत', १६–१–८८
१८. श्रीराम! श्रीराम! 'लोकमत', ९–२–८८
१९. धुलिकण, 'लोकमत', २३–२–८८
२०. तिसरा अपघात, 'लोकमत', २८–१०–८९
२१. मोर्चा, 'लोकमत', १८–२–९५
२२. बसकरी 'लोकमत', ४–३–९५
२३. ब्रम्हगाठ, 'लोकमत', ३–६–९५

**[छ] कथा**

१. प्रीतीचे पडसाद, 'बातमीदार', २०–३–६०
२. जखीण, 'महानुभाव', नोव्हेंबर, १९७०
३. कशिदा, 'जळगाव समाचार', दिवाळी अंक १९७२ [लघुत्तम कथा स्पर्धेतील दुसऱ्या क्रमांकाची कथा]
४. माते, मला आशीर्वाद दे!, स्वातंत्र्यदिन रौप्य महोत्सव स्मरणिका, जळगाव जिल्हा काँग्रेस कमेटी, १९७२–७३
५. आत्माहुती, 'बातमीदार', दिवाळी अंक, १९७२
६. मळभ, 'पिसारा', जून १९७८

**[ज] एकांकिका**

१. काय सांगितलं तिने? [जयवंत दळवींच्या 'बळी' या कथेवर आधारित, नाट्यदर्पण, दिवाळी १९९१]
२. सत्त्वपरीक्षा, 'धनाश्री' १९७१–७२
३. हस्तिदंती गुलाबाचं फूल [अप्रकाशित] व. पु. काळे यांच्या 'सुवर्णतुला' या कथेवर आधारित.
४. अल्बम [अप्रकाशित]

**[झ] भाषणे**

१. काव्यरत्नावलीकार नानासाहेब फडणीस १९७९ [नूतन मराठा कॉलेज, जळगाव]
२. 'आनंद'कर्ते वासुदेव गोविंद आपटे, २–२–८० [आकाशवाणी जळगाव केंद्र]
३. बहिणाबाई चौधरी यांचे काव्य, १३–१–८६ [आकाशवाणी, जळगाव केंद्र]
४. पर्यावरण आणि प्रगती, यावल काँग्रेस कमिटी, युवक शिबीर, १९८७
५. तोडू समस्यांच्या सीमा, २०–१०–८८ [आकाशवाणी, जळगाव केंद्र]



Scanned with OKEN Scanner

६. प्रजासत्ताकानंतरची आव्हाने, १६–१–८९ [आकाशवाणी, जळगाव केंद्र]
७. कलाविष्कार, सप्तपुट ललित कलाभवन, खिरोदा १९९२

[ट] बालसाहित्य

**बालकादंबऱ्या**

१. बेगड, प्रबोधिनी प्रकाशन, खिरोदा, प. आ. १९७५
२. पाचामुखी पांडू, चेतश्री प्रकाशन, अमळनेर, प. आ. १९८५
[राज्य सरकारचा साने गुरुजी पुरस्कार प्राप्त]

**बालकथा**

१. सावळ्याजी रे सावळ्याजी [संस्कार वाचन माला इ. ३ री, पुस्तक एकमध्ये समाविष्ट]
२. बुटका राजपुत्र आणि दगडी राजवाडा [संस्कार वाचनमाला इयत्ता ३ री, पुस्तक दोनमध्ये समाविष्ट]
३. भुताची ज्योत – समाज शिक्षण माला क्र. ४५६, सप्टेंबर १९८८ मध्ये प्रसिध्द.
४. तुळशीबाग – 'भुताची ज्योत' मध्ये समाविष्ट
५. करणी, आनंद, दिवाळी अंक, १९८२
६. मेघनाद – 'किशोर' मे १९८२
७. आंब्याचं झाड – 'आंब्याचं झाड', अनघा प्रकाशन, ठाणे या पुस्तकात समाविष्ट १९९२
८. गुन्ह्याचा शोध, खेळगडी, दिवाळी १९९२ मध्ये प्रसिध्द.
९. फुलपाखरांची देणगी – आकाशवाणी जळगाव केंद्रावरून प्रसारित.
१०. सोन्याचा दिनू – 'अबब ! हत्ती', जुलै १९९४
११. बूटघरातील लाल्या – 'अबब! हत्ती', एप्रिल १९९४
१२. जरीची टोपी – 'अबब ! हत्ती', नोव्हे–डिसें–१९९४
१३. राईस प्लेट आणि केळीचं पान – अप्रकाशित.

**बालनाट्ये**

१. भांगेतील तुळस – 'महिला प्रगती', दिवाळी अंक १९९१ मध्ये प्रसिध्द.
२. धुडकू धमाले – आकाशवाणी जळगाव केंद्रावरून प्रसारित.

✧ ✧



Scanned with OKEN Scanner



**डॉ. श. रा. राणे**

धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर, येथील निवृत्त उपप्राचार्य, प्रपाठक व मराठी विभागप्रमुख;

पुणे विद्यापीठ [भूतपूर्व], उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ व का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था, धुळे येथील संशोधक मार्गदर्शक; प्रसिध्द समीक्षक, ललित निबंधलेखक, नाटककार व बालसाहित्यकार; डॉ. श. रा. राणे यांनी संशोधनक्षेत्रात त्यांना आलेल्या अनुभवांच्या आधारे 'मराठी साहित्यसंशोधन : स्वरूप आणि दिशा' या पुस्तकाचे लेखन केले आहे.

सुबोध शैलीमुळे व सर्वसमावेशक माहितीमुळे मराठीचे संशोधन करणाऱ्या अभ्यासकांस या पुस्तकामुळे निश्चित दिशा मिळू शकेल.

Scanned with OKEN Scanner